# १

# पेशवाईचा उदय: पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ

**घटक रचना :**


१.० उद्दिष्टये

१.१ प्रस्तावना

१.२ बाळाजी विश्वनाथाचा उदय

१.३ बाळाजी विश्वनाथाची कामगिरी

१.४ मराठा मंडळाची निर्मिती

१.५ बाळाजी विश्वनाथाची योग्यता

१.६ सारांश

१.७ प्रश्न

१.८ संदर्भ


## १.० उद्दिष्टये

१. पेशवाईच्या उदयाची पार्श्वभूमी समजावून घेणे.

२. पेशवा बाळाजी विश्वनाथांच्या कार्याचे मूल्यांकन करणे.

३. बाळाजी विश्वनाथाची योग्यता अभ्यासणे.

## १.१ प्रस्तावना

मुघल बादशाह औरंगजेब याचा इ.स. १७०७ मध्ये मृत्यू झाल्यानंतर मुघल- मराठा संघर्ष संपुष्टात आला होता. दरम्यानच्या काळात छ. संभाजी महाराजांचे पुत्र शाहू यांची मुघलांच्या कैदेतून सुटका झाल्यानंतर त्यांचे स्वराज्यात आगमन होताच त्यांनी स्वराज्याचा खरा वारसदार आपणच असल्याचे जाहीर केले. त्यामुळे महाराणी महाराणी ताराबाईने राजपुत्र शाहूला स्वराज्याचा वारसदार होण्यास विरोध केला, त्यातून शाहू व महाराणी ताराबाई यांच्यात मराठयांच्या राजगादीच्या वारसदारावरून संघर्ष निर्माण झाला. या संघर्षाची परिणीती अंतर्गत यादवीमध्ये होऊन मराठयांच्या स्वराज्याचे विभाजन दोन राजगाद्यांमध्ये झाले. त्यापैकी साताऱ्याच्या राजगादीचा वारसदार शाहू महाराज तर कोल्हापूरच्या राजगादीचा वारसदार महाराणी महाराणी ताराबाईंचा पुत्र दुसरा शिवाजी हे झाले. यातूनच छ.शाहू महाराज – महाराणी ताराबाई संघर्ष संपुष्टात येण्यास मदत झाली. या सत्तासंघर्षात

बाळाजी विश्वनाथाची भूमिका महत्त्वाची ठरली. कारण छ. शाहू महाराजांची मुघलांच्या कैदेतून सुटका झाल्यानंतर त्यांचे स्वराज्यात आगमन होण्यासाठी बाळाजी विश्वनाथाचे सहकार्य त्यांना लाभले होते. बाळाजी विश्वनाथांनी महाराणी ताराबाईचे खरे समर्थक धनाजी जाधव यांना स्वराज्याचे खरे वारसदार शाहू महाराज असल्याचे पटवून दिले व त्यांना शाहू महाराजांच्या पक्षात आणण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे शाहू महाराजांचा बाळाजी विश्वनाथांवरील विश्वास वाढत गेला. त्यातच महाराणी महाराणी ताराबाईच्या पक्षातील मातब्बर सरदारांना आपल्या मुत्सद्देगिरीने छ. शाहू महाराजांच्या पक्षात आणण्यामध्ये तर काही सरदारांचा प्रत्यक्ष लढाईत बंदोबस्त करून शाहू महाराजांना स्वराज्याचा उत्तराधिकारी बनविण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्यामुळे छ. शाहू महाराजांनी १७१३ मध्ये पेशवेपदाची वस्त्रे बहाल करण्यात आली. येथूनच स्वराज्यात पेशवाईचा उदय झाला.

## १.२ बाळाजी विश्वनाथांचा उदय

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य नामशेष करण्याची औरंगजेबाची इच्छा शेवटपर्यंत पूर्ण झाली नाही. मुघल सम्राट आझमशहाने १८ मे १७०७ ला छत्रपती शाहूंची मुघलांच्या कैदेतून सुटका केली होती. जेव्हा छ. शाहू महाराज महाराष्ट्रात आले, तेव्हा त्यांना अनेक प्रतिष्ठित सरदार येऊन मिळाले. या सरदारांपैकी त्यांना बाळाजी विश्वनाथ भट या कर्तबगार पेशव्याची अतिशय मदत झाली. बाळाजी विश्वनाथ यांचा जन्म १६६० मध्ये चित्पावन ब्राह्मण भट कुटुंबात झाला. त्यांचे घराणे मूळ कोकणातील श्रीवर्धन येथील होते. बाळाजीचे पणजोबा महादजी विसाजी देशमुख हे भट घराण्यातील पहिले ज्ञात पुरुष होते. या घराण्याकडे दंडाराजापुरी आणि श्रीवर्धन या परगण्यांची देशमुखी ही वंशपरंपरागत चालत आलेली होती. ही देशमुखी इ.स.१४०० ते इ.स. १६०० पर्यंत निरंतर चालू होती. असे इतिहासाचार्य वि.का.राजवाडे म्हणतात, तर रियासतकार सरदेसाई यांचे मत असे आहे की, ही देशमुखी त्यांना इ.स. १४७८ च्या सुमारास मिळाली असावी. रियासतकार पुढे अशी ही शक्यता व्यक्त करतात की, बाळाजी विश्वनाथांचे आजोबा व वडील दोघेही छ.शिवाजी महाराजांच्या सेवेत असावेत.

munotes.in

बाळाजीच्या वडिलांचे नाव विश्वनाथ होते, त्यांना एकूण चार भाऊ होते कृष्णाजी, जानोजी, विठ्ठल व रुद्राजी. या घराण्याची देशमुखी छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीपर्यंत सुस्थितीत होती. परंतु संभाजी महाराजांच्या वधानंतर (१६८९) जिंजिराच्या सिद्धींनी या घराण्याचा छळ सुरू केल्यामुळे बाळाजीला सुरक्षेच्या कारणामुळे आपल्या कुटुंबीयांसोबत साताऱ्याला आश्रय घ्यावा लागला होता. आपल्या कुटुंबाच्या चरितार्थाकरिता त्यांना नौकरी करणे क्रमप्राप्त होते. बाळाजी विश्वनाथाने आपल्या कार्याची सुरुवात कारकूनी व्यवसायापासून केली होती. रामचंद्रपंत अमात्य यांच्याकडे त्यांनी कारकुनाचे कार्य केले होते. त्याच काळात त्यांचा संपर्क धनाजी जाधवांबरोबर आला होता. धनाजीची त्याच्यावर मर्जी बसल्यामुळे त्याला दिवाण म्हणून आपल्या सेवेत घेतले. बाळाजी विश्वनाथाने संताजी व धनाजी यांच्या गनिमी काव्याच्या युद्धतंत्राचा जवळून अनुभव घेतलेला होता. महाराणी महाराणी ताराबाईच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी धनाजी जाधव यांच्याबरोबर काही लढायांमध्ये सहभाग घेतलेला होता. त्याचेच फळ म्हणून त्यांना पुण्याची सुभेदारी मिळालेली होती.

छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात म्हणजे १६९९ ते १७०२ पर्यंत ते पुणे प्रांताचे सुभेदार होते आणि त्यानंतर १७०४ ते १७०७ पर्यंत औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत दौलताबादचे सुभेदार होते. महाराणी महाराणी ताराबाईच्या काळात दौलताबादचे सुभेदार असताना त्यांनी  सेनापती धनाजी जाधव यांच्याबरोबरचे संबंध अधिक घनिष्ट स्वरूपाचे केले होते. सेनापती धनाजी जाधव यांच्या मर्जीमुळे हळूहळू त्यांचा प्रवेश मराठयांच्या राजकारणात झाला. पुढे शाहू महाराजांचे स्वराज्यात आगमन झाल्यानंतर त्यांना स्वराज्याचे उत्तराधिकारी बनविण्यामध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. परिणामी त्यांची नियुक्ती पेशवेपदी करण्यात आली होती. ती त्यांनी आपल्या स्वकर्तृत्वाने सिद्ध करून दाखवली. बाळाजी विश्वनाथ यांनी महाराणी ताराबाईंच्या पक्षातील मातब्बर सरदारांना छ. शाहू महाराजांच्या पक्षात वळविण्याचे महत्त्वाचे कार्य केले होते. त्यामध्ये धनाजी जाधव, खंडो बल्लाळ आणि कान्होजी आंग्रें सारख्या पराक्रमी सरदारांचा समावेश होता. त्यामुळे शाहू महाराजांचा छत्रपती होण्याचा मार्ग मोकळा झाला होता. सेनापती धनाजी जाधव आणि सरखेल कान्होजी आंग्रे यांच्यासारखे पराक्रमी सरदार महाराणी ताराबाईच्या पक्षात असल्यामुळे त्यांनी बलाढ्य अशा मोगल सत्तेशी संघर्ष करून स्वराज्याचे रक्षण केले होते. मराठयांचे आरमार प्रमुख सरखेल कान्होजी आंग्रे यांनी केवळ मराठयांच्या आरमाराचे रक्षण केले असे नाही तर त्यांनी पश्चिम किनारपट्टीवर सिद्धी, पोर्तुगीज व इतर परकीय सत्तांशी संघर्ष करून आपल्या पराक्रमाच्या जोरावर कोकणच्या प्रदेशावर आपले वर्चस्व निर्माण केले होते. त्यांनी कोकणातील परकीय व मुघल फौजेचा संयुक्तपणे सामना करून त्यांचा पराभव केला होता आणि मराठयांची राजधानी रायगड पुन्हा मुघलांच्या ताब्यातून घेण्याची किमया केली होती. कान्होजी आंग्रेचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी छत्रपती शाहू महाराजांनी पेशवा बहिरोपंत पिंगळे यांच्याकडे सोपवली होती, परंतु कान्होजीने त्याचा पराभव केलेला होता. अशावेळी छत्रपती शाहू महाराजांनी कान्होजी आंग्रे यांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी बाळाजी विश्वनाथ यांच्याकडे दिली होती, बाळाजी विश्वनाथ यांना कान्होजीच्या पराक्रमाची प्रचिती आली होती. त्यामुळे कान्होजीला पराभूत करणे सोपे नव्हते. त्यांनी पेशवेपदाच्या मोबदल्यात कान्होजीचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी स्वीकारली होती. छत्रपती शाहू महाराजांनी बाळाजीला पेशवेपदाची वस्त्रे इ.स. १७१३ मध्ये बहाल केली. त्यानंतर बाळाजीने कान्होजीबरोबर थेट संघर्ष करणे टाळून आपल्या मुत्सद्देगिरीच्या जोरावर कान्होजी आंग्रे यांना छत्रपती शाहू महाराजांच्या पक्षात आणण्यात त्यांना यश आले. ही बाब बाळाजीच्या आणि छ. शाहूंच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची बाब होती. याच घटनेमुळे महाराणी ताराबाईंचा पक्ष कमजोर होऊन त्यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. छ. शाहू महाराजांच्या पक्षात आल्यानंतर आंग्रेला आरमार प्रमुख म्हणजे सरखेलपद दिले. आंग्रे सारखे मातब्बर सरदार छ. शाहूंच्या पक्षाकडे वळाल्यामुळे इतर अनेक सरदार हळूहळू छ. शाहू महाराजांच्या पक्षात येण्यास सुरुवात झाली. परिणामी त्यांची राजकीय स्थिती अधिकच बळकट झाली होती याचे श्रेय बाळाजी विश्वनाथ यांना दिले जाते.

## १.३ बाळाजी विश्वनाथांची कामगिरी

मुघल बादशाह औरंगजेबच्या मृत्यूनंतर बहादुरशहा दिल्लीच्या राजगादीवर विराजमान झाला. परंतु त्याला फारसे आयुष्य लाभले नाही. त्यांच्या मृत्यूनंतर जाहंदरशहा मुघल

सम्राट झाला. त्याच्या कारकिर्दीत सय्यद अब्दुल्ला व सय्यद हुसेन या सय्यद बंधूचे दिल्लीच्या राजकारणात वर्चस्व निर्माण झाले होते. सय्यद बंधूंनी दिल्लीच्या राजकारणीची सूत्रे हाती घेऊन जुल्फीकारखानाला ठार मारून फारूख्सियार याला राजगादीवर बसवले. परंतु दिल्लीच्या राजकारणात फारूख्सियर यांना निजाम मुल्क हा प्रतिस्पर्धी होता, म्हणून सय्यद बंधूंनी बादशाच्या मदतीने निजाम- उल- मुल्कला दक्षिणेच्या सुभेदारीची जबाबदारी देऊन त्यांची रवानगी दक्षिणेत केली. दक्षिणेत येताच निजामाने मराठयांचे अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली, त्यासाठी त्यांनी निंबाळकर, चंद्रसेन जाधव यांना छ. शाहूंच्या विरोधात चिथावणी देण्यास सुरुवात केली. याच काळात सय्यद बंधूंच्या दिल्लीच्या राजकारणातील हस्तक्षेपावरून मुघल बादशहाने सय्यद हुसेन यांना दक्षिणेची सुभेदारी देऊन त्यांना दक्षिणेत पाठवले व निजामाला मुरादाबाद येथे पाठवले होते. त्यामुळे मराठयांना त्यांच्या विरोधात कारवाया करणाऱ्या निजामाला रोखण्यासाठी प्रयत्न करावे लागले नाही. याच घटनेमुळे मराठयांचे दिल्लीतील वजन वाढले व दक्षिणेतील निजामाचा हस्तक्षेप समाप्त झाला होता.

## सय्यद हुसेन आणि मराठे संबंध

मुघल बादशाह फारूख्सियर याने सय्यद बंधूपैकी सय्यद हुसेनची नियुक्ती दक्षिणेचा सुभेदार म्हणून केली. तो दक्षिणेत येण्यापूर्वीच त्याचा काटा काढायचा कट रचला होता, पण तो उघड झाल्याने या कटात सामील असलेले दाऊदखान पन्नीला पराभूत करून त्याला ठार मारले. याच काळात जवळपास दोन वर्षे त्यांनी दक्षिणेत असताना मराठयांच्या आक्रमक हालचालींना पायबंध घालण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात त्याला फारसे यश आले नाही. दरम्यानच्या काळात सय्यद हुसेनचा बंधू अब्दुल्लाचे दिल्लीतील स्थान अस्थिर झाल्याने त्याने आपल्या मदतीसाठी आपला भाऊ सय्यद हुसेन याला दिल्लीला बोलावले आणि या कठीण काळात आपले स्थान मजबूत करण्यासाठी त्यांनी मराठयांची मदत मागितली होती. या संधीचा फायदा घेत नंतरच्या काळात मराठयांचा उत्तरेतील राजकारणाचा मार्ग मोकळा झाला. मराठयांनी सय्यद बंधूंना मदत देण्याअगोदर त्यांच्याबरोबर तह करून पुढील अटी ठेवल्या होत्या. मराठयांचे सहकार्य मिळावे म्हणून सय्यद बंधूंनी मराठयांशी शंकराजी मल्हार नरगुंदकर यांच्या मदतीने तह केला. या तहातील तरतुदी पुढील प्रमाणे होत्या.

१. छ.शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा पूर्ण प्रदेश व किल्ले शाहू महाराजांना मिळावेत.

२. खानदेश, वऱ्हाड, गोंडवाना, हैदराबाद व कर्नाटक या भागात मराठयांनी नव्याने जिंकलेला प्रदेश मराठयांकडेच द्यावा.

३. दक्षिणेतील ६ मुघल सुभ्यातून चौथाई, सरदेशमुखी गोळा करण्याचा अधिकार मिळावा.

४. मुघल बादशाहने छ. संभाजी महाराजांचे पुत्र शाहू, पत्नी महाराणी येसूबाई व इतरांना मुघलांच्या कैदेतून सुटका करावी.

वरील तहास छ. शाहू महाराजांनी १ ऑगस्ट १७१८ रोजी मान्यता दिली. पुढे मराठयांनी बाळाजी विश्वनाथाच्या नेतृत्वाखाली दिल्लीच्या दिशेने वाटचाल करण्याचा निर्धार केला होता. या तहाचा परिणाम असा झाला की, शाहू महाराजांना कायदेशीररित्या छ. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा वारस म्हणून मान्यता मिळाली. तसेच या तहामुळे मराठयांना

चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मिळाल्या होत्या. नंतरच्या काळात मराठयांचे दिल्ली दरबारात वर्चस्व निर्माण झाले होते.

## बाळाजी विश्वनाथांची दिल्ली मोहीम

सय्यद बंधू आणि मराठे यांच्यामध्ये झालेल्या तहास मुघल बादशहा फारूखसियर याची मान्यता नव्हती, त्यामुळे बाळाजी विश्वनाथ यांना सय्यद बंधूंशी केलेल्या तहास मुघल बादशाहाची मान्यता मिळविणे अत्यावश्यक होते. त्यासाठी बाळाजी विश्वनाथ यांनी दिल्लीला मोहीम हाती घेतली. या मोहिमेसाठी त्यांनी पंधरा हजार सैन्य सोबत घेतले होते. सोबत खंडेराव दाभाडे, संताजी भोसले, उदाजी पवार सारखे मातब्बर सरदार घेऊन फेब्रुवारी १७१९ मध्ये बाळाजी विश्वनाथ दिल्ली येथे पोहोचले होते. मराठे- सय्यद बंधू यांच्या प्रबळ सैन्याची कुमक लक्षात घेऊन मुघल बादशाह फारूख्सियर यांनी मराठयांशी समझोता करण्याची भाषा केली. परंतु या तहाला मान्यता दिल्याशिवाय दिल्लीचा वेढा उठवला जाणार नसल्याचे मराठयांनी कळविले, तेव्हा बादशाहने मराठयांशी व सय्यद बंधूशी चकमक घडून आणली. त्यामध्ये दोन हजाराच्या आसपास सैन्य धारातीर्थी पडले होते. आक्रमक झालेल्या मराठयांनी सय्यद बंधूच्या साह्याने मुघल बादशहाची उचलबांगडी केली आणि महंमदशाहाला गादीवर बसवले. इ.स. १७४८ पर्यंत मुघल बादशहा म्हणून महंम्मदशहा कार्यरत होता. मार्च १७१९ मध्ये सय्यद बंधूंनी मुघल बादशहाकडून मराठयांना त्यांचे हक्क मिळवून दिले होते. चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा, येसूबाईंची कैदेतून सुटका या गोष्टी पदरात पाडून बाळाजी विश्वनाथाने छ. शाहू महाराजांचे मन जिंकले होते. बाळाजी विश्वनाथाच्या मुत्सद्देगिरी आणि पराक्रमामुळे मराठयांना चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा तर मिळाल्याच, परंतु स्वराज्याचा उत्तराधिकारी असलेल्या छ. शाहू व महाराणी येसूबाई आणि इतर मराठी सरदारांची सुखरूप सुटका करून घेतल्यामुळे छ. शाहुमहाराजांच्या दरबारी बाळाजीचे वजन वाढले होते. मराठयांनी बाळाजीच्या सुरुवातीच्या काळापर्यंत दक्षिणेकडचे राजकारण करण्यामध्ये आपले सर्वस्वपणाला लावले होत,परंतु बाळाजी विश्वनाथाच्या दिल्ली मोहिमेनंतर मराठयांनी दिल्लीच्या राजकारणामध्ये सक्रिय सहभाग घेतला होता. दक्षिणेतील मुघलांच्या प्रदेशातून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा वैधानिक अधिकार मराठयांना प्राप्त झाला होता. मराठयांच्या दृष्टीने ही घटना अत्यंत महत्त्वाची होती. इतिहासकार सरदेसाईंनी मराठयांना मिळालेल्या या सनदाची तुलना लॉर्ड वेलस्लीच्या तैनातीफौजेबरोबर केली आहे. या हक्कामुळे मराठयांच्या स्वराज्याचा विस्तार झाला होता, परंतु मराठयांनी पुन्हा त्यांचे सार्वभौमत्व स्थापन केले नाही. इतिहासकार शेजवळकर यांनी सुद्धा या संदर्भात बाळाजी विश्वनाथाच्या स्वार्थी दृष्टिकोनावर बोट ठेवताना असे म्हटले होते की, या सनदामुळे मराठयांनी आपले साम्राज्याअंतर्गत साम्राज्य मिळविले.

### चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा

बाळाजी विश्वनाथांनी दिल्लीच्या मुघल बादशहाकडून सय्यद बंधूंच्या सहकार्याने चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा प्राप्त करून घेतल्यामुळे दक्षिणेकडील मुघली प्रदेशातून मराठयांना उत्पन्नाचे मार्ग प्राप्त झाले म्हणून या सनदांचे महत्त्व आहे. चौथाई म्हणजे उत्पन्नाचा चौथा भाग होय. मुघल प्रदेशातून मराठयांना उत्पन्नाचा चौथा भाग चौथाईच्या रूपाने मिळत

होता. चौथाईच्या मोबदल्यात मुघली मुलखात कोणताही उपद्रव केला जात नव्हता. अन्यथा मराठे ज्या प्रदेशावर हल्ले करत असत तेथील जमीन महसुलीचा चौथा हिस्सा प्राप्त करत होते, ही पद्धत रामनगरच्या कोळी राजाने सुरू केली होती. पोर्तुगीज त्या मोबदल्यात त्यांना चौथाई देत असे. तर सरदेशमुखी ही देशमुख या वतनदारांना रयतेकडून गोळा केलेल्या उत्पन्नाचा दहावा भाग कर म्हणून हक्काने मिळत असे.

परंतु नंतरच्या काळात राजांनीच शत्रूच्या मूलखातून कर घेण्यास सुरुवात केली होती. स्वराज्याच्या उत्पन्नाचा तो मार्ग होता. औरंगजेब व त्यानंतरच्या मुघल बादशहानी त्यास मान्यता दिली नव्हती. बाळाजी विश्वनाथ यांच्या कारकिर्दीत मुघलांकडून त्यास मान्यता मिळवून दक्षिणेतील सहा मुघल सुभ्यातून मराठयांना हा उत्पन्नाचा मार्ग मिळवून खुला झाला होता. बाळाजीची ही अत्यंत महत्त्वाची कामगिरी होती. बाळाजीच्या मध्यस्तीने मुघलांकडून स्वराज्याच्या वारसदारांची सुटका करून शाहू महाराजांना मराठयांच्या स्वराज्याचे कायदेशीर वारसदार बनवले व कोल्हापूरच्या राजगादीचे महत्व कमी केले. या घटनेपासून बाळाजी विश्वनाथ यांचे महत्त्व प्रचंड वाढले होते. मुघलांच्या कैदेतून येसूबाई व इतर मराठा सरदारांची सुटका बाळाजी विश्वनाथ यांनी सय्यद बंधूशी केलेल्या तहानुसार झाली होती. महाराणी येसूबाई व इतर मराठा सरदारांची मुघलांच्या कैदेतून सुटका करणे, चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मिळविणे, मराठयांना उत्तरेच्या राजकारणात स्थान मिळवणे या उद्देशाने बाळाजीची दिल्ली मोहीम महत्वाची होती. छ. शाहू महाराज आणि महाराणी येसूबाईची (शाहुमहाराजांच्या मातोश्री) तब्बल १२ वर्षांनी भेट झाली झाली होती. मराठयांच्या दृष्टीने या घटनेला अत्यंत महत्त्व आहे. बाळाजी विश्वनाथाने या कामी बजावलेल्या भूमिकेवर छत्रपती शाहू महाराज अतिशय संतुष्ट होते.

## १.४ मराठा मंडळाची निर्मिती

दिल्लीच्या मुघल बादशहाकडून स्वराज्याच्या सनदा प्राप्त झाल्यानंतर छत्रपती शाहू महाराजांनी कायदेशीर मान्यता मिळून ते स्वराज्याचे खरे उत्तर अधिकारी झाले होते. स्वराज्यामध्ये स्थिरता प्राप्त झाल्यानंतर प्रशासनामध्ये गतिमानता आणि सैन्य व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी बाळाजी विश्वनाथ यांनी अष्टप्रधान मंडळा ऐवजी मराठा मंडळाची निर्मिती केली होती. छत्रपती राजाराम पर्यंत अष्टप्रधान मंडळ अस्तित्वात होते, परंतु त्यानंतर अष्टप्रधान मंडळ कमकुवत होत गेले. मराठा सरदारांनी स्वतंत्रपणे आपला दरारा निर्माण केलेला होता. ही वजनदार मंडळी अष्टप्रधान मंडळाच्या नियंत्रणात राहणे शक्य नाही हे लक्षात येत बाळाजी विश्वनाथ यांनी मराठा मंडळाची निर्मिती करण्याचे ठरविले. त्यानुसार नवी संयुक्त राज्यव्यवस्था छत्रपती शाहू महाराजांच्या नेतृत्वाखाली प्रस्थापित केली होती. या संदर्भात न्या. रानडे असे म्हणतात की, बाळाजी विश्वनाथाने मराठयांची स्थिती नीट पारखली व मराठयांची सत्ता टिकवुन ती वाढविण्यासाठी जो उपाय काढला त्याचे अंतर्बाह्य स्वरूप भिन्न होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या परंपरेला धरून परकीय सत्तेशी एक दिलाने लढेल असा मोठा बलिष्ठ पुढाऱ्यांचा संघ निर्माण करणे हे त्या उपायाचे बाह्य स्वरूप होते. या सरदारांच्या ताब्यातील प्रदेशात ज्याचा तो मुलुख त्याने त्या प्रदेशात आपली सत्ता गाजवावी. मात्र सर्व विभागातील सरदारांची कुलमुखत्यारी समान दर्जाची असावी ही त्या उपायाची दुसरी बाजू होती. न्या. रानडे यांनी मराठा मंडळाच्या निर्मितीची योजना उत्तम असल्याचे म्हटले आहे.

या योजनेचा भावी काळात मराठयांना फायदा आणि तोटा दोन्ही झाले होते. साम्राज्य विस्तारासाठी त्याचा फायदा झाला, परंतु कुलमुखत्यारीमुळे सरदारांची स्वतंत्र वृत्ती निर्माण झाल्यामुळे ते सत्ता प्रमुख म्हणजे छत्रपतीं बरोबर फटकुन वागू लागले होते. स्वराज्याच्या संघर्षाच्या कालखंडातील २५ वर्षाच्या मुघली सत्तेशी संघर्षाचा विचार करता कठीण काळात मराठयांनी प्राणपणाने स्वराज्याचे रक्षण केले होते, त्या दृष्टीने मराठा सत्तेला छत्रपती नसतानासुद्धा मातब्बर सरदारांनी वैयक्तिक महत्त्वाकांक्षेला महत्त्व न देता स्वराज्याचे हित जोपासले होते. सेनापती संताजी, धनाजी, कान्होजी या बलाढ्य सरदारांच्या पराक्रमावरून हे लक्षात येते. कठीण समयी त्यांनी जर वैयक्तिक स्वार्थ बघितला असता, तर स्वराज्य लयाला गेले असते. परंतु तसे झाले नाही. या परिस्थितीचे अवलोकन केल्यास मराठा मंडळाचे महत्त्व लक्षात येते.

बाळाजी विश्वनाथाच्या कामगिरीचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. छ. शाहू महाराजांच्या सुटकेसाठी प्रयत्न.
२. कैदेतून सुटका झाल्यानंतर त्यांना पाठबळ देणे.
३. धनाजी जाधव, कान्होजी आंग्रे यांना छ. शाहू महाराजांच्या पक्षात वळविणे.
४. खेडच्या लढाईची व्यूहरचना करून त्यामध्ये छ. शाहू महाराजांच्या पक्षाच्या विजयात हातभार लावणे.
५. मुघलांकडून छ. शाहू महाराजांच्या पक्षाला वैधानिक मान्यता मिळवली.
६. महाराणी येसूबाई, छ. शाहूची पत्नी सावित्रीबाई व इतर मराठा सरदारांची कैदेतून सुटका.
७. सातारच्या गादीवर छत्रपती शाहू महाराज यांना बसवले.
८. मुघलांकडून चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मिळविल्या.
९. मराठा मंडळाची निर्मिती केली.
१०. उत्तरेकडे साम्राज्यविस्ताराचे नवे कार्यक्षेत्र उपलब्ध केले.
११. मराठा राज्याच्या उत्पन्नाचा नवा मार्ग मिळविला व मराठयांची प्रतिष्ठा वाढवली.
१२. मराठा सरदारांपुढे दिल्लीच्या राजकारणाचा आदर्श ठेवला व त्यांना नवी दृष्टी दिली.

पहिला पेशवा म्हणून बाळाजी विश्वनाथांची पेशवेपदाची कारकीर्द १७१३ पासून जरी सुरू झाली असली तरी त्यापूर्वी त्यांनी पुणे आणि दौलताबाद प्रांताचे सुभेदार म्हणून जबाबदारी स्वीकारली होती. सुभेदार म्हणून त्यांची कामगिरी वाखाणण्याजोगी होती. त्यांच्या कारकीर्दीमधील महत्त्वाचे पर्व हे १७१३ पासून सुरू होते. पेशवे पदाची वस्त्रे स्वीकारल्यानंतर त्यांनी शाहू महाराजांचे स्थान बळकट करण्यासाठी व त्यांना स्वराज्याचे कायदेशीर उत्तराधिकारी म्हणून मान्यता मिळविण्यासाठी दिल्ली दरबारी केलेल्या मुत्सद्देगिरीमुळे व मुघलांकडून मिळवलेल्या चौथाई सरदेशमुखीच्या सनदांमुळे त्यांचे स्वराज्यातील स्थान अतिशय महत्वपूर्ण होते. दिल्लीच्या वारीमध्ये व्यस्त असताना राजारामाचा दुसरा पुत्र संभाजी (द्वितीय) यांनी महाराणी महाराणी ताराबाईला कैद करून कोल्हापूरची राजगादी मिळवली होती, पुढे त्याने छत्रपती शाहू महाराजांच्या विरोधात मोहिम हाती घेतली. या मोहिमेची वार्ता समजतात बाळाची विश्वनाथांनी दिल्लीहून परत महाराष्ट्रात येऊन दुसऱ्या संभाजीवर चाल केली होती. इ.स. १७१९ मध्ये त्याने कोल्हापूरला वेढा दिला व दुसऱ्या संभाजीला जरब बसवली होती. त्यानंतर त्याने सातारा

येथे छत्रपती शाहू महाराजांची भेट घेऊन आपल्या प्रकृतीच्या कारणास्तव ऑक्टोबर १७१९ मध्ये त्यांनी छत्रपती शाहू महाराजांकडून परवानगी घेऊन पुण्याजवळील सासवड येथे मुक्कामी गेले होते. सासवड येथे वास्तव्यास असताना ते आजारी पडले व आजारपणातच त्यांचे २ एप्रिल १७२० ला दु:खद निधन झाले होते.

## १.५ बाळाजी विश्वनाथाची योग्यता

बाळाजी विश्वनाथाची योग्यता अभ्यासताना त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात जर बघितली, तर ती साध्या कारकूनी पदापासून झाली होती. आपल्या कुशल कामगिरीमुळे व मुत्सद्देगिरीच्या जोरावर मराठा सत्तेमध्ये पहिला पेशवा होण्याचा मान मिळवला होता. त्यांनी मुघल दरबारात मराठयांचा दबदबा निर्माण केला होता, त्यांच्या काळातील प्रमुख घटनाक्रम संक्षिप्त रूपातवर दिलेला आहे. त्यांच्या अंगी असलेल्या मुत्सद्देगिरीमुळे त्यांनी अनेक मातब्बर सरदारांना त्यांनी युद्धाशिवाय जिंकून छ. शाहू महाराजांच्या पक्षात आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्याचे प्रमुख उदाहरण म्हणजे सेनापती धनाजी जाधव आणि सरखेल कान्होजी आंग्रे या महाराणी महाराणी ताराबाईंच्या पक्षातील बलाढ्य सरदारांना छ. शाहू महाराजांच्या पक्षात आणण्यात त्यांनी यश मिळवले व छत्रपती शाहू महाराज हेच मराठयांच्या स्वराज्याचे खरे वारसदार असल्याचे सिद्ध करून त्यांना मुघलांकडून कायदेशीर मान्यता मिळवून दिली होती. इतिहासकारांनी बाळाजी विश्वनाथाच्या कामगिरीविषयी वेगवेगळी विधाने केलेली आहेत. त्यापैकी इतिहासकार शेजवळकर आणि सरदेसाई यांनी असे म्हटले होते की, अल्पसंख्यांकडून बलवान मुघलांना कब्जात आणण्याचा प्रयोग केला. स्वतः दिल्लीवर जाऊन मराठयांचे वर्चस्व सिद्ध केले व निजाम आणि दुसऱ्या संभाजीला नमविले होते. न्या. रानडे यांनी त्यांच्याविषयी असे म्हटले होते की, बाळाजी विश्वनाथाने मराठा सरदारांमध्ये सुसंघटित ऐक्य निर्माण केले होते, तर डॉ. दिघे यांनी बाळाजी विश्वनाथ हे श्रेष्ठ मुत्सद्दी असल्याचे म्हटले होते. यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना 'अतुल्य पराक्रमी सेवक' या शब्दात गौरविले होते. यावरून बाळाजी विश्वनाथाची योग्यता मोठी असल्याचे सिद्ध होते. सारांश मराठयांच्या स्वातंत्र्ययुद्धाचा शेवट औरंगजेबाच्या मृत्यूने म्हणजे १७०७ मध्ये जरी झालेला असला तरी मुघल- मराठा संघर्षानंतर छत्रपती शाहू महाराज व महाराणी महाराणी ताराबाई यांच्यातील अंतर्गत संघर्षामुळे मराठयांच्या स्वराज्यात अंतर्गत दुफळी निर्माण झाली होती. अशा कठीण काळात महाराणी महाराणी ताराबाईंच्या पक्षात असलेल्या मातब्बर सरदारांच्या फौजेपुढे व पराक्रमापुढे छ. संभाजी महाराजांचे पुत्र छ. शाहूचा निभाव लागणे शक्य नव्हते. या कठीण काळात बाळाजी विश्वनाथाच्यारूपाने एका मुत्सद्याने त्यांच्या स्वराज्यात येण्याचा मार्ग आपल्या बुद्धीचातुर्याच्या जोरावर मोकळा केला होता.

## १.६ सारांश

या प्रकरणामध्ये पहिला पेशवा म्हणून बाळाजी विश्वनाथ यांनी छत्रपती शाहू महाराजांची मुघलांच्या कैदेतून सुटका करण्यापासून ते त्यांना स्वराज्याचा कायदेशीर वारसदार म्हणून मुघलांकडून मान्यता मिळविण्यापर्यंत बाळाजी विश्वनाथांनी महत्वाची भूमिका बजावली होती या संबंधीचा आढावा घेतलेला आहे. या व्यतिरिक्त दिल्लीची मोहीम हाती घेऊन बाळाजीने चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मिळविल्या होत्या. दिल्लीच्या मोहिमेमधून

सय्यद बंधूच्या मदतीने मोठी उपलब्धी मिळविली होती व मराठयांना उत्तरेच्या राजकारणाचे दरवाजे उघडे करून दिले होते याचा फायदा मराठयांना नंतरच्या काळात दिल्लीचे राजकारण खेळताना झाला होता.

## १.७ प्रश्न :

१. छ. शाहू महाराजांना स्वराज्याचा कायदेशीर वारसदार म्हणून घोषित करण्यामध्ये बाळाजी विश्वनाथांनी बजावलेल्या भूमिकेचे विश्लेषण करा?
२. बाळाजी विश्वनाथांच्या मुत्सद्देगिरीने शाहू महाराजांचा पक्ष कसा मजबूत झाला होता याचे वर्णन करा.
३. बाळाजी विश्वनाथांच्या दिल्ली मोहिमेविषयी सविस्तर टिपण लिहा.

## १.८ संदर्भ :

१. खोबरेकर,वि.गो. [२००६], महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड – भाग १ शिवकाळ [१६३०-१७०७], महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
२. कोंडेकर,ए. वाय.,[२००४], मराठयांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
३. सरदेसाई गो.रा., मराठी रियासत, खंड १-८, प्रमुख संपादक, स.मा. गर्गे, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई .
४. कोलारकर, श. गो., [२००३], मराठयांचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर.

❖❖❖❖

# २

## पेशवा पहिला बाजीराव

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टये

२.१ प्रस्तावना

२.२ थोरले बाजीराव पेशव्यांचा उदय

२.३ दरबारातील सरदारांचा विरोध अखेर पेशवे पदाची प्राप्ती

२.४ साम्राज्यविस्ताराचे धोरण

२.५ बाजीराव आणि निजाम संघर्ष

२.६ पालखेडची लढाई

२.७ कर्नाटक मोहीम

२.८ वारणेचा तह

२.१० गुजरात व माळवा मोहीम

२.११ दिल्लीवर स्वारी

२.१२ भोपाळची लढाई

२.१२ सिद्दीविरुद्ध मोहीम

२.१३ पोर्तुगिजांचा पराभव

२.१४ बाजीरावांची अखेर

२.१५ बाजीरावांची योग्यता

२.१६ सारांश

२.१७ प्रश्न

२.१८ संदर्भ

munotes.in

## २.० उद्दिष्टये

१. थोरले बाजीराव पेशव्यांचा उदय व त्यांच्या कार्याचा अभ्यास करणे.

२. पेशवे थोरले बाजीराव व निजाम यांच्यातील संबंधाविषयी माहिती घेणे.

३. पेशवे थोरले बाजीरावांनी आपल्या कारकीर्दीत केलेल्या सर्व मोहिमांचा अभ्यास करणे.

## २.१ प्रस्तावना

मराठा साम्राज्यातील बाळाजी विश्वनाथांचा उदय ही एक महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. कारण या घटनेने पुढे छत्रपती पदाची सत्ता संपुष्टात येऊन, पेशवे मराठा साम्राज्याचे सर्वाधिकारी बनले. खरे तर छत्रपती शाहू महाराजांचे आसन स्थिर करण्यात बाळाजी विश्वनाथांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी मराठा साम्राज्याची विस्कळीत झालेली घडी बसवली. तसेच मराठा मंडळाची स्थापना करून कारभार सुव्यवस्थेत चालविला. उत्तरेतील चौथाई, सरदेशमुखीच्या सनदा मिळविल्या. त्यांनी अनेक मोहिमा फत्ते करून मराठा साम्राज्याचा विस्तार केला. त्यांच्याप्रमाणे त्यांचा पुत्र म्हणजेच थोरले बाजीराव पेशवे हेही तितकेच पराक्रमी होते. म्हणूनच बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूनंतर वयाच्या अवघ्या २०व्या वर्षी पहिल्या बाजीरावांना छत्रपती शाहू महाराजांनी पेशवाईची वस्त्रे बहाल केली. या रणधुरंदर सैनिकाने आपल्या स्वपराक्रमाने मराठा साम्राज्याचा सांभाळ तर केलाच, त्याचबरोबर स्वराज्याचा उत्तरेत विस्तार करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांनी आपल्या कारकीर्दीत अनेक लढायांमध्ये विजयाच्या पताका फडकवल्या. असे या महापराक्रमी पेशव्यांचा इतिहास आज आपण या प्रकरणात शिकणार आहोत.

## २.२ पेशवा पहिला बाजीरावांचा उदय

पहिले बाजीराव पेशवा यांचा जन्म १८ ऑगस्ट १७०० साली झाला. त्यांना बाजीराव बल्लाळ म्हणूनही ओळखले जाते. त्यांच्या आईचे नाव राधाबाई होते. बाळाजी विश्वनाथाच्या आकस्मिक निधनानंतर वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी बाजीराव स्वराज्याचे पेशवे झाले. छ.शाहू महाराजांच्या आज्ञेवरून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वप्न अर्थातच हिंदवी स्वराज्य हे नर्मदा पार नेऊन ठेवले. थोरले बाजीराव पेशवे हे बाळाजी विश्वनाथांचे मोठे चिरंजीव होते. लहानपणापासूनच ते अत्यंत हुशार व कुशाग्र बुद्धीचे होते. बाजीरावांचे राजकीय व लष्करी शिक्षण पित्याच्या सान्निध्यातच झाले. तसेच ते लहानपणापासूनच आपला वडिलांसोबत विविध मोहिमेवर जात असे. त्यामुळे लहान वयात ते अनुभवी व मुत्सद्दी राजकारणी व पराक्रमी बनले. थोरल्या बाजीराव पेशव्यांनी त्यांच्या हयातीत अनेक लढाया लढल्या व त्या जिंकल्याही, तसेच त्यांच्या पराक्रमाने फक्त पेशव्यांचेच नव्हे तर पूर्ण मराठा साम्राज्याची क्षितिज उंचावले.

## २.३ दरबारातील सरदारांचा विरोध आणि अखेर पेशवे पदाची प्राप्ती

बाळाजी विश्वनाथांच्या मृत्यूनंतर छ. शाहू महाराजांच्या दरबारात पेशवे पद कोणाला द्यायचे याबद्दल विचार विनिमय सुरू झाला. छ. शाहू महाराजांच्या दरबारात अनेक मुत्सद्दी सरदार

munotes.in

होते. पण छ.शाहू महाराजांच्या मनात पेशवे पदासाठी तरुण तडफदार बाजीराव दिसत होते. परंतु बाजीरावास पेशवे पद देण्यास श्रीपतराव प्रतिनिधी, अनंतराव सुमंत, नारोजी, खंडेराव दाभाडे, कान्होजी भोसले या मुत्सद्यांचा विरोध होता. त्यांच्या मते, बाजीराव उद्दाम प्रवृत्तीचा, अवघा वेळ शिपाईगिरीत घालवणारा, राज्यकारभारात लागणारा संयमाचा अभाव त्यामुळे या पदास ते योग्य नाही. असे इतर सरदारांचे म्हणणे होते. छत्रपती शाहू महाराजांनी सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर बाजीराव पेशवे पदासाठी लायक कसे हे सर्वांना पटवून दिले व सर्वांना बाजीरावाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. शेवटी छत्रपती शाहूंनी कोणाच्याही विरोधाची परवा न करता १७ एप्रिल १७२० रोजी बाजीरावांना पेशवे पदाची वस्त्रे दिली. तेथूनच खऱ्या अर्थाने या रणंधुरंदर सैनांनीच्या कार्यास गती मिळाली.

## २.४ साम्राज्य विस्ताराचे धोरण

थोरले बाजीराव पेशवे हे लहानपणापासून अत्यंत कुशाग्र बुद्धीचे होते. तसेच त्यांनी आपल्या वडिलांकडून म्हणजेच पेशवे बाळाजी विश्वनाथांकडून राजकारणाचे धडे घेतले होते. शिवाय बालवयातच त्यांनी आपल्या वडिलांसमवेत अनेक मोहिमेत भाग घेतला होता. म्हणून सर्व डावपेच ते आपल्या बालपणापासूनच शिकले होते. त्यातच त्यांना पेशवाईची वस्त्रे मिळाली व त्यांनी खऱ्या अर्थाने साम्राज्यविस्ताराला सुरुवात केली. प्रथम त्यांनी मुघलांकडे आपला मोर्चा वळविला. कारण बाजीरावांना मोगल साम्राज्य रसतळाला चालले आहे याची पूर्ण कल्पना होती. मोगल बादशहा नामधारी आहे हेही माहीत होते. मोघलांचे सैन्य विलासी, भ्रष्टाचारी बनले आहे हे त्यांना दिसत होते. या उलट मराठा राज्य दिवसेंदिवस प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत होते. अशा परिस्थितीत चौथाई व सरदेशमुखी बाबतचे धोरण अंमलात आणण्या ऐवजी सरळ सरळ युद्धाचे व साम्राज्य विस्ताराचे धोरण अंमलात आणल्यास, ते मराठा साम्राज्यास हितकारक ठरेल असे त्यांचे स्पष्ट मत होते. ऱ्हासाला जात असलेल्या मोघलांकडे सवलती मागण्याऐवजी त्या साम्राज्यावर आघात करून मराठयांचे वर्चस्व स्थापन करावे, हे त्यांना सोयीस्कर वाटत होते. बाजीरावांचे धोरण श्रीपतराव प्रतिनिधी व काही सरदारांना पसंत पडले नाही. छत्रपती शाहू महाराजांना मोगलांविषयी जवळीक वाटत असल्याने बाजीरावाने एकाकी आक्रमक धोरण स्वीकारू नये असे त्यांना वाटत होते. या विषयावर साताऱ्याला दरबारात चर्चा झाली असताना, बाजीरावाने आपले धोरण छत्रपती शाहूंना पटवून दिले. बाजीरावांचे नवीन धोरणामुळे मराठयांना पराक्रमाची नवी संधी प्राप्त होणार होती. अखेर छ.शाहू महाराजांनी बाजीरावांच्या साम्राज्यवादी धोरणास परवानगी दिली. येथून पुढे बाजीरावांची तलवार तळपू लागली व त्यांनी अनेक लढाया केल्या आणि त्या जिंकल्याही. त्या लढाया पुढीलप्रमाणे सांगता येईल -

१७२३ - माळवा

१७२४ – धार, औरंगाबाद

१७२८ - पालखेड

१७४१ - अहमदनगर

१७३६ - उदयपूर

१७३७ – पेशावर, कंधार, काबुल, बलुचिस्तान,

१७३८ - भोपाळ

१७३९ - वसईची लढाई

या आणि अशा ४७ लढायांचा समावेश आहे. अशा या रणधुरंदर पेशव्याने आपल्या हयातीत एकही लढाई हरले नाही व ते नेहमीच अजिंक्य राहिले.

## २.५ बाजीराव आणि निजाम संघर्ष

पहिल्या बाजीरावांनी सत्तेवर येताच दक्षिणेतील मराठी राज्याचे रक्षण, उत्तरेकडे जास्तीत जास्त वर्चस्व प्रस्तापित करण्याचे धोरण आखले. हैद्राबादच्या निजाम घराण्याचा संस्थापक निजाम-उल-मुल्क (दख्खनचा वजीर) याने मोगल सत्तेच्या कमकुवतपणाचा फायदा घेऊन दक्षिणेवर हक्क सांगत होता. या परिस्थितीत संघर्ष अनिवार्य होता. बाजीराव कर्नाटकाच्या स्वारीत गुंतले असता १७२६ मध्ये महाराष्ट्रात निजामाने कोल्हापूरच्या संभाजीसह छ.शाहू महाराजांचा प्रदेश लुटण्यास सुरुवात केली. निजामाचा उपदव्याप वाढतच चालला होता. बाजीराव कर्नाटक स्वारीहुन महाराष्ट्रात येताच ही परिस्थिती बदलली. बाजीरावांनी निजामाच्या मराठ्यातील प्रदेशांवर हल्ले केले. निजामाने बाजीरावचा पाठलाग सुरू केला. बाजीरावांनी त्यास हुलकावण्या देत पालखेड (औरंगाबाद जिल्हा) येथे अडवलं. त्यांच्यात १७२८ला पालखेडची लढाई झाली.

## २.६ पालखेडची लढाई

बाजीरावांनी १७२६ मध्ये कर्नाटकचा प्रदेश जिंकला होता. निजामाने तेथील चौथाई व सरदेशमुखीच्या हक्काबद्दल प्रकरण काढून विरोध केला. कोल्हापूरचे छत्रपती संभाजी, निजाम आणि चंद्रसेन जाधव या तिघांनी मिळून पुण्यावर हल्ला केला. यामुळे बाजीरावाने कर्नाटक मोहीम अर्धवट सोडून ते परत आले. मराठयांनी निजामाच्या ताब्यातील औरंगाबादकडे हल्ले सुरू केले. तेव्हा निजामाने औरंगाबादकडे कुच केली. दरम्यान बाजीरावाने वैजापूरवर हल्ला करून तेथील निजामाची धान्याची रसद लुटली. निजामाच्या सैन्यातील पाणीपुरवठा बंद केला. निजामाला अन्नधान्य व पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली. १५ फेब्रुवारी १७२८ रोजी पैठण नजीक पालखेड येथे बाजीरावाने निजामाचा पराभव केला. ६ मार्च १७२८ ला निजामाला मुंगी-शेवगाव येथे बाजीरावबरोबर तह करावा लागला. तो पुढीलप्रमाणे-

मुंगी-शेगावच्या तहातील अटी

१. छत्रपती शाहू महाराजांच्या चौथाई व सरदेशमुखीचा हक्क निजामाने मान्य करावा.

२. पुणे, बारामती, खेड हा भाग मराठयांना पुन्हा परत करावा.

३. दक्षिण सुभ्याचा कारभार मराठयांच्या सल्ल्यानुसार मोगलानी करावा.

४. निजामाने कोल्हापूरच्या संभाजीला चिथावणी देऊ नये.

पालखेड येथील निजामाच्या पराभवाने त्याचे दिल्ली दरबारातील स्थान डळमळीत झाले. बाजीरावांचा वचक निर्माण झाला. पुढे अनेक सरदारांवर वचक निर्माण झाला.

## २.७ कर्नाटक मोहीम

मुघल बादशहाने निजामाची दक्षिणेतील सुभेदारी काढून मुबारिझखानाला दिली व निजामाच्या बंदोबस्ताचे आदेश दिले. बाजीरावही निजामाच्या विरोधात होते, तेव्हा एकाच वेळी दोन शत्रूशी लढणे शक्य नाही हे समजून निजामाने बाजीरावाची १९ मे १७२४ रोजी भेट घेतली. छत्रपती शाहू महाराज्यांच्या स्वराज्याच्या सनदांना मान्यता देऊन, बादशाहविरुद्धच्या संघर्षात मदत मागितली. छ. शाहू महाराजांनीही बाजीरावाला निजामाची मदत करण्यास सांगितले. त्यानंतर मराठयांची मदत घेऊन दक्षिणेत स्वतंत्र राज्य निर्माण करणाऱ्या निजामाने लवकरच मराठयांना आपले खरे रूप दाखवण्यास सुरुवात केली. छ. शाहू महाराजांच्या मोगल सुभ्यातील चौथाई सरदेशमुखीच्या वसुलीला हरकत घेऊन, आपल्या हस्तकांना मराठयांविरुद्ध कारवाया करण्यास उत्तेजन दिले. चंद्रराव जाधव, बुधाजी चव्हाण यांसारखे असंतुष्ट मराठी सरदारांना लष्करी मदत देऊ केली. मराठयांमध्ये फूट पडावी म्हणून त्यांनी कोल्हापूरच्या संभाजीशी संगनमत केले. निजामाचा पक्का बंदोबस्त केल्याशिवाय दुसरा पर्याय नसल्याने निजामाबाबत आक्रमक धोरण स्वीकारावे असे बाजीरावांचे मत होते. पण छ. शाहू महाराजांनी निजामाबद्दल मवाळ धोरण स्वीकारून बाजीरावांना कर्नाटक मोहीम काढण्यास सांगितली. बाजीरावानी १७२५ व १७२७ अशा दोन स्वाऱ्या कर्नाटकात करून मोठी खंडणी वसूल करून अनेक ठिकाणी आपला अंमल प्रस्तापित केला.

## २.८ वारणेचा तह

पालखेडच्या लढाईनंतरही कोल्हापूरच्या संभाजीचा उपद्रव बंद झाला नव्हता. त्याने सरळ सरळ छ. शाहू महाराजांकडे स्वराज्याचा अर्धा हिस्सा मागितला. संभाजीचा समर्थक उदाजी चव्हाण याने छ. शाहू महाराजांच्या प्रदेशात दंगा सुरू केला. एवढेच नव्हे तर छ. शाहू महाराजांना ठार मारण्यासाठी मारेकरी ही पाठवले. त्यामुळे छ. शाहू महाराजांनीही आक्रमक भूमिका घेऊन, संभाजीवर जानेवारी १७३० मध्ये आक्रमण केले. संभाजी व उदाजी चव्हाण यांचा पराभव होऊन ते पळून गेले. ऑक्टोबरमध्ये छ. शाहू महाराजांनी विशाळगड जिंकला. संभाजीची परिस्थिती दयनीय होऊन त्यांनी शरणागती पत्करली. छ. शाहू महाराजांनी मोठया मनाने त्याला क्षमा केली. उभयंतात १३ एप्रिल १७३१ रोजी वारणेचा तह घडून आला. या तहाने दोघांनी आपल्या राज्याची हद्द आखून घेतली. वारणेच्या खोऱ्यातील सर्व प्रदेश, किल्ले संभाजीकडे देण्यात आले. या तहामुळे सातारा व कोल्हापुर या दोन घराण्यातील १७०८ पासूनचे वैमनस्य कायमचे संपुष्टात आले. संभाजीने छत्रपती म्हणून शाहूंना मान्यता दिली. तसेच कधीही परक्या शत्रूची मदत घेतली नाही. अशाप्रकारे अंतर्गत यादवी संपल्याने छ. शाहू महाराजांना स्थिरता प्राप्त झाली.

## २.९ गुजरात व माळवा मोहिम

मुघल बादशहा व बाळाजी विश्वनाथ यांच्यात झालेल्या करारानुसार मराठयांना स्वराज्याच्या चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मिळाल्या, पण या तहात गुजरात व माळव्याचा उल्लेख नसला तरी, छ. शाहू महाराजांकडून बनवलेल्या तहाच्या मसुद्यात गुजरात- माळवा मराठयांना मिळण्याबाबत उल्लेख होता. पण मोघल बादशहाने त्यास



munotes.in

नकार दिला. म्हणून बाजीरावांनी लष्करी बळावर गुजरात व माळव्याची सनद मिळवण्याचे ठरवले. दाभाडे यांच्या नाशानंतर गुजरातमध्ये पिलाजी गायकवाड यांचा प्रभाव वाढत गेला. त्यांनी आपल्या पराक्रमाने तेथे चौथाई व देशमुखी ही वसूल केली. मोगल सुभेदार अभयसिंहला ही गोष्ट खटकत होती. पिलाजी विरुद्ध लष्करी कारवाई करण्यात त्यांना अपयश आल्याने, बोलण्याचे नाटक करून १७३२ मध्ये **डाकोर** येथे बेसावध पिलाजीचा खून घडून आणला. अभयसिंग विरुद्ध गुजरामध्ये वनवा पेटला. मराठयांनी जोरदार स्वाऱ्या चालू केल्या. शेवटी अभयसिंगने गुजरातची चौथाई, सरदेशमुखी मराठयांना देण्याचे कबूल केले. १७३५ नंतर गुजरातवरील मोघलांचा ताबा पूर्ण नष्ट होऊन मराठयांकडे आला.

गुजरातप्रमाणे बाजीरावाने माळव्याकडेही लक्ष दिले. मोगल दरबारात जयपुरचा राजा जयसिंगचे महत्व वाढले होते. पण जयसिंगना रजपुतांचे ऐक्य घडवून, मोघलांना दुर्बल करायचे होते. त्यासाठी त्यांनी मराठयांसोबत संधान साधले. जयसिंगचे निमंत्रण मिळताच बाजीराव व चिमाजी आप्पा उत्तरेकडे निघाले. दोघेजण वेगवेगळ्या मार्गाने माळव्याकडे निघाले. चिमाजी आप्पा बागलाण व खानदेश मार्गे माळव्यात पोहोचले. यावेळी मोगल बादशहाने माळव्यावर गिरधर बहादुरला सुभेदार म्हणून नेमले होते. चिमाजींनी वेगवान हालचाली करून धार गाठले. याचवेळी गिरधर बहादुर व त्याचा पुतण्या दयाबहादूर यांचा मुक्काम अजमेरमध्ये होता. चिमाजींनी त्यांच्यावर अकस्मितपणे हल्ला केला. २९ नोव्हेंबर १७२८ रोजी झालेल्या लढाईत गिरधर बहादूर व दयाबहादुर हे दोघे मारले गेले. मराठा फौजानी माळव्याचा ताबा घेतला.

अशाप्रकारे गुजरात व माळवा या दोन्हीवरही मराठयांचे वर्चस्व निर्माण झाले.

## २.१० दिल्लीवर स्वारी

१७३४ मध्ये बाजीरावांनी उत्तरेकडील मोहीम हाती घेतली. कारण शिंदे, होळकरांनी माळवा प्रांतात मराठयांचे चांगलेच वर्चस्व निर्माण केले होते. दिल्लीच्या राजकारणात मराठयांनी आपले वर्चस्व वाढवले पाहिजे. या हेतूने त्यांनी ही मोहीम हाती घेतली होती. मेवाड, उदयपूर, जयपूर येथील रजपुतराजांनी त्यांचे स्वागत केले. अनेक रजपुत राजांशी बाजीरावांनी मैत्रीचे संबंध निर्माण केले होते. भविष्यात आपण दिल्लीवर स्वारी केली, तर राजपूत आपल्या आड येणार नाहीत याची काळजी बाजीरावांनी अगोदरच घेतली होती. बाजीराव दक्षिणेकडे परतल्यावर परत १७३७ मध्ये माळव्यावर स्वारी केली. तिकडे वर्चस्व निर्माण केल्यावर मराठयांनी चंबळ नदीपर्यंत प्रवेश केला. बाजीरावांनी मल्हारराव होळकरांबरोबर फौज देऊन दुआबात (गंगा-यमुना यांचे खोरे) पाठवले. ५० लाख युद्धखंडणी मराठयांना मिळाली. निजामांचा पूर्ण बिमोड न करता त्याला वेळोवेळी नामोहरण करण्याचे धोरण छ. शाहू महाराजांचे होते. तेच बाजीरावांनी पुढे चालवले होते.

## २.११ भोपाळची लढाई

बादशहाने निजामाला दिल्लीमध्ये बोलावून घेतले, बाजीरावांचा निर्णायक पराभव करण्यासाठी त्याला बादशहाने ३४ हजाराचे सैन्य आणि एक कोटी रुपये दिले. शिवाय त्याचे १५ हजाराचे सैन्य होतेच. ही सर्व तयारी करण्याचे कारण म्हणजे बादशहाने बाजीरावांचा दिल्ली मोहिमेचा इतका धसका घेतला होता की, मराठयांपासून दिल्ली

सुरक्षित नाही, असे त्याला वाटत होते. निजाम व बादशहाच्या हालचाली कानावर येताच, वसईची मोहीम अर्धवट सोडून बाजीरावांनी २५ ऑक्टोबर १७३७ रोजी उत्तरेकडे कुच केली. निजामाचा दुसरा मुलगा नासिरजंग हा दक्षिणेतून प्रचंड सैन्य घेऊन निघाला. या दोन्ही फौजा एक होऊ नयेत म्हणून बाजीरावांनी चिमाजी अप्पांवर नासिरजंगला रोखण्याची जबाबदारी सोपवली. बाजीराव माळव्यात येण्यापूर्वी निजामाने ३०,००० फौज व मोठा तोफखाना घेऊन प्रथम बुंदेलखंडावर ताबा मिळवला. डिसेंबर महिन्यात उभयंतात अनेक चकमकी घडून आल्या. मराठयांजवळ अवजड सामान नसल्याने त्यांच्या हालचाली जलद होत होत्या, परंतु अवजड तोफखाना सांभाळून निजामाला चपळाईने पुढे जाता येत नव्हते. म्हणून त्यांनी भोपाळच्या मजबूत किल्ल्याचा आश्रय घेतला. बाजीरावांनी लगेच किल्ल्याला वेढा घातला. मराठयांच्या नाकेबंदीमुळे मोघलांची स्थिती दयनीय बनली. धान्याचा साठा आठवडयात संपला. त्यामुळे निजामाने सैन्यासह निसटून जाण्याचा प्रयत्न केला. पण तो चार ते पाच मैलापर्यंतही जाऊ शकला नाही. कुणाची मदत मिळू शकणार नाही हे लक्षात येताच, त्याने शरणागती स्वीकारली. पेशवे बाजीराव व निजाम यांच्यात ७ जानेवारी १७३८ रोजी दोराहसराई येथे तह झाला. त्या तहाच्या अटी पुढील प्रमाणे-

दोराहसराई तहाच्या अटी :

१. निजामाने बाजीरावांना माळव्याची सुभेदारी आणि नर्मदा व चंबळ मधील सर्व प्रदेशांची मालकी हक्क बादशाहकडून मिळवून देण्यात यावेत.

२. युद्धखंडणी म्हणून निजामाने ५० लाख रुपये बाजीरावास द्यावे.

अशाप्रकारे भोपाळचा विजय थोरले बाजीराव पेशवे यांच्या कर्तृत्वाचा परमोच्च शिखरावर पोहचवणारा ठरला.

## २.१२ सिद्दीविरुद्ध मोहीम

पश्चिम किनाऱ्यावरील सिद्धी हे मराठयांचे प्रबळ स्पर्धक व शत्रू होते. अफगाणिस्तानातील एबॅसिनिया येथून हे सिद्धी १२ व्या शतकात भारतात आले होते. अत्यंत चिवट आणि पराक्रमी म्हणून त्यांची ओळख होती. कोकणाच्या भागात हल्ला करून ते लुटालूट करीत. यांचा बंदोबस्त करणे अवघड होते. बाजीरावांनी सेखोजी आंग्रेजी भेट घेऊन सिद्धीच्या विरुद्ध मोहिम राबवली. पेशव्याने १७३३ मध्ये जंजिरास वेढा घालून, सिद्धीच्या आरमाराचा धुवा उडवला. दरम्यान छ. शाहू महाराजांनी प्रतिनिधींना रायगड घेण्यास पाठवले होते. प्रतिनिधींनी रायगड घेतला, पण दोघांच्या मोहिमेत सूत्रबद्धता नव्हती. दोघांमध्ये मतभेद होते. दरम्यान सेखोजी आंग्रेंचा मृत्यू झाल्याने २७ ऑगस्ट १७३३ बाजीरावांनी मोहीम अर्ध्यावर थांबवली. सिद्धीने १७३६ मध्ये आंग्रेच्या कुलाबा भागात हल्ला केला. तेव्हा छ. शाहू महाराजांनी पिलाजी जाधव, चिमाजी आप्पा यांना मोहिमेवर पाठवले. चिराई व कामराले गावानजीक दोन्ही सैन्यात लढाई होऊन सिद्धीसात मारला गेला. सिद्धीने पराभव मान्य केला व मराठयांची मांडलिकत्व स्वीकारले.

## २.१३ पोर्तुगीजांचा पराभव

मराठे आणि पोर्तुगीज यांच्यात सतत संघर्षाचे प्रसंग उद्भवले होते. पोर्तुगीज हे छत्रपती शिवाजी महाराजांपासून वसई, ठाणे या कोकण प्रदेशात व्यापाराच्या निमित्ताने राहत होते. हळूहळू त्यांनी वसई, ठाणे येथील राजव्यवस्था हाती घेतली. पश्चिम किनाऱ्यावरील आपली ठाणी प्रस्थापित करताना पोर्तुगीजांनी तेथील हिंदू प्रजेशी जी वर्तणूक ठेवली होती, ती अत्यंत निर्दयी होती. जागोजागी त्यांनी धर्मांतरे घडून आणली. हिंदू प्रजेवर सतत अत्याचार केले होते. हिंदूंची देवळे पाडून त्यांनी जागोजागी चर्च बांधली. पेशवे बाजीराव व पोर्तुगीज यांच्यात संघर्ष घडून येण्याची काही महत्त्वाची कारणे कारणीभूत ठरली. ती पुढीलप्रमाणे - पोर्तुगीजांना मराठयांच्या वाढत्या आरमारी शक्तीची भीती वाटत होती. त्यामुळे त्यांचा राग सेखोजी आंग्रे यांच्यावर होता. सेखोजी आंग्रेंच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलाच्या भांडणात पोर्तुगीजांनी लक्ष घातले होते व मानाजी आंग्रेच्या विरुद्ध तुळाजी आंग्रेला मदत केली होती. कारण मानाजी आंग्रेची बाजू बाजीरावांनी घेतली. म्हणून पोर्तुगीजांनी तुळाजीस मदत केली. बाजीरावास ही गोष्ट खटकली. पोर्तुगीज वसई, ठाणे प्रांतातील हिंदू प्रजेवर सतत अत्याचार करीत होते. बाजीरावांनी चिमाजी आप्पास पोर्तुगीजांचा बंदोबस्त करण्यास पाठवले. १७३७ मध्ये मराठयांनी ठाणे जिंकले. पुढे १७३८ मध्ये वसईच्या आसपासचा प्रदेश जिंकून, वसईच्या किल्ल्यास वेढा दिला. वसईचा किल्ला दोन कोस समुद्रात होता. खाडी, अथांग समुद्र, पूर्वेस दलदलीची जागा तिन्ही बाजूंनी किल्ल्यास जाण्यास कोणताच मार्ग नव्हता. २ मे १७३९ रोजी मराठयांनी वसईच्या किल्ल्यावर जोराचा हल्ला केला. ४ मे १७३९ रोजी पोर्तुगीजांनी शरणागती स्वीकारली. वसई, ठाणे, दमणपर्यंतचा भाग मराठयांच्या ताब्यात आला.

## २.१४ बाजीरावांची अखेर

पेशवा बाजीरावला त्यांच्या आयुष्यातील शेवटच्या काळात नातेवाईकांचा प्रचंड त्रास व मनस्ताप झाला. बाजीराव-मस्तानी प्रेम प्रकरणामुळे पुण्यातील त्यांचे नातेवाईक व आप्तेष्ट नाराज झाले. बाजीराव नासीरजंगच्या मोहिमेत असतानाच चिमाजी आप्पा आणि इतर काही मंडळीनी मस्तानीस कैद करून तुरुंगात टाकले. त्यापूर्वीही बाजीराव-मस्तानी यांची भेट होऊ नये याची काळजी घेतली जात होती. खरे तर बाजीराव आणि मस्तानीवर जीवापाड प्रेम होते. पण कर्मठ आप्तेष्टांना हे मान्य नव्हते. या सर्व घटनामुळे बाजीरावांना प्रचंड मनस्ताप होत होता. आयुष्यभर लष्करी मोहिमा, सततची धावपळ यामुळे त्यांचे शरीर दुबळे झाले होते. त्यांचे सारे आयुष्य लष्करी तळावर गेले. अशा स्थितीत २८ एप्रिल १७४० रोजी  नर्मदेच्या काठी रावेर येथे त्यांचा मृत्यू झाला. इतिहासातील एका पराक्रमी पेशव्याचा अखेर अंत झाला. ते केवळ ४० वर्षाचे होते. बाजीरावाची समाधी रावेलखेड येथे नर्मदा नदीच्या किनारी आहे. बाजीरावांच्या मृत्यूची बातमी समजताच मस्तानीचा ही मृत्यू झाला. पुणे जिल्ह्यातील पाबळ येथे मस्तानीची समाधी आहे. बाजीरावांनी पाबळ येथे मस्तानीस जहागिरी दिली होती.

## २.१५ बाजीरावांची योग्यता

बाळाची विश्वनाथाच्या मृत्यूनंतर म्हणजे १७२० मध्ये छत्रपती शाहू महाराजांनी बाजीरावांमधील गुण ओळखून त्यांना पेशवे पदाची वस्त्रे दिली होती. दरबारातील अनेक सरदारांचा विरोध असतानाही छ. शाहू महाराजांनी बाजीरावांची योग्यता ओळखली होती. १७२० ते १७४० या वीस वर्षाच्या काळात बाजीरावांनी केलेले कार्य अतुलनिय असे होते. बाजीरावानी पेशवे पद स्वीकारले, तेव्हा मराठी राज्याचा पाया डळमळीत झालेला होता. मराठा जहागीरदार आपापल्या फौजा बाळगून स्वतंत्र वागू लागले होते. दक्षिणेतील मुघलांचा सुभेदार निजाम मराठा राज्य नष्ट करण्यासाठी धडपडत होता. त्यांच्या फौजा मराठा मुलखात हल्ले करीत, लुटा लूट करीत. बाजीरावाने पालखेड येथे निजामाचा पराभव करून, त्याचा बंदोबस्त केला. पोर्तुगीज, सिद्धी यांच्या विरोधात मोहीम काढून त्यांचा पराभव केला. पश्चिम किनारा त्यांच्यापासून सुरक्षित केला. रजपुतांशी मैत्रीचे संबंध ठेवले. मराठयांचे धोरण, सीमा मर्यादित न ठेवता उत्तरेकडे साम्राज्य विस्ताराची बाजीरावांचे धोरण कौतुकास्पद होते. मुघल सत्ता कधी कोसळू शकते त्याची पोकळी भरून काढण्यास मराठयांनी प्रयत्न करावेत या मताचे ते होते.

सर जदुनाथ सरकार म्हणतात "तो घोडदळाचा जन्मजात प्रमुख होता. अनेक इतिहासकारांनी बाजीरावाच्या राजकारणापेक्षा बाजीरावाच्या लढवय्यापणाबद्दल भरपूर लिहिले आहे. मराठयांचा आद्य इतिहासकार ग्रँड डफ असे म्हणतो "बाजीरांवाजवळ योजना आखण्याचे बुद्धी, सामर्थ्य होते व ती योजना प्रत्यक्षात आणण्याचे बलशाली मनगट ही होते. बाजीरावानी खऱ्या अर्थाने मराठा राज्याचा विस्तार केला. माळवा, बुंदेलखंड, दिल्ली, भोपाळ, पश्चिमेकडील किनारपट्टी व दक्षिणेकडील कर्नाटक हे प्रांत जिंकून घेतले होते. बाजीरावानी आपली हयात मोहीम आखण्यात, घोडदोड करण्यात व शत्रूला पराभूत करण्यात घालवली.

सामान्य सैनिकांप्रमाणे ते राहत असल्याने सैनिकांचे त्यांच्यावर मनापासून प्रेम होते. धर्म जातीपेक्षा त्यांनी सैनिकातील कर्तृत्वावर महत्व दिले होते.

## २.१६ सारांश

बाळाजी विश्वनाथ यांनी छत्रपती शाहू महाराजांचे आसन स्थिर करून मराठयांना खरा छत्रपती देऊ केला व छत्रपती शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथांना पेशवाईची वस्त्रे दिली. तेथूनच खऱ्या अर्थाने पेशवाईला सुरुवात झाली असे म्हणता येईल. बाळाजी विश्वनाथाने आपल्या कर्तृत्वाने उत्तरेकडील भागाकडून चौथाई व सरदेशमुख ह्या सनंदा मिळून दिल्या व मराठा मंडळाची स्थापना करून मराठा साम्राज्य घडी सुव्यवस्थित केली. त्याचप्रमाणे त्यांचे पुत्र थोरले बाजीराव पेशवे हे अत्यंत हुशार व कुशाग्र बुद्धीचे होते. त्यांनी मराठा साम्राज्याचा साम्राज्यविस्तार मोठया प्रमाणात केला. आपल्या पराक्रमाने व कर्तृत्वाने मराठा साम्राज्याचे क्षितिज उंचावले आणि तेथूनच खऱ्या अर्थाने मराठयांच्या राज्यकारभाराची सगळी सूत्रे पेशव्यांच्या हाती घेतली आणि पुढील शंभर वर्षे पेशव्यांनी मराठयांवर राज्य केले.

## २.१७ प्रश्न

१. पहिला बाजीराव पेशव्यांचा उदय सांगून, त्यांच्या साम्राज्य विस्ताराचे सविस्तर वर्णन करा.

२. पेशवे पहिला बाजीरावांचे निजामांशी संघर्ष व पालखेडच्या लढाईचा सविस्तर वृत्तांत द्या.

३. पहिला बाजीराव पेशव्यांचा सिद्दी व पोर्तुगीजांशी असलेल्या संबंधाशी चर्चा करा.

## २.१८ संदर्भ

१. पवार जयसिंगराव- मराठी साम्राज्याचा उदय व अस्त, मेहता प्रकाशन.

२. भामरे जितेंद्र, मराठयांचा इतिहास – शेठ पब्लिकेशन, मुंबई

३. सरदेसाई गो.रा., 'मराठी रियासत', खंड १ ते ८ प्रमुख संपादक स.म.गर्गे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

४. कोलारकर श. गो., 'मराठयांचा इतिहास'.

❖❖❖❖

munotes.in

# ३

## मराठा महासंघ

**घटक रचना :**


३.० उद्दिष्टये

३.१ प्रस्तावना

३.२ मराठा महासंघाचा उदय

३.३ मराठा महासंघाची निर्मिती

३.४ मराठा महासंघाच्या निर्मितीचे चार टप्पे

३.५ मराठा महासंघाच्या ऱ्हासाची कारणे

३.६ सारांश

३.७ प्रश्न

३.८ संदर्भ


## ३.० उद्दिष्टये

१) मराठा महासंघाची ओळख करून घेणे.

२) मराठा महासंघाची गरज का भासली हे जाणून घेणे.

३) मराठा महासंघाचे महत्त्व समजून घेणे.

४) मराठा महासंघाच्या ऱ्हासाची कारणे तपासणे.

## ३.१ प्रस्तावना

सतराव्या शतकात मराठा राज्याची स्थापना झाली. अठराव्या शतकात हे राज्य कळसास पोहोचले. अठराव्या शतकात भारतात प्रमुख सत्ता होती ती मराठयांची आणि म्हणूनच भारताचा त्या शतकाचा इतिहास म्हणजेच मराठयांचा इतिहास होय, असे समीकरण मांडावे लागेल. मराठयांच्या कर्तुत्वाचा विजय म्हणजेच छत्रपती शिवरायांचा उदय होय.

छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राच्या भूमीत स्वराज्याचे बीजारोपण केले. महाराजांच्या रूपाने मराठी समाजाला अलौकिक असे नेतृत्व मिळाले. म्हणूनच भविष्यकाळात मराठी सत्तेचा उदय घडून आला. स्वधर्म, स्वराष्ट्र व स्वसंस्कृती यांच्या रक्षणार्थ आपली लढाई आपणच लढायची असते. याची शिकवण शिवाजी महाराजांनी मराठी जनतेला दिली. तसेच राज्यकारभार सुव्यवस्थित चालवण्यासाठी अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. या मंडळाच्या स्थापनेतून महाराजांनी अनेक खाती व पदे निर्माण केली व मोगली सत्तेला म्हणजेच औरंगजेबाला शह दिला. त्यांच्या मृत्युनंतर छत्रपती राजारामांच्या मृत्युनंतर राणी ताराबाई यांच्या हातात मराठी सत्ता आली व त्यांच्याच



munotes.in

कारकिर्दीत शाहूंची मुघलाच्या ताब्यातून सुटका झाली व छ. शाहू व महाराणी ताराबाई संघर्ष सुरु झाला व या संघर्षातूनच अनेक सरदार, सेनापती, वतनदार छ. शाहू महाराजांना येऊन मिळाले व या सर्व संघर्षाच्या काळात मराठी सत्ता पुन्हा प्रबळ करायची असल्यास योग्य नेतृत्व व सरदार असणे गरजेचे वाटले म्हणूनच यातून मराठा महासंघाची निर्मिती झाली.

## ३.२ मराठा महासंघाचा उदय

छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती करून राज्यकारभार केला. सेनापती, पंडितराव, न्यायाधीश, चिटणीस, सरनोबत, डबीर अशी अनेक खाती निर्माण करून राज्यकारभार सुव्यवस्थित चालविला. त्यांच्याप्रमाणेच छत्रपती राजारामांच्या काळात झालेल्या मराठा स्वातंत्र्ययुद्धात मराठा मंडळ (मराठा महासंघ) अस्तित्वात आला. छत्रपती राजारामांच्या काळापासूनच जी वतनदारी चालू झाली. तिचे रुपांतर मराठा मंडळात झाले व मराठयांच्या घोडदौडीत सुरुवात झाली.

छत्रपती राजारामांच्या काळात झालेल्या मराठा स्वातंत्र्ययुद्धात मराठा मंडळ अस्तित्वात आले व राजांनी काही महत्त्वाच्या सरदारांची नियुक्ती मराठा मंडळात केली. राजाराम कालीन मराठा सरदार पुढीलप्रमाणे :-

१) रामचंद्र अमात्य

२) रघुनाथराव हनुमंते

३) संताजी-धनाजी

४) परसोजी भोसले

५) प्रल्हाद निराजी

६) शंकाजी मल्हार

७) खंडेराव दाभाडे

छत्रपती राजाराम कालीन हे महत्त्वाचे सरदार होते व त्यांनी मराठा साम्राज्यासाठी महत्वाची अशी कामगिरी केली. तसेच इ.स.१६९९ ला छत्रपती राजारामांनी उत्तर भारतातील ४ प्रांतात ४ मराठा सरदारांची नियुक्ती केल्या.

छत्रपती राजाराम द्वारा नियुक्त सरदार –

| प्रांत | सरदार |
|---|---|
| बागलन | दाभाडे |
| खानदेश | शिंदे |
| वऱ्हाड | भोसले |
| गंगथडी | निंबाळकर |

छत्रपती राजारामांनी वरील प्रांतास सरदारांच्या नियुक्त्या करून, प्रांताचा कारभार सुव्यवस्थेत चालविला. तसेच त्यांनी इनाम आणि जहागिरी देण्याची पद्धत सुरु केली. इ.स. १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला. मोघलांच्या ताब्यात असलेले छत्रपती संभाजी महाराजांचा पुत्र शाहू यांची सुटका झाली व शाहूंचे आगामन महाराष्ट्रात झाले. तेथून राणी ताराबाई व शाहू महाराज हा संघर्ष चालू झाला. या संघर्षात छ. शाहू महाराजांचा विजय

झाला. कारण छत्रपती राजारामानी निर्माण केलेले मराठा मंडळातील सरदार यांच्यात फूट पडली व ते शाहूंना मिळाले. तेथूनच खऱ्या अर्थाने छत्रपती शाहू महाराजकालीन किंवा पेशवेकालीन महासंघाची निर्मिती झाली ती पुढीलप्रमाणे –

## ३.३ मराठा महासंघाची निर्मिती

छत्रपती शाहूंचा राज्याभिषेक केल्यावर बरेच सरदार त्यांना येऊन मिळाले. खेडच्या लढाईमुळे त्यांचा राजा होण्याचा मार्ग निर्धोक झाला. छ. शाहूंच्या या काळात त्यांना साथ दिली पेशवे बाळाजी विश्वनाथांनी त्या बदल्यात शाहूंनी त्यांना इ.स.१७१३ पेशवे पद दिले व मराठा साम्राज्यात बाळाजी विश्वनाथ पहिले पेशवे म्हणून सत्तारूढ झाले. छत्रपती राजाराम व राणी ताराबाईंच्या काळात वतनदारी वाढीस लागली होती. वतनदार मनमानी करत व वेळप्रसंगी स्वराज्याची साथ सोडत. या सर्वांना एकत्र आणून राज्य कसे करायचे व कसे वाढवायचे, सुशिक्षित करायचे हे आवाहन दोघांसमोर होते. यातून बाळाजी विश्वनाथांनी अतिशय योग्य पद्धतीने मार्ग काढला. त्यांनी प्रथम मोघल बादशहाकडून छ. शाहूंच्या नावे स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी ह्यांच्या सनदा प्राप्त करून घेतल्या. त्यामुळे मराठयांच्या इतिहासात वेगळे वळण लागले. बाळाजी विश्वनाथांनी सर्व सरदारांना एकत्रित करून किंवा एकजूट रहावे व साम्राज्याची घडी व्यवस्थित बसावी याकरता त्यांनी मराठा मंडळाची निर्मिती केली. येथूनच खऱ्या अर्थाने शाहू महाराजांचे आसन स्थिर होण्यास मदत झाली. कारण जो सरदार वर्ग मनमानी करत व स्वत: निर्णय घेत होते, तो वर्ग आता बाळाजी विश्वनाथांनी या मंडळाच्या मार्फत बांधून घेतला होता. मराठा मंडळाची निर्मिती करून बाळाजीने मराठयांना पराक्रमाची नवे क्षितिज उपलब्ध करून दिली होती. एक नवी राजकीय, लष्करी व आर्थिक व्यवस्था निर्माण केली. वतने व सरंजाम यांच्या बाबतीत छत्रपती राजारामांचेच धोरण बाळाजींनी पुढे चालू ठेवले जो मराठा सरदार उत्तरेकडील मोगली मुलुख हस्तगत करेल त्याला त्यांनी जिंकलेल्या मुलुख सरंजाम म्हणून देण्याचे छत्रपती शाहूंच्या अनुमतीने जाहीर केले. महाराजांच्या ठाई निर्माण झालेल्या अशा आकांक्षाचा विचार पेशवे बाळाजी विश्वनाथांनी केलेला होता आणि म्हणूनच या नव्या राज्यव्यवस्थेचे मराठा मंडळाचे मराठा सरदारांकडून स्वागत झाले.

**नवीन योजनेनुसार सरदार व त्यांचे विभाग**

| सरदार | विभाग |
|---|---|
| फत्तेसिंग भोसले | अक्कलकोट |
| प्रतिनिधी | औंध |
| सेनापती दाभाडे | खानदेश, गुजरात |
| परसोजी भोसले | वऱ्हाड नागपूर |
| कान्होजी आंग्रे | पूर्ण पश्चिम किनारा |
| छत्रपती | कर्नाटक (जिंजीकडील काही भाग) |
| पेशवे | स्वराज्याच्या उर्वरित थोडा भाग |

या नवीन सरदाराने चौथाई वसूल करावी व चौथाई वसुलीतून आपला खर्च वजा करून बाकीची रक्कम मध्यवर्ती तिजोरीत भरावी. तसेच छत्रपतींनी बोलावल्यास आपल्या सैन्यासह राहावे असे ठरवण्यात आले व त्यांनी केलेल्या कामाची पूर्ण माहिती छत्रपतींना

द्यावी. यानुसार कामकाज चालू होते. तसेच चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्यात येत होती.

चौथाई – चौथाई म्हणजेच स्वराज्याबाहेरील प्रदेशाच्या रक्षणार्थ वसूल झालेला उत्पन्नाचा २५% भाग होय.

चौथाई हक्क प्रदेश – विजापूर, हैदराबाद, बिदर, औरंगाबाद, वऱ्हाड व खानदेश.

सरदेशमुखी – शासनाच्या वतीने महसूल गोळा करण्याचा अधिकार देशमुखांना होता. उत्पन्नापैकी १०% भाग सेवा शुल्क म्हणून देशमुखास मिळे त्यास सरदेशमुखी म्हणतात.

मराठा मंडळ 'प्रमुख बाळाजी विश्वनाथाने मोघल बादशहाकडून मराठा मंडळास चौथाई सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मिळवून दिला.

दिनांक ३ मार्च १७१९ ला चौथाईची सनद.

दिनांक १५ मार्च १७१९ ला सरदेशमुखीची सनद.

इ.स.१७१९ ला स्वराज्याची सनद मराठा मंडळास मोघल बादशहाने दिली. पेशवे बाळाजी विश्वनाथांनी निर्माण केलेला हा मराठा महासंघ किंवा मराठा मंडळ यामुळे मराठाशाहीला मोठा फायदा झाला. कारण बादशहाकडून मोठया प्रमाणात चौथाई, सरदेशमुखीच्या सनदा प्राप्त होऊन मराठा राज्याला त्याचा फायदा झाला. कारण छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्यानंतर संभाजी महाराजांच्या मृत्युनंतर व राजारामाच्या मृत्युनंतर मराठा साम्राज्य पूर्ण अधोगतीला चालले होते. यात छ. शाहू महाराजांच्या आगमनामुळे व बाळाजी विश्वनाथ यांच्या योग्य नेतृत्वामुळे मराठा साम्राज्याची विस्कळीत झालेली घडी पुन्हा व्यवस्थित झाली. मराठा मंडळाच्या स्थापनेतून तर मराठा सरदार पुन्हा कार्यरत झाले व साम्राज्याच्या विकासाला सुरुवात झाली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. कारण इ.स.१७१९ ला छत्रपती शाहू महाराजांना मोघल बादशहाकडून औरंगजेबाने जिंकलेले प्रदेश परत मिळाले.

इ.स.१७१९ ला प्राप्त स्वराज्याच्या सनदेत ३५ प्रदेश अंतर्भूत होते. प्रांत व किल्ला यांचा समावेश असलेला महसूल विभागास 'महाल' म्हणत. या महाल विभागातून प्राप्त महसूल हा छत्रपतींकडे जमा केला जाईल. त्याचप्रमाणे 'मोकासा' हा देखील लष्करी सेवेबद्दल प्राप्त उत्पन्न होय. तसेच 'साहोत्रा' म्हणजेच एकूण वसूल महसूल उत्पन्नाचा ०६% भाग तर 'नागगोंडा' म्हणजे ३% भाग होय. अशाप्रकारे वेगवेगळ्या माध्यमातून महसूल गोळा केला जात होता व मराठा साम्राज्य मजबूत करण्याचा प्रयत्न यशस्वी होत गेला. प्रांत, परगणा, महाल या सर्व ठिकाणी नेमलेल्या कुशल व योग्य असा सरदार वर्ग आपले कामकाज पूर्ण प्रामाणिकपणे पार पाडत होता. जेव्हा शाहू महाराज छत्रपती झाले, वेगवेगळ्या प्रांतातील सरदाराने आपल्या कर्तुत्वाच्या जोरावर दरारा निर्माण केला होता. कर्नाटकात घोरपडे, वऱ्हाड-नागपुरात कान्होजी भोसले, खानदेशात सेनापती दाभाडे तर बागलाण भागात निंबाळकरांनी आपले वर्चस्व निर्माण केले होते. ही वजनदार मंडळी अष्टप्रधान मंडळाच्या नियंत्रणाखाली राहणे शक्य नव्हते. म्हणूनच बाळाजी विश्वनाथांनी 'मराठा मंडळाची' रचना करून छ. शाहू महाराजांच्या नेतृत्वाने नवे संयुक्त राज्य व्यवस्था प्रस्थापित केले.

मराठा मंडळाच्या निर्मितीबाबत "न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे लिहीतात" बाळाजी विश्वनाथांनी मराठयांची स्थिती नीट पारखली. सत्ता टिकवून वाढवण्यासाठी जो उपाय काढला त्याचे अंतर्बाह्य स्वरूप भिन्न होते. शिवाजी महाराजांच्या परंपरेला धरून राजकीय सत्तेशी एकदिलाने लढले असा मोठा बलिष्ट पुढाऱ्यांचा संघ निर्माण करणे हे त्या उपायाचे बाह्य स्वरूप होते. या सरदारांच्या ताब्यातील प्रदेशात ज्याचा तो कुलमुखत्यार व्हावा, त्याने त्या प्रदेशात आपली सत्ता गाजवावी मात्र सर्व विभागातील सरदाराने कुलमुखत्यारी समान दर्जाची असावी ही त्या उपायाची दुसरी बाजू होती. यावरून मराठा मंडळाचे स्वरूप लक्षात येते.

न्यायमूर्ती रानडयांनी ही योजना उत्तम होती असेही म्हटले आहे. कारण भविष्यकाळात साम्राज्यविस्तार करण्यासाठी मराठयांना या मंडळाचा फायदा झाला. दोषाचा विचार केला तर सरदारांमध्ये स्वातंत्र्यवृत्ति निर्माण झाली व सत्ता प्रमुखांच्या विरुद्ध सरदार फटकून वागू लागले.

परंतु खऱ्या अर्थाने २५ वर्षानंतरच्या स्वतंत्रसंग्रामाच्या परिस्थितीचा विचार केला तर मराठा मंडळाशिवाय तरणोपाय नव्हता, हे आपणास मान्य करावे लागेल. म्हणून बाळाजी विश्वनाथांनी भविष्यकालीन सर्व परिस्थितीचा आढावा घेऊनच मराठा मंडळाची स्थापना केली हे सर्व आपण मान्य केले पाहिजे. म्हणूनच मराठा मंडळाच्या निर्मितीस बाळाजी विश्वनाथांची कामगिरी हे अत्यंत मौल्यवान व महत्वाची आहे.

## ३.४ मराठा महासंघाच्या निर्मितीचे चार टप्पे

छत्रपती शाहू महाराजांचे आसन स्थिर व सुरक्षित करण्यात बाळाजी विश्वनाथांनी अनेक मातब्बर सेनापती व सरदार आपल्या बाजूने केले नसते तर कदाचित आज मराठयांचा इतिहास वेगळाच असता, परंतु पेशवे बाळाजी विश्वनाथांच्या योग्य नेतृत्वामुळे हुशारीमुळे व चतुराईमुळे शाहू महाराज यांना छत्रपती पद मिळाले व ते छत्रपती बनले. हे जरी सत्य असले तरी देखील ज्यावेळी शाहू महाराज छत्रपती झाले, त्यावेळी मराठा साम्राज्यात सर्वत्र गोंधळाचे वातावरण होते. सर्व प्रांत-प्रांताचे सरदार व वतनदार सेनाकर्ते आपला मनमानी राज्यकारभार करीत होते. त्यांना एकत्रित आणून स्वराज्याची म्हणजेच मराठयांची स्थिती मजबूत करणे गरजेचे वाटले. म्हणूनच बाळाजी विश्वनाथांनी मराठा मंडळाची स्थापना केली व मराठा साम्राज्यातील सर्व प्रबळ व नेतृत्व संपन्न असे सरदार एकत्रित केले. म्हणूनच बाळाजी विश्वनाथाने आणि मराठा महासंघाच्या निर्मितीचे चार टप्पे पाडले ते पुढीलप्रमाणे –

१. प्रबळ मराठा सरदारांना साम्राज्यात सेवेत घेतले.

२. सरदारांनी विजित केलेय प्रदेशाचा ताबा दिला.

३. मराठा सरदारांना किताब/ इनाम दिले.

४. सरदारांना नवीन प्रांत देणे.

**१. प्रबळ मराठा सरदारांना साम्राज्य सेवेत घेतले :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी जसे स्वराज्य स्थापन करण्यासाठी नेतृत्व गुण संपन्न असे मावळे आपल्या हाताशी घेतले व त्यांनी त्यांची जात कोणती? धर्म कोणता? वंश कोणता?

हे न पाहता त्यांच्या गुणांच्या पारखेतून आपल्या स्वराज्याच्या कामात रुजू केले व त्यांनी निवडलेले हे सरदार आणि स्वराज्य स्थापनेत मोलाची कामगिरी केली व अखेर मराठयांना स्वराज्याची प्राप्ति झाली. हे सर्व बाळाजी विश्वनाथ जाणून होते. म्हणूनच त्यांनी छत्रपती शिवरायांप्रमाणेच जात, धर्म, पंथ न पाहता फक्त गुणांची पारख करून आपल्या साम्राज्याच्या सेवेत प्रबळ असे मराठा सरदारांची नेमणूक केली. बाळाजी विश्वनाथांनी मराठा मंडळात चौथाई व सरदेशमुखी मुघल बादशहाकडून मिळून घेतली व त्याच्याच मुलखात आपण नेमलेल्या योग्य व प्रबळ असे सरदारांची प्रांतावाईक नेमणूक करून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा अधिकार त्यांना दिला.

**२. सरदारांनी जीवित केलेल्या प्रदेशाचा ताबा दिला :**

छत्रपती शिवरायांनी जसे आपले अष्टप्रधान मंडळ निर्माण करून सर्व सरदारांवर आपला विश्वास व वचक निर्माण केला, तसाच त्यांच्यानंतर येणाऱ्या वारसदारांना करता आले नाही. कारण छत्रपती संभाजी राजे यांना छत्रपती पद देण्यापासून ते त्यांच्या राज्यकारभार करण्यापर्यंत काही सरदारांनी त्यांना विरोध केला. तसेच त्यांच्यात सुरु झालेला गृहकलहाचा फायदा इतर शत्रू व सरदाराने घेतला म्हणून संभाजीराजांना नंतर छत्रपती राजाराम आणि राणी ताराबाई यांच्या काळापासूनच मराठा सरदारांमध्ये फूट पडू लागली. त्यांची आपली राजाबद्दलची निष्ठा कमी होऊ लागली. तसेच छत्रपती राजारामवर आणि राणी ताराबाई यांच्या काळात वतनदारी वाढीस लागली. आपआपल्या वाटणात मनमानी करत व वेळप्रसंगी स्वराज्याची साथ सोडत. या सर्वांना एकत्र आणून अंमल कसा करायचा व राज्य सुरक्षित कसे करायचे हे आवाहन छत्रपती शाहू महाराज व पेशवे बाळाजी विश्वनाथांवर होते, परंतु बाळाजी विश्वनाथांनी अतिशय योग्य पद्धतीने व चतुराईने सरदार व वतनदारांना समजावून आपल्या मराठी मुलखात प्रामाणिक व कार्य दक्ष कसे राहायचे हे त्यांना समजावून दिले. तसेच त्यांना योग्य तो मोबदला त्यांच्या केलेल्या कार्याबद्दल दिला जाईल, हे सांगितले. धनाजी जाधव, बोकील, खंडेराव दाभाडे, परसोजी वा कान्होजी भोसले यांना शाहू महाराजांना सहकार्य करण्यास प्रवृत्त केले. परिणामी शाहू महाराजांच्या राज्यास स्थैर्य प्राप्त झाले व अनेक सरदाराने त्यांना आपल्या विजित केलेल्या प्रदेशाचा ताबा दिला.

**३. मराठा सरदारांना किताब/ इनाम दिले :**

छत्रपती राजारामांनी मराठा सरदारांना त्यांच्या उत्तम कामकाजाच्या बदल्यात इनाम व जहागिरी देण्याची पद्धत सुरु केली होती. खरे तर हे इनाम व जहागीर छत्रपतींचे पूर्वज म्हणजे शहाजीराजे भोसले यांना आदिलशहाने त्यांच्या उत्तम कामगिरीबद्दल जहागीर म्हणजेच प्रांत दिले गेले होते. त्याप्रमाणेच छ. राजारामानी ही प्रथा चालू ठेवली. कारण सरदारांना जर खुष ठेवले, तर राज्यकारभार चांगला चालेल व कामाची शाबासकी म्हणून ही त्यांनी जहागिरी व इनाम देण्याची प्रथा सुरु केली. छत्रपती राजारामांप्रमाणेच पेशवे बाळाजी विश्वनाथांनी आपल्या सरदारांना त्यांच्या योग्य कामाबद्दल किताब व इनामे बहाल केली. खंडेराव दाभाडे व परसोजी भोसले यांना अनुक्रमे 'सेनापती' व 'सेनासाहेब सुभा' हे किताब दिले.

**४. सरदारांना नवीन प्रांत देणे :**

औरंगजेबाच्या सततच्या स्वाऱ्यांमुळे राज्य खिळखिळे झाले होते. शिवाजी महाराजांच्या वेळची परिस्थिती व छ. शाहुंच्या काळातील परिस्थितीत फार मोठे अंतर पडले होते. अशा स्थितीत मराठा सरदारांच्यामध्ये नवचैतन्य निर्माण करून देणे आवश्यक आहे असे पेशवे बाळाजी विश्वनाथांना वाटले. म्हणूनच त्यांनी मराठा मंडळाची किंवा मराठा राज्य संघाची कल्पना मांडली व छत्रपती शाहू महाराजांनी तिला मान्यता दिली. या अंतर्गत सरदाराने मुलूखगिरी करावी, मोघलांना पराभूत करावे व जिंकलेला प्रदेश स्वतःकडेच ठेवावा अशी बाळाजींनी रचना केली होती. त्यानुसार त्यांनी नवीन योजना आखली व त्या योजनेनुसार फतेसिंग यांच्याकडे अक्कलकोट, प्रतिनिधींकडे – औंध, दाभाडांकडे खानदेश व गुजरात तर परसोजी भोसल्यांकडे कराड, नागपूरचे क्षेत्र देण्यात आले.

वरील सर्व सरदारांकडे हे नवे प्रांत देऊन मराठा सरदाराने चौथाई वसुलीतून आपला खर्च वजा करू बाकीची रक्कम मध्यवर्ती तिजोरीत भरावी. तसेच छत्रपतींनी बोलावल्यास सैन्यासह हजार राहावे असे ठरवण्यात आले आणि या नवीन योजनेचे सर्व मराठा सरदारांनी मनापासून स्वागत केले.

## ३.५ मराठा महासंघाच्या ऱ्हासाची कारणे

**१. सरंजाम व्यवस्था –**

मराठीशाहीत छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात विशेषत: देशमुख, देशपांडे यांची अनेक वतने जपत करून, वेतन पद्धती आणण्याचा प्रयत्न केला आणि रयतेला (शेतकऱ्याला) दिलासा दिला. त्यामुळे रयतेचा राजा ही उपाधी त्यांना लाभली. मात्र छत्रपती राजारामानी जहागिरी देऊन सरंजामशाहीला पुन्हा जीवदान दिले. छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत (१७०७ ते १७४९) एखाद्या सरदाराने नवीन प्रदेश जिंकून घेतला, की त्यालाच तो जहागीर म्हणून देण्याची प्रथा पडली. त्यामुळे पुढे पेशवाईत मराठा साम्राज्याचा विस्तार झाला असला तरी या सरंजामशाहीमुळे एकसूत्री राज्य राहिली नाही. आणि स्वतंत्र राज्यसंस्था उदयास आली. त्यामुळे सरदारांमध्ये एकीही राहिली नाही. सरदार वर्ग स्वतःला सर्वश्रेष्ठ समजू लागला. तसेच सरदार वर्गाला पेशव्याने जिंकलेला प्रांत दिल्यामुळे ते त्या प्रांताचे राजे झाले. म्हणूनच सरंजाम व्यवस्थेमुळे मराठा महासंघाचा ऱ्हास घडून आला.

**२. परस्पर हेवेदावे –**

छत्रपती शाहू महाराजांनी पेशवे बाळाजी विश्वनाथांच्या म्हणण्यानुसार, विजित प्रदेश सरदारांना दिला. ही पद्धत चालू केल्यामुळे मराठा शाहीतील बरेच सरदार नवीन प्रांत मिळवण्याच्या मागे लागले. त्यामुळे त्यांच्या आपापसात वाद व हेवेदावे मोठया प्रमाणात वाढले व त्यांचा परिणाम महासंघावर झाला. कारण पेशव्यांनी निर्माण केलेला हा महासंघ मराठा सरदारांमधील स्पर्धा व हेवेदावे यामुळे पूर्णपणे मोडकळीस आला.

### ३. छत्रपती शाहूंचा मृत्यू –

छत्रपती शाहू महाराजांनी इ.स.१७०७ पासून ते मरेपर्यंत म्हणजे १५ डिसेंबर इ.स. १७४९ पर्यंत राज्य चालविले. त्यांना आपली गादी सांभाळून मोठया प्रमाणात साम्राज्यविस्तार करायचा होता. त्याचप्रमाणे त्यांनी पेशवे बाळाजी विश्वनाथांच्या नियोजनानुसार सरदार वर्ग नेमला व तो वर्ग महाराजांच्या हयातीत त्यांना साथ देत राहिला परंतु ज्यावेळी महाराजांचा मृत्यू झाला, तेव्हापासून हा सरदार वर्ग साम्राज्यशाहीशी एकनिष्ठ राहिला नाही. कारण त्यांना नवीन योजनेनुसार दिलेले प्रांत हे शाहू महाराजांच्या मृत्युनंतर स्वतः त्या प्रांताचे ते स्वामी झाले. त्यामुळे मराठा सरदारांमध्ये फूट पडली व मराठा महासंघाचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली.

### ४. छत्रपती नंतर पेशव्यांच्या हातात सत्ता –

छत्रपती शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथास पहिले पेशवे पद म्हणून पेशव्यांची वस्त्रे बहाल केली. तेव्हापासून पेशवाईला सुरुवात झाली. छत्रपती शाहू महाराज प्रत्येक निर्णय घेतल्यापासून ते कोणतेही कार्य करण्यासाठी पेशव्यांवर अवलंबून राहत होते. त्याचा परिणाम म्हणजे पुढील काळात छत्रपती पद केवल नाममात्र राहिले व मराठयांच्या राज्यकारभाराची सगळी सूत्रे पेशव्यांच्या हाती गेली. पुढील शंभर वर्षे पेशव्याने मराठा वर राज्य केले. त्यामुळे इतर मराठा सरदार दुखावले गेले. ते मराठा संघापासून वेगळे झाले आणि त्यामुळेच पेशव्यांच्या हातात मराठाशाहीची पूर्ण सत्ता गेली.

### ५. पेशवे माधवरावानंतर नाना फडणवीसांचा उदय –

पेशवे बाळाजी विश्वनाथांपासून ते पेशवे माधवरावांपर्यंत मराठी सत्ता ही अनेक अडचणीत येऊनही तग धरून होती. वेळोवेळी फूट पडलेल्या सरदार वर्गाला एकत्र आणून राज्यकारभार करायचा प्रयत्न होत होता. पानिपतच्या पराभवामुळे तर मराठी सत्ता पूर्णपणे कोलमडून पडली होती. परंतु तिला जीवदान देण्याचे कार्य माधवरावांनी केले. त्यांच्यानंतर त्यांच्या वंशजांना हे पेशवे पद नीट सांभाळता आले नाही. पेशव्यांमध्ये गृहकलहाला सुरुवात झाली. रघुनाथ रावांची कारस्थाने, नारायण रावांचा खून या सर्व घटनांमुळे पेशवाई पूर्ण ऱ्हासाला लागली होती. यातच नाना फडणवीसांचा झालेला उदय हे महत्वाचे कारण ठरले. नाना फडणवीस यांनी नंतर नारायण रावांचा पुत्र सवाई माधवराव यास पेशवाईचे वस्त्रे दिली परंतु हे पेशवे अल्पवयीन असल्याने नाना फडणवीस यांनी राज्यकारभार हाती घेतला त्यामुळे अनेक सरदार नाराज झाले. एकी राहिली नाही. तसेच बाळाजी विश्वनाथ यांनी राज्यकारभार सुरळीत चालावा म्हणून मराठा महासंघाची स्थापना केली होती. मात्र आता हेच संघ असणारे सरदार फुटले व मराठा महासंघाचा पूर्ण ऱ्हास घडून आला.

### मराठा महासंघाचे महत्व

१) बाळाजी विश्वनाथांनी निर्माण केलेला मराठा महासंघ यामुळे छत्रपती शाहूंना एक संघ प्रामाणिक सरदार वर्ग प्राप्त झाला.

२) मराठयांना मोघल बादशहाकडून उत्तरेकडील चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा अधिकार प्राप्त झाला.

३) सरदार वर्ग संतुष्ट झाले.

४) मराठयांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली.

५) मराठयांचा दरारा वाढला.

६) मराठयांना दक्षिणेच्या राजकारण व्यतिरिक्त उत्तरेकडे राजकारणात जाण्याची मुभा उपलब्ध झाली.

७) मराठा सत्तेचा वेगाने प्रसार होण्यास मदत झाली.

८) मराठा सरदारांना चांगल्या कामाबद्दल किताबे व इनामे दिले. त्यामुळे त्यांच्यात नवीन उत्साह निर्माण झाला.

## ३.६ सारांश

औरंगजेबाच्या मृत्युनंतर दक्षिणेच्या राजकीय परिस्थितीत मोठया प्रमाणात अस्थिरता निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत राणी ताराबाईचे आक्रमक धोरण व छ. शाहू महाराजांची संयमी भूमिका या दोन्ही बाजूने मराठा साम्राज्यात परिवर्तन होऊ लागले. अशा कठीण परिस्थितीत बाळाजी विश्वनाथांचा झालेला उदय व त्यांनी छत्रपती शाहू महाराजांचे केलेले स्थिर आसन हे महत्वाचे ठरते. तसेच पेशवे बाळाजी विश्वनाथांनी मराठा साम्राज्याचे कामकाज नीट व सुरळीत चालवले. सरदार वर्ग कामकाजात सक्रीय व एकसंघ राहावा यासाठी त्यांनी 'मराठा महासंघाची' स्थापना केली. तसेच या महासंघाच्या माध्यमातून मराठा साम्राज्य वाढवण्याचा व सुरक्षित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तसेच सरदार वर्गांना वतने, इनामे व किताबे दिले गेल्याने त्यांच्या कामाची गती आणखी वाढली. याचेच उत्तम उदाहरण म्हणजेच बाळाजी विश्वनाथाने उत्तरेकडील चौथाई व सरदेशमुख ही मोघल बादशहांकडून मिळून दिल्याने मराठयांची आर्थिक स्थिती चांगली सुधारली.

असे असले तरी छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्युनंतर मराठा सरदारांमध्ये फूट पडण्यास सुरुवात झाली. कारण या सरदारांना नवीन योजनेनुसार जिंकलेला प्रांत देण्याचे ठरले. त्याप्रमाणे ते त्या प्रांताचे स्वामी बनले व मनमानी कारभार करू लागले. छत्रपती शिवरायांनी संपविलेली जहागिरदारी किंवा सरंजामशाही पुन्हा जन्मास आली. सरदार हे वतनदार झाले व मनमानी राज्यकारभार करू लागले. बाळाजी विश्वनाथांनी निर्माण केलेला मराठा महासंघ आता ऱ्हासाच्या दिशेने वाटचाल करू लागला. या सरदारांच्या फुटीरवृत्तीमुळे मराठा महासंघाचा ऱ्हास घडून आला.

मराठा महासंघाचे चांगले वाईट परिणाम काही असले तरी पेशवा बाळाजी विश्वनाथांनी मराठयांच्या राजकीय क्षेत्रात मोठा बदल घडून आणला होता. महाराष्ट्राबाहेर म्हणजेच उत्तरेपर्यंत मराठयांचा साम्राज्यविस्तार वाढविला होता. म्हणूनच पेशवे बाळाजी विश्वनाथांनी निर्माण केलेला मराठा महासंघ इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा ठरला आहे.

## ३.७ प्रश्न

१) मराठा महासंघाचा उदय सांगून मराठा महासंघाच्या निर्मिती विषयी सविस्तर चर्चा करा.

२) मराठा महासंघाच्या निर्मितीतील चार टप्प्यांची चर्चा करा.

३) मराठा महासंघाचे महत्त्व स्पष्ट करा.

४) मराठा महासंघाच्या ऱ्हासाची कारणे सविस्तर स्पष्ट करा.

## ३.८ संदर्भ


१) पवार जयसिंगराव, मराठी साम्राज्याचा उदय व अस्त, मेहता प्रकाशन.

२) भामरे जितेंद्र, मराठयांचा इतिहास – शेठ पब्लिकेशन, मुंबई

३) कोलारकर, श.गो., मराठयांचा इतिहास, नागपूर.

४) मोरवंचीकर रा. श्री. आधूनिक महाराष्ट्राची जडणघडण व शिल्पकार चित्रकोष, खंड १, २००९.

५) Kedar, mayboli.com


munotes.in

# ४

## पेशवे बाळाजी बाजीराव (नानासाहेब)

**घटक रचना :**

४.० उद्दिष्टये

४.१ प्रस्तावना

४.२ नानासाहेबांचा उदय

४.३ पेशव्यांसमोरील अडचणी व राज्यकारभाराचे धोरण

४.४ नानासाहेबांनी उत्तरेकडे केलेला साम्राज्यविस्तार (१७४१ ते १७४८)

४.५ नागपूरचे रघुजी भोसले प्रकरण

४.६ दरबारातील पेशवे विरोधी गटाचे कारस्थान

४.७ छत्रपती शाहूंचा मृत्यू व पेशव्यांकडे मराठ्यांची पूर्ण सत्ता आली.

४.८ आंग्रेंच्या आरमाराचा नाश

४.९ उदगीरची लढाई

४.१० पानिपतचे तिसरे युद्ध -१७६१

४.११ नानासाहेबांचा मृत्यू व योग्यता

४.१२ सारांश

४.१३ प्रश्न

४.१४ संदर्भ

## ४.० उद्दिष्टये

१. पेशवे बाळाची बाजीराव उर्फ नानासाहेब यांच्या कार्याचा अभ्यास करणे.

२. पेशवे बाळाची बाजीराव व मुघल यांच्यातील संबंधाविषयी माहिती समजून घेणे.

३. पेशवे बाळाची बाजीरावांच्या उत्तरेकडील मोहिमांची माहिती समजून घेणे.

४. पेशवे बाळाची बाजीरावांची योग्यता समजून घेणे.

munotes.in

## ४.१ प्रस्तावना

छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दीत पेशवा बाळाजी विश्वनाथांचा खऱ्या अर्थाने उदय झाला. व तेथूनच खऱ्या अर्थाने पेशवे युगाला प्रारंभ झाला. पेशवे बाळाजी विश्वनाथांनी पेशवे म्हणून अतिशय उत्तम कामगिरी पार पाडली व मराठा साम्राज्याचा मोठया प्रमाणात साम्राज्यविस्तार केला. त्यांच्याप्रमाणे त्यांच्या वंशजानी या पेशव्याची गादी अतिशय उत्कृष्टपणे व जबाबदारीने चालवली. पेशवे बाळाजी विश्वनाथनंतर थोरले बाजीराव पेशवे हे अतिशय कुशाग्र व रणधूरंदर सेनानी होते. बाजीरावांचा इतिहास म्हणजे विजयाचा इतिहास मानावा लागेल. पेशवेकाळात छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरण चालू ठेवणारे पेशवे म्हणजे बाजीराव पेशवे होय. अशी त्यांची ओळख इतिहासात आहे त्यांच्याप्रमाणेच त्यांचा पुत्र बाळाजी बाजीराव (नानासाहेब पेशवे) वडिलांप्रमाणे पराक्रमी व कुशल राज्यकारभार करणारे पेशवे होते. पहिल्या बाजीरावांच्या मृत्यूनंतर जून १७४० मध्ये बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांना पेशवाईची वस्त्रे मिळाली आणि तिथूनच खऱ्या अर्थाने पेशवे नानासाहेबांच्या कार्यास सुरुवात झाली. त्यांनी आपल्या पित्याप्रमाणेच उत्तर हिंदुस्थानात साम्राज्य विस्तार मोठ्या प्रमाणात वाढवला. तसेच मुघलांकडून चौथाई व सरदेशमुखी या सनदादेखील वसूल केल्या आणि शत्रूला पूर्णपणे नमवले. अशा या रणधूरंदर पेशव्यांच्या कार्याचा व साम्राज्यविस्ताराचा आढावा आपण पुढील प्रमाणे घेऊ.

## ४.२ नानासाहेबांचा उदय

बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे हे थोरले बाजीराव पेशवे यांचे पुत्र होते. ते थोरल्या बाजीरावांच्या मृत्यूनंतर मराठा साम्राज्याचे पेशवे बनले. त्यांच्याच काळात मराठा साम्राज्याने यशाचे उत्तुंग शिखर गाठले आणि मराठयांनी अटकेपार झेंडे लावले. अशा या रणधुरंदर पेशवांचा जन्म १६ डिसेंबर १७२१ रोजी झाला. वयाच्या नवव्या वर्षी ११ जानेवारी १७३० रोजी त्यांचा विवाह वाईचे श्रीमंत सावकार भिकाजी नाईक रास्ते यांची कन्या गोपिकाबाईशी झाला. नानासाहेबांचे लष्करी शिक्षण काका चिमाजी आप्पांच्या हात खाली झाले. त्यांची हुशारी व कर्तृत्व पाहून छत्रपती शाहू महाराजांनी नानासाहेबांना २५ जून १७४० रोजी पेशव्याची वस्त्रे सातारा दरबारी प्रदान केली. त्यांच्या पेशवाईच्या काळात मराठा साम्राज्याने बाळशे धरले, तसेच मराठयांनी उत्तर भारतात जबर वचक बसवला आणि साधारण इसवी सन १७६० च्या आसपास मराठा साम्राज्य ही भारतीय उपखंडातील एक बलाढ्य अशी ताकद बनली.

थोरले पेशवे बाजीराव यांचा मुलगा नानासाहेब हे पित्याप्रमाणेच कर्तव्यदक्ष असल्याने त्यांना पेशवेपद देण्याची छत्रपती शाहूंची इच्छा होती. पण दरबारातील काही मंडळींचा पुन्हा भट घराण्याकडे पेशवेपद देण्यास विरोध होता. त्यात रघुजी भोसले हे आघाडीवर होते. रघुजी भोसले हे छत्रपती शाहू महाराजांचे जवळचे नातेवाईक होते. त्यांनी पेशवे पदासाठी बाबूजी नाईक बारामतीकर या श्रीमंत सावकाराचे नाव पुढे केले. पण केवळ पैशावर राजकारण करणे किंवा राज्य सांभाळणे शक्य होत नाही, हे छ. शाहू महाराज ओळखून होते. म्हणूनच त्यांनी रघुजींच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करून नानासाहेबांना पेशवे पदाची वस्त्रे दिली. मराठी राज्याला पुन्हा एकदा १९व्या वर्षात पदार्पण केलेला तरुण तडफदार पेशवा लाभला. छत्रपती शाहू महाराजांनी मराठा राज्याची सर्व कायदेशीर व प्रत्यक्ष कारभाराची सूत्रे

त्यांच्याकडे सोपवली व स्वतः मराठा साम्राज्याचे नामधारी प्रमुख राहिले. इ. स.१७४९ साली छत्रपती शाहू महाराजांचा मृत्यू झाल्यानंतर बाळाची बाजीराव उर्फ नानासाहेब मराठा राज्याचे सत्ताधीश बनले.

## ४.३ पेशवेपदाची प्राप्ती व नानासाहेबांचे राज्यकारभाराचे धोरण

थोरले बाजीरावांच्या निधनानंतर छत्रपती शाहू महाराजांनी पेशवाईची वस्त्रे नानासाहेबांना दिली. बाळाची बाजीराव उर्फ नानासाहेब यांनी पूर्वीच्या दोन पेशव्यांसारखेच मराठा छत्रपतींच्या संमतीने साम्राज्यवादी धोरण अवलंबिले. थोरले बाजीराव पेशव्यांनी आपल्या कारकीर्दीत शत्रूवर चांगलाच वचक बसवला होता. उत्तरेपर्यंत साम्राज्य विस्तार केला होता. तसेच थोरले बाजीरावने आपल्या हयातीत मोहिमा आखण्यात घोडदोड करण्यात व शत्रूला पराभूत करण्यात घालवली. ते सामान्य सैनिकाप्रमाणे राहत होते. असे या महान सैनिकाचा मृत्यू अचानक झाला. छत्रपती शाहू महाराजांना मोठा धक्का बसला होता. कारण अनेक महत्त्वाचे प्रश्न सोडवणे बाकी राहिले होते. त्यामुळे सर्वांची जबाबदारी पेशवे नानासाहेब यांच्यावर पडली. समोर अनेक अडचणी व समस्या उभ्या होत्या. भोपाळच्या लढाईनंतर निजामाच्यामार्फत मराठयांना माळव्याची सनद मिळणार होती. ती अजूनही मिळाली नव्हती. निजामाचा बाजीरावने दोनदा पराभव करूनही त्यांच्या मराठी राज्याविरुद्ध कारवाया थांबवलेल्या नव्हत्या. पश्चिम किनारपट्टीवर सिद्धी, पोर्तुगीज, इंग्रज या परकीय सत्तांच्या मराठयांविरुद्ध जोरदार हालचाली सुरू होत्या. तसेच आंग्रे पेशव्यांना जुमानत नव्हते. मराठा राज्याची आर्थिक स्थिती ही बिघडलेली होती. बाजीरावांच्या सततच्या मोहिमांमुळे पेशव्यांना प्रचंड कर्जाचे ओझे झाले होते. म्हणजेच नानासाहेबांना मराठी राज्यांच्या शत्रूंचा बंदोबस्त करणे व कर्जाचा भार कमी करणे ही महत्त्वाची कर्तव्य करायची होती. त्यासाठी त्यांनी आपल्या वडिलांचे साम्राज्य विस्ताराचे धोरण पुढे चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी नवीन योजना आखल्या व त्या अंमलात आणल्या. तसेच अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी राज्यातील अर्थव्यवहाराचे नियंत्रण करणारी एक यंत्रणा निर्माण केली. कर्नाटकमध्ये मुरारराव घोरपडे या विश्वासू अधिकाऱ्यांची नेमणूक करून तेथून बरीच खंडणी वसूल केली. दरवर्षी वीस हजार रुपये अकार्टमधून मिळण्याची तरतूद करण्यात आली. पोर्तुगीजांकडून मराठयांनी जिंकलेल्या प्रदेशातील महसूल जमा करण्याची परवानगी शाहू महाराजांनी नानासाहेबांना दिली. तसेच उत्तरेत गुजरात सोडून सर्व प्रांताचा महसूल वसुलीचाही अधिकार दिला. त्यामुळे लवकरच आर्थिक संकटांवर पेशवे नानासाहेबांना मात करता आली व मराठा साम्राज्याची थोरले बाजीरावानंतर विस्कटलेली घडी ते पुन्हा व्यवस्थित बसू शकले. छत्रपतींचा विश्वास ही सार्थ ठरू शकले.

## ४.४ नानासाहेबांनी उत्तरेकडे केलेला साम्राज्यविस्तार (१७४१ ते १७४८)

### १. पहिली स्वारी १७४१

थोरल्या बाजीराव पेशव्यांचा दिल्ली मोहिमेचा बादशहाने इतका धसका घेतला होता की, पेशव्यांपासून दिल्ली सुरक्षित राहणार नाही असे त्यांना वाटले. म्हणून बादशहाने निजामाला दिल्लीत बोलावून घेतले व मराठयांना हूसकावून लावण्यासाठी बादशहाने

निजामाला एक कोटी रुपये व पाच-सहा सुभ्याचा कारभार दिला. तसेच त्याच्या मुलास आग्रा व माळव्याची सुभेदारी दिली. या सर्व हालचालींची खबर थोरल्या बाजीराव पेशव्यास लागताच त्यांनी २५ डिसेंबर १७३७ ला उत्तरेकडे कुच केली. निजाम व थोरले बाजीराव पेशवे यांच्यात भोपाळची लढाई झाली. या लढाईमध्ये पेशव्यांचा विजय झाला. बाजीराव व निजाम यांच्यात दोराहसराईचा तह झाला. त्यानुसार माळव्याचे सनद मोघल बादशहाकडून निजामाने मराठयांना मिळवून देण्याचे ठरले. परंतु त्यानंतर थोरले बाजीरावांचा अचानक मृत्यू झाल्याने, ही सनद मराठयांना मिळाली नव्हती. नानासाहेबांनी सत्ता हातात येताच या दिशेने प्रयत्न सुरू केले. त्यासाठी प्रथम निजामाशी बोलणी सुरू केली. निजाम वयस्कर झाला असून, त्याच्या वारसांमध्ये संघर्ष सुरू झाला होता. नानासाहेबांनी १७४१ मध्ये वऱ्हाडातील एदलाबाद येथे निजामाची भेट घेतली. पण माळव्याबाबत निजामाने टाळाटाळ केली. दिल्ली दरबाराशी वारंवार पत्रव्यवहार करूनही बादशहा पेशव्यांना दात देत नव्हता. मराठी सरदारदेखील माळव्यात स्वस्त न बसता आजूबाजूची महत्त्वाची ठिकाणे जिंकून घेत होती व तेथे आपला वचक निर्माण करीत होते.

बाजीरावांच्या काळापासूनच जयपूरच्या सवाई जयसिंग यांच्याशी मराठयांचे चांगले संबंध होते. त्यांचा माळव्याच्या संदर्भात उपयोग करून घेण्याचाही नानासाहेबांनी प्रयत्न केला. १७४१ मध्ये त्यांनी जयसिंहाची भेट घेऊन बादशहाकडून जयसिंहानी मराठयांना माळव्याची सुभेदारी मिळून द्यावी त्या बदल्यात मराठे जयसिंहाला नेहमी मदत करतील असा प्रस्ताव ठेवला. परंतु जयसिंहानी गोड बोलून नानासाहेबांची बोलवण केली. निजाम व जयसिंहाची काहीच मदत होत नाही, हे पाहून नानासाहेबांनी आक्रमक पवित्रा घेऊन, स्वबळावर माळव्याची सनद मिळवण्याचे ठरवले. त्या दृष्टीने नानासाहेबांनी आपल्या फौजेनिशी माळव्यावर आक्रमण केले. त्यामुळे सर्व शत्रूंवर वचक निर्माण झाला. जयसिंहाने बादशहाकडे मराठयांना माळव्याचे सनद देण्याविषयी आग्रह केला. परिणामी ४ जुलै १७४१ रोजी बादशहाकडून माळव्याची सनद मिळाल्याचे आश्वासन मिळाले. त्यामुळे पेशवे पुण्यात परतले.

**२. दुसरी स्वारी १७४२ बुंदेलखंडचा विजय -**

उत्तर हिंदुस्तानातील बुंदेलखंडाचा प्रदेश भौगोलिक स्थानामुळे लष्करी कारवायांसाठी अत्यंत मोक्याचा होता. बुंदेलखंडात शिरकाव झाल्यास तेथून माळव्यावर लक्ष ठेवणे शक्य होईल. तसेच तेथून गंगेच्या दुवाबात जाणेही सोपे होईल. या दुवाबतील मथुरा, काशी, अलाहाबाद, गया ही हिंदूंची तीर्थस्थाने मुस्लिमांच्या ताब्यात होती. ती सोडवणे मराठयांना आवश्यक वाटत होते. त्याचप्रमाणे छत्रसालने बाजीरावांना त्यांच्या राज्याचा तिसरा हिस्सा देणे कबूल केले होते. पण प्रत्यक्षात तो ताब्यात आला नव्हता. म्हणूनच नानासाहेबांनी उत्तरेकडील दुसरी मोहीम काढली व खानदेशमार्गे माळव्यात जाऊन पोहोचले.

झाशीपासून सहा मैलावर असलेले ओरच्छा हे ठिकाण ताब्यात आल्यास बुंदेलखंडावर प्रभुत्व निर्माण करता येईल. असे वाटल्याने नानासाहेबांनी ज्योतिबा शिंदे व मल्हारकृष्ण या सरदारांना प्रथम ओरच्छाचा राजा वीरसिंह देवकडे पाठवले. दोघे सरदार झाशीला मुक्कामी असताना वीरसिंहाने अचानक हल्ला करून त्यांना ठार मारले. ही बातमी समजताच पेशवे

नानासाहेबांनी नारोशंकरला पाठवून वीरसिंगला कैद केले. ओरच्छाचा पूर्ण विध्वंस केला व झाशीचा ताबा घेतला.

### ३. तिसरी स्वारी १७४५

पेशवे नानासाहेब यांनी १७४२ ला दुसरी स्वारी करून राजपुत राजांवर वचक निर्माण केला. परंतु असे असले तरी अजून राजपूत मराठयांचे वर्चस्व मानायला तयार नव्हते. या काळात दोन दुःखद घटना घडल्या होत्या त्या म्हणजे १७४५ मध्ये पराक्रमी सरदार राणोजी शिंदे यांचा मृत्यू झाला व मराठयांचा दिल्लीतील वकील महादेव भट हिंगणे यांचीही हत्या झाली. तरी नानासाहेबांनी बुंदेलखंड मोहीम चालूच ठेवून ५ मे १७४६ रोजी जेतपुर किल्ला जिंकला त्याआधी १७४५ च्या सुमारास भोपाळच्या नवाबा विरुद्ध पेशव्यांनी चढाई केली. त्यामुळे भिलसा हे महत्त्वाचे ठाणे व पंधरा-सोळा तालुके जिंकले. बुंदेलखंडामध्ये पेशव्यांना फार मोठे यश प्राप्त झाले असे असले तरी, नानासाहेबांना उत्तर भागातील इतर आणखी भागावर आपले वर्चस्व निर्माण करायचे होते. पण याचवेळी रघुजी भोसल्यांच्या कारस्थानाची बातमी पेशव्यांच्या कानावर आली त्यामुळेच उत्तरयेतील मोहीम अर्धवट सोडून १७४७ च्या सुमारे पेशवे साताऱ्यास परतले व त्यांनी रघुजींचा बंदोबस्त केला. ही उत्तरेची अर्धवट राहिलेली मोहीम त्यांना पूर्ण करणे आवश्यक वाटप होते म्हणून त्यांनी पुन्हां उत्तरे चौथी स्वारी केली.

### ४. जयपूर प्रकरण

नानासाहेब पेशव्याने पुन्हा एकदा उत्तर हिंदुस्तानात चौथी स्वारी केली. कारण तिसऱ्या स्वारी दरम्यान त्यांना उर्वरित भाग काबीज करणे बाकी होता आणि ते साध्य करण्यासाठीच त्यांनी पुन्हा एकदा उत्तरेत चौथी स्वारी केली. परंतु त्यावेळी उत्तर भागात वेगळेच राजकारण चालू होते. जयपुरचा राजा सवाई जयसिंह हा १७४३ मध्ये मरण पावला. त्यांना ईश्वरसिंह व माधवसिंह ही दोन मुले होती. माधवसिंह हा मेवाडचा राजकन्येचा पुत्र होता. तिला जयसिंह यांनी माधवसिंह हा भविष्यात जयपूरच्या गादीवर बसेल असे वचन दिले होते. परंतु गादीवर खरा हक्क वडील मुलगा ईश्वरसिंहाचा होता. त्यातून संघर्ष होऊ नये म्हणून जयसिंहाच्या हयातीत मेवाडच्या राजाने समपुरा परगणा माधवसिंहाला देऊन त्याने मेवाडची सेवा करावी व जयपुर मध्ये ईश्वरसिंहाला राज्य करू द्यावे असे ठरवले. त्यामुळे जयसिंहाच्या मृत्यूनंतर ईश्वरसिंह गादीवर बसले. माधवसिंह मेवाडचा राजा जगतसिंहाकडे गेले, पण अचानक १७४७ मध्ये जगतसिंहाने जयपूरच्या गादीवर माधवसिंहाचा हक्क असल्याचे सांगून, ईश्वरसिंह विरुद्ध युद्ध पुकारले. ईश्वरसिंह यांनी माळव्यातील शिंदे व होळकरांकडे मदत मागून तीन लाख खंडणी देण्याचे कबूल केले. त्यामुळे मराठयांनी जगतसिंह व माधवसिंहाचा पराभव केला. या प्रकरणात जयप्पा शिंदेने भरपूर कमाई केल्याने मल्हार होळकरांना त्यांचा मत्सर वाटू लागला. म्हणूनच माधवसिंहाने होळकरांना ६५ लाख रुपयाचे प्रलोभन दाखवून ईश्वरसिंहाला विरोध केला. अशा प्रकारे कारण नसताना जयपुर प्रकरणाबाबत शिंदे व होळकर एकमेकांच्याविरुद्ध उभे राहिले. या सर्व चाललेल्या राजकारणाची खबर नानासाहेबांना लागताच त्यांनी १७४८ मध्ये जयपुरला येऊन पोहोचले व त्यांनी दोन्ही भावांमध्ये समेट घडवून व तडजोड करून ईश्वरसिंहाने माधवसिंहाला नेवायई सह चार परगणे पेशव्यांना तीन लाख रुपये व होळकर यांना २५

हजार रुपये देण्याचे कबूल केल्याने पेशवे जून १७४८ मध्ये पुण्यात परतले, परंतु पेशव्यांची पाठ वळताच ईश्वरसिंहाने वरील तडजोड अमान्य केली. त्याचा राग येऊन होळकरांनी जयपुरवर आक्रमण केले. ईश्वरसिंहाचा पराभव करून माधवसिंहाला चार परगणे द्यायला लावले. पण नंतर होळकरांचे उपद्रव वाढत गेल्याने ईश्वरसिंहाने आत्महत्या केली. १७५१ मध्ये मराठयांनी माधवसिंहाला गादीवर बसवले. ज्या माधवसिंहाला मराठयांनी मदत केली तोच पुढे मराठयांवर उलटला. कटकारस्थाने करून त्याने अनेक मराठयांना ठार मारले. जयपूर प्रकरणात मराठयांना लाभ न होता मोठी हानी झाली. तसेच मराठा राजपूत यांच्यातील संबंध दुरावले गेले.

## ४.५ नागपूरचे रघुजी भोसले प्रकरण

नागपूरच्या भोसले घराण्यातील एक शूर व मुत्सद्दी व्यक्ती म्हणून रघुजी भोसले प्रसिद्ध होते. त्यांचे घराणे मूळचे पुणे प्रांतातील हिंगणीचे तसेच इतिहासात ते पहिले रोघोजी म्हणून ओळखले जातात. वयाच्या बाराव्या वर्षी कान्होजी भोसले (चुलता) त्यांनी त्यास सांभाळण्यासाठी वऱ्हाड येथे नेले आणि तेथूनच नंतर ते छत्रपती शाहूंच्या चाकरीत साताऱ्यास आले. रघुजी भोसले हे पराक्रमी व स्वतंत्र वृत्तीचे असल्याने छ. शाहू महाराजांनी त्यांना १७३८ मध्ये बंगालकडील पूर्व भागात चौथाई वसुलीचा अधिकार दिला होता. त्याप्रमाणे रघुजीनी नवाबास आपल्या आक्रमक धोरणातून शरण आणले. त्यानंतर नवाबाने तह करून बंगाल, बिहार, ओरिसामधील मराठयांचे चौथाई व सरदेशमुखी हक्क मान्य केले. यामुळे साहजिकच रघुजींचे मध्यपूर्व भागात प्रभुत्व निर्माण झाले. त्यानंतर १७४० नंतर मात्र नानासाहेब व रघूजी यांच्यातील संघर्षामुळे मराठेशाहीचे नुकसान घडून आले. नानासाहेबांनी उत्तरेकडील मोहिमात बुंदेलखंड जिंकले, तेव्हा पेशव्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात घुसखोरी केल्याचे वाटून रघुजी अस्वस्थ झाले. पण नानासाहेबांना आपण पेशवा असल्याने सर्व सरदाराने आपल्या आज्ञा पाळाव्यात असे वाटत होते. याचवेळी रघुजींनी कर्नाटकावर आक्रमण करून दोस्तअलीचा पराभव केला. तसेच त्रिचिनापल्लीचा नवाब चंदा साहेबाला अटक केली. त्याच्या या विजयामुळे मराठा राज्यात त्यांना मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली. छत्रपतींनी त्यांचा सत्कार केला. ही गोष्ट पेशव्यांना आवडली नाही. यावरून उभयंतात किती मत्सर होता हे स्पष्ट दिसून येते. त्यानंतर रघुजीनी पूर्वेकडील चौथाई वसुलीकडे लक्ष केंद्रित केले. अलीवर्दीखान हा बंगाल प्रांताचा सुभेदार होता. बंगालमधील सुभेदार हे स्वतंत्र वागू लागले होते. त्यातच अलीवर्दीखान व मीरहबीब यांच्यात अंतर्गत संघर्ष चालू होता. या संघर्षाचा फायदा घेऊन रघुजीनी भास्करांमानच्या नेतृत्वाखाली १७४१ मध्ये बंगालवर सैन्य पाठवले. भास्करामानी मीरहबीबला हाताशी धरून अलीवर्दीची नाकेबंदी केली. मुर्शिदाबाद हे शहर लुटले. मराठयांची सत्ता हुगळी व कलकत्त्यापर्यंत निर्माण केली.

रघुजी भोसले एका मागून एक मोगल सरदारांना शह देत होते. याच काळात पेशव्याने गदा व मांडला हे प्रदेश जिंकून तेथूनच बंगालच्या चौथाईची मागणी केल्याने रघुजी भोसल्यांना राग आला. त्याबाबतची तक्रार त्यांनी छ. शाहू महाराजांकडे केली या सर्व घडामोडी छ. शाहू महाराजांच्या समोर घडत होत्या. पण ते प्रत्यक्षात कोणा एकाची बाजू घेऊ शकत नव्हते, तर रघुजी हे पेशव्यांचे महत्त्वपूर्ण स्थान मानायला तयार नव्हते. पेशव्यांना रघुजीचे वर्चस्व व रघुजीचे स्वतंत्र वागणे पसंत नव्हते. त्यातच मोगल बादशहाने व सरदाराने छत्रपती शाहू

महाराजांकडे रघुजींची तक्रार केली की, ते आम्हास त्रास देत आहे. त्यावेळी मात्र शाहूनी रघुजीच्या कारवायांना पायबंद घालण्याचे ठरवले. परंतु छत्रपती शाहू महाराजांना नानासाहेब पेशवे व रघुजी भोसले हे दोघेही महत्त्वाचे वाटत असल्याने त्यांनी पेशवे व भोसले यांची संघर्षाची बातमी समजताच त्यांनी दोघांनाही सातारास बोलावून घेतले. दोघांमध्ये समेट घडून आणला. १७४३ मध्ये झालेल्या मैत्री करारानुसार छत्रपतींनी पेशवे व भोसल्यांची कार्यक्षेत्र ठरवून दिली. दोघांमध्ये पुन्हा कोणताच वाद किंवा संघर्ष निर्माण होऊ नये याची व्यवस्था केली. अशा प्रकारे छत्रपती शाहू महाराजांनी पेशवे व रघुजीमध्ये संघर्ष मिटवला व आपले राज्य हे वादविवादापासून वाचवले शेवटी पूर्णपणे नागपूरचे रघुजी भोसले व पेशव्यांमधील प्रकरण मिटले.

## ४.६ दरबारातील पेशवे विरोधी गटाचे कारस्थान

नानासाहेब पेशवे यांना पेशवे पद हे सहजासहजी मिळाले नव्हते. कारण दरबारामध्ये पेशवे पदासाठी पहिले बाजीराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर बरेच सरदार इच्छुक होते. परंतु शाहू महाराजांनी थोरले बाजीराव पेशव्यांचे पुत्र नानासाहेब यांची पेशवे पदासाठी घोषणा केली. तेथूनच खऱ्या अर्थाने पेशवे विरोधी गटांमध्ये कटकारस्तांना सुरुवात झाली. खरे तर इ.स. १७४६- ४७ मध्ये म्हणजेच छ. शाहू महाराजांच्या मृत्यूच्या दोन वर्षे अगोदर पासूनच पेशव्यांविरुद्ध मोठे कारस्थान चालू झाले होते. ते असे की छ. शाहू महाराज हे स्वतः मोहिमांवर जात नसे. छ. शाहू महाराजांचा खर्च अफाट असल्याने ते कर्जबाजारी झाले होते. त्यांनी पेशव्यांनाही परिस्थिती कळवली होती. पण पेशवे त्यावेळी उत्तरेतील राजकारणात व्यस्त असल्याने त्यांना छत्रपतींचे अडचणीकडे लक्ष देता आले नाही. याच गोष्टीचा फायदा घेऊन दरबारातील पेशवे विरोधी गटाने पेशव्यांनी उत्तरेत प्रचंड कमाई केली असून छत्रपतींचे कर्ज ते सहज फेडू शकतात. परंतु पेशवे उद्दाम व व्यसनी झाले आहेत. त्यांना छत्रपतींच्या दुःखाचे देणे घेणे नाही. अशा प्रकारे छ. शाहू महाराजांचे कान फुंकण्यात आले. शाहू महाराज वार्धक्यामुळे व कर्जबाजारीपणामुळे तसेच वारसा प्रश्नामुळे खूपच चिंताग्रस्त झाले होते. त्यामुळे पेशवे विरोधातील गोष्टी खऱ्या मानून त्यांनी १७४७ मध्ये नानासाहेबांना पेशवे पदावरून बडतर्फ केल्याची घोषणा केली. पण त्यांच्या या कृतीमुळे राज्यात गोंधळ माजला. नानासाहेबांनी मनाचा तोल ढासळू न देता अत्यंत नम्रपणे छ. शाहू महाराजांचे म्हणणे मान्य केले. परिणामी छत्रपती शाहू महाराजांना आपली चूक उमगली व दोन-तीन महिन्यातच त्यांनी पुन्हा नानासाहेबांकडे पेशवेपद बहाल केले. दरबारातील पेशव्यां विरोधातील कट्टरस्थान करणाऱ्या सरदारांना त्यांच्या निर्णयामुळे गप्प केले. व त्यांच्या कुटीलडावांना व कटकारस्ताना आळा घातला.

## ४.७ छत्रपती शाहूंचा मृत्यू व पेशव्यांकडे मराठयांची पूर्ण सत्ता

छत्रपती शाहू महाराजांना आपण हयात असतानाच आपल्यानंतर आपल्या छत्रपती पदाचा वारस कोण होईल, याची चिंता ग्रासत होती. कारण त्यांना अनेक मुली होत्या, परंतु मुलगा नव्हता. त्यामुळे छत्रपतींच्या शेवटच्या दिवसात वारसा शोधण्याची राजकारणी सुरू झाली. तसेच या प्रश्नावरून दरबारात अनेक गट निर्माण झाले असतानाच साताऱ्याला नजर कैदेत असणाऱ्या, महाराणी ताराबाईंचा मुलगा दुसरा शिवाजी १७२६ मध्ये वारले. तेव्हा त्यांची पत्नी तीन महिन्याची गरोदर होती, नंतर तिला मुलगा झाला. पुढे हाच मुलगा छत्रपती नंतर

वारस होईल असे त्यांना वाटत होते. तसेच घडले व शाहू महाराजांना छत्रपती पदासाठी वारसदार आहे असा गौप्यस्फोट केला. यावर छत्रपतींची पत्नी सकवारबाईना ही गोष्ट मान्य नव्हती, बऱ्याच शंका निर्माण होत होत्या, म्हणून छत्रपतींनी भगवंतराव रामचंद्र अमात्यानी शपथ पूर्व महाराणी ताराबाईंची गोष्ट खरी असल्याचे सांगितले. यावर छत्रपतींचा विश्वास बसला व छत्रपतींनी तत्काळ पेशवे नानासाहेबांना गुप्त संदेश पाठवून माझ्या नंतर छत्रपतीपदावर किंवा गादीवर महाराणी ताराबाईंचा नातू राजाराम यास छत्रपती पदावर बसवायची आज्ञा केली. त्याचप्रमाणे १५ डिसेंबर १७४९ रोजी छ. शाहू महाराजांचा मृत्यू झाल्यावर महाराणी ताराबाईंचा नातू राजाराम यांना छत्रपती पद देण्यात आले व राजकारभाराचे सूत्रे देण्यात आली. आता महाराणी ताराबाईंना आपला नातू छत्रपती झाला आहे व आता आपल्या हातात पुन्हा राज्यकारभार येणार असे स्वप्ने पडू लागली. परंतु राजारामनीं महाराणी ताराबाईंची सर्व बंधने झुगारून पेशव्यांकडे राज्यकारभाराची सर्व सूत्रे सोपवली व आपण फक्त छत्रपती राहू असे सांगितले.

अशाप्रकारे हताश झालेल्या महाराणी ताराबाईंनी सिंहगडावर निवास केला. तेथूनच कारस्थाने ही सुरू केली. प्रथम राजाराम हा आपला नातूच नाही असे जाहीर केले. त्यामुळे राज्यात गोंधळ निर्माण झाला. त्यावर पेशव्यांनी महाराणी ताराबाईकडून सिंहगड मागितला. परंतु महाराणी ताराबाईंनी व त्यांचे सचिव चिमणाजी यांनी नकार दिल्याने पेशव्यांनी सैन्य पाठवून तुंग, तिकोणा व सिंहगड हे किल्ले जिंकून घेतले. राजाराम ही पुण्यात आले. त्यामुळे मराठाराज्याचे पुणे हेच प्रमुख सत्ता केंद्र बनले. या सर्व घटनांचा विचार करता महाराणी ताराबाई स्वस्त बसल्या नाहीत त्यांनी पुन्हा एक कट रचला. राजारामांना धडा शिकवण्यासाठी त्यांनी राजारामांना २२ नोव्हेंबर १७५० रोजी कुलदेवतेच्या पूजेच्या निमित्ताने बोलावून अटक केले. स्वतःकडे राज्य घेऊन पेशव्यांना निष्प्रभ करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना त्यात यश आले नाही. पेशव्याने पूर्णपणे महाराणी ताराबाईंचा बंदोबस्त केला व खऱ्या अर्थाने या वेळेपासूनच मराठा साम्राज्याची सर्व सत्ता पेशव्यांच्याच हातात गेली.

## ४.८ आंग्रेंच्या आरमाराचा नाश

सरखेल कान्होजी आंग्रे हे १८ व्या शतकातील मराठा आरमाराचे प्रमुख होते. त्यांनी इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच आरमाराबरोबर लढून मराठा आरमारांची स्थापना केली. तसेच त्यांनी आपल्या पूर्ण हयातीत मराठा साम्राज्याची अतिशय प्रामाणिकपणे सेवा केली. तसेच त्यांनी आपली निष्ठा नेहमी मराठा साम्राज्याशी ठेवली, इंग्रज व पोर्तुगीज आरमाराच्या अथक प्रयत्नानंतरही मरेपर्यंत कान्होजी आंग्रे यांचे मराठा आरमार अजिंक्य राहिले. या महान सैनानीचा मृत्यू ४ जुलै १७२९ रोजी झाला. आंग्रे घराण्यात अंतर्गत संघर्ष चालू झाला. तसेच त्यांचा पेशव्यांशी ही संघर्ष सुरू झाला होता. मानाजी व तुळाजीमध्ये सत्ता संघर्ष सुरू झाला. आंग्रे हे पेशव्यांचे अधिकार कधी मानत नव्हते, असे असले तरी या दोन भावांपैकी मानाजी मुजुमदार असल्याने आणि तुळाजींच्या मानाने पराक्रमी कमी असल्याने त्यांचा पक्ष उचलून धरणे नानासाहेबांना सोयीस्कर वाटले. त्यांनी मानाजींना आपल्या बाजूने घेतले. तुळाजी आंग्रेच्या आता ताब्यात दक्षिण कोकण किनारपट्टी असून विजयदुर्ग हे त्यांचे ठाणे होते. उत्तर कोकण मात्र पेशव्यांच्या हातात होता. त्या ठिकाणी त्यांनी रामाजी महादेव बिलकर या धूर्त व राजकारणी माणसाची सुभेदार म्हणून नेमणूक केली होती. तुळोजी हे

पराक्रमी असले तरी त्यांचे पेशव्यांशी पटत नव्हते. दोघेजण एकमेकांना नष्ट करू पाहत होते. पेशव्यांनी पोर्तुगीजांचा वसई व आजूबाजूचा प्रदेश जिंकून घेतला होता. तो परत मिळवण्यासाठी पोर्तुगीज पुन्हा धडपड करीत होते. मराठे पोर्तुगीजांशी लढत असताना मात्र तुळोजी हे पोर्तुगीजांना मदत करीत होते. यावर असे समजते की तुळोजींत व पेशवा यांच्यात द्वेष निर्माण झाला होता. त्यातच महाराणी ताराबाई याही तुळोजीचा पेशव्यांविरुद्ध वापर करून घेत होत्या. नानासाहेबांनी या सर्वांना पायबंध घालण्यासाठी व कायमचा त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी रामाजी महादेवांच्या मार्फत आंग्रे विरुद्ध इंग्रजांची मदत घेतली. इंग्रजांनी पेशव्यांवर काही अटी व करार लादले ते पुढील प्रमाणे -

१. आंग्रेंचा संपूर्ण आरमार हे इंग्रजांच्या ताब्यात राहील व कोणत्याही मोहिमे संदर्भात निर्णय हे दोघे मिळून घेतील.
२. बाणकोट, हिम्मतगड व त्या भोवतालची पाच गावे पेशव्यांनी इंग्रजांना द्यावी.
३. तुळोजी आंग्रेंचा पराभव केल्यावर त्यांची जहाजे दोघांमध्ये वाटून घेण्यात येतील.
४. आंग्रेंच्या किल्ल्यातील द्रव्य, दारुगोळा, तोफा व इतर सामान पेशव्यांच्या ताब्यात द्यावे.

वरील करार होताच पेशवे व इंग्रजांच्या संयुक्त आरमाराने तुळोजीविरुद्ध मोहीम सुरू केली. व लवकरच त्यांचा पराभव करून इंग्रजांनी पेशव्यांच्या मदतीने १७५६ मध्ये कान्होजींचे शेवटचे वंशज तूळोजीला पकडले व पूर्णपणे कान्होजी आंग्रेंचे आरमाराचा नाश केला.

अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले व कान्होजी आंग्रेने आपल्या पराक्रमाने वाढवलेले हे आंग्र्यांच्या वंशज्यांचे चुकीचे धोरण व नानासाहेबांचा अताताई धोरणामुळे नष्ट झाले.

**दाभाडे, गायकवाड विरुद्ध पेशवे संघर्ष -**

नानासाहेब पेशवे झाल्यावर त्रिंबकराव दाभाडे यांच्या मातोश्री उमाबाई दाभाडेंकडे गुजरातचे अर्धे राज्य मागितले. यावर उमाबाईंनी पेशव्यास नकार देऊन राणी ताराबाईशी संधान साधले व महाराणी ताराबाईंनी दमाजी गायकवाड यांना आपल्या बाजूने वळवुन घेतले. गुजरातवर खऱ्या अर्थाने गायकवाड यांचा अंमल असल्याने त्यांना पेशव्यांना अर्धे राज्य देणे मान्य नव्हते. यातच पेशवे १७५१ रोजी कर्नाटकला गेले असता महाराणी ताराबाईंनी कटकारस्थान रचले व दमाजींना पुण्यावर स्वारी करण्यास पाठवले. ही बातमी पेशव्यांना समजताच पेशव्यांनी तातडीने हालचाली सुरू केल्या व लवकर त्यांच्यावर चाल करून, पेशव्यांनी दमाजींचा पराभव केला. त्यानंतर दमाजींनी पेशव्यांसमोर शरणागती पत्करली. तेव्हा पेशव्यांनी त्यांच्याकडे गुजरातचा अर्ध्या हिस्स्याची मागणी केली. परंतु त्यांनी पेशव्यांना सांगितले की, गुजरातचे मूळ मालक दाभाडे असून मी त्यांचा सेवक आहे. याबाबतीतला सर्व निर्णय उमाबाई दाभाडेच घेऊ शकतात. यामुळे पेशव्याने दामाजीच्या छावणीवर अचानक हल्ला केला. दमाजी व नंतर यशवंतराव दाभाडे व कुटुंबातील सदस्यांना कैदी केले. त्यामुळे गायकवाड यांनी गुजरातचा अर्धा हिस्सा पेशव्यांना देण्याचे कबूल केले. परंतु पूर्ण हिस्सा मिळेपर्यंत कुणाची सुटका होणार नाही असे पेशव्यांनी सांगितले. शेवटी निराश होऊन गायकवाड यांनी ३० मार्च १७५२ रोजी करार केला. पूर्ण गुजरात पेशव्यांच्या ताब्यात दिला. गायकवाड हा पेशव्यांचे प्रतिनिधी म्हणून गुजरातचे

कामकाज पाहण्यासाठी तेथेच राहिले. अशाप्रकारे चतुराईने नानासाहेब पेशव्यांनी हा संघर्ष मिटवला.



## ४.९ उदगीरची लढाई

उदगीर शहरावर ८०० वर्षे मुघलांचे राजे होते. खरे पाहता पहिल्या बाजीरावांच्या काळापासूनच निजाम- उल- मुल्क व मराठे यांच्यातील संघर्षाला सुरुवात झाली होती. निजामाला तर पेशवे बाजीरावांनी दोनदा पराभूत केले होते. पण त्याला पूर्णपणे नामशेष न करता त्यांच्याशी मैत्री करार केले. कारण त्यांच्या मार्फत दिल्लीचा बादशहाकडून माळव्याची सनद मिळवण्याची बाजीरावांची इच्छा होती, परंतु धूर्त निजामाने नानासाहेब पेशवे बनले तरी माळव्याची सनद मराठयांना बादशहाकडून मिळवून दिली नव्हती, नानासाहेब व रघुजी भोसले यांच्यातील संघर्षाचा फायदा घेऊन निजामाने १७४३ मध्ये कर्नाटकावर आक्रमण केले होते. व त्रिचिनापल्ली जिंकून राजाकडून खंडण्या वसूल केल्या होत्या, परंतु निजाम आता वार्धक्यामुळे फारशा मोहिमा करू शकत नव्हता. तसेच त्यास अनेक मुले होती आणि त्यांच्यात वारसा युद्ध चालू झाली होती. २९ मे १७४८ मध्ये निजाम-उल-मुल्कचा बऱ्हाणपूर मुक्कामी मृत्यू झाला. त्याचा दुसरा मुलगा नासिरजंग यास दक्षिणेचा सुभेदार म्हणून वारसा हक्क प्राप्त झाला. निजामाच्या दरबारात रामदासपंत नावाचा धूर्त व मुत्सद्दी ब्राह्मण होता. दरबारात त्याचे चांगले वजन होते. त्याने बुशीच्या मदतीने सालाबदजंगला निजाम बनवण्याचे ठरवले. या गोंधळाचा फायदा घेऊन पेशव्याने निजाम दरबाराची सूत्रे आपल्या हाती यावी, म्हणून गाझाउद्दीनला पाठिंबा दिला. निजाम दरबारी अनेक कटकारस्थाने शिजत होती. खरे पाहता गाझाउद्दीनला निजाम बनवणे ही पेशव्यांकडे चालून आलेली उत्तम सुवर्णसंधीच होती, पण त्याच दरम्यान गाझाउद्दिनवर विष प्रयोग झाला व तो मारला गेला. असे असले तरी निजामाच्या दरबारात बुशीच्या रूपाने फ्रेंचांची मनमानी जणू चालूच होती. पण त्यातच इंग्रज व फ्रेंच यांच्यात संघर्ष निर्माण झाला. इंग्रजांनी १७६० रोजी वाँदीवाशच्या लढाईत फ्रेंचांचा पूर्ण पराभव केला. बुशीला इंग्रजांनी कैदी बनवले. त्यामुळे फ्रेंनच्यांपासून निजामाचा दरबार मुक्त झाला होता.

यातच पेशव्याच्या नशिबाने एक नवी संधी चालून आली. ती म्हणजे निजामाच्या तोफखानाचा प्रमुख इब्राहिम खान व निजाम अली यांच्यात भांडणं होऊन इब्राहिम खानला नोकरीतून काढून ते पेशव्यांच्या नोकरीत रुजू झाले. निजामाने त्यात इंग्रजांशी सख्ख बांधले पेशव्यांशी केलेला तह मोडून काढला. त्यामुळे १७५९ मध्ये पेशव्यांच्यावतीने सदाशिवराव भाऊने निजामावर चाल केली.

ऑक्टोबरमध्ये अहमदनगरचा किल्ला जिंकला. तसेच निजाम अलीही तयारीनिशी बाहेर पडला. उभय सैन्यांची गाठ २६ जानेवारी १७६७ रोजी उदगीर या ठिकाणी होऊन निकराची लढाई झाली. त्यात निजामाचा पराभव झाला. त्यामुळे झालेल्या तहानुसार निजामाने मराठयांना ६० लाख रुपये उत्पन्नाचा प्रदेश अशिरगड, दौलताबादचे किल्ले तसेच विजापूर व बऱ्हाणपूर हे किल्ले देण्याचे ठरवले, शेवटी निजामाचा पूर्ण बंदोबस्त करण्यात आला. पेशव्यांना उदगीरच्या लढाईत पूर्ण यश प्राप्त झाले. त्यामुळे नानासाहेब पेशव्यांच्या कारकिर्दीत उदगीरची लढाई अत्यंत महत्त्वाची व निर्णायक ठरली.

## ४.१० पानिपतचे तिसरे युद्ध १७६१

नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीतील पानिपतची तिसरे युद्ध हे अत्यंत निर्णायक व पेशव्यांच्या दृष्टीने त्यांच्या कर्तृत्वाला काळाच्या पडद्याआड नेणारे ठरले. कारण पेशवे नानासाहेब यांनी उत्तरेपर्यंत साम्राज्यविस्तार केला आणि शत्रूंना नमवले आपल्या मराठा साम्राज्याची धुरा अत्यंत कसोटीने सांभाळी, परंतु या रणधुरंदर पेशव्यांना पानिपतच्या तिसऱ्या लढाईच्या पराभवाने पूर्णपणे खचून टाकले.

या सर्व अपयशाला पेशवांच्या अनेक चुका कारणीभूत ठरल्या, त्यामध्ये सर्वात महत्त्वाची चुक म्हणजे पानिपत लढाईमध्ये जाताना त्यांनी राज्यातील यात्रेकरूना जाण्याची परवानगी दिली. खरे पाहता पेशव्यांच्या धार्मिक कृती या युद्धात अतिमारक ठरली. कारण यात्रेकरूनची संख्या ही लाखापेक्षा जास्त झाली. त्या मोहिमेत या यात्रेकरूंना रसद पुरवणे तसेच त्यांचे संरक्षण करणे ही जबाबदारी पेशव्यांवर पडली. खरे पाहता या मोहिमेचे गांभीर्य यांना समजले नसावे. असे असले तरी मराठा सैनिकांनी शेवटपर्यंत या युद्धात आपले कर्तुत्व दाखवले. तसेच उत्तर भारतातील मराठयांच्या अनेक मोहिमांमध्ये त्यांनी आपल्या पराभूत झालेल्या मांडलिक राजांकडून मोठया प्रमाणात कर वसूल केल्यामुळे अनेक राज्यांमध्ये नाराजी होती. तसेच त्यांनी अनेकांची मने दुखावली होती. म्हणून युद्धाच्या वेळी मराठयांना रसद कमी पडल्यावर व सैनिकी कमतरता भरून काढण्यासाठी उत्तर भारतातील राज्यकर्त्यांनी कोणतीही मदत केली नाही. म्हणून नानासाहेबांच्या कारकिर्दीत उत्तरेत घडून आलेले पानिपतचे तिसरे युद्ध हे मराठयांच्या व नानासाहेबांच्या दृष्टीने दूरगामी परिणाम करणारे ठरले.

## ४.११ नानासाहेबांचा मृत्यू व योग्यता

बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे हे बाजीराव पेशव्यांचे पुत्र होते. ते थोरल्या बाजीराव यांच्यानंतर मराठा साम्राज्याची पेशवे बनले. त्यांच्याच काळात मराठा साम्राज्याने यशाचे उत्तुंग शिखर गाठले आणि मराठयांनी अटकेपार झेंडे लावले. नानासाहेबांनी पुणे शहराच्या उन्नतीसाठी खूप मोठे योगदान दिले. त्यांना २५ जून १७४० रोजी छत्रपती शाहू महाराजांनी पेशव्याची वस्त्रे सातारा दरबारी प्रदान केली. त्यांच्या पेशव्याच्या काळात मराठा साम्राज्याने बाळशे धरले. मराठयांनी उत्तर भागात जरब बसवली आणि साधारण इ.स.१७६० च्या आसपास मराठा साम्राज्य ही भारतीय उपखंडातील एक बलाढ्य अशी ताकद होती. परंतु १७६१ च्या तिसऱ्या पानिपत युद्धात मराठयांचा झालेला पराभव हा त्यांच्या सोनेरी कीर्तीला डागाळून टाकणारा ठरला. त्याच पराभवाच्या धक्क्याने २३ जून १७६१ रोजी या महान पेशव्यांचा मृत्यू झाला.

**पेशवे नानासाहेबांची योग्यता-**

नानासाहेब हे बाजीरावांप्रमाणे लढवय्ये नव्हते, परंतु बाजीराव हे तलवार बहाद्दूर असून नानासाहेब मात्र कलमबहाद्दर होते. असे सरदेसाई म्हणतात. तसेच ते पित्याप्रमाणे कसलेले सेनापती नसले तरी त्यांच्या मुत्सद्दी धोरणामुळे मराठा साम्राज्याचा विस्तार कन्याकुमारीपासून अटकेपर्यंत घडून आला होता. तसेच त्यांनी पाश्चात्त्याप्रमाणे मराठा फौजेचे केलेले आधुनिकीकरण कौतुकास्पद होते. त्यांनी आपल्या सैन्यात रोहिले, पठाण,

बुंदेल, अरब यांना सामावून त्याला राष्ट्रीयत्वाचे स्वरूप दिले. परंतु असे असले तरी पेशव्यांमध्ये काही बाबतीत मुत्सद्येगिरीचा अभाव दिसून येतो. रजपूत-मराठा मैत्रीचे महत्त्व त्यांनी ओळखले नाही. शिंदे, भोसले, गायकवाड, आंग्रे या सरदारातील वाददेखील ते मिटू शकले नाही. चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याच्या रूपाने त्यांनी अनेक सरदारांना उत्तर भारतात लुटालुट करण्याची परवानगी दिली. त्यामुळे उत्तर भारतात मराठे बदनाम झाले. त्यांना लुटारू म्हणून संबोधले जाऊ लागले. नानासाहेब मात्र लोककल्याणाच्या बाबतीत नेहमी दक्ष असे, प्रजेवर त्यांनी कोणत्याच प्रकारचे जुलूम जबरदस्ती केली नाही. उलट त्यांची काळजीच घेतली. हे सर्व खरे असले तरी वास्तवता नानासाहेबांचा स्वभाव ऐशोआरामाचा होता. शिवाय आपल्या राज्याची आर्थिक घडी नीट बसवायची कामगिरी त्यांनी केली. पेशव्यांची नावाजलेली हिशेब पद्धतीने नानासाहेबांनी सुरू केली. या कामे त्यांना नाना फडणीसांची खूप मदत झाली. नानासाहेबांनी पुण्यात पर्वती या सौंदर्य स्थळाची निर्मिती केली. नानासाहेबांनी मराठा साम्राज्यावर पेशवे म्हणून वीस वर्षे राज्य केले.

अशाप्रकारे पेशवे नानासाहेबांची कारकीर्द अत्यंत धामधुमीची ठरली. पेशव्यांनी बऱ्याच मोहिमांमध्ये व लढायांमध्ये यश प्राप्त केले. परंतु त्यांच्या हयातीत पानिपतच्या १७६१ ची लढाई ही अपयशी ठरली व मराठयांची एक पूर्ण पिढी या लढाईत गारद झाली. हे अपयश मात्र नानासाहेब पचवू शकले नाही. या धक्क्याने ते अतिशय खचून गेले आणि नंतर या दुःखातच त्यांचा मृत्यू झाला. हे जरी सत्य असले तरी मराठयांच्या इतिहासाच्या दृष्टीने नानासाहेब पेशव्यांचे कर्तृत्व अत्यंत महान ठरले.

## ४.१२ सारांश

मराठयांच्या इतिहासात पेशवेयुगाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कारण छत्रपती वंशांमध्ये वारसा हक्का वरून झालेल्या संघर्षात पेशवे बाळाजीविश्वनाथांची महत्त्वाची कामगिरी आहे. कारण शाहू महाराज व राणी ताराबाई युद्धात, बाळाची विश्वनाथांच्या कर्तुत्वाने व चतुराईने छ. शाहूंचे आसन स्थिर झाले. छत्रपती शाहूनींही बाळाजी विश्वनाथांना पेशव्याची वस्त्रे दिली. मराठयांना पहिले पेशवे मिळाले. तसेच त्यांनी आपल्या पदाच्या महत्त्वाची जाण ठेवून मोठ्या प्रमाणात साम्राज्यविस्तार केला. चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मुघलबादशहाकडून मिळवल्या. बाळाजी विश्वनाथन नंतर त्यांचे पुत्र हे अतिशय पराक्रमी व मुसत्द्दी निघाले. बाळाजी विश्वनाथ नंतर पेशव्याची वस्त्रे थोरले बाजीराव यांना मिळाली. त्यांनीही आपल्या पित्याप्रमाणे पराक्रम गाजवून, मराठा साम्राज्याचा साम्राज्य विस्तार वाढविला. त्यानंतर त्यांचे पुत्र नानासाहेब पेशवे झाले, तेव्हा त्यांच्यापासून खऱ्या अर्थाने पेशवेपदे वंशपरंपरागत झाले. तसेच नानासाहेब पेशव्यांनी ही आपले आजोबा व वडिलांप्रमाणे उत्तम प्रकारची कामगिरी केली आणि शत्रूंना नमवले. कटकारस्थाने उधळून लावली. उत्तर हिंदुस्थानापर्यंत साम्राज्यविस्तार वाढविला, तसेच मराठी कारभारही अत्यंत सुव्यवस्थेत चालवला. परंतु त्यांच्या कारकीर्दीला गालबोट लावणारी महत्त्वाची घटना म्हणजे १७६१ ची पानिपतची लढाई, या लढाईच्या पराभवामुळे ते पूर्णपणे खचून गेले व त्यातच त्या धक्क्याने त्यांचा मृत्यू झाला. हे जरी सत्य असले तरी मराठयांच्या इतिहासात या रणधुरंदर सेनानीचा म्हणजे नानासाहेबांच्या कारकीर्दीचा इतिहास अत्यंत महत्त्वाचा ठरला.

## ४.१३ प्रश्न

१. पेशवे नानासाहेबांचा उदय सांगून, त्यांच्या राज्यकारभाराच्या धोरणाविषयी सविस्तर चर्चा करा?

२. पेशवे नानासाहेबांनी उत्तरेकडे केलेल्या साम्राज्यविस्ताराविषयी चर्चा करा?

३. उदगीरची लढाई यावर टीप लिहा?

४. दाभाडे- गायकवाड विरुद्ध पेशवे संघर्ष यावर सविस्तर चर्चा करा?

## ४.१४ संदर्भ ग्रंथ

१. देव प्रभाकर- 'मराठयांचा इतिहास'- विद्या प्रकाशन.

२. पवार जयसिंगराव, मराठी साम्राज्याचा उदय व अस्त - मेहता प्रकाशन.

३. पगडी सेतू माधवराव, छत्रपती शिवाजी कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

४. भामरे जितेंद्र, मराठयांचा इतिहास – शेठ पब्लिकेशन, मुंबई

❖❖❖❖

munotes.in

# ५

## पानिपतचे तिसरे युद्ध

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टये

५.१ प्रस्तावना

५.२ पानिपतच्या तिसऱ्या युद्धाची पार्श्वभूमी

५.३ पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे स्वरूप

५.४ पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे परिणाम

५.५ सारांश

५.६ प्रश्न

५.७ संदर्भ

### ५.० उद्दिष्टये

१. पानिपतच्या तिसऱ्या युद्धाची पार्श्वभूमी समजून घेणे.

२. पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे स्वरूप अभ्यासणे.

३. पानिपतच्या तिसऱ्या युद्धाच्या परिणामांचे विश्लेषण करणे.

### ५.१ प्रस्तावना

मुघल बादशाह औरंगजेब याच्या मृत्यूनंतर मुघलांच्या बलाढ्य साम्राज्यास खंबीर व कार्यक्षम वारस मिळाला नाही. त्यामुळे मुघल साम्राज्याच्या पतनास सुरुवात झाली. मुघलांच्या दुबळ्या मध्यवर्ती सत्तेमुळे व कमकुवतपणामुळे मराठयांनी दिल्ली दरबारात व उत्तर भारतात आपले वर्चस्व निर्माण करण्यास सुरुवात केली होती. त्याचाच एक भाग म्हणून मराठयांनी बाळाजी विश्वनाथांच्या पुढाकाराने चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मुघल दरबारातून मिळविल्या होत्या. या सनदांच्या बदल्यात मराठयांनी दिल्लीच्या रक्षणाची जबाबदारी घेऊन उत्तरेत आपले पाय रोवले होते. नानासाहेब पेशव्यांनी मराठयांच्या उत्तरेतील विस्तारवादी धोरणाला कायम करण्यासाठी उत्तरेच्या मोहिमा आखल्या होत्या. त्यासाठी रघुनाथराव यांना जबाबदारी दिली होती. त्यांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर अटकेपार मराठयांचे झेंडे रोवले होते. त्यामुळे उत्तरेत मराठयांचा दबदबा निर्माण झाला होता. रोहीलखंडच्या रोहील्यानी मराठयांविरुद्ध कुटनीतीचा वापर करून त्यांचे वर्चस्व कमी करण्यासाठी व दिल्लीच्या राजगादीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अहमदशहा अब्दालीला आमंत्रण दिले होते. त्यातून अब्दाली आणि मराठे यांच्यात हरियाणा राज्यात असलेल्या

munotes.in

पानिपत या ठिकाणी ऐतिहासिक पानिपतची तिसरी लढाई झाली होती. या लढाईची कारणे, स्वरूप व परिणाम यांची सविस्तर माहिती या घटकामध्ये दिलेली आहे.

## ५.२ तिसऱ्या पानिपत युद्धाची पार्श्वभूमी:

### ५.२.१ श्रीमंत नानासाहेब पेशवे उर्फ बाळाजी बाजीराव यांचे विस्तारवादी धोरण:

बाजीरावाच्या मृत्यूनंतर बाजीरावाचा मुलगा बाळाजी बाजीराव यांची छत्रपती शाहू महाराजांनी पेशवेपदी नियुक्ती केली. बाळाजी बाजीराव म्हणजेच नानासाहेब पेशव्यांनी बाजीरावाचे उत्तरेकडचे धोरण उचलून धरले. नानासाहेब पेशव्यांना बाजीरावसारखे विस्तारवादाचे धोरण राबवायचे होते, परंतु बाजीरावसारखे गुण, पराक्रम व कुशल सेनानी नेतृत्व त्यांच्याकडे नव्हते. निजाम व त्याचा पुत्र नासिरजंग यांच्यात आपसामध्ये बेबनाव सुरू झालेला असताना नानासाहेब पेशव्यांनी निजामाची बाजू घेतली. निजामाचे अंतर्गत प्रश्नात नानासाहेबांनी लक्ष घालून निजामालाच दुखावले. छत्रपती शाहू महाराजांनी १७३८ मध्ये रघुजी भोसले यांना बुंदेलखंड, बंगाल, बिहार या प्रांतात आपला प्रभाव स्थापन करण्याची परवानगी दिलेली होती. रघुजी भोसले यांचा नानासाहेब मत्सर करू लागले. बंगाल आणि बिहार प्रदेशाची चौथाई व सरदेशमुखीचा अधिकार रघुजी भोसले यास मिळू नये म्हणून नानासाहेब पेशव्यांनी अलीवर्दी खानाची भेट घेऊन रघुजी भोसले विरुद्ध मदतीचा करार केला. या प्रकारामुळे इतर सरदारांमध्ये फुटीरवृत्ती व स्वार्थ वाढत गेला. दुसऱ्या बाजूला मराठी आरमार प्रमुख कान्होजीचा पुत्र सखोजी आंग्रे मृत्यू पावल्यावर त्यांच्या वारसांमध्ये भांडणे सुरू झाली. त्यापैकी मानाजी आंग्रेंनी इंग्रजांना मदतीची मागणी केली. मानाजी आंग्रेपेक्षा तुळाजी हा पराक्रमी व सरखेल म्हणजे आरमार प्रमुख बनण्यास योग्य होता, परंतु नानासाहेबांनी तुळाजीच्या विरोधात भूमिका घेतली. आंग्रेंचे आरमार इंग्रजांना नष्ट करण्यास नानासाहेबांनी मदत केली. तुळोजी आंग्रेचा पराभव करण्यासाठी १७५५ मध्ये आत्मघातकी करार पेशव्याने केला. त्यानुसार मराठयांचे व आंग्रेचे सर्व आरमार इंग्रजांच्या ताब्यात तर द्यावेच तसेच आंग्रेंच्या ताब्यात जे द्रव्य, किल्ले, युद्धसाहित्य आहे याचीही वाटणी पेशवा व इंग्रजांनी करून घ्यावी. याशिवाय बाणकोट, हिम्मतगड हे पेशव्यांनी इंग्रजांना देण्याची अट मान्य केली. आंग्रेचे आरमार हे शेवटी मराठयांचेच होते ते इंग्रजांनी नष्ट करून मराठयांच्या सत्तेच्या नाश्याची वाट आपल्यासाठी सुकर केली. या सर्व घडामोडीवरून एक लक्षात येते की, नानासाहेबांनी राज्यहितापेक्षा वैयक्तिक स्वार्थाला जास्त प्राधान्य दिले.

### ५.२.२ उत्तरेतील मराठयांची प्रशासन व्यवस्था

उत्तरेकडे मराठयांनी जे विस्ताराचे धोरण स्वीकारले, त्यात त्यांनी अनेक चुका केल्या. परिणामी निजाम, जाट, मोगल सरदार, रजपुत, रोहिले, बंगश असे मराठयांचे शत्रू निर्माण झाले. १७४३ पर्यंत मराठयांनी उत्तरेत आपला चांगलाच जम बसवला होता. रघुनाथराव उर्फ राघोबादादा यांनी अगदी अटकेपर्यंत धडक मारली होती. म्हणजे सध्याच्या पाकिस्तान व अफगाणिस्तानची सीमारेषा. तेथील प्रदेश जिंकून घेऊन तो भाग मराठयांच्या वर्चस्वाखाली आणला होता, परंतु जिंकलेल्या प्रदेशाची नीट प्रशासन व्यवस्था न लावल्यामुळे जिंकलेला प्रदेश हळूहळू मराठयांच्या हातातून निघून जात होता. त्यामुळे

नवनवीन प्रदेश जिंकायचे, परंतु प्रशासनाची घडी नीट न बसविल्यामुळे पुन्हा तो प्रदेश स्वतंत्र होत असे. अशा बाबींमुळे मराठयांच्या उत्तरेतील राजकारणाला फारसे यश येत नव्हते. त्यांचा केवळ धाक वाटत होता. लोक कल्याणकारी प्रशासन व्यवस्था निर्माण करण्यात ते कमी पडले होते.

**५.५.३. उत्तरेतील सत्तांचे एकीकरण:** मराठयांच्या उत्तरेतील विस्तारवादी धोरणातील चुकांमुळे निजाम, जाट, मोगल सरदार, रजपुत, रोहिले, बंगश, नवाब सुजाउद्दौला यांना या स्वार्थी धोरणामुळे व मराठयांच्या वर्चस्ववादाला आळा घालण्यासाठी मराठयांविरुद्ध एकत्रीकरण करावे लागले. मराठयांना अटकाव घालण्यासाठी आणि दिल्लीच्या राजगादीवरील मराठयांचे नियंत्रण कमी करण्यासाठी नजीबखान रोहिला याने अहमदशाह अब्दाली याला हिंदुस्थानात येण्याचे निमंत्रण दिले होते. रोहिल्यांनी स्वार्थी व धर्माचे राजकारण केल्यामुळे त्यांनी मराठयांना विरोध केला. त्यांचे वर्चस्व रोहिल्यांना सहन होत नव्हते. रोहिल्यांना दिल्लीवर वर्चस्व हवे होते. त्यामुळे मराठयांच्या पराभवासाठी नजीबखानाने कूटनितीचा वापर करून मराठयांच्या विरोधात इतर सरदारांचा पाठिंबा मिळविला.

**५.५.४ मराठयांच्या चौथाई, सरदेशमुखीच्या सनदाचा परिणाम:** मराठयांनी बाळाजी विश्वनाथाच्या नेतृत्वात मुघलांकडून चौथाई, सरदेशमुखीच्या सनदा मिळविल्या. त्यामुळे उत्तरेतील मुघल दरबारातील सरदार तसेच उत्तरेतील इतर सत्ताधीशांना ही गोष्ट आवडली नाही. मराठयांनी रजपूत, जाट यांच्याकडून चौथाई, सरदेशमुखी वसूल करण्याऐवजी त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले असते तर ते दुखावले नसते त्यामुळे मराठयांविषयी उत्तरेत असंतोष निर्माण झाला होता.

**५.५.५ मराठे व रोहिले यांचे वैर:** मुघल बादशहाचा वजीर सफदरजंग आणि गंगा- यमुना दुआबातील रोहिले यांच्यात शत्रुत्व होते. कारण सफदरजंग हे शियापंथीय मुस्लिम होते, तर रोहिले-पठाण हे सुन्नीपंथीय होते. या दोघांच्या संघर्षामध्ये मराठयांनी सफदरजंगला लष्करी सहाय्य केले. इ.स.वी. सन १७५१ मध्ये मराठयांनी रोहिल्यांच्या पराभव केला. त्यामुळे रोहिल्यांनी मराठयांचे पारिपत्य करण्यासाठी इराणचा बादशाह अहमदशाह अब्दालीला मदतीसाठी बोलावले.

नजीबखानाला मदत करण्यासाठी अब्दाली हिंदुस्थानात आला. त्यातून मराठे-अब्दाली यांच्यात १७६१ मध्ये पानिपतची तिसरी लढाई झाली.

**५.५.६ दिल्ली दरबारातील मराठा विरोधी कटकारस्थाने:** मराठयांनी बाळाजी विश्वनाथापासून दिल्लीच्या राजकारणात रस घेतला होता. कमकुवत असलेल्या मुघलांनी दिल्लीच्या संरक्षणासाठी मराठयांचे सहाय्य मागितले होते. परिणामी मराठयांचे दिल्ली दरबारात वास्तव्य वाढीस लागले. मराठयांनी दिल्लीमध्ये आपला वकील अंताजी माणकेश्वर यांना नेमले होते. त्यांनी दिल्ली दरबारातील मराठयांच्या विरोधी होत असलेल्या कट कारस्थानाची माहिती पेशव्यांना दिली. त्यानुसार सदाशिवरावभाऊंना उत्तरेत येण्याचे निमंत्रण दिले.

**५.५.७ मराठे व मुघल वजीर सफदरजंग करार:** रोहीलखंडच्या रोहिल्यांनी अयोध्येच्या प्रदेशावर आक्रमण केल्यामुळे अयोध्येच्या नवाबाने त्यांच्या बंदोबस्तासाठी मराठयांकडे मदत मागितली. मराठयांनी वेळोवेळी मदत करून त्यांचा बंदोबस्त केला होता. अहमदशाह अब्दालीने १७४८ पासून भारतावर स्वाऱ्या करून प्रचंड संपत्तीची लूट केली होती. इ.स. १७५१ मध्ये त्याने भारतावर तिसरी स्वारी केली. इ.स.१७५२ मध्ये पंजाबसारखा सधन प्रांत त्याने जिंकून घेतला. त्यामुळे मुघल दरबारात घबराट निर्माण झाली होती. अहमदशहाला रोहिल्यांनी दिल्लीवर आक्रमण करून मराठे व मुघलांना धडा शिकवून दिल्लीचे राजकारण करावयाचे होते. हे ओळखून मुघल बादशहाचा वजीर सफदरजंग यांनी मराठयांची मदत मागितली. त्यानुसार १२ एप्रिल १७५२ मध्ये मराठे-सफदरजंग त्यांच्यामध्ये करार झाला. त्यानुसार

१) मराठयांनी अंतर्गत व बाह्यक्षेत्रात शत्रूपासून सुरक्षा करणे.

२) अब्दालीचा बंदोबस्त करणे.

३) मराठयांना या मदतीबद्दल ५० लाख रुपये देण्यात येतील.

४) या करारांमुळे मराठयांना पंजाब, सिंध आणि गंगेच्या दुआबातील प्रदेशात चौथाई व सरदेशमुखीचे अधिकार प्राप्त होतील.

सफदरजंग आणि मराठयांचे सहाय्यक दिल्लीत येऊन पोहोचले. त्यापूर्वीच बादशहा आणि अब्दाली यांच्यात करार होऊन पंजाबचा प्रांत अब्दालीला देऊन टाकला. दिल्लीमध्ये वजीर सफदरजंग व मुघल बादशहा यांच्यात संघर्ष निर्माण झाला. त्यावेळी रोहिले व जाट यांनी अनुक्रमे मुघल बादशहा व वजीर सफदरजंग यांना मदत केली. नानासाहेब पेशव्यांनी उत्तरेची मोहीम रघुनाथरावांवर सोपविली. रघुनाथराव यांनी जाटाचा बंदोबस्त करण्यासाठी कुंभेर किल्ल्याला वेढा दिला. हा किल्ला जिंकताना मल्हारराव होळकरांचा पुत्र खंडेराव होळकर मारला गेला. पुढे मराठयांनी सुरजमल जाटाकडून ३० लाख रुपये घेऊन वेढा उठविला. मराठयांनी जाटाबरोबर शत्रुत्व पत्करले. पेशव्यांनी रघुनाथरावाला अब्दालीला रोखण्यासाठी पाठवले होते. अब्दालीने पंजाबच्या राज्यपालाच्या निमंत्रणावरून भारतावर चौथी स्वारी केली. त्यानुसार २९ जानेवारी, १७५७ ला त्यांनी दिल्ली जिंकली व तो पुन्हा काबुलला रवाना झाला. रघुनाथराव दिल्लीला पोहोचले तोपर्यंत अब्दाली काबूलला पोहोचला होता. दिल्लीला नजीबखान रघुनाथरावाला शरण आला, परंतु रघुनाथरावाने त्याला क्षमा केली. त्यातूनच पुढचे पानिपत घडले.

### ५.५.८ दत्ताजी शिंदे यांचा बदला घेण्यासाठी सदाशिवरावभाऊंना उत्तरेच्या मोहिमेवर पाठवले

रघुनाथरावाने उत्तरेच्या दुसऱ्या मोहिमेत सतलज नदी ते बनारसचा प्रदेश जिंकून दिल्लीवर आपले नियंत्रण प्रस्थापित केले. दिल्ली जिंकल्यानंतर अंताजी मानकेश्वर व कृष्णराव काळे यांच्याकडे दिल्लीची जबाबदारी सोपवली. रघुनाथरावाने ऑक्टोबर ८ मार्च १७५८ ला कुंजपुरा जिंकला. १७५८ मध्ये त्याने पंजाबचा प्रदेश जिंकून त्याचा कारभार आबाजी शिंदे यांच्याकडे सोपवला. अटकेचा कारभार रहेमानला देऊन रघुनाथराव २६ सप्टेंबर १७५८ला उत्तरेतील दुसऱ्या मोहिमेवरून पुण्याला पोहोचले. दरम्यान पेशव्यांनी

नजीबखान रोहिल्याचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी दत्ताजी शिंदे यांच्याकडे दिली. दत्ताजी शिंदे यांनी शुक्रतालला वेढा दिला.

शुक्रतालच्या लढाईत नजीबखानला गंगा नदीवरील पुलामुळे उत्तरेतून रसद पुरवठा मिळाला. मराठयांनी नजीबखानास जेरीस आणले खरे, परंतु पावसाळ्याच्या दिवसात नजीबखानाने छावणी केलेली ठिकाणे कठीण असल्यामुळे नजीबखान मराठयांच्या हातून वाचला होता. या संधीचा फायदा घेऊन त्याने अब्दालीची मदत मागितली व अब्दालीने ३५०००ची फौज घेऊन भारताच्या दिशेने आला. अब्दाली पंजाबात आल्याची खबर मिळताच दत्ताजीने शुक्रतालचा वेढा उठवून अब्दालीची स्वारी रोखण्यासाठी २२ डिसेंबर रोजी चढाई केली. २५ डिसेंबर रोजी यमुना नदी ओलांडली, गंगा-यमुनाच्या दोआबात नजीबखान रोहिला त्यास जाऊन मिळाला. नजीब खानाच्या सहाय्याने अब्दाली दिल्लीच्या दिशेने येण्यास निघाला. दत्ताजीने दिल्लीचा बचाव करण्यासाठी वजीर इमाद यास दिल्लीच्या बंदोबस्तासाठी जाण्यास सांगितले, परंतु त्याने तसे न करता तो सुरजमल जाटांच्या आश्रयास जाऊन राहिला. दत्ताजीने कुंजपुराची छावणी २७ डिसेंबरला हलवून तो २९ डिसेंबरला सोनपत येथे आला. तेथे सहा दिवस शत्रूच्या हालचालीची टेहाळणी करून ६ जानेवारी १७६० रोजी दिल्लीस येऊन संपत्तीची व्यवस्था करून स्वतः दिल्लीच्या उत्तरेस बारा मैलांवर असलेल्या बरारी गावी छावणीस आला. ९ जानेवारी, १७६० रोजी नजीबखान यमुना ओलांडून पश्चिमेस आला. तेव्हा मराठयांनी शत्रूवर चाल केली. एक तास दोन्ही सैन्याची झुंज झाली, परंतु अफगाण सैन्याच्या बंदुकीच्या माऱ्यापुढे मराठयांचे काहीही चालले नाही. दत्ताजी शिंदे यांना बंदुकीची गोळी लागून ते ठार झाले, तेव्हा मराठे पळू लागले. नजीबखानाने जोराचा हल्ला चढविला. त्यावेळी जनकोजी शिंदे शत्रूला सामोरे गेले. उभयंतांमध्ये चार घटका लढाई झाली. जणकोजी शिंदे घायाळ झाल्यामुळे जनकोजीस रणांगणातून उचलून मराठे दिल्लीच्या दिशेने धावले. अब्दालीने मराठयांवर विजय मिळवून त्याने दिल्लीच्या लालकिल्ल्यात प्रवेश केला. दिल्लीची लूट करून त्याने करोडो रुपयांची संपत्ती मिळवली. दिल्लीचा ताबा मिळवून अब्दालीने वजीर शहावली खानाचा चुलत भाऊ याकुबअली खान यास दिल्लीचा गव्हर्नर म्हणून नेमले. उत्तरेतून दत्ताजी शिंदेच्या मृत्यूची बातमी ऐकून नानासाहेब पेशवा यांनी सदाशिवरावभाऊंना उत्तरेच्या मोहिमेवर पाठवले.

## ५.३ पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे स्वरूप

पानिपतच्या तिसऱ्या युद्धाची पार्श्वभूमी समजून घेतल्यानंतर या युद्धाचे नेमके स्वरूप कसे होते ते अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

१४ जानेवारी, १७६१ मध्ये मराठे आणि अहमदशहा अब्दाली यांच्यामध्ये पानिपतचे तिसरे युद्ध झाले. मराठयांनी सदाशिवरावभाऊ यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड फौज उत्तरेमध्ये अब्दालीचे पारिपत्य करण्यासाठी पाठवलेली होती. सदाशिवरावभाऊंनी विश्वासरावांना बरोबर घेऊन या मोहिमेचे नेतृत्व केले होते. जवळपास एक लाखांचा लवाजमा घेऊन ते उत्तरेच्या मोहिमेवर निघाले होते. त्यामध्ये खडे सैन्य होते, तर ४०००० बिनलष्करी लोकांचा त्यामध्ये समावेश होता.

अनेक अडचणींना तोंड देत सदाशिवरावभाऊंनी दिल्लीच्या दिशेने आगेकूच केली होती. उत्तरेमध्ये समोरासमोर मैदानी युद्ध करण्याच्या कलेत मराठयांचा अनुभव कमी होता, परंतु दक्षिणेमध्ये मराठयांनी गनिमी काव्याच्या युद्धतंत्राचा अवलंब करून बलाढ्य शत्रूंना जेरीस आणले होते. मैदानी प्रदेशामध्ये लढलेले मराठयांचे हे सर्वात मोठे युद्ध होते. या युद्धाचे स्वरूप इतर युद्धांपेक्षा पुर्णतः वेगळे होते. अहमदशहा अब्दाली हा मुस्लिम राज्यकर्ता असल्यामुळे उत्तरेतील सर्व राजे-रजवाडे यांना एकत्रित करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला दिसतो. त्यामध्ये नजीब खान रोहिल्यांनी आपल्या कूटनीतीचा अवलंब करून उत्तरेमध्ये मराठयांना एकटे पाडण्याची किमया केली होती. मराठयांनी उत्तरेच्या मोहिमेमध्ये उत्तरेतील इतर सत्ताधीशांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याऐवजी त्यांच्याकडून चौथाई आणि सरदेशमुखी वसुली करण्याच्या कारणाने त्यांचे शत्रुत्व ओढवून घेतले होते. उत्तरेतील सर्व राजे व सरदारांनी एकत्रित येऊन अब्दालीला सहकार्य केले होते. मराठयांना त्यांच्याबरोबर मैत्रीपूर्ण संधान साधता आले नाही. त्यामुळे सदाशिवराव भाऊंना उत्तरेत कोणाचीही मदत मिळाली नाही. सुरजमल जाटांनी मदत करण्याचा प्रयत्न केला, परंतु अंतर्गत कलहामुळे तोही मराठयांना सोडून निघून गेला.

पानिपतच्या तिसऱ्या लढाईमध्ये मराठयांना इतर सत्ताधीशांची मदत तर झालीच नाही, परंतु नैसर्गिक परिस्थितीसुद्धा त्यांच्यासाठी विपरीत होती. निसर्गानेसुद्धा त्यांना साथ दिली नाही. पावसाळ्याच्या दिवसात त्यांच्या फौजेचे अतोनात हाल झाले. नजीबखान रोहिल्याने उत्तरेतील मराठयांची सर्व रसद तोडलेली होती. त्यामुळे त्यांचे अन्नपाण्यावाचून मोठे हाल सुरू झालेले होते. अशाही परिस्थितीत सदाशिवरावभाऊने कुंजपुरा जिंकून घेतलेला होता. कुंजपुरा जिंकण्याचे अब्दालीस कळताच त्याने यमुना नदी ओलांडली आणि आपले सैन्य मराठयांच्या दिशेकडे जाणाऱ्या सर्व वाटा अडविल्यामुळे मराठयांना रसद मिळणारे सर्व मार्ग बंद झाले. त्यामुळे मराठयांची अधिकच अडचण झाली होती. मराठयांनी अब्दालीच्या उत्तरेतील वाटा जरी अडवलेले असल्या तरी त्यांना नजीबखान रोहिल्याची साथ मिळाल्यामुळे त्यांना उत्तरेतून रसद मिळत होती. वेळेवर रसद मिळत नसल्यामुळे मराठयांनी बचावात्मक धोरणाचा अवलंब करून, युद्धाला जेवढा विलंब करता येईल तेवढा त्यांनी विलंब करण्याचा प्रयत्न केला. परंतु उपासमार वाढत गेल्यामुळे व रसद संपल्यामुळे अब्दालीवर हल्ला करण्याशिवाय मराठयांना पर्याय नव्हता.

गोविंदपंत बुंदेल यांनी मराठयांना रसद पुरविली होती, परंतु त्यांचा मृत्यू झाल्यानंतर मराठयांच्या रसदेवर मोठा परिणाम झालेला होता. त्यांना अन्नधान्याची टंचाई निर्माण झालेली होती.

डिसेंबर आणि जानेवारी महिन्यामध्ये प्रचंड थंडी असल्यामुळे उत्तरेमध्ये मराठयांच्या सैन्यावर त्याचा मोठा परिणाम झालेला होता. थंडीपासून संरक्षण करण्यासाठी मराठयांकडे जाड कपडे नव्हते, तर रोहिल्यांकडे तशा प्रकारची व्यवस्था होती. उत्तरेकडील हवामान मराठयांना प्रतिकूल होते व ते अब्दालीला नजीब खानच्या मदतीमुळे अनुकूल होते, त्याचा फायदा अब्दालीला झाला. अब्दालीने नजीबखानच्या इशाऱ्यानुसार हळूहळू आपल्या सैन्याच्या छावण्या बदलल्या. त्यामुळे रोगराई, उपासमार यांचा त्याला सामना करावा लागला नाही. परंतु मराठे जवळ जवळ अडीच ते तीन महिने एकाच जागी होते, त्यामुळे त्यांच्या छावणीमध्ये मेलेली जनावरे, मलमूत्र आणि गलिच्छपणा यामुळे रोगराई पसरली

होती याचा मराठयांना मोठा फटका बसला मराठयांचे सैन्य अन्नधान्य व रोगराईमुळे मृत्यूमुखी पडत होते. त्यामुळे मराठयांना रोगराई आणि अन्न-पाण्याशिवाय मरण्यापेक्षा शत्रूशी लढता लढता मेलेले बरे असे वाटू लागले. शेवटी १० जानेवारी रोजी मकर संक्रातीचा सण साजरा केल्यानंतर मराठयांचा सेनापती सदाशिवरावभाऊने दिनांक १३ जानेवारी, १७६१ रोजी प्रमुख सरदार व सेनापतींची बैठक बोलावली व युद्ध करण्याचा अंतिम निर्णय घेतला. युद्धाची संपूर्ण व्यूहरचना ठरून त्यावर चर्चा झाली. शेवटी गोलाकार लढाई करण्याची व शत्रूची फळी फोडून दिल्ली गाठायची असा निर्णय झाला त्यानुसार दिनांक **१४ जानेवारी १७६१ रोजी पानिपतच्या तिसऱ्या लढाईला प्रत्यक्ष सुरुवात झाली होती**.

मराठयांच्या सैन्याच्या आघाडीस इब्राहीमखान गारदीच्या नेतृत्वाखाली त्यांचा प्रभावी तोफखाना व गारद्यांची नऊ पथके होती, स्वतः इब्राहिम खान आपल्या ७००० गारद्यांबरोबर डावीबाजू सांभाळत होता. त्यांना लागून दमाजी गायकवाड आपल्या २००० घोडेस्वारांसह, तर विठ्ठल शिवदेव आपल्या १५००० घोडेस्वारांबरोबर होते. मध्यभागी अनेक लहान मोठे सरदार घोडेस्वारांसहित होते.

सदाशिवरावभाऊ व नानासाहेबांचे पुत्र विश्वासराव हे १३५००ची फौज व बळवंतरावांचे सैन्य घेऊन मध्यभागी होते तर उजव्या बाजूला अंताजी माणकेश्वर, सटवाजी जाधव व इतर लहान-मोठे मराठे सरदार २५०० घोडदळासह उभे होते, त्यांना लागूनच बाजीराव-मस्तानीचे पुत्र समशेरबहाद्दर १५०० पायदळाच्या सैनासह आपली बाजू सांभाळीत होते. आघाडीच्या सैन्यामागे बायका, मुले, म्हातारी माणसे, बिनकामाचे लोक होते, त्यांच्या पाठीमागे शिंदे व होळकरांच्या संरक्षण करणाऱ्या तुकड्या होत्या. दोन्ही बाजूच्या सैन्याची रचना समोरासमोर अर्धा गोलाकार पद्धतीने होती.

**प्रत्यक्ष लढाईला सुरुवात १४ जानेवारी १७६१:**

१४ जानेवारी, १७६१ रोजी सकाळी नऊ वाजता प्रत्यक्ष लढाईला सुरुवात झाली. सुरुवातीला मराठयांनी निकराचा हल्ला करून पहिल्या एका तासात ९००० रोहिले व पठानांना यमसदनी पाठवले होते. मध्यभागी उभ्या असलेले मराठयांचे सेनापती सदाशिवरावभाऊ व विश्वासराव यांच्या नेतृत्वाखालील फौजेने शहावलीखानावर निकराचा हल्ला चढून त्यास एक मैल मागे रेटले होते. इब्राहीम खानाच्या तोफखान्यामुळे समोर असलेल्या शत्रूंच्या फळीत खिंडार पडले. नजीबखानच्या सैन्याची दाणादाण उडाली, परंतु गोलाकार लढाईचे तंत्र न समजल्यामुळे मराठे सरदार दमाजी गायकवाड व विठ्ठल शिवदेव यांचे सैन्य पुढे सरसावले व शत्रूच्या कंपूत घुसले. त्यामुळे इब्राहीम खानाला तोफगोळ्यांचा मारा करताना अडचणी येऊ लागल्या. कारण त्यांचे तोफगोळे मराठी सैन्यावर पडून ते मृत्युमुखी पडत होते. त्यामुळे त्याला तोफखाना बंद करावा लागला. ज्या तोफांची अब्दालीने धास्ती खाल्ली होती, तो तोफखाना बंद पडल्याचे कळताच पळण्याच्या तयारीत असणारे सर्व रोहिले व पठाणी सैन्य मागे फिरले आणि त्यांनी त्यांची फळी ही पूर्ववत केली. पुन्हा मराठयांनी निकरांचा हल्ला चढवून शत्रूचे 3000 सैन्य यमसदनी पाठविले होते. अब्दाली व रोहील्यांच्या फौजेचा धीर खचून ती मागे पडू लागले, तेव्हा अब्दालीने त्यांच्या मदतीला दहा हजार सैन्याच्या राखीव तुकडीस पाठवून कमी झालेल्या व पळून गेलेल्या

सैन्याची पोकळी भरून काढली होती. सदाशिवराव, विश्वासराव, इब्राहिमखान गारदी, यशवंतराव पवार, अंताजी माणकेश्वर, जनकोजी शिंदे यांनी जिवावर उदार होऊन अब्दालीच्या सैन्यावर प्रहार केला होता. दुपारी २ वाजेपर्यंत मराठयांच्या सैन्यांची सरशी होत होती, मात्र त्यावेळी सूर्याचे दक्षिणायन असल्यामुळे मराठी सैन्याच्या डोळ्यावर सूर्याची किरणे पडू लागली. त्यातच अनेक दिवसापासून पोटभर अन्न-पाणी न मिळाल्याने घोडी व माणसे पाण्याविना तरफडून धारातीर्थी पडू लागली होती. या संधीचा अब्दालीने बरोबर फायदा घेतला. त्याने आपल्या राखीव तुकडया व उंटावरील तोफखाना पुढे करून मराठयांवर जोरदार हल्ला करण्यास प्रारंभ केला. तेवढयात विश्वासराव यांना गोळी लागून ते धारातीर्थी पडले. विश्वासराव पडल्याची बातमी सैन्यात वाऱ्यासारखी पसरल्याने मराठयांच्या सैन्याचे मनोबल खचले. विश्वासरावांच्या मृत्यूने सदाशिवरावभाऊ उद्वेगाने हत्तीवरून उतरून घोडयावर येऊन त्वेषाने शत्रू पक्षावर तुटून पडले होते, काही वेळाने तेही शत्रू पक्षाच्या तावडीत सापडून धारातीर्थी पडले. मराठयांचे सेनापती पडल्यामुळे सैन्याचा धीर खचला व ते पळू लागले. मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड, विठ्ठल शिवदेव, नाना पुरंदरे इत्यादी सरदारांनी पळणाऱ्या मराठा सैन्याबरोबर दिल्लीकडे पळ काढला. त्याबरोबर उरलीसुरली मराठी फौज क्षणार्धात कोलमडली आणि मराठयांचा प्रचंड पराभव झाला. विजयी झालेल्या अब्दालीच्या सैन्याने मराठी फौजेचा ४० मैलापर्यंत पाठलाग केला व त्यांच्यावर जबरदस्त हल्ला करून पळणाऱ्या सैन्याचे अतोनात हाल केले. मराठयांच्या सैनिकांच्या बायका, मुलांची व सैनिकांची डोकी कापली होती व प्रचंड अत्याचार केला होता. युद्धाचा निकाल पहिल्याच दिवशी लागला असला तरी दुसरे दोन दिवस पळणाऱ्या सैन्याची कत्तल व लुट सुरू होती. ही लूट व कत्तल इतकी भयानक होती की, त्यामध्ये दया, क्षमा, माणुसकी या शब्दांना कसलाच अर्थ राहिला नव्हता. इतका अन्याय, अत्याचार नजीबखान आणि अब्दालीच्या सैन्याने मराठयांवर केला होता. अनेक मराठा सैन्यातील स्त्रियांनी शत्रूंच्या अत्याचारापासून स्वतःचा जीव वाचविण्यासाठी विहिरीमध्ये उडया टाकून आपले बलिदान दिले होते. पानिपत गावात पळून आलेल्या काही मराठयांच्या सैन्याला अब्दालीच्या सैन्याने एका रांगेत उभे करून त्यांच्या निर्दयपणे हत्या केल्या होत्या. या लढाईमध्ये सदाशिवरावभाऊ, विश्वासराव, यशवंतराव पवार, संताजी वाघ, तुकोजी शिंदे, खंडेराव निंबाळकर इ. वीर मारले गेले तर इब्राहिम गारदी, जनकोजी शिंदे यांना कैद करून नंतर ठार करण्यात आले. समशेर बहाद्दर व अंताजी माणकेश्वर अत्यंत जखमी झाले होते. ते रस्त्यातच मरण पावले.

पानिपतच्या या लढाईमध्ये दोन्ही बाजूचे प्रचंड सैन्य मारले गेले होते. अनेक हजारो सैन्याच्या कत्तली झाल्या होत्या. मराठयांचे प्रमुख सेनापती सदाशिवराव भाऊ, विश्वासराव यशवंतराव पवार, तुकोजी शिंदे, जनकोजी शिंदे हे या लढाईमध्ये ठार झालेले होते. १५ जानेवारी १७६१ रोजी अब्दालीने पानिपतच्या दर्ग्यात विजयाबद्दल अल्लाची प्रार्थना केली होती. दिनांक २१ जानेवारी १७६१ ला अब्दालीने विजयी सैन्यासह दिल्लीत प्रवेश केला व दिवानेखासमध्ये दरबार भरून दिल्लीचा ताबा घेतला होता.

नानासाहेब पेशव्यांना उत्तरेत येताना वाटेत माळव्यामध्ये 'भिलसा' या गावी मुक्कामी असताना पानिपतच्या युद्धात मराठयांचा प्रचंड पराभव झाल्याची बातमी 'साहुकार'ने लिहिलेल्या सांकेतिक भाषेतील पत्राद्वारे मिळाली. 'साहुकार' हा मराठयांचा सैनिक किंव्हा सरदार असू शकतो. त्याने पत्रात खाली असे लिहिले होते की, "दो मोती गलत, दास बिस

असराफित फरकट, खुदरेकू रुप्याकू गणात नाही". अर्थात या 'युद्धात २ मोती हरवले, २० एक सोण्याची नाणी बेपत्ता झाली, चिल्लर, खुर्द कुठे हरवले याचा पत्ताच लागला नाही'. अशा पद्धतीचा निरोप नानासाहेब पेशव्यांना मिळाला. ते या धक्यातून कधीही सावरू शकले नाही. परिणामी पानिपतच्या तिसऱ्या युद्धातील पराभवाचा धसका घेऊन नानासाहेब पेशव्यांना त्याचे अतोनात दुःख झाले व शेवटी २३ जून १७६१ ला त्या दुःखातून ते सावरू शकले नाही आणि पुण्यातील पर्वती येथे त्यांचा मृत्यू झाला.

## ५.४ पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे परिणाम

पानिपतामध्ये एकूण तीन युद्धे झाली होती, परंतु त्यापैकी पानिपतच्या तिसऱ्या युद्धाची भयानकता जास्त होती. या युद्धाने मराठयांचे अतोनात नुकसान झाले होते जे की, कधीही भरून निघु शकत नव्हते. या युद्धाने उत्तर भारतातील विशेषतः दिल्लीचे संपूर्ण राजकारण बदलले होते. या युद्धाचे दूरगामी परिणाम खालीलप्रमाणे आहेत.

**१. मराठयांच्या लष्कराची प्रचंड हानी :**

या युद्धात मराठयांचा दारूण पराभव झाला होता. प्रत्यक्ष रणभूमीवर शेकडो मराठा सैनिक धारातीर्थी पडले होते. पराभवानंतर मराठा सैन्याने रणभूमीवरून पळ काढला होता. युद्ध भूमीतून पळणाऱ्या शेकडो मराठयांच्या सैनिकांच्या कत्तलीसुद्धा अब्दाली व नजीबखानच्या सैनिकांनी केल्या होत्या. युद्धात जखमी झालेल्या मराठा सैनिकांची संख्यासुद्धा मोठी होती. बाजार बुणगे आणि बिनकामाच्या लोकांचासुद्धा हालअपेष्टा आणि भुकेमुळे मृत्यु झालेला होता. एकंदरीत पानिपतच्या युद्धामध्ये मराठयांच्या कर्तृत्ववान लोकांची एक पिढीच गारद झाली होती हे कधी ही भरून न निघणारे नुकसान होते.

**२. मराठयांचे उत्तर हिंदुस्थानातील राजकीय अस्तित्व धोक्यात :**

पानिपतातील दारूण पराभवामुळे मराठयांचे दिल्ली व उत्तर हिंदुस्थानातील अस्तित्व धोक्यात आले होते. एक कर्ती पिढी गारद झाल्यामुळे मराठयांना उत्तर हिंदुस्थानातून आपले लक्ष काढून घ्यावे लागले होते. त्यांनी उत्तरेतून माघार घेऊन दक्षिणेत आपले साम्राज्य टिकून ठेवण्यासाठी विशेष लक्ष दिले होते. उत्तर हिंदुस्थानात मराठा साम्राज्य स्थापन करण्याची मराठयांची महत्वाकांक्षा धुळीस मिळाली होती.

**३. पंजाबमध्ये शीख सत्तेची स्थापना:**

पानिपतच्या तिसऱ्या युद्धामुळे उत्तर हिंदुस्थानातील राजकीय परिस्थिती संपूर्णपणे बदलून गेली होती. मराठयांच्या बरोबर उत्तरेत शिखांचा दबदबा होता, परंतु मराठयांच्या उत्तरेतील माघारीनंतर व अब्दालीच्या पुन्हा मायदेशी जाण्यामुळे पंजाबमध्ये शिखांना आपल्या स्वतंत्र सत्तेची स्थापना करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण झाले होते. त्याचा फायदा घेऊन शिखांनी पंजाबमध्ये स्वतंत्र सत्तेची स्थापना केली व ती पुढे १८४८ पर्यंत टिकली होती.

**४. मुघल सत्ता खिळखिळी बनली :**

पानिपतानंतर दिल्लीतील मुघलसत्ता संपूर्णपणे खिळखिळी झाली होती. कारण मुघलांचे दिल्लीतील अस्तित्व हे केवळ मराठयांच्या लष्करी ताकतीवर व त्यांच्या संरक्षणाच्या हमीवर अवलंबून होती. परंतु मराठयांचा पराभव झाल्यामुळे त्यांनाच उत्तरेतून काढतापाय घ्यावा लागला. त्यामुळे मराठयांच्या संरक्षणाच्या हमीवर असलेल्या मुघलीसत्तेला पानिपतानंतर उतरती कळा लागली.

**५. मराठयांच्या राजकारणात रघुनाथरावचे महत्व वाढले :**

उत्तरेमध्ये पानिपत घडण्याच्या अगोदर रघुनाथरावने दोन मोहिमा काढल्या होत्या आणि उत्तर हिंदुस्थानात मराठयांचे वर्चस्व निर्माण केले होते. मराठी सत्तेचा उत्तरेत विस्तार होण्यामध्ये रघुनाथरावचे योगदान महत्वाचे होते. त्यांनी अटकेपर्यंत धडक मारून मराठा साम्राज्याचा विस्तार उत्तर हिंदुस्थानात केला होता. परंतु त्यांनी जिंकलेल्या प्रदेशाची निट व्यवस्था न लावल्यामुळे तो प्रदेश पुन्हा मराठयांना गमवावा लागला. तसेच उत्तरेत इतर समविचारी सत्तेबरोबर घनिष्ट संबंध प्रस्तापित करण्याऐवजी त्यांच्याकडून जबरदस्तीने चौथाई आणि सरदेशमुखी वसूल केली होती, त्यामुळे उत्तरेत त्यांना मित्र जोडता आले नाही. परंतु पानिपतानंतर मराठयांच्या राजकारणात प्रचंड घडामोडी घडत गेल्या. त्यामध्ये वरिष्ठ असल्यामुळे रघुनाथरावचे वर्चस्व वाढत गेले व पुढील काळात त्यांच्या महत्त्वाकांक्षा वाढत गेल्या.

**६. इंग्रज सत्तेचा सत्तास्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला:**

इंग्रजांनी कर्नाटक-बंगालच्या प्रदेशातून सुरुवात करून हळुहळू संपूर्ण हिंदुस्थान आपल्या वर्चस्वाखाली आणण्यासाठी हालचाली चालू होत्या. १७५७ च्या प्लासीच्या लढाईनंतर त्यांचा आत्मविश्वास वाढला होता. उत्तरेमध्ये आपले बस्तान बसविण्यासाठी इंग्रजांना या युद्धानंतर वाव मिळाला व त्यांनी याचा पुरेपूर फायदा घेतला. उत्तरेत निर्माण झालेली पोकळी इंग्रजांनी भरून काढण्यासाठी आपल्या हालचालींना वेग दिला.

**७. कर्नाटकात हैदर अलीचा उदय:**

पानिपतातील पराभवामुळे केवळ उत्तर हिंदुस्थानातील मराठयांचे वर्चस्व कमी झाले असे नाही तर दक्षिणेतसुद्धा त्यांना या पराभवाचा फटका बसला होता. दक्षिणेतील कर्नाटकच्या प्रदेशावर मराठयांचे वर्चस्व होते, परंतु पानिपतातील पराभवामूळे खचून गेलेल्या मराठयांना आपली विस्कटलेली घडी निट बसविताना कर्नाटकाच्या प्रदेशावरील नियंत्रण गमवावे लागले होते. याचा फायदा हैदरअलीने घेतला व हळूहळू कर्नाटकात आपली सत्ता स्थापन केली. इ.स. १७५८ मध्ये त्याने कर्नाटकातील बंगलोर शहराचा ताबा मिळविला होता. त्याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा टिपू सुलतान याने कर्नाटकाच्या सत्तेला बळकटी देऊन आपली सत्ता टिकविली होती. त्यासाठी त्याला मराठे, इंग्रज यांच्याबरोबर संघर्ष करावा लागला होता.

## ५.५ सारांश

१८व्या शतकामध्ये झालेल्या प्रमुख लढायांमध्ये सर्वात महत्वाची आणि हिंदुस्तानच्या राजकारणावर परिणाम करणारी महत्वाची लढाई म्हणजे पानिपतची तिसरी लढाई होय. इ.स. १७६१ मध्ये झालेल्या पानिपतच्या लढाईमुळे संपूर्ण उत्तर हिंदुस्थानात व दिल्लीच्या राजकारणाला मोठी कलाटणी मिळाली होती. याच संधीचा फायदा घेऊन इंग्रजांनी पुढे भारतात आपली सत्ता स्थापन केली होती. मध्यवर्ती सत्ता कमकुवत झाल्यामुळे शत्रूने त्याचा फायदा घेतला होता. या लढाईत मराठयांचा पराभव झाल्यामुळे त्यांना जवळपास १० ते १५ वर्ष उत्तरेच्या राजकारणात लक्ष देता आले नाही.

मराठयांची एक कर्तृत्ववान पिढी गारद झाल्यामुळे त्यांचे झालेले अतोनात नुकसान कधीही भरून निघणारे नव्हते. सदाशिवराव, विश्वासराव यांच्यासारखे वीर या लढाईत मारले गेल्यामुळे याचा धसका घेऊन खुद्द पेशवा नानासाहेब यांचासुद्धा मृत्यु झाला होता. या लढाईमुळे मराठयांचे प्रचंड नुकसान तर झाले होतेच, परंतु हिंदुस्थानचेसुद्धा राजकारण यामुळे बदलले होते. म्हणून पानिपतची तिसरी लढाई हिंदुस्थानच्या इतिहासाला कलाटणी देणारी ठरली.

## ५.६ प्रश्न

१. पानिपतच्या तिसऱ्या लढाईची पार्श्वभूमी सांगा?

२. पानिपतच्या तिसऱ्या लढाईचे स्वरूप स्पष्ट करा?

३. पानिपतच्या तिसऱ्या लढाईच्या परिणामांचे विश्लेषण करा?

## ५.७ संदर्भ

१. कोंडेकर ए.वाय., (२००४), मराठयांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२. खोबरेकर,वि.गो. (२००६), महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड – भाग-१, शिवकाळ (१६३०-१७०७), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

३. मराठयांचा इतिहास, दूरस्थ शिक्षण विभागाचे अध्ययन साहित्य, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

❖❖❖❖

# ६

# पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे महत्व

**घटक रचना :**

६.० उद्दिष्टये

६.१ प्रस्तावना

६.२ मराठयांच्या पराभवाची कारणे

६.३ पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे महत्व

६.४ सारांश

६.५ प्रश्न

६.६ संदर्भ

## ६.० उद्दिष्टये

या घटकाचा अभ्यास करण्यासाठी पुढील उद्दिष्टये ठेवलेली आहेत.

१. पानिपतच्या तिसऱ्या युद्धामध्ये मराठयांच्या पराभवाच्या कारणांचे विश्लेषण करणे.

२. पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे महत्व अभ्यासणे.

## ६.१ प्रस्तावना

इ.स. १७६१ मध्ये पानिपतचे तिसरे युद्ध मराठे आणि अहमदशाह अब्दाली यांच्यात लढले गेले होते. पानिपतावर झालेल्या इतर दोन युद्धापेक्षा हे युध्द वेगळे होते. या युद्धाने दिल्लीचे व उत्तरेतील संपूर्ण राजकारण बदलले होते. या युद्धाने मराठयांची एक कर्तुत्ववान पिढीच गारद झाली होती, त्याची मोठी किम्मत मराठयांना मोजावी लागली होती. या युद्धाने दिल्लीतील मुघलशाही खिळखिळी झाली होती. हिंदुस्थानातील अस्थिर परिस्थितीचा फायदा इंग्रजांनी घेऊन संपूर्ण हिंदुस्थानवर आपला अंमल प्रस्थापित करण्याचा इरादा स्पष्ट केला होता.

हिंदुस्थानातील मध्यवर्ती सत्ता कमकुवत झाल्यानंतर काय होऊ शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे पानिपतचे तिसरे युद्ध होय. जोपर्यंत दिल्लीच्या संरक्षणाची जबाबदारी मराठयांकडे होती, तोपर्यंत परकीय शत्रूने हिंदुस्थानाकडे वाकडी नजर करून बघितले नव्हते. पानिपतातील दारूण पराभवामुळे मराठयांनी दिल्लीतील आपले लक्ष काढून घेतले आणि मुघल सत्ता कमकुवत झाली. या युद्धाचे विश्लेषण वेगवेगळ्या इतिहासकारांनी व विचारवंतानी आपापल्या तर्कसंगत मांडणीद्वारे व पुराव्यानिशी मांडले आहेत. त्यानुसार या युद्धाचे महत्व समजून घेणे अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे.



munotes.in

## ६.२ पानिपतामध्ये मराठयांच्या झालेल्या पराभवाची कारणे

मराठयांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर उत्तर हिंदुस्थानात आपला दबदबा निर्माण केला होता. अटकेपार मराठयांचे झेंडे रोवले गेले होते. पेशवा पहिला बाजीरावच्या विस्तारवादी धोरणामुळे व त्यांच्या स्वपराक्रमामुळे मराठयांची वेगळीच ओळख निर्माण झाली होती. रघुनाथरावाने तोच आदर्श समोर ठेऊन उत्तरेतील दोन मोहिमा यशस्वी राबविल्या होत्या व जवळपास उत्तर हिंदुस्थानवर मराठयांचे वर्चस्व निर्माण केले होते. त्याचप्रमाणे सदाशिवरावभाऊ हे उत्तम योद्धे होते. त्यांच्या जोडीला विश्वासराव, इब्राहीमगारदी, शिंदे, होळकर यांच्यासारखे मातब्बर मराठे सरदार असतांनासुद्धा पानिपतच्या तिसऱ्या युद्धात त्यांना दारूण पराभवाला सामोरे जावे लागले होते. याला जबाबदार असलेली कारणे अभ्यासणे महत्वाचे आहे.

### १. प्रतिकूल नैसर्गिक परिस्थिती:

मराठयांनी गनिमी काव्याच्या युद्धतंत्राने दक्षिणेकडील प्रदेशावर आपले वर्चस्व निर्माण केले होते. उत्तरेमध्ये मराठयांनी आपल्या पराक्रमाची झलक दाखविली होती, परंतु उत्तरेतील नैसर्गिक परिस्थिती, तेथील हवामान, नवीन भूभागाची नसलेली माहिती यामुळे लष्कराच्या वेगाने हालचाली करणे मराठयांना अवघड गेले.

सदाशिवरावभाऊचे सैन्य उत्तरेत हिवाळ्याच्या दिवसात गेल्यामुळे उत्तर हिंदुस्थानातील कडाक्याच्या थंडीची मराठयांना सवय नव्हती. तसेच त्यांच्याकडे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी उबदार कपडयांची सोय नसल्यामुळे मराठयांना त्याचा प्रचंड त्रास होत होता. या उलट अब्दालीच्या व रोहील्यांच्या सैन्याकडे उबदार कपडे व थंडीपासून संरक्षण करण्यासाठी आवश्यक असलेला पेहराव होता. त्यामुळे त्यांना थंडीपासून स्वतःचे संरक्षण करता आले. प्रत्यक्ष लढाईच्या दिवशी दुपारपर्यंत म्हणजे सूर्य डोक्यावर असेपर्यंत मराठयांनी जोराचा प्रहार केला होता, परंतु दुपारनंतर सूर्याची किरणे डोळ्यावर पडल्यामुळे त्यांना समोरच्या शत्रूचा अंदाज येत नव्हता व पाण्यावाचून मराठयांचे सैन्य कासावीस झाले होते असे वर्णन भाऊसाहेबांच्या बखरीत केलेले आहे. मराठयांचे सैन्य अर्धमेल्या अवस्थेत लढत होते तर अब्दालीने आपल्या नव्या दमाच्या राखीव सैन्याची तुकडी तैनात केल्यामुळे मराठयांच्या सैन्याचा पराभव झाला होता.

### २. मराठा सैन्याची व्यूहरचना:

मराठे व अब्दाली यांच्यामध्ये झालेल्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धामध्ये दोन्ही बाजूच्या सेनापतींनी सपाट मैदानी प्रदेश असल्यामुळे समोरासमोरच्या युद्धासाठी आपापल्या सैन्याची व्यूहरचना केली होती. मराठयांनी अर्धगोलाकार पद्धतीने सैन्याची रचना केलेली होती. या पद्धतीने मराठयांनी लढलेले हे पहिलेच युद्ध होते. अशा प्रकारच्या युद्धाची मराठयांना सवय नसल्यामुळे त्यांच्या तोफखान्यापुढे अब्दाली व रोहील्यांची दाणादाण झाली होती, परंतु मराठयांच्या मधल्या तुकडीने संयम न बाळगता गोल मोडून अब्दालीच्या सैन्यावर चाल केली होती, त्यामुळे इब्राहीम गारदीला तोफांचा मारा करतांना असे लक्षात आले की, तोफामुळे आपलेच सैनिक मृत्युमुखी पडत आहे. त्यामुळे त्यांनी तोफखाना बंद

ठेवला. याचा फायदा अब्दालीने घेऊन त्याने मराठा सैन्यावर चढाई केली, मराठयांची गोलाकार पद्धतीने युद्ध करण्याची युद्धनीती चुकल्यामुळे त्यांचा दारूण पराभव झाला होता.

### ३. मराठयांच्या सेनापतीची झालेली चूक:

पानिपतच्या तिसऱ्या युद्धामध्ये मराठयांच्या सैन्याचे नेतृत्व सदाशिवरावभाऊ यांच्याकडे होते. त्यांनी गोलाकार सैन्याची रचना करून ते स्वतः मध्यभागी हत्तीवरील अंबारीतून सैन्याचे नेतृत्व करीत होते. त्यांच्यासमोरील घोडदळाचे नेतृत्व विश्वासराव करीत होते. ऐन युद्धाच्या रणधुमाळीत विश्वासरावांचे संतुलन बिघडून ते शत्रूच्या सैन्यावर तुटून पडले. त्यामध्ये विश्वासरावला गोळी लागली व ते धारातीर्थी पडले. विश्वासराव पडल्याचे बघून सदाशिवरावभाऊनी हत्तीवरून खाली उतरून घोडयावर बसून बेभान होऊन शत्रूवर तुटून पडले व शेकडो अफगाणी सैन्य कापून काढले. सदाशिवरावभाऊ एकटेच शत्रूच्या सैन्यामध्ये सापडल्याचे बघून नजीबखानाने त्यांना घेरले व त्यांच्यावर हल्ला केला. सदाशिवरावभाऊ धारातीर्थी पडले. मराठा सैन्यांनी त्यांच्या सेनापतीची खाली असलेली अंबारी बघून आणि सेनापती धारातीर्थी पडल्यामुळे रणांगणातून पळ काढला.

### ४. अब्दालीने राखीव सैन्याचा योग्यवेळी वापर केला:

अहमदशहा अब्दालीला मैदानी युद्धाची पूर्ण व्युव्हरचना माहित असल्यामुळे त्याने पानिपतामध्ये मराठयांना आपल्या जाळ्यात अडकवले होते. मराठयांना मैदानी युद्धाची पूर्ण माहिती नसल्यामुळे त्यांनी त्यांच्या सैन्यामध्ये राखीव सैन्याची तरतूद केली नव्हती, परंतु अब्दालीने मात्र दहा हजार राखीव सैन्याची तरतूद केलेली होती.

मराठयांनी सुरुवातीला तोफखान्याचा मारा केल्यामुळे त्यांची सरशी होत होती. त्यावेळी पीछेहाट होत असलेल्या आणि घाबरून पळ काढणाऱ्या अफगाण सैन्यावर विजय मिळविता आला असता, परंतु मराठयांचा तोफखाना बंद असल्याचे बघून अब्दालीने नव्या दमाच्या राखीव सैन्याला आक्रमण करण्यास सांगितले. परिणामी मराठा सैन्याचा त्यांच्या समोर टिकाव लागला नाही व त्यांचा दारूण पराभव झाला. मराठयांच्या मधल्या फळीने गोलाकार कडे तोडून शत्रूच्या सैन्यावर तुटून पडण्याचा निर्णय त्यांच्या अंगलट आला होता.

### ५. उत्तरेतील इतर सत्तांचा मराठयांना पाठींबा मिळाला नाही:

मराठयांनी पानिपता अगोदर रघुनाथरावच्या नेतृत्वाखाली दोन मोहिमा काढल्या होत्या. त्यामध्ये त्यांनी केवळ नवीन प्रदेश जिंकण्यावर भर दिला होता, परंतु नवीन जिंकलेल्या प्रदेशाची नीट प्रशासकीय व्यवस्था न लावताच ते उत्तरेतून निघून आले. त्यामुळे त्यांची पाठ फिरताच जिंकलेला प्रदेश पुन्हा मराठयांच्या ताब्यातून निघून जात होते. उत्तरेमध्ये दिल्ली दरबारातसुद्धा मराठयांच्या विरोधात कटकारस्थाने चालू असल्याची वार्ता पेशव्यांना कळताच, त्यांनी दिल्लीच्या मोहिमेची जबाबदारी सदाशिवरावभाऊना देऊन त्यांना दिल्लीच्या दिशेने रवाना केले. उत्तरेमध्ये असलेल्या जाट, राजपूत, शीख, रोहिले, सुजाउद्दौला या इतर सत्तांनी मराठयांना सहकार्य केले नाही. केवळ बुन्देल्यांनी त्यांना रसद पुरविली होती. मराठयांचे उत्तरेतील वर्चस्व इतर प्रमुख सत्ताधीशांना पसंद नव्हते. कारण चौथाई व सरदेशमुखीच्या वसुलीमुळे उत्तरेतील सत्ता मराठयांना सहकार्य करण्यास कुचराई करीत होत्या. या संधीचा फायदा घेऊन नजीबखान रोहील्यानी आपल्या

कुटनीतीचा वापर करून उत्तरेतील सत्तांना अब्दालीच्या पक्षात सामील करून घेतले तर काहीना तटस्थ राहण्यास सांगिलते. परिणामी मराठयांना उत्तरेत वेळेवर रसद मिळाली नाही. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली होती. इतिहासकारांनी मराठयांच्या पराभवास उत्तरेतील सत्तांचा पाठींबा न मिळणे व युध्द प्रसंगी काहींनी शत्रू पक्षाला साथ दिल्यामुळे मराठयांचा पराभव झाला होता.

**६. मराठयांच्या सैन्यात बाजारबुणगे आणि यात्रेकरूंची भरती :**

मराठयांचे पेशवे नानासाहेब यांनी उत्तरेच्या मोहिमेची जबाबदारी सदाशिवरावभाऊ यांच्याकडे दिली होती. परंतु त्यांच्याबरोबर पाठविलेल्या सैन्यामध्ये ४०% बाजारबुणगे, यात्रेकरू, महिला यांचा समावेश होता. मराठयांना उत्तरेतून रसद मिळेल अशी अपेक्षा होती, परंतु तसे झाले नाही. परिणामी युद्धास विलंब झाला. सोबत असलेल्या बिनकामाच्या सैन्यामुळे त्यांना वेगाने हालचाली करता आल्या नाही. तसेच उत्तरेतून आणि दक्षिणेतून रसद येईल. अशा अपेक्षेवर बसलेल्या सदाशिवरावभाऊचा भ्रमनिरास झाला व त्यांना आहे त्यास्थितीत युद्ध करण्याशिवाय पर्याय नव्हता. परिमाणी त्यांना दारूण पराभवाला सामोरे जावे लागले. एका कर्तृत्ववान पिढीला मुकावे लागले. त्यामुळे मराठा साम्राज्याचे प्रचंड नुकसान झाले होते व ते कधीही भरून न निघणारे होते.

या व्यतिरिक्त अनेक कारणे मराठयांच्या पराभवास जबाबदार ठरली होती. 'मराठे म्हणजे यश' या समीकरणास पानिपतच्या तिसऱ्या युद्धामुळे छेद मिळाला. मराठयांचा अतिआत्मविश्वास त्यांना नडला आणि त्याचा फायदा अब्दालीच्या शिस्तबद्ध सैन्याने घेतला. परिणामी मराठयांना मोठया पराभवाला सामोरे जावे लागले.

## ६.३ पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे महत्व

पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे महत्व समजून घेताना या युद्धाविषयी वेगवेगळ्या इतिहासकारांनी व विचारवंतानी आपली मतमतांतरे मांडलेली आहेत. त्यापैकी खालील काही महत्वाच्या विचारवंतांची भूमिका उल्लेखनीय आहे.

**१. सरदेसाई आणि सुरेंद्रनाथ सेन:**
या दोन्ही इतिहासकारांच्या मते, पानिपतावर प्रत्यक्षात मराठयांचा जरी पराभव झालेला असला तरी दूरदृष्टीने विचार केला तर मराठयांचे अस्तित्व काही नष्ट झाले नव्हते किंवा त्यांचे राजकीय भवितव्यसुद्धा धोक्यात आले नव्हते. कारण पानिपतानंतर काही वर्षाच्या अवधीतच पेशवा थोरले माधवराव यांच्या काळात महादजी शिंदे यांनी पानिपतात मराठयांची गेलेली प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त करून दिली होती. तसेच युद्धात अहमदशाह अब्दालीचा जरी विजय झाला असला तरी प्रत्यक्षात त्याला या विजयाचा कोणताच लाभ झाला नाही. या युद्धात अब्दालीच्या सैन्याचीसुद्धा मोठया प्रमाणात हानी झाली होती. या नंतर अब्दालीला कधीही भारतावर स्वारी करण्याचे धाडस झाले नाही. हा एक प्रकारे मराठयांचा विजयच होता.

**२. एल्फिन्स्टन** यांच्या मते, पानिपतमध्ये झालेला पराभव मराठयांच्या सत्तेवरील फार मोठा आघात होता. त्यामुळे मराठयांची सत्ता संपूर्णपणे खिळखिळी झाली होती. या

munotes.in

युद्धानंतर मराठयांच्या उत्तर आणि दक्षिणेकडील साम्राज्यावरील वर्चस्व कमी होऊन त्यांचा ऱ्हास सुरू झाला होता. त्यांच्या मते जरी महादजी शिंदे यांनी इ. स. १७७२ मध्ये दिल्ली पुन्हा आपल्या ताब्यात आणली असली तरी पूर्वीसारखा त्यांचा दबदबा राहिला नव्हता. आणि पूर्वीसारखे त्यांचे महत्त्वही उरले नव्हते. पानिपतापूर्वी उत्तर हिंदुस्थानात मराठयांचा जो दबदबा होता तो संपला होता.

**३. न. चि. केळकर** यांच्या मते, मराठा सरदारांना असलेली स्वतंत्र जहागिरीची व सरंजामीची असलेली हाव तसेच देशाभिमान, शिस्तबद्ध कवायती सैन्य आणि युद्ध सामुग्री यांचा मराठयांकडे असलेला अभाव ही मराठयांच्या पराभवाची प्रमुख कारणे होती.

**४. वि. का. राजवाडे** या इतिहासकारांच्या मते, मराठयांची सनातनी वृत्ती, पारंपारिक विचारसरणी यामुळे मराठयांनी आधुनिक भौतिकशास्त्रांच्या अभ्यासाची केलेली उपेक्षा. हे मराठयांच्या पराभवाचे सर्वात प्रमुख कारण होते. राजवाडे यांनी पानिपतच्या तिसऱ्या युद्धाच्या पराभवाचे खापर मल्हारराव होळकर किंवा गोविंदपंत बुंदेले यांच्यावर फोडले होते. होळकर व बुंदेले यांच्या युद्धभूमीवरील चुकांमुळे मराठयांना पराभवास सामोरे जावे लागले होते.

**५. डॉ. सुरेंद्रनाथ सेन** हे मराठयांचा इतिहासाचे गाढे अभ्यासक होते. बंगाली इतिहासकारांमध्ये डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी विविध कारणांसाठी मानाचे स्थान पटकावले आहे. डॉ. सेन हे पहिले भारतीय इतिहासकार आहेत की, ज्यांनी मराठयांच्या इतिहासातील आतापर्यंत दुर्लक्षित झालेल्या विषयांचा अभ्यास केला. हे विषय म्हणजे 'प्रशासनाचा इतिहास' आणि 'लष्करी इतिहास'. त्यांच्या मते, मराठयांमधील अंतर्गत दुफळी व मतभेद हे मराठयांच्या पराभवाचे प्रमुख कारण होते. त्याचप्रमाणे मराठे हे आपआपसातील मतभेद तात्पुरते बाजूला ठेवून समान शत्रूविरुद्ध एकत्र येत असत, परंतु शत्रूचे संकट टळले की ते पुन्हा आपल्या मूळ स्वभावाप्रमाणे एकमेकांच्या विरोधात संघर्षास तयार असत. या त्यांच्या स्थायी प्रवृत्तीमुळे मराठा सत्तेच्या ऐन वैभवाच्या काळात त्यांच्या भविष्यातील विनाशाची बीजे पेरली गेली होती.

**६. त्र्यं. श. शेजवलकर** या इतिहासकरांनी पानिपतच्या युद्धाचे स्फटिक विश्लेषण केलेले आहे. त्यांच्या मते, मराठासत्तेचा ऱ्हास व नाश यासाठी पेशव्यांच्या चुकीच्या धोरणांना मुख्यतः जबाबदार धरले आहे. त्यांच्या मते पेशव्यांच्या अनेक चुकीच्या धोरणापैकी खालील प्रमुख घटक मराठा सत्तेच्या ऱ्हासास जबाबदार होते. त्यापैकी पहिला घटक म्हणजे बाळाजी विश्वनाथ यांनी मुघल दरबारातून मिळविलेल्या चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा होत, या सनदामुळे मराठयांनी मुघली सत्तेची गुलामगिरी स्वीकारली होती. दुसरा घटक म्हणजे पेशव्यांनी दक्षिणेकडील प्रदेशावर लक्ष केंदित करण्याऐवजी उत्तरेकडे धाव घेऊन स्वतः संकट ओढून घेतले. तिसरा महत्वाचा घटक म्हणजे पेशव्यांनी 'मराठा तितुका मेळवावा' हा मंत्र देऊन सर्व हिंदूंची एकजूट घडवून आणणे आवश्यक होते, परंतु तसे केले नाही याचा परिणाम पानिपतात झाला. पेशव्यांच्या या तीन प्रमुख घोडचुका शेजवलकरांच्या दृष्टीने मराठा सत्तेला हानिकारक ठरल्या व त्यांचा ऱ्हास झाला. याचबरोबर मराठयांची प्रशासकीय अव्यवस्थासुद्धा पानिपतच्या पराभावाला कारणीभूत होती. इतिहासकार शेजवलकर यांनी पानिपतच्या पराभवाला राष्ट्रीय आपत्ती म्हंटले होते.

**७. पराग फाटक**, (बीबीसी मराठी प्रतिनिधी) यांच्या मते, मराठाशाहीचे धोरण सुमारे अर्धे शतक यशस्वी ठरले. एकाएकी वादळ निर्माण होऊन जशी इमारत जमीन दोस्त होते तसेच अब्दाली - रोहिले यांची युती होऊन मराठयांच्या साम्राज्यस्थापनेवर जबरदस्त आघात झाला. पुत्र, बंधू आणि मित्र यांच्या वियोगाने पेशवा मरण पावला. अटकेपर्यंत फडकवलेला मराठयांचा भगवा झेंडा चंबळ नदीवर जेमतेम स्थिरावला. दक्षिणेत निजाम, हैदर यांनी डोकी वर काढली. उत्तरेस राजस्थान, बुंदेलखंड, माळवा येथील राजेरजवाडे व लहान-मोठया जमीनदारांनी मराठयांविरुद्ध दंगे सुरू केले. मराठेशाहीचा दरारा नाहीसा झाला. पानिपतानंतर पन्नास-साठ वर्षे मराठी राज्य अस्तित्वात होते, पण त्याचे आक्रमक धोरण जाऊन ते बचावाचे होऊन बसले. प्रयत्न करूनही त्यांना दिल्लीस पूर्वीसारखा जम बसविता आला नाही असे नमूद करण्यात आले आहे. पुणे-पानिपत हे अंतर आताच्या काळातही बरंच आहे. दळणवळणाची साधने मर्यादित असताना लाखभर माणसं, प्रतिकूल हवामान आणि तुल्यबळ प्रतिस्पर्धी यांना टक्कर देत सदाशिवराव भाऊंनी दिलेली लढत इतिहासाच्या पानामधलं एक धगधगत पर्व राहील असे वर्णन केले आहे.

**८. विश्वास पाटील:** पानिपतकार म्हणून ज्यांची ओळख आहे ते विश्वास पाटील हे एक प्रशासकीय अधिकारी असून पानिपतावर सखोल अभ्यास करून 'पानिपत' नावाची एक कादंबरी लिहून पानिपतच्या रणसंग्रामाचे हुबेहूब वर्णन केलेले आहे. त्यातून पानिपतच्या तिसऱ्या युद्धाची इत्यंभूत माहिती समजण्यास मदत होते. एक ऐतिहासिक कादंबरी म्हणून 'पानिपत' ही कादंबरी अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाची आहे.

या व्यतिरिक्त वासुदेव बेलवलकर यांची दत्ताजी शिंदे यांच्यावरील कादंबरी, रघुनाथ यादव यांची पानिपतची बखर तर राजा लिमये यांचे पानिपतचा अखेरचा रणसंग्राम, तर पानिपतचा विजय या ऐतिहासिक लिखाणाद्वारे पानिपतच्या तिसऱ्या युद्धाची समकालीन दृष्टीकोनातून झालेली मांडणी व विश्लेषण अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

## ६.४ सारांश

सर्वनाश या मराठी अर्थासाठी 'पानिपत होणे' हा शब्दप्रयोग रूढ झाला तो पानिपतच्या तिसऱ्या युद्धामुळे. पानिपतचा पराभव ही मराठी इतिहासातील शोकांतिकाच होती. मराठी साम्राज्याच्या भाळावरची भळभळणारी जखम असं पानिपतच्या युद्धाचे वर्णन केलं जातं. दोन मोती, सत्तावीस मोहरा आणि असंख्य चिल्लर खुर्द गमावलेल्या या युद्धाने मराठा साम्राज्याचा कणा खिळखिळा केला. पानिपतची तिसरी लढाई हिंदुस्थानातील राजकारणाला कलाटणी देणारी होती. या लढाईचे महत्व अभ्यासतांना केवळ या लढाईत मराठयांचा पराभव झाला म्हणून ती महत्वाची होती असे नाही, तर या लढाईने हिंदुस्थानी सत्तांनी आपल्या स्वार्थासाठी शत्रूला केलेली मदत यातून पुढील १५० ते २०० वर्षाची इंग्रजांची गुलामगिरी सर्वांना भोगावी लागली. याचेही अवलोकन याद्वारे होणे महत्वाचे ठरते. हिंदुस्थानी सत्तांमधील अंतर्गत वाद, संघर्ष, इर्षा, वर्चस्ववादी भूमिका यामुळे परकीय शत्रूने नेहमीच त्याचा फायदा घेतलेला आहे. 'फोडा आणि राज्य करा' ही इंग्रजांची नीती तत्कालीन वेगवेगळ्या भागातील हिंदुस्थानी राज्यकर्त्यांनी दुर्लक्षिल्यामुळे इंग्रजांच्या सत्ता स्थापनेचा मार्ग पानिपतापासून सुरु झाला होता. या दृष्टीने पानिपतची तिसरी लढाई हिंदुस्थानच्या इतिहासाला कलाटणी देणारी ठरली होती.

munotes.in

## ६.५ प्रश्न

१. पानिपतच्या तिसऱ्या युद्धातील मराठयांच्या पराभवाची कारणे सांगा.

२. पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे ऐतिहासिक महत्व सांगा.

## ६.६ संदर्भ

१. कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., (संपादक), मराठयांचा इतिहास, खंड तिसरा
२. खोबरेकर,वि.गो. (२००६), महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड – भाग-१
३. शिवकाळ (१६३०-१७०७), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
४. कोंडेकर,ए. वाय.,(२००४), मराठयांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
५. सरदेसाई गो.रा., मराठी रियासत, खंड १-८, प्रमुख संपादक, स.मा. गर्गे, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई .
६. कोलारकर, श. गो., (२००३), मराठयांचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर.

munotes.in

# ७

# पेशवा माधवराव व मराठा सत्तेचे पुनरूज्जीवन

**घटक रचना :**


७.० उद्दिष्टये

७.१ प्रस्तावना

७.२ निजामअलीची पुण्यावरील स्वारी

७.३ माधवराव - रघुनाथराव संघर्ष

७.४ राक्षसभुवनची लढाई

७.५ माधवरावाच्या कर्नाटकावरील स्वाऱ्या

७.६ रघुनाथरावांचा बंदोबस्त

७.७ जानोजीचा बंदोबस्त

७.८ उत्तरेकडील राजकारण

७.९ योग्यता

७.१० सारांश

७.११ प्रश्न

७.१२ संदर्भ


## ७.० उद्दिष्टये

१. पानिपतच्या लढाईनंतर झालेल्या मराठा सत्तेच्या पुरूज्जीवनाचा आढावा घेणे.

२. माधवराव पेशव्यांच्या असामान्य कर्तृत्वाचा अभ्यास करणे.

## ७.१ प्रस्तावना

१४ जानेवारी १७६१ रोजी पानिपतच्या लढाईत मराठयांचा प्रचंड पराभव झाला. मराठयांची एक संपूर्ण पिढीच्या पिढी गारद झाली. पानिपतचा जबरदस्त धक्का नानासाहेब पेशव्यांना सहन झाला नाही. त्यातच २३ जून, १७६१ रोजी त्यांचा दुःखद शेवट झाला. त्यांच्या मृत्युने एका विशेष उल्लेखनीय कारकीर्दीची अखेर झाली. नानासाहेबांच्या मृत्युमुळे मराठयांच्या राज्यावरील संकट अधिकच गंभीर झाले. या सर्वस्वी निराशजनक परिस्थितीत नानासाहेबांचा सतरा वर्षाचा द्वितीय पुत्र माधवराव याला पेशवेपदाची वस्त्रे बहाल करण्यात आली. रघुनाथरावच्या पालकत्वाखाली माधवरावाने राज्यकारभार पहावा असे ठरले. याशिवाय माधवरावाची आई गोपिकाबाई हिचेही मार्गदर्शन माधवरावाला मिळणार होतेच.

माधवरावांनी पेशवेपदाची सुत्रे ग्रहण केली. तो काळ राजकीयदृष्ट्या अनंत अराजकतेचा होता. मराठयांच्या उत्तर भारतातील वर्चस्वाला पानिपतच्या पराभवामुळे जबरदस्त तडा गेला होता. अब्दाली अफगाणिस्तानात परतला होता. मराठे दक्षिण हिंदुस्थानात परत गेले आणि परिणामी सत्तेची पोकळी उत्तर हिंदुस्थानात निर्माण झाली. याचा फायदा ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने कालांतराने घेतला. अशा परिस्थितीत रघुनाथरावाने माधवरावाशी प्रामाणिकपणे सहकार्य केले असते तर परिस्थिती अगदी वेगळी बनली असती. परंतु स्वतः पेशवा बनण्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे रघुनाथराव अंध बनलेला होता. अल्पवयीन माधवरावाने पेशवा बनावे, हे त्याला अजिबात पसंत नव्हते. परंतु एकाही मराठा सरदाराने पाठिंबा न दिल्याने नाइलाजाने माधवरावाला पेशवा म्हणून मान्यता द्यावी लागली होती. सुरूवातीला राघोबाने माधवरावाला बाजूला करून मराठयांच्या राज्याची सूत्रे आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न केला. परंतु माधवरावची आई गोपिकाबाईंनी यास विरोध केल्याने पेशव्याच्या दरबारात माधवराव व राघोबा यांचे परस्पर विरोधी गट तयार झाले. याचा फायदा निजामाने घेतला.

## ७.२ निजामअलीची पुण्यावरील स्वारी

उदगीरच्या लढाईत मराठयांनी आपला घोर पराभव केला, हे दुःख निजामअली अजूनपर्यंत विसरलेला नव्हता. उदगीरच्या पराभवाचा निजामाला सुड उगवायचा होता. निजामाने मुरारराव घोरपडे, हणमंतराव निंबाळकर, रामचंद्रराव जाधव यांसारख्या सरदारांना आपल्या बाजूला वळवले. कर्नूल, कडप्पा आणि सावनूर येथील नवाबांना आपल्या गटात खेचले. पावसाळा संपताच ६० हजाराचे सैन्य घेऊन निजामअलीने पुण्याकडे मार्गक्रमण केले. वाटेत निजामाने प्रवरा संगम येथे असलेली अनेक मंदिरे पाडून टाकली. श्रीगोंदे येथील शिद्यांचा वाडा जमीनदोस्त केला. डिसेंबर १७६१ मध्ये निजाम पुण्याजवळ असलेल्या उरळीकांचन या गावाजवळ आला. पुण्यातील पेशवा व कुटुंबियांनीसुद्धा आक्रमणाच्या भयामुळे लोहगड, पुरंदर आणि सिंहगड येथे आश्रय घेतला.

अशा कठीण परिस्थितीत रघुनाथराव आणि माधवराव ह्यांनी इतर सर्व मराठा सरदारांनी आपल्या मदतीला यावे, असे आवाहन केला. या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला आणि विशेष करून जानोजी भोसले हा पेशव्यांच्या मदतीला आला. प्रत्यक्ष युद्ध न करता गनिमीकाव्याने निजामबरोबर लढायचे असे मराठयांनी ठरविले व निजामाच्या प्रदेशावर प्रतिहल्ले चढविले. निजामाच्या सैन्यात अनेक मराठा सरदार होते. त्यांना निजामाने मराठयांच्या धार्मिक क्षेत्राची चालविलेली मोडतोड आवडली नाही. निजामाचे सरदार रामचंद्र जाधव व त्याचा भाऊ मीर मोगल मराठयांना येऊन मिळाले. निजामाचा तळ पुण्याच्या जवळ उरळीकांचन येथे असताना निजामाला पूर्णपणे नेस्तनाबूत करण्याची संधी मराठयांना सापडली. परंतु दुर्दैवाने रघुनाथरावाचे राजकारण मराठयांच्या आड आले. निजामाचे राज्य नष्ट केल्यास माधवराव आपल्याला काहीच किंमत देणार नाही आणि मराठा राजकारणातून आपला अस्त होईल अशी भिती रघुनाथरावाला वाटत होती आणि म्हणून त्याने केवळ ४० लाखाचा प्रदेश घेऊन निजामास जीवदान दिले आणि युद्ध थांबविले. रघुनाथरावाची ही कारवाई एकतर्फी व मराठयांच्या हिताच्या विरोधी असल्याने खुद माधवराव, जानोजी भोसले, गोपाळराव पटवर्धन यांना आवडले नाही यातूनच माधवराव व रघुनाथाराव यांच्यातील मतभेद वाढले.

## ७.३ माधवराव - राघोबा संघर्ष

निजामाला नष्ट करण्याची सुवर्णसंधी रघुनाथरावाने आपल्या स्वार्थाकरीता वाया घालवली. मराठा प्रमुख सरदारांनासुद्धा रघुनाथरावांचे हे वर्तन पसंत पडले नाही. या कारणावरून रघुनाथराव आणि माधवराव यांच्यात वैमनस्य निर्माण झाले. निजामाचा बंदोबस्त केल्यानंतर रघुनाथराव आणि माधवराव यांनी हैदरअलीचा बंदोबस्त करण्याकरिता कर्नाटकाकडे कूच केले, कारण निजामाप्रमाणेच हैदरअलीही पानिपताच्या पराभवाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करत होता. या स्वारीवर जाताना दोघांमध्ये मतभेद झाले व रघुनाथराव कर्नाटक मोहीम अर्धवट सोडून चिकोडीहून पुण्याला परत आला. पेशवे माधवराव तुंगभद्रेच्या प्रदेशावर आपला अंमल बसवून जून १७६२ मध्ये पुण्यास परत आले.

इकडे पुण्याला परत आल्यावर रघुनाथरावाने आपल्या समर्थकांशी संधान बांधण्यास सुरूवात केली. मल्हारराव होळकर यांनी त्याला उघडपणे साथ दिली. या विरूद्ध प्रतिक्रिया म्हणून माधवरावाने मिरजचे पटवर्धन व अन्य सरदारांना आपल्या बाजूला वळवून घेतले होते. पेशवे कुटुंबातील या कलहाचा मराठयांच्या राज्यावर विपरीत परिणाम होणे अटळ होते. असे परिणाम टाळण्याच्या दृष्टिने माधवरावाने आपल्या परीने रघुनाथरावांशी तडजोड करण्याचे प्रयत्न केले. परंतु राघोबाने मुळीच दाद दिली नाही. त्याने माधवरावाकडे पाच महत्त्वाचे किल्ले व दहा लाख रूपये महसूली उत्पन्नाच्या जहागिरीची मागणी केली परंतु माधवरावाने ही मागणी मान्य केली नाही. कारण राज्याची वाटणी झाल्यास राज्य दुर्बल बनेल अशी भिती माधवरावास वाटत होती. मागणीला नकार मिळताच आपल्या जीवाला धोका आहे असा मोठा कांगावा करून रघुनाथरावाने पुण्याहून नाशिकजवळ विंचूर येथे पळ काढला. तेथे ठरलेल्या योजनेप्रमाणे विठ्ठल शिवदेव, आबा पुरंदरे, नारोशंकर इ. सरदार त्यास मिळाले. जानोजी भोसले व निजाम यांनी देखील रघुनाथरावास पाठिंबा दिला. रघुनाथरावाला सर्वांचे मिळून पन्नास हजारांचे सैन्य घेऊन पुण्याच्या रोखाने कूच केले. घोड नदीच्या काठावर दोन्ही सैन्यांची लढाई ७ नोव्हेंबर १७६२ रोजी झाली. पण ही लढाई निकाली नव्हती. आळेगाव येथे माधवरावाची फौज बेसावध असताना राघोबा व निजाम यांनी छापा घातला. माधवरावाने शरणागती स्वीकारली. निजामाने रघुनाथरावाला मदत केल्याबद्दल लाखो रूपयांचा मुलूख व दौलताबाद किल्ला त्यास देण्यात आला. म्हणजे उदगीरच्या लढाईत सदाशिवराव भाऊसाहेबांनी जे मिळवले ते रघुनाथरावाने घालविले.

रघुनाथरावाने स्वतःचे स्थान बळकट करण्याचा प्रयत्न सुरू केला. चिंतो विठ्ठल रायरीकर याची फडणीसपदी नेमणूक केली. सखारामबापूला कारभारी बनविले. त्यांच्या वास्तव्यासाठी सिंहगड किल्ला दिला. पुरंदर कायमचा आबा पुरंदरे यांच्याकडे देऊन त्याला आपला साहाय्यक बनविले. या नंतर सातार्‍याला जाऊन छत्रपती राजारामाचा पाठिंबा मिळवला व मिरजेच्या पटवर्धनांवर स्वारी करून त्यांना शरणागती पत्करण्यास भाग पाडले. हैदरअलीचा समाचार घेण्यासाठी राघोबा कर्नाटक प्रांताकडे रवाना झाला. परंतु हैदरअली विरूद्धची मोहीम पूर्ण होण्यापूर्वीच निजाम व नागपूरच्या रघुजी भोसले यांची युती झाल्याचे वृत्त त्याच्या कानी आल्याने तो परत फिरला. दरम्यान निजामाने भीमा नदीच्या पूर्वेचा मराठयांचा सर्व प्रदेश आपल्याला परत करण्यात यावा. या प्रदेशातील

जहागिरदारांच्या हिरावून घेतलेल्या जहागिऱ्या त्यांना परत करण्यात याव्यात आणि आपण सांगू त्या व्यक्तीची दिवाणपदी नेमणूक करण्यात यावी अशा मागण्या राघोबाकडे केल्या. मराठयांच्या राज्यासमोर निजामाच्या मागण्यामुळे परत एकदा गंभीर पेचप्रसंग निर्माण झाला. गमाजी यमाजी, गोपाळराव पटवर्धन निजामाला मिळाले होते. राज्याचा खजिना रिकामा झाला होता. सैनिकांच्या वेतनाची थकबाकी मोठी झाली होती. तसेच सैनिकांना शस्त्रास्त्रे, दारूगोळा व अन्य साधनसामुग्री यांची टंचाई जाणवू लागली होती. त्यामुळे मराठयांच्या राज्यात आणीबाणीची परिस्थिती उद्भवली. तथापि सुदैवाने या आणीबाणीच्या प्रसंगी मराठा सरदारांनी आपसातील हेवेदावे व मतभेद विसरून राज्यातील संकटाचे निवारण करण्यासाठी एकजुटीने आवश्यक ती कारवाई करण्याचा निर्णय घेतला. माधवराव, रघुनाथराव, सखारामबापू एकमेकांतील मतभेद विसरून एक झाले. मराठयांनी गनिमी काव्याचा अवलंब केला. रघुनाथराव मिरजेहून परस्पर औरंगाबादकडे वळला. औरंगाबाद येथे मल्हारराव होळकर मराठयांच्या फौजेत सामील झाला. निजामच्या फौजा भीमा नदीच्या काठाने पेशव्याचा प्रदेश उद्ध्वस्त करत पुण्याकडे सरकू लागल्या. पेशव्याने औरंगाबादचा परिसर लुटून साफ केला. मार्च ते ऑगस्ट १७६२ या सुमारे पाच महिन्यांच्या काळात दोन्ही पक्ष परस्परांवर हल्ले करीत होते. नाशिक ते सातारा हा मराठी प्रदेश शत्रुने उध्वस्त केला, तर औरंगाबादपासुन हैद्राबादपर्यंतचा प्रदेश मराठयांनी साफ केला. निजामाने या काळात मराठयांना गाठण्याचा प्रयत्न केला. परंतु मराठयांनी त्याला दाद दिली नाही. अवजड तोफखान्यासह मराठयांचा पाठलाग करणे अशक्य आहे, हे पाहून निजामाने पुण्यावर हल्ला केला. त्याने शहरात जाळपोळ केली. पेशवे कुटुंबियांनी सिंहगडावर आश्रय घेतला. पुणे लुटल्याची बातमी समजताच रघुनाथराव अतिशय संतप्त झाला. त्याने निजामाशी सरळ युद्ध करण्याचा आपला निश्चय केला. परंतु इतर ज्येष्ठ सरदारांनी त्याला आवर घातला. निजाम-मराठा संघर्षामध्ये निजामाला जे यश मिळत होते त्याचे कारण म्हणजे गोपाळराव पटवर्धन आणि जानोजी भोसले यासारखे मराठे सरदार निजामाचे समर्थक होते हे सगळ्यांना समजून चुकले होते. माधवरावाने या दोघांना निजामापासून वेगळे करण्याचे प्रयत्न चालविले. येथून रघुनाथरावाचे नेतृत्व निष्प्रभ होत गेले आणि माधवरावाच्या हाती राजकारणाची सुत्रे आपोआपच आली. माधवरावाने मराठा सरदारांना निजामाचा पक्ष सोडून परत येण्याचे आवाहन केले. तसे झाल्यास त्यांना क्षमा करण्यात येईल. त्यांच्या जहागिरी त्यांना परत करण्यात येईल असे आश्वासन दिले. एकंदरीत झालेल्या युद्धात मराठा सरदारांचा काहीच फायदा झाला नव्हता. याउलट मानहानी झाली होती. जानोजी भोसल्याच्या दृष्टीने तर साताराची गादी मिळणे अशक्य झाले होते. माधवरावाने त्याला पदच्युत करून नागपूरची गादी त्याचा धाकटा भाऊ मधोजी याला देण्याची घोषणा केली. उत्तरेत महादजी शिंद्यांना भोसल्याच्या प्रदेशाची लुटालुट करण्यास सांगितले. पेशव्यांनी स्वतःही भोसल्यांचा प्रदेश लुटला. एकंदरीत त्याची परिस्थिती निराशाजनक झाली. जानोजीने माधवरावाला मदत करण्याचे वचन दिले. गोपाळरावालाही निजामाचे खरे स्वरूप कळून चुकले होते. अशारितीने माधवरावाच्या कुटनितीमुळे निजाम राजकारणात एकटा पडला. माधवराव सतत निजामाच्या पाठलागावर होते. निजामाचा भाऊ बसालत जंग यालाही माधवरावाने आपल्या बाजूला वळवून घेतले होते. दिवसेंदिवस निजामाचे सामर्थ्य कमी होऊ लागले. निजामाने औरंगाबादचा आश्रय घेण्याचे ठरविले. १० ऑगस्ट, १७६३ रोजी निजामाने राक्षसभूवन येथे गोदावरी नदी पार केली. नदीला महापूर असल्याने अवजड तोफखाना व सर्व सैन्य नदीपार नेणे कठीण होते. एवढयात अचानक

मराठे राक्षसभुवनवर येऊन धडकले. मराठे गोदावरी नदी ओलांडून आपल्यावर हल्ला चढवतील अशी भीती वाटून निजाम औरंगाबादकडे गेला, त्यावेळी मराठयांनी त्याचा सतत पाठलाग केला. शेवटी निजामाने शरणागती पत्करली. उदगीरच्या तहातील ६० लक्ष व नवीन २२ लक्ष उत्पादनाचा प्रदेश निजामाने मराठयांना दिला.

## ७.४ राक्षस भुवनची लढाई

राक्षस भुवनची लढाई ही मराठा इतिहासात महत्त्वाची समजली जाते. कारण पानिपतच्या तिसऱ्या लढाईत मराठयांचा जो दारूण पराभव झालेला होता. त्यामुळे मराठे कधीच आपले डोके वर काढू शकणार नाहीत, अशी सर्वांची कल्पना झाली होती. या कल्पनेला राक्षस भुवनच्या विजयामुळे फार मोठा धक्का बसला. या विजयामुळे मराठयांना आत्मविश्वास प्राप्त झाला. पानिपतपूर्वी आपल्याला जे प्रतिष्ठेचे स्थान होते, ते आपण पुन्हा परत मिळवू अशी आशा मराठयांना वाटू लागली आणि हा सगळा चमत्कार पेशवे माधवरावाने घडविला. आतापर्यंत माधवराव रघुनाथरावाच्या पालकत्वाखाली होता. ते पालकत्वही या विजयामुळे आपोआपच संपुष्टात आले. राक्षसभुवनच्या विजयामुळे माधवरावाच्या स्वतंत्र कर्तबगारीस सुरूवात झाली. या मोहिमेत त्याने स्वतंत्रपणे युद्धव्यूह रचले. बहादुरी गाजवली. निजामाला मिळालेल्या मराठा सरदारांना माधवरावाचा वचक बसला. पानिपतच्या युद्धात मराठी सत्तेचा शेवट झाला नसून तरुण, तडफदार पेशव्याच्या नेतृत्वाखाली मराठा सत्ता नव्या जोमाने उत्कर्षाकडे धाव घेत आहे, हे सर्व हिंदुस्तानला दिसून आले.

## ७.५ माधवरावाच्या कर्नाटकावरील स्वाऱ्या

पानिपताच्या पराभवाचा फायदा घेऊन हैदरअली मराठयांची दक्षिण हिंदुस्तानातील सत्ता नष्ट करू पाहात होता. १७६३ मध्ये ज्यावेळी पेशवा निजामाशी लढा देत होता, त्यावेळी या परिस्थितीचा फायदा घेऊन हैदरअलीने बेदनूर जिंकून घेतले. त्याचप्रमाणे सावनूर, आणि कडाप्पा ही राज्ये आपल्या स्वामित्वाखाली आणली. हैदरअलीने याचबरोबर मुरारराव घोरपडे यांचा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. ही सर्व राज्ये मराठा छत्राखालील राज्ये होती. इ.स.१७६४ मध्ये निजामाविरूद्धची मोहीम संपल्यानंतर माधवरावाने हैदरअलीचा समाचार घेण्यासाठी कर्नाटकावर स्वारी करण्याचे ठरवले. फेब्रुवारी १७६४ मध्ये मराठयांचे सैन्य कृष्णा नदीच्या दक्षिणेला असलेल्या सावनूरपर्यंत गेले. मराठयांच्या व हैदरअलीच्या सैन्यात काही किरकोळ चकमकी उडाल्या. ६ नोव्हेंबर १७६४ रोजी मराठयांनी धारवाडचा किल्ला ताब्यात घेतला. सावनूरजवळच्या अनवटीच्या लढाईत मराठयांनी हैदरअलीचा पराभव केला. या पराभवानंतर स्वतः हैदरअलीला आपला जीव वाचवण्यासाठी जवळच्या जंगलात आश्रय घ्यावा लागला होता. यानंतर हैदरअलीने मराठयांशी कधीही समोरासमोरची लढाई केली नाही, त्याने गनिमी काव्याचा अवलंब केला. अनवटीच्या लढाईत मुरारराव घोरपडयाने विजयी कामगिरी केली. मराठयांच्या दृष्टीने जरी अनवटीचा विजय महत्त्वाचा असला तरी नेमक्या याच वेळेस माधवराव व राघोबा यांच्यातील मतभेद अतिशय तीव्र झाले. पुण्यात राघोबाची गुप्त कारस्थाने चालूच होती. या काळातच पुरंदरच्या कोळयांनी किल्लेदार पुरंदरे यांच्या विरूद्ध बंड पुकारले. माधवराव पेशवे यांनीच असे बंड करण्यासाठी या कोळी सैनिकांना गुप्त चिथावणी दिली, असा आरोप रघुनाथरावाने केला. आपल्या गैरहजेरीत रघुनाथराव आपल्या विरूद्ध नानाप्रकारची कारस्थाने करील अशी भिती माधवरावांस सतत वाटू लागली. यावर उपाय म्हणून माधवरावाने रघुनाथरावास

ताबडतोब कर्नाटकात बोलावून घेतले. हैदरअलीविरूद्ध चाललेल्या युद्धात रघुनाथरावाने आपल्याशी सल्ला मसलत करावी असे कारण दाखवून माधवरावाने रघुनाथरावास कर्नाटकात बोलावले. रघुनाथराव कर्नाटकात आले तेव्हा हैदरअलीने माधवरावाशी वाटाघाटी चालविलेल्या होत्या. रघुनाथराव, ज्येष्ठ असल्याने साहजिकच वाटाघाटीची सर्व सूत्रे  रघुनाथरावाकडे आली आणि त्याचा फायदा घेऊन रघुनाथरावाने पुन्हा राजकारण करण्याचा प्ररंभ केला. माधवरावाने राघोबाच्या सल्ल्याने ३० मार्च १७६५ रोजी हैदरअलीशी अनंतपूरचा तह केला. या तहातील महत्त्वाच्या तरतुदी खालीलप्रमाणे होत्या.

१) हैदरअलीने मोहिमेच्या खर्चापोटी मराठयांना तीस लाख रूपये व तुंगभद्रा नदीच्या उत्तरेचा प्रदेश देण्याचे मान्य केले.

२) मराठयांच्या राज्याचे मांडलिकत्व पत्करलेल्या सावनूरचा नवाब, मुराराव घोरपडे व अन्य मराठा सरदारांना कसलाही उपद्रव न देण्याचे हैदरअलीने मान्य केले.

अशाप्रकारे हैदरअलीचा पूर्णपणे नाश करण्याची पेशव्यांना मिळालेली संधी रघुनाथरावाने घालवली. जास्तीत जास्त सौम्य अटींवर त्याने हैदरअलीशी तह करण्याचे ठरविले. निजामाला जसे त्याने जीवदान दिले तसेच जीवदान यावेळी हैदरअलीलाही मिळाले. १७६५ मधील पावसाळ्यामध्ये हैदरअली विरूद्धच्या यशस्वी मोहिमेनंतर माधवराव पेशवे पुण्याला परत आले. पुढील दोन वर्षापर्यंत दक्षिणेच्या प्रदेशावर वर्चस्व स्थापन करण्यासाठी मराठे, हैदरअली, निजाम व इंग्रज यांच्यात तीव्र स्पर्धा सुरू झाली. इ.स. १७६६ मध्ये माधवरावाने निजामाशी परस्पर मैत्रीचा करार करून हैदरअली बरोबरच आपल्या संघर्षात तो तटस्थ राहील, अशी व्यवस्था केली होती. इ.स. १७६५च्या अखेरीस गोपाळराव पटवर्धन व अन्य सरदार आणि मराठयांचे सैन्य यांच्यासह माधवरावाने कर्नाटक प्रांतावर स्वारी केली. तेथील सुरापूर, रायपूर व मूदगळ हा प्रदेश त्याने प्रथम काबीज केला. फेब्रुवारी १७६७ मध्ये मराठयांच्या सैन्याने शीरा व मडेगिरी असे दोन किल्ले जिंकून घेतले. या सैन्याने मडेगिरीच्या किल्ल्यात तुरूंगात असणाऱ्या बेदनूरच्या राणीची सुटका केली. आता फक्त श्रीरंगपट्टण आणि बेदनूर ही दोनच ठिकाणे जिंकावयाची राहिली होती. त्यामुळे हैदरअली इतका अस्वस्थ झाला की, त्याने माधवरावाशी तहाची बोलणी सुरू केली. अशा परिस्थितीत रघुनाथरावाचे राजकारण पुन्हा आड आले. रघुनाथराव यावेळी नुकताच उत्तेरेच्या स्वारीत अपयशी होऊन परत आला होता आणि त्याने पुण्यात राहून माधवरावांविरूद्ध नानाप्रकारची कारस्थाने चालवली होती. त्याच्या कारस्थानांनी गंभीर स्वरूप धारण करण्यापूर्वी आपण पुण्याला पोहचले पाहिजे अशी निकड माधवरावास वाटू लागली आणि म्हणून त्याने हैदरअलीशी घाईघाईने तह करणे पसंत केले. त्यामुळे परत एकदा हैदरअलीला विनाकारण जीवदान मिळाले होते.

यानंतर दोन वर्षे माधवराव पेशवे हैदरअलीच्या प्रश्नाकडे लक्ष पुरवू शकले नाही. या दोन वर्षात माधवरावाला रघुनाथरावाचा आणि जानोजी भोसल्याचा बंदोबस्त करावा लागला. हैदरअलीनेही या परिस्थितीचा फायदा घेऊन मुराराव घोरपडे आणि सावनूरचा नवाबाचा पराभव केला. त्यामुळे १७७० मध्ये  माधवरावाने कर्नाटकच्या मोहिमेची योजना आखली. सावनूरच्या रक्षणाकरता त्याने गोपळराव पटवर्धनाची नेमणुक करुन तो स्वतः इ.स. १७७० मध्ये कर्नाटकच्या मोहिमेवर निघाला. माधवरावाचे प्रचंड सैन्य पाहून हैदरअलीने बेदनूरच्या जंगलात आश्रय घेतला. पेशव्यांना निजाम व मुराराव घोरपडे येऊन मिळाले.

मराठयांनी हैदरचा एक कोटी उत्पन्नाचा मुलूख व बरेच प्रदेश जिंकले. परंतु दुर्दैवाने त्याचवेळी माधवराव गंभीर आजारी पडल्याने त्यांना पुण्यास परत निघून जावे लागले. मोहिमेची सर्व जबाबदारी त्रिंबकराव पेठे, गोपाळराव पटवर्धन, मुराररराव घोरपडे यांच्यावरच पडली. ५ मार्च, १७७१ रोजी मराठयांनी श्रीरंगपट्टणमजवळ मोती तलावाच्या लढाईत हैदरअलीचा प्रचंड पराभव केला. हैदरअली जिवानिशी लढाईत निसटला व त्याने श्रीरंगपट्टणमच्या किल्ल्यात आश्रय घेतला. किल्ला मजबूत असल्याने एक वर्ष लढा देऊन सुद्धा मराठयांना तो जिंकता आला नाही. त्यातच माधवरावाच्या गंभीर आजारपणाच्या बातम्या कर्नाटकात येऊ लागल्या. हैदरही तहाची याचना करू लागला. शेवटी जून १७७२ मध्ये मराठे व हैदरअली यांच्यात एक तह झाला. त्यानुसार हैदलअलीने तुंगभद्रेच्या दक्षिणेतील बराचसा प्रदेश व एकतीस लाख रूपये मराठयांना देण्याचे मान्य केले. शर्थीचे प्रयत्न करूनही आपल्याला हैदरअलीचा पूर्ण बंदोबस्त करता आला नाही, हे शल्य मृत्युसमयी माधवरावाला नक्कीच बोचत असले पाहिजे.

## ७.६ रघुनाथरावांचा बंदोबस्त

पेशवा माधवरावाच्या कारकिर्दीच्या अगदी सुरूवातीपासून रघुनाथरावाने कारभारात अडथळे निर्माण केले व राज्याची वाटणी करण्याचा आग्रह धरला. परंतु तशी वाटणी केल्यास मराठा राज्य दुर्बळ होईल, हे ओळखून माधवरावाने ती मागणी नाकारली. दैनंदिन कलह टाळण्यासाठी माधवरावाने रघुनाथरावाला उत्तरेच्या मोहिमेवर पाठविले. परंतु उत्तरेकडील स्वारीत रघुनाथरावाला एकही विजय मिळवता आला नाही. उलट उत्तरेत आपला पराभव झाला, याला माधवरावच जबाबदार आहे, असे त्याने जाहीर केले. यामुळे माधवराव आणि रघुनाथराव यांचे संबंध बिघडले. रघुनाथराव नाशिकजवळ आनंदवल्ली याठिकाणी मुक्काम करून होता. लढाई केल्याशिवाय या प्रकरणाचा शेवट होणार नाही असे माधवरावास वाटू लागले. शेवटी नाईलाजाने माधवराव प्रचंड फौज घेऊन आनंदवल्लीस येऊन पोहोचले. माधवरावाने कडक भूमिका स्वीकारल्यामुळे रघुनाथराव घाबरला. शेवटी रघुनाथरावाने दहा लाखाची जहागिरी घ्यावी व पेशव्यांनी उत्तरेच्या स्वारीचे कर्ज रूपये २५ लाख फेडावे असे ठरले. यालाच आनंदवल्लीचा तह म्हटले जाते. (३ ऑक्टोबर, १७६७) पण या करारामुळे रघुनाथराव शांत बसणार नव्हता. त्याने अमृतराव हा मुलगा दत्तक घेतला व पेशव्याविरूद्ध निजाम, हैदर, जानोजी भोसले व इंग्रज यांच्याशी संधान बांधले, तेव्हा मात्र राघोबाला शेवटचा दणका दिला पाहिजे असे माधवरावाने ठरविले. माधवरावाने धोडप येथे रघुनाथरावाचा पूर्ण पराभव केला व पुण्यात आणून बंदीवासात टाकले.

## ७.७ जानोजीचा बंदोबस्त

भोसले व पेशवा यांचे संबंध कधीच सुधारू शकले नाहीत. मराठा संघातील एक सरदार या नात्याने पेशवा बोलावील त्यावेळे स्वारीत हजर न होणे, पेशव्याविरूद्ध कारस्थाने करीत राहणे, पेशव्यांच्या शत्रुशी हातमिळवणी करणे, या सारख्या तक्रारी भोसल्यांविरूद्ध होत्या. रघुनाथरावाचा घोडप येथे पराभव केल्यानंतर त्यांचा एक साथीदार म्हणून भोसल्याचाही बंदोबस्त करण्याचे पेशव्यांनी ठरविले. यासाठी माधवरावाने उत्तरेकडे जाणाऱ्या रामचंद्र गणेशांच्या फौजास व कर्नाटकाकडे जाणाऱ्या गोपाळराव पटवर्धनाच्या फौजास विदर्भाकडे वळविले. स्वतःही प्रचंड फौज घेऊन भोसल्याच्या प्रदेशावर चालून गेला. जानोजीने काही काळ गनिमाकाव्याने युद्ध चालविले. परंतु त्याला यश आले नाही. शेवटी तो पेशव्यांना शरण

गेला, सर्वांनी एकीने राहाण्यात राष्ट्रहित आहे, असे आवाहन करून जानोजीला अभय दिले. दोघात परस्पर भेटी झाल्या व २४ एप्रिल, १७६९ रोजी दोघात वाटाघाटी होऊन कनकपूरचा तह झाला. या करारानुसार जानोजी भोसल्याने स्वतंत्र वागणार नाही, आपली फौज वाढविणार नाही व पेशव्याच्या दरबारात राज्याच्या सेवेसाठी हजर राहू, पेशव्यांशी एकनिष्ठ राहू इत्यादी अटीबरोबर पाच लक्ष देण्याचे मान्य केले.

## ७.८ उत्तरेकडील राजकारण

पानिपतच्या अपयशानंतर उत्तरेत मराठा सत्तेचा प्रभाव फारसा उरला नव्हता. बूंदेलखंड, राजपूताना, माळवा येथे मराठयांचा अंमल संपुष्टात येऊ लागला. अनेक छोटया-मोठया राजपूत संस्थानिकांनी, जाट, बुंदेल्यांनी त्यांच्या विरूद्ध उठाव केला. गंगा-यमुनेचा दुआब शूजाउद्दौलाने घेतला, तर इटाव्यापासून हरीद्वारपर्यंतचा प्रदेश रोहिल्याने घेतला. उत्तरेतील मराठा सरदार आपआपल्या परीने मराठयांची सत्ता टिकविण्याचा प्रयत्न करीत होते.

पानिपतच्या पराभावानंतर मल्हारराव होळकर हाच मराठयांचा उत्तरेकडील मातब्बर सरदार होता. जयपूरचा माधोसिंग हा राजपुतांचा नेता होता आणि तो मराठयांचा कट्टर शत्रु होता. परंतु मल्हारराव होळकराने २९ नोव्हेंबर १७६१ रोजी कोटानजीक मंगरूळच्या लढाईत माधोसिंगाचा पराभव केला. याचवेळी मल्हाररावास दक्षिणेत बोलावल्यामुळे मराठे उत्तर हिंदुस्थानातील समस्यांकडे बरीच वर्षे लक्ष देऊ शकले नाहीत. याचाच फायदा इंग्रजांनी घेऊन बंगालमध्ये आपला प्रभाव वाढवला. अयोध्येचा शूजाउद्दौला व दिल्लीचा बादशहा शहाआलम यांचा बक्सारच्या लढाईमध्ये (ऑक्टोबर १७६४) इंग्रजांनी दणदणीत पराभव केला व उत्तर हिंदुस्थानवर आपला दरारा उत्पन्न केला. बक्सारच्या पराभवानंतर मीर कासीमला शूजाउद्दौलाने आश्रय दिला होता. इंग्रजांनी चिडून शूजाविरूद्ध मोहिम हाती घेतली. शुजाने मल्हारराव होळकरांची मदत घेतली. पण इंग्रजांच्या प्रभावी तोफखान्यामुळे शूजा व मल्हारराव यांच्या संयुक्त सेनेचा निभाव लागला नाही व कोराच्या लढाईत इंग्रजी फौजा विजयी झाल्या. (३ मे १७६५).

शेवटी १७६५ च्या अखेरीस रघुनाथराव उत्तरेच्या मोहिमेवर निघाला. १७६६च्या एप्रिल महिन्यात शिंदे, होळकर रघुनाथरावास मिळाले. मराठयांच्या उत्तरेतील आगमनाला यावेळी गोहाडच्या जाटराजाने विरोध केला. जाटराजा जवाहिर सिंगचा या गोहाडच्या राजाला पाठिंबा होता. त्यामुळे रघुनाथरावाने प्रथम गोहाडचा राजा चत्तरसिंग याचा पराभव करण्याचे ठरविले. मराठयांच्या दुर्दैवाने याचवेळी मल्हारराव होळकरांचा मृत्यु झाला. (२० मे, १७६६) त्यामुळे मराठयांची परिस्थिती बिकट झाली. गोहाड जिंकण्यात यश मिळाले नाही व त्यामुळे रघुनाथरावाच्या प्रतिष्ठेला कमीपणा आला. अशा परिस्थितीत महादजी शिंदे याने या भांडणात समेट घडवून आणला आणि गोहाडच्या राजाने १५ लाख रूपये खंडणी दिल्यानंतर किल्ल्याचा वेढा उठवला. त्यानंतर गोहाडचा समर्थक जाटराजा जवाहिरसिंग याचा बंदोबस्त करण्याकरीता रघुनाथरावाने ढोलपूरकडे आपला मोर्चा वळविला. याचवेळी अहमदशहा अब्दाली पुन्हा पंजाबात आल्याच्या वार्ता आल्याने रघुनाथरावाला जुजबी तह करून ही मोहिम आटोपती घ्यावी लागली. अशारितीने उत्तरेत दीड वर्षे मुक्काम करूनसुद्धा रघुनाथरावाला एकही भरीव विजय मिळविता आला नाही. उलट तो कर्जबाजारी बनला. रघुनाथराव दक्षिण माळव्यात १७६७ च्या मार्च महिन्यात येऊन पोहोचला. त्याने मल्हारराव होळकर याची विधवा सुन अहिल्याबाई होळकर यांच्या

प्रदेशावर हल्ला करण्याचा विचार केला. अहिल्याबाईचा पूत्र मालेराव याचे थोड्या दिवसापूर्वी निधन झाले होते. अशा दुःखद प्रसंगात पैशासाठी रघुनाथरावाने हल्ला करण्याचे ठरविले. रघुनाथरावाच्या सैन्यातील अनेकांना हा विचार पटला नाही. अहिल्याबाईनेही युद्धाची तयारी केली. पण पुढे रघुनाथरावालाच लाज वाटली व शेवटी मालेरावच्या निधनानिमित्त शोक व्यक्त करून रघुनाथराव पुण्याकडे निघून गेला.

रघुनाथरावाच्या अपयशी स्वारीचे परिणाम दूरगामी ठरले. रघुनाथरावाने माघार घेतलेली पाहून जवाहिरसिंगने १७६७ मध्ये बुंदेलखंडावर स्वारी केली आणि काल्पी पर्यंतचा सर्व प्रदेश आपल्या ताब्यात घेऊन तिथल्या सर्व मराठा सरदारांना हाकलून लावले. या परिस्थितीवर मात करण्यासाठी पेशवे माधवरावाने रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण यांना उत्तरेकडे पाठवले. १७६९मध्ये हे सैन्य उत्तरेत पोहचले व महादजी शिंदे, तुकोजी होळकर या सैन्यास मिळाले. मराठयांनी जाटांचा पराभव केला. मराठयांचे यश पाहून नजीबखान घाबरला व त्याने तुकोजी होळकरांकडे संधान बांधून मराठयांकडे तहाची याचना केली. महादजी शिंदे रोहिल्यांच्या दुष्ट कारवाया ओळखून असल्याने त्याने या वाटाघाटीस विरोध केला. परंतु तुकोजीने भर घातल्याने तूर्त नजीबखानाच्या मदतीने गंगा यमुना नदीच्या दूआबात आपला अंमल बसवावा असे रामचंद्रपंतांनी ठरविले. मात्र नजीबखानने आतून नवाब बंगश यांच्याशी संधान बांधले व मराठयांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. परंतु शुक्रतालच्या अनुभवावरून मराठे शहाणे झाले होते. त्यांनी नजीबखानचा डाव हाणून पाडला. मराठे ताबडतोब यमुना नदीच्या पलीकडे उतरले व नजीबखानचा मुलगा झबेताखान यास अटक केली. याचवेळी नजीबखान रोहिला मरण पावला. तुकोजी होळकरच्या मदतीने झबेताखान कैदेतून निसटला व अहमदखान बंगशाच्या आश्रयास गेला. मराठयांनी दोघांचाही पराभव करून गंगा-यमुना नदीचा दुआब हस्तगत केला. अशा प्रकारे मराठयांनी जाटांचा व रोहिल्यांचा पराभव केला. १० फेब्रुवारी १७७१ मध्ये महादजी शिंदेच्या नेतृत्वाखाली मराठी फौजा दिल्लीवर चालून गेल्या व त्यांनी अलाहाबाद येथे इंग्रजांच्या आश्रयास असलेल्या शहाआलम यास दिल्लीचे सिंहासन मिळवून दिले. महादजी शिंदे यांनी झाबेताच्या छावणीवर हल्ला करून रोहिल्यांचा मूलूख लूटला. या संग्रामात महादजी शिंदे विजेसारखे चमकून उठले. मराठयांची प्रतिष्ठा वाढली. पानिपताचे शल्य धुऊन निघाले.

munotes.in

## ७.९ पेशवे माधवरावाचा मृत्यु व योग्यता

बारा वर्षांच्या अविश्रांत धडपडीचा माधवरावाच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम होऊन त्याला क्षयरोग झाला आणि त्यातच १८ नोव्हेंबर १७७२ रोजी पुण्याजवळच्या थेऊर येथे त्याचा मृत्यु झाला.

माधवरावांच्या अकरा वर्षाच्या कारकीर्दिचा विचार करता मराठेशाहीतील पेशव्यांच्या मालिकेत माधवरावांचे स्थान निर्विवादपणे श्रेष्ठ म्हणून मान्य करावे लागेल. ग्रॅण्ट डफने असे म्हटले आहे की, "पानीपताच्या संकटामुळे मराठी राज्याचे जे नुकसान झाले त्यापेक्षा अधिक पटीने माधवरावाच्या अकाली मृत्युने झाले." हे मत सार्थ आहे. पेशवे माधवराव यांच्या गुणांचा आढावा घेतला तर ते प्रामाणिक, न्यायी, प्रशासकीय कामात कुशल, प्रजाहितदक्ष, निर्भिड, योग्य त्या व्यक्तीचा योग्य त्या ठिकाणी आदर राखणारा असा हा असामान्य पेशवा होता. बाळाजी विश्वनाथाची मुत्सद्देगिरी, बाजीरावाचे शौर्य व नानासाहेब

पेशव्यांचा करारीपणा या तिन्ही गुणांचा समावेश माधवरावाच्या व्यक्तिमत्वात आढळतो, असे मत सरदेसाई यांनी व्यक्त केले आहे. पानिपतच्या रणसंग्रमात मराठयांचे झालेले नुकसान त्याने पूर्णपणे भरून काढले आणि गेलेली प्रतिष्ठा परत मिळवून दिली. पराक्रमी व कर्तबगार मराठा सरदारांची एक नवी पिढी त्याने तयार केली व त्यांच्या सहाय्याने मराठयांचा दरारा परत एकवटला सर्वत्र प्रस्थापित केला. हरिपंत फडके, गोपाळराव पटवर्धन, नाना फडणीस, महादजी शिंदे, त्रिंबकराव पेठे, रामचंद्र गणेश, गोविंद शिवराम, रामशास्त्री प्रभूणे, विसाजी कृष्ण अशी कित्येक मराठी माणसे माधवरावाच्या तालमीत तयार झाली. माधवरावाने आपल्या राज्य कारभारास एक नवे नैतिक वजन प्राप्त करून दिले. रामशास्त्री प्रभुण्यांसारख्या निःस्पृश न्यायाधिशाच्या हाती न्यायदानाचे काम सोपवून प्रजेला खरा निर्भिड न्याय दिला. कर आकारणीतील अन्याय त्याने दूर केले. वेठबिगारांवर बंदी घालण्यात आली. सैन्यातील आणि निरनिराळ्या सरकारी खात्यातील आळशीपणा, बेफिकिरी दूर करण्यात आली. दारूगोळ्याचे कारखाने जागोजागी स्थापन करण्यात आले. अशा लोकोत्तर गुणांचा पेशवा अकाली मृत्यु पावावा, हे मराठा राष्ट्राचे दुदैवच समजावे लागेल.

## ७.१० सारांश

पानिपतच्या युद्धात मराठयांचा पराभव झाल्यावर त्यांच्या अखिल भारतीय वर्चस्वास धक्का पोहोचला. त्यांच्या शत्रूंनी उचल खाली. परंतु माधवरावाने अल्पकाळातच निजामाचा बंदोबस्त केला. हैदरचा दारूण पराभव केला. उत्तरेत मुघल बादशहा यास सिंहासनावर बसवून शत्रूंचा बिमोड केला. मराठे अजूनही क्षीण झालेले नाही. पहिल्यासारखे तेजाने चमकू शकतात, हे मराठयांनी सिद्ध केले.

## ७.११ प्रश्न

१. मराठा सत्तेचे पुनःरूज्जीवन करण्यासाठी पेशवा माधवराव यांनी केलेल्या कामगिरीचे वर्णन करा.

२. माधवराव पेशव्यांच्या कर्तृत्वाबद्दल माहिती सांगून मराठयांच्या इतिहासात माधवरावाचे स्थान कोणते ते स्पष्ट करा.

## ७.१२ संदर्भ

१. कुळकर्णी अ. रा., खरे ग. ह. 'मराठयांचा इतिहास' खंड ३, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

२. काळे म. वा. 'मराठयांचा इतिहास' मुंबई.

३. गर्गे स. मा., राजदेरकर सुहास 'मराठयांचा इतिहास' कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

४. गायकवाड आर. डी., थोरात डी. डी., चव्हाण आर. डी., 'मराठी सत्तेचा विकास व ऱ्हास' पुणे.

५. सरदेसाई गो. स., 'मराठी रियासत' खंड १ ते ८ - पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

❖❖❖❖

# ८

## बारभाई मंडळ

**घटक रचना :**

८.० उद्दिष्टये

८.१ प्रस्तावना

८.२ नारायणराव पेशव्यांचा खून

८.३ बारभाईचे कारस्थान

८.४ सुरतेचा तह

८.५ पुरंदरचा तह

८.६ वडगावची लढाई

८.७ चतुःसंघाची स्थापना

८.८ सालबाईचा तह

८.९ सारांश

८.१० प्रश्न

८.११ संदर्भ

munotes.in

### ८.० उद्दिष्टये

१. बारभाई मंडळाच्या स्थापनेच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२. बारभाई मंडळाच्या कार्याची माहिती करून घेणे.

३. महादजी शिंदे यांच्या कामगिरीचा आढावा घेणे.

४. इंग्रज-मराठा यांच्यातील युध्दाचा अभ्यास करणे.

५. मराठा सत्तेच्या ऱ्हासाची कारणमिमांसा समजून घेणे.

### ८.१ प्रस्तावना

थोरल्या माधवरावांच्या मृत्यूनंतर पेशवाईमध्ये जी काही मोजकी कर्तबगार मंडळी होती. त्यामध्ये नाना फडणीस व महादजी शिंदे यांचा समावेश होता.

मराठा सत्तेचा उत्तरेत विस्तार करुन दिल्ली दरबारमध्ये मराठयांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचे महत्वाचे कार्य शिंदे, फडणीस व होळकर यांनी केले होते.

या विषयाची सविस्तर माहिती या प्रकरणातून दिलेली आहे.

## ८.२ नारायणराव पेशव्यांचा खून

पेशवा माधवरावाच्या मृत्युनंतरही आपणास पेशवेपद मिळाले नाही, ही गोष्ट रघुनाथरावाच्या मनात सलत होती. "मी नारायणरावाचा सांभाळ करीन" असे त्याने माधवरावास आश्वासन दिले असले तरी आता त्याला त्याचा विसर पडू लागला. त्याने नारायणरावाविरूद्ध कारवाया सुरू केल्या. नारायणरावास समजताच त्याने रघुनाथरावाची कैद कडक केली. याची परिणिती अखेर नारायणराव पेशवा याचा काटा काढण्यासाठी त्याच्याविरूद्ध कट करण्यात झाली. तुळाजी पवाराच्या मध्यस्थीने सुमेरसिंगाने नारायणरावास कैद करावे असे ठरले. गारद्यांनी राघोबाकडून धरावे असे लेखी हुकूम घेतला. पुढे लेखी हुकमातील 'ध'चा 'मा' आनंदीबाईने केला, असा सर्वत्र समज झाला. परंतु तो खरा नसावा. नियोजित कटाप्रमाणे नारायणरावचा खून करण्यात आला. नारायणरावाच्या दुर्दैवी वधामुळे मराठयांच्या राज्यावर परत एकदा गंभीर संकट कोसळले. रघुनाथरावाने राज्यकारभार करण्यास सुरूवात केली. नारायणरावाच्या खूनाची चौकशी करण्यासाठी रामशास्त्री प्रभुणे यांना नियुक्त करण्यात आले. त्यांनी चौकशीनंतर खूनाची संपूर्ण जबाबदारी रघुनाथरावावर टाकून त्याला खुनी जाहीर केले व त्यास देहान्त प्रायश्चिताची शिक्षा फर्माविली. दरम्यान मराठयांच्या शत्रूंनी उचल खाल्ली व रघुनाथराव कर्नाटकात हैदरअलीवर चालून गेला.

## ८.३ बारभाईचे कारस्थान

रघुनाथराव कर्नाटक मोहिमेवर गेल्याची संधी साधून त्याला पदच्युत करण्याचे पुणे दरबारातील निवडक लोकांनी ठरविले. पुणे दरबारातील नाना फडणीस, सखारामबापू बोकील इ. मुत्सद्दी राघोबाविरूद्ध कारस्थान करू लागले. त्यांनी रघुनाथरावास पेशवेपदावरून काढून टाकण्याचा डाव रचला. याच घटनेस बारभाईचे कारस्थान असे म्हणतात. या कारस्थानात सखाराम बापू, नाना फडणीस, त्रिंबकराव पेठे, बाबाजी नाईक, हरिपंत फडके, मोरोबा फडणीस, रास्ते, पटवर्धन, मालोजी घोरपडे, भवानराव प्रतिनिधी, महादजी शिंदे, तुकोजी होळकर हे बारा लोक प्रमुख होते. त्यांनी ठरविले की, राघोबास पेशवेपदावरून काढून टाकायचे व नारायणरावाची विधवा पत्नी गंगाबाई जी गरोदर होती तिला सुरक्षित स्थळी नेऊन ठेवायचे. तिला पुत्र झाल्यास त्याच्या नावाने पेशवाईची सूत्रे चालवायची, नाहीतर पहिल्या बाजीरावाचा मस्तानीपासून झालेल्या मुलाचा म्हणजे समशेर बहादूरचा मुलगा अलीबहादूर यास पेशवेपद द्यावे असे ठरले. आपल्या विरूद्ध कारस्थान घडल्याची बातमी कळताच रघुनाथराव अस्वस्थ झाला. त्याने कर्नाटक मोहीम आटोपती घेतली. पंढरपूर मार्गाने पुणे येथे येत असतानाच त्याची त्रिंबकराव पेठे यांच्या सैन्याशी कासेगाव येथे गाठ पडली. यात पेठे जखमी झाले व काही दिवसांनी त्यांचा मृत्यु झाला. हरिपंत फडकेंनी साताऱ्याहून ताबडतोब रघुनाथवर चाल केली. फडक्यास भोसले व निजामाची मदत मिळाली. पण रघुनाथराव उत्तरेकडे पळून गेला. दरम्यानच्या १८ एप्रिल, १७०४ रोजी गंगाबाईस पुत्र झाला. त्याचे सवाई माधवराव असे नाव ठेवण्यात आले. २८

मे, १७७४ रोजी मुलाच्या ४० व्या दिवशी त्याला पेशवेपदाची वस्त्रे देण्यात आली. रघुनाथरावाने शिंदे व होळकरांची मदत घेण्याचा प्रयत्न केले. परंतु कोणाचीही त्याला सहानुभूती नव्हती. त्याने इंग्रजांकडे मदतीची याचना केली व मराठयांच्या राजकारभारात हस्तक्षेप करण्याची संधी इंग्रजांना प्राप्त करून दिली.

## ८.४ सुरतेचा तह

रघूनाथराव (राघोबा) इंग्रजांच्या आश्रयास पोहचल्यानंतर इंग्रजांनी ६ मार्च १७७५ मध्ये रघुनाथरावाशी तह केला. या तहाच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या.

१. इंग्रजांनी आपले सैन्य रघुनाथरावाच्या तैनातीस द्यावे.

२. या फौजेच्या खर्चासाठी रघुनाथरावाने दीड लाख रूपये दर महिन्यास इंग्रजांना द्यावेत.

३. कंपनीकडे ठेव म्हणून रघुनाथरावाने सहा लाखांचे रत्नजडीत अलंकार ठेवावेत.

४. वसई साष्टी, मुंबईजवळील सर्व बेटे, गुजरातमधील जंबूसार व ओल्पाड हे प्रदेश रघूनाथरावाने (राघोबाने) इंग्रजांना द्यावे.

राघोबाच्या मदतीला आलेले इंग्रजांचे सैन्य व हरिपंत फडके यांच्या सैन्यात चकमकी उडाल्या. परंतु त्यात कोणासही निर्णायक विजय मिळाला नाही.

## ८.५ पुरंदरचा तह

गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टींग्ज याच्यापुढे अनेक अडचणी असल्याने मुंबईच्या गव्हर्नरने मराठयांशी चालविलेले हे युद्ध त्याला पसंत नव्हते. मुंबईच्या गव्हर्नरने त्याची परवानगी न घेतल्याने त्याने आपला प्रतिनिधी पुण्याला नव्याने समझोता करण्यासाठी पाठविण्याचा निर्णय घेतला व कर्नल ॲप्टन यास पाठविले. उभयतांमध्ये वाटाघाटी होऊन १ मार्च, १७७६ रोजी त्यांच्यात तह घडून आला. तो पुरंदरचा तह या नावाने ओळखला जातो. या तहातील तरतुदी खालीलप्रमाणे होत्या.

१. साष्टी व ठाणे ही ठिकाणे इंग्रजांकडेच राहावीत.

२. रघुनाथरावाला इंग्रजांनी केलेल्या मदतीपोटी मराठयांनी त्यांना ८२ लाख रूपये द्यावेत.

३. पेशव्याने रघुनाथरावास दरसाल ३ लक्ष ८७ हजार रूपये पेन्शन द्यावी, व यापुढे रघुनाथरावाने राजकारणात भाग न घेता राहिलेले आयुष्य गंगातीरी घालवावे.

४. इंग्रजांनी गुजरातमधील मराठयांचा जिंकलेला प्रदेश त्यांच्याकडे राहू द्यावा.

५. इंग्रजांनी रघुनाथरावाला आश्रय देऊ नये.

६. घाईघाईने व पूर्ण विचार न करता केलेल्या या तहामुळे इंग्रज व मराठे यांच्यातील मूळ संघर्ष सुटण्यासाठी काहीच उपयोग झाला नाही.

munotes.in

## ८.६ वडगावची लढाई (१६ जानेवारी, १७७९)

पुरंदरचा तह मुंबईच्या गव्हर्नरला पसंत पडला नाही. त्यांनी संचालक मंडळाकडे दाद मागितली. पुरंदर तहाप्रमाणे रघुनाथरावास पेशव्यांच्या हवाली करण्यास नकार दिला. दरम्यान अमेरिकन वसाहती स्वतंत्र झाल्या व इंग्लंडच्या साम्राज्याला जबर धक्का बसला. ही हानी भरून काढण्याचा वॉरन हेस्टींग्जने प्रयत्न चालवला. त्याने मुंबईकरांना पुन्हा युद्ध करण्याचा आदेश दिला. नोव्हेंबर १७७८ मध्ये रघुनाथराव, इंग्रजांच्या सैन्याच्या संरक्षणाखाली पुण्याला रवाना झाला. कर्नल इगरटन हा या सैन्याचा प्रमुख होता. मराठयांनी तळेगावच्या आसपासच्या प्रदेशात इंग्रजांची नाकेबंदी केली. इंग्रज वडगावपर्यंत मागे हटले. मराठयांनी इंग्रज फौजांचा धूव्वा उडविला. इंग्रजांनी मराठयांपुढे शरणागती पत्कारली व महादजी शिंद्याच्या मदतीने वडगाव येथे तह घडवून आणला. या तहानुसार इंग्रजांनी राघोबास पेशव्याच्या स्वाधीन करावे असे ठरले. साष्टी, ठाणे व गुजरातमधील इंग्रजांनी मराठयांचा जिंकलेला प्रदेश मराठयांना परत करावा असे ठरले.

वॉरेन हेस्टींग्जला हा तह पसंत पडला नाही. मराठयांविरूद्ध पुन्हा लढाई करण्याचे त्याने ठरविले. जनरल गोडार्डने गुजरात प्रांतावर हल्ला चढवला आणि त्याचवेळी रघुनाथराव मराठयांच्या कडेकोट बंदोबस्तातून निसटून पुन्हा सुरतेला दाखल झाला.

## ८.७ चतुःसंघाची स्थापना

इंग्रजांनी पुरंदर तह फेटाळून पुन्हा युद्धास सुरूवात केली. नाना फडणिसांनी इंग्रजांना प्रतिकार करण्यासाठी अखिल भारतीय आघाडी उभारली. त्यांनी इंग्रजांविरूद्ध पेशवे, निजाम, हैदरअली व भोसले असा चतुःसंघ उभा केला. मराठयांनी महाराष्ट्र व गुजराथमधून इंग्रजांच्या विरूद्ध आघाडी लढवावी, हैदरने दक्षिण कर्नाटकातील इंग्रजांच्या प्रदेशावर हल्ला करावा, निजामाने पूर्व किनाऱ्यावर इंग्रजांच्या प्रदेशावर आक्रमण करावे, तर भोसल्यांनी बंगाल प्रांतात घुसून इंग्रजांनी आपल्या ताब्यात ठेवलेला प्रदेश जिंकावा अशी योजना ठरविण्यात आली. परंतु इंग्रजांनी निजाम व नागपूरकर भोसले यांना चतुःसंघातून फोडण्यात यश मिळविले. जनरल गोडार्ड याने फत्तेसिंगराव गायकवाड याच्या मदतीने गुजरातमधील मराठी प्रदेशावर जोरदार हल्ले करण्यास सुरूवात केली. महादजी शिंदे व तुकोजी होळकरांनी गनिमी काव्याने लढून इंग्रजांची दाणादाण करून टाकली. मुंबईच्या आसपास मराठयांनी इंग्रज सैन्याची जबरदस्त हानी केली. शेवटी गुजराथची मोहीम आटोपती घेऊन मुंबईच्या संरक्षणास धावावे लागले. मराठयांनी इंग्रज फौजांना गनिमी काव्याने हैराण केले. महादजीने गुजरात मधील इंग्रजाची सत्ता उखडून काढली. प्रचंड वितहानी व मानहानीमुळे इंग्रजांना जबर धक्का पोहचला. त्यांनी महादजी मार्फत मराठयांकडे तहाची याचना केली व १७ मे १७८२ रोजी सालबाईचा तह करण्यात आला.

## ८.८ सालबाईचा तह

१. पुरंदरच्या तहापासून इंग्रजांनी वसई धरून जो मुलूख जिंकला असेल तो मुलुख इंग्रज मराठयांना परत करतील.

२. साष्टी व मुंबईच्या आसपासची लहान बेटे इंग्रजांच्या ताब्यात रहातील.

३. गुजरातमधील जिंकलेला प्रदेश इंग्रज मराठयांना परत देतील.

४. इंग्रजांनी रघुनाथरावास मराठयांच्या ताब्यात देण्याचे मान्य केले. त्याला दरमहा रू. २५०००/- पेन्शन मराठयांनी द्यावे.

५. हैदरअलीने इंग्रजांचा जिंकलेला प्रदेश त्यांना परत मिळवून देण्याचा मराठयांनी प्रयत्न करावा.

६. इंग्रजांना पूर्वीप्रमाणे पेशव्यांनी व्यापारी सवलती द्याव्या. इंग्रज व पोर्तुगीज याशिवाय इतर युरोपीयन व्यापाऱ्यांस मराठयांनी आपल्या प्रदेशात व्यापाराची परवानगी देऊ नये.

या तहाने एक गोष्ट स्पष्ट झाली की, मराठयांच्या प्रदेशावर आक्रमण केल्यास किंवा मराठयांच्या अंतर्गत प्रश्नात ढवळाढवळ केल्यास त्याचे परिणाम काय होतील हे इंग्रजांना दिसून आले. या तहामुळे मराठयांना ठाणे व साष्टी हे दोन्ही प्रदेश मात्र कायम स्वरूपी गमवावे लागले. या तहामुळे महादजी शिंदे यांचे महत्त्व व प्रभुत्व वाढले. व त्यांना उत्तरेत पराक्रम गाजविण्याची चांगली संधी मिळाली. कारण दिल्लीच्या राजकारणात इंग्रज हस्तक्षेप करणार नाहीत अशी ग्वाही इंग्रजांनी मराठयांना दिली. रघुनाथराव स्वतः मराठयांच्या स्वाधीन झाला. १८ डिसेंबर, १७७३ मध्ये निराश अवस्थेत कोपरगाव येथे त्याचे निधन झाले.

## ८.९ सारांश

रघुनाथरावाने उत्तर पेशवाईत अन्यायाने पेशवेपद मिळवण्यासाठी केलेला प्रयत्न यशस्वी न होऊ देणाऱ्या मराठी सेनानी व मुत्सद्दी यांचा संघ म्हणजे बारभाई मंडळ म्हणून ओळखला जात होता. हा संघ प्रामुख्याने रघुनाथरावांनी केलेल्या कारवायांना प्रतिबंध घालण्यासाठी स्थापन करण्यात आलेला होता. नारायणरावांची गरोदर पत्नी गंगाबाई तिच्या नावाने कारभार करावा आणि जर तिला मुलगा झाला तर त्याला दत्तक घेऊन त्याच्या नावाने कारभार करावा असे सुरुवातीचे कारस्थान ठरलेले होते यालाच बारभाई कारस्थान म्हणतात. या कारस्थानात पेशव्यांच्या नावाने नाना फडणवीस पूर्ण कारभार करत होते. बारभाईच्या कारस्थानामुळे रघुनाथरावांचे काही एक चालले नसल्याने त्यांना बारभाईला शरण यावे लागले. पुरंदरच्या तहानंतर त्यांना कोपरगाव, आनंदवल्ली इत्यादी ठिकाणी तसेच इंग्रजांच्या आश्रयाखाली सुरत, मुंबई, भावनगर इत्यादी ठिकाणी त्यांना जीवन व्यतीत करावे लागले. शेवटी कोपरगाव जवळ किरकोळ आजाराने रघुनाथरावांचे निधन झाले.

बारभाई कारस्थानाचा मराठयांच्या इतिहासावर मोठा परिणाम झालेला होता. या प्रकरणाने मराठयांच्या राजकारणात रघुनाथराव एकटे पडले आणि त्यांनी पेशवेपदाच्या महत्त्वाकांक्षेपायी थेट इंग्रजांची मदत घेतली आणि त्याचे परिणाम शेवटी मराठा सत्तेच्या ऱ्हासात झाले.

## ८.१० प्रश्न

१. मराठयांच्या इतिहासात बारभाई मंडळाची स्थापना का झाली होती?

२. बारभाई मंडळात नाना फडणवीसांनी बजावलेल्या भूमिकेचे मुल्यांकन करा.

३. बारभाई कारस्थानावर सविस्तर माहिती लिहा.

## ८.११ संदर्भ

१. कोंडेकर, ए.वाय. (२००४) मराठयांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२. खोबरेकर, वि. गो. (२००६), मराठयांचा इतिहास, मराठा कालखंड- भाग-२, पेशवे काळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

३. भामरे जितेंद्र, मराठयांचा इतिहास – शेठ पब्लिकेशन, मुंबई

❖❖❖❖

munotes.in

# ९

## मराठा सत्तेचा ऱ्हास

**घटक रचना :**

९.० उद्दिष्टये

९.१ प्रस्तावना

९.२ पानिपतच्या तिसऱ्या लढाईतील मराठयांचा पराभव

९.३ पेशवा थोरल्या माधवरावाचा अकाली मृत्यू

९.४ पेशवेपदासाठी मराठयांचा अंतर्गत संघर्ष

९.५ मराठा - इंग्रज युद्धे

९.६ मराठा सत्तेच्या ऱ्हासाची कारणे

९.७ सारांश

९.८ प्रश्न

९.९ संदर्भ

## ९.० उद्दिष्टये

१. पानिपतानंतर मराठयांमध्ये सुरु झालेल्या अंतर्गत संघर्षाची माहिती समजून घेणे.

२. मराठा - इंग्रज यांच्यामध्ये झालेल्या युद्धाचे विश्लेषण करणे.

३. मराठा सत्तेच्या ऱ्हासास जबाबदार असलेल्या कारणांची चिकित्सा करणे.

## ९.१ प्रस्तावना

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात मराठा साम्राज्याचे विघटन ही एक दुर्दैवी घटना ठरली. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या रक्षणासाठी व आत्मसन्मानासाठी स्वराज्याची स्थापना केली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनंतर छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांनी आपल्या स्वपराक्रमाने तसेच सेनापती संताजी घोरपडे, सेनापती धनाजी जाधव, सरखेल कान्होजी आंग्रे या सारख्या मातब्बर सरदारांनी स्वराज्य हितासाठी प्राणप्रणाने मुघल व इतर परकीय सत्तांशी संघर्ष करून स्वराज्याचे रक्षण केले होते. छत्रपती शाहू महाराजांनी कर्तबगार पेशवा बाळाजी विश्वनाथ यांच्याकडे स्वराज्य रक्षणाची जबाबदारी दिली होती, त्यांनी आपल्या मुत्सद्देगिरीच्या जोरावर दिल्लीचे राजकारण केले व मुघलांकडून छ. शाहुमहाराजांना कायदेशीर अधिष्ठान प्राप्त करून दिले

munotes.in

होते. बाळाजी विश्वनाथानंतर पहिला बाजीराव, नानासाहेब पेशवे, थोरले माधवराव यांनी आपल्या पराक्रमाने स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर केले होते. मातब्बर मराठा सरदार महादजी शिंदे यांनी आपल्या स्वपराक्रमाने मराठयांचा उत्तरेतही दबदबा निर्माण करून दिला होता. मराठयांनी आपल्या पराक्रमाने सामर्थ्यशाली साम्राज्य उभे केले होते. दुर्दैवाने दुसऱ्या बाजीरावाने आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी इंग्रजांची मदत घेऊन तैनाती फौजेचा स्वीकार केला. इंग्रजांनी मराठयांच्या कमकुवत नेतृत्वाचा फायदा घेऊन इ.स. १८१८ मध्ये त्यांचा पराभव केला व मराठा साम्राज्य ताब्यात घेतले. मराठी सत्तेचा ऱ्हास ही एकाएकी झालेली घटना नव्हती, त्यासाठी अनेक घटक कारणीभूत ठरलेले होते. इ.स. १७६१ मध्ये झालेल्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धानंतर मराठेशाही सर्व बाजूंनी संकटात सापडली होती. शत्रु पक्षांनी हीच बाब ओळखून मराठयांच्या विरोधात व्यूहरचना केली व मराठी सत्ता कमकुवत करून तिचा ऱ्हास कसा घडवून आणला होता या विषयीची सविस्तर माहिती या प्रकरणामध्ये दिलेली आहे.

## ९.२ पानिपतच्या तिसऱ्या लढाईतील मराठयांचा पराभव

मराठे आणि अहमदशाह अब्दाली यांच्यामध्ये इ.स. १७६१ मध्ये पानिपतची तिसरी लढाई झाली होती आणि या लढाईमध्ये मराठयांचा दारूण पराभव झाला होता. पानिपतच्या तिसऱ्या लढाईचे दूरगामी परिणाम भारताच्या व मराठयांच्या इतिहासावर झालेले दिसून येतात. या लढाईतील पराभवामुळे मराठयांच्या आत्मविश्वासाला प्रचंड धक्का बसला होता. उत्तरेत अब्दालीशी लढतांना मराठयांना कोणत्याही इतर सत्तांची मदत मिळाली नाही तसेच स्वकियांकडून सुद्धा वेळेवर रसद न मिळाल्यामुळे तसेच मैदानी लढाईची व्यूहरचना व परस्पर समन्वय नसल्यामुळे पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठयांचा दारूण पराभव झाला होता. या लढाईमुळे साम्राज्य बनविण्याचे मराठा सत्तेचे स्वप्न हवेत विरल्याचे इतिहासकार सांगतात.

इ.स. १७६१च्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धातील दारुण पराभवानंतर मराठेशाहीच्या पेशवेपदाची धुरा १६ वर्षाच्या माधवरावांकडे आली होती, परंतु विपरीत परिस्थितीत त्यांनी मराठेशाहीची धुरा समर्थपणे आपल्या खांद्यावर घेतली होती. मराठयांच्या इतिहासात माधवराव पेशव्यांचा कालखंड महत्त्वाचा मानला जातो. पानिपतातील पराभवानंतर मराठी सत्तेचा ऱ्हास होतो की काय अशी परिस्थिती होती. मराठयांना पानिपतच्या धक्क्यातून वर काढण्यासाठी आपल्या समर्थ नेतृत्वाखाली माधवराव पेशव्यांनी अनेक प्रयत्न केले होते. इंग्रजांचे वाढते सामर्थ्य ही माधवरावांपुढे मोठी समस्या होती, मराठी सत्तेचा प्रभाव उत्तर हिंदुस्थानात निर्माण करण्यासाठी त्याने निजामाशी मुत्सद्दीपणे स्नेह जोडला व हैदरअलीच्या सत्तेला आवर घातला, त्याच बरोबर राघोबाची (रघूनाथराव) यादवी मोडून काढली व पानिपतात मराठयांची गेलेली प्रतिष्ठा पुन्हा मिळवली होती. त्यामुळे इतिहासकार त्यांना सर्वोत्तम पेशवा म्हणतात. पेशवे काळात उदयास आलेले महादजी शिंदे हे एक मुत्सद्दी व पराक्रमी सरदार होता. त्यांनी मराठेशाहीच्या अस्थिर व कठीण परिस्थितीतही महत्त्वपूर्ण कामगिरी करून मराठी सत्तेला गतवैभव मिळून दिले होते. त्यांच्याजवळ तलवारीच्या जोरावर पराक्रम गाजविणे व मुत्सद्देगिरी हे दोन्ही गुण होते. त्याच जोरावर त्यांनी मुघल सत्तेला नियंत्रित करून दिल्लीमध्ये पुन्हा मराठयांचे वर्चस्व प्रस्थापित केले

होते. त्यामुळे पानिपतात गेलेली मराठयांची प्रतिष्ठा पुन्हा मिळविली व मराठयांची मान पुन्हा गर्वाने उंचावली होती.

माधवराव पेशव्यांच्या अकाली मृत्यूमुळे मराठयांच्या अंतर्गत राजकारणात राजगादीसाठी संघर्ष सुरु झाला होता. यावेळी महादजी शिंदे आणि नाना फडणवीस यांनी बारभाईच्या माध्यमातून मराठयांच्या राजगादीला सुरक्षित करण्याचे काम केले होते. राजकारणातही महादजी शिंदे यांचे नेतृत्व खंबीर होते, त्यांनी शीख, रजपूत, जाट यांच्या बंदोबस्तासाठी अनेक मोहिमा काढल्या होत्या. पेशवाईच्या अखेरच्या काळात अस्तित्वात असलेल्या अनेक कर्तबगार मंडळीमध्ये महादजी शिंदे आणि नाना फडणवीसांचे स्थान मोठे होते. बारभाई कारस्थानात त्यांचा पुढाकार होता. राघोबादादाच्या स्वार्थी राजकारणाला व ब्रिटिशांच्या हस्तक्षेपाला त्यांनी विरोध केला होता. त्याचबरोबर मराठे सरदार वर्गावर त्यांनी आपला वचक ठेवला होता. इंग्रजांचा मराठयांच्या सत्तेला मोठा धोका आहे हे ओळखून त्यांनी चतु:संघ निर्माण केला होता.

## ९.३ पेशवा थोरल्या माधवरावाचा अकाली मृत्यू

थोरल्या माधवरावांनी पानिपतच्या पराभवातून मराठयांना सावरण्याची मोठी कामगिरी केली. राज्यकर्त्यांच्या अंगी आवश्यक असणारे सर्व गुण माधवरावांमध्ये होते. म्हणून त्यांनी अवघ्या दहा वर्षांच्या आत मराठी सत्तेस गतवैभव प्राप्त करून दिले व मराठयांची गेलेली राजकीय प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त करून दिली होती. दुर्दैवाने त्यांना अल्प आयुष्य लाभले. पानिपतच्या पराभवामुळे मराठे संपले ही समजूत त्यांनी आपल्या पराक्रमामुळे व मुत्सद्देगिरीमुळे खोटी ठरविली. मराठयांचा इतिहास लिहिणाऱ्या ग्रँड डफने म्हटले होते की, 'पानिपतच्या संकटामुळे मराठयांचे जे नुकसान झाले, त्यापेक्षा अधिक पटीने नुकसान माधवरावाच्या अकाली मृत्यूने झाले होते. यावरून थोरल्या माधवरावांची योग्यता लक्षात येते. माधवरावांनी त्यांच्या सैन्यात कडक शिस्त अंगीकारली होती. सरदार व अधिकारी वर्गावर कडक वचक निर्माण केला होता. पानिपतच्या युद्धात अनुभवी सेनानींची एक पिढीच्या पिढी गारद झाली होती. त्यांची जागा भरून काढण्यासाठी माधवरावांनी समर्थ अशी माणसे तयार केली होती. त्यामध्ये कृष्णराव काळे, नारो अप्पाजी, महादजी पंत, हरिपंत फडके, गोपाळराव पटवर्धन, नाना फडणवीस, महादजी शिंदे, आनंदराव धुळप, खंडेराव दरेकर, त्रिंबकराव पेठे, रामचंद्र गणेश, विसाजी कृष्णाजी इत्यादी मराठी माणसे माधवरावांच्या तालमीत तयार झाली होती. दहा वर्षाच्या अल्प कारकिर्दीत माधवराव पेशव्यांना विलक्षण शारीरिक व मानसिक कष्ट सहन करावे लागले होते. सततच्या धावपळीमुळे माधवरावांना क्षयासारख्या असाध्य रोगाने ग्रासले होते. कौटुंबिक कटकटी, घरभेदांचे उपद्व्याप, विविध मोहिमांचे संचालन, प्रवासाची दगदग व राज्यकारभारातील गुंतागुंतीचे प्रश्न या विविध गोष्टींचा असर त्यांच्या प्रकृतीवर पडला व त्यांना जडलेला रोग दिवसेंदिवस जास्त बळावत गेला. अखेरच्या दिवसात आपले मरण जवळ आल्याचे जाणून त्यांनी सखाराम बापू व नाना फडणवीस यांना राज्याचा कारभार पाहण्यास सांगून नारायणरावास आपला वारस म्हणून नियुक्त केले. ३० सप्टेंबर १७७२ ला त्यांनी आपले मृत्युपत्र तयार केले. त्यात त्यांनी स्पष्ट म्हटले की, "दादासाहेबास (राघोबा) पाच लक्षची जहागिरी द्यावी. त्याहून थोडे बहुत अधिक मागितल्यास त्यांचा संतोष व मर्जी राखण्यासाठी निदान सात लक्षची जहागिरी देऊन यांची मर्जी राखावी अधिक मागु लागल्यास ऐकू नये."

यावरून माधवरावानंतर रघुनाथावांना (राघोबा) पेशवेपदाची वस्त्रे मिळू नयेत हे स्पष्ट होते. आपले मृत्युपत्र त्यांनी रामशास्त्री प्रभुणे यांच्या साथीने पूर्ण केले, शेवटी १८ नोव्हेंबर १७७२ रोजी त्यांनी आपले प्राण सोडले.

माधवरावांचा अकाली मृत्यू हे मराठेशाहीवर आलेले मोठे संकट होते हे ग्रँड डफने व इतर एतद्देशीय इतिहासकारांनी लिहिल्याचे दिसून येते.

## ९.४ पेशवेपदासाठी मराठयांचा अंतर्गत संघर्ष

माधवरावांच्या अकाली मृत्यूनंतर पेशवेपदासाठी अंतर्गत संघर्ष सुरू झाला. माधवरावांचा धाकटा भाऊ नारायणराव आणि चुलता रघुनाथराव यांच्यामध्ये पेशवे पदासाठी संघर्ष सुरु झाला. शेवटी रघुनाथरावांना १४  एप्रिल १७७२ रोजी शनिवार वाडयात कैदेत टाकले आणि माधवरावांचा धाकटा भाऊ नारायणराव हे पेशवे झाले. नारायणरावांना पेशवेपद मिळाल्यामुळे चुलत्या – पुतण्यातील संघर्ष शिगेला गेला. पेशवेपदाच्या महत्त्वाकांक्षेमुळे रघुनाथराव यांच्या संतापामध्ये भर पडत जाऊन त्यांनी नारायणरावांच्या विरोधात कट रचला. रघुनाथरावाने सुमेरसिंगाला नारायणरावास मारण्याची आज्ञा दिली. त्यानुसार गारद्यांनी ३० ऑगस्ट १७७३ ला शनिवार वाडयात नारायणरावचा खून केला.

पेशव्यांच्या अंतर्गत संघर्षाचा फायदा हैदरअलीने घेतला. हैदरअलीने कर्नाटकातील पटवर्धन आणि रास्ते यांनी स्थापन केलेली अनेक लष्करी ठाणे जिंकून घेतली. त्यामुळे मराठयांसमोर हैदरअलीचा बंदोबस्त कसा करायचा हा प्रश्न उभा राहिला. निजाम, हैदर आणि इंग्रज यांनी पेशव्यांच्या अस्थिर परिस्थितीचा फायदा घेतला. पेशवे घराण्यात रक्ताचा वारस नसल्यामुळे रघुनाथराव पेशवे झाले. त्यामुळे सरदारांमध्ये नाराजीचा सूर स्पष्ट दिसू लागला. पेशवा रघुनाथरावाने हैदर, निजाम आणि इंग्रज यांचा बंदोबस्त करण्यासाठी मोहिमा आखल्या, परंतु त्याला विरोध होऊ लागला आणि याचाच फायदा शत्रू पक्षांना झाला. बारभाईने १७७४  मध्ये रघुनाथरावांना पेशवे पदावरून दूर केल्याचा जाहीरनामा काढला व नारायणरावांची पत्नी गंगाबाई हिच्या पोटी जन्मास आलेल्या मुलाचे नाव सवाई माधवराव ठेवून त्यांच्या नावे बारभाईने कारभार सुरू केला. रघुनाथराव यामुळे सूडाने पेटला आणि तो इंग्रज, फ्रेंच, शिंदे, होळकर, हैदर यांच्याशी मैत्रीचा नवा करार करून पेशव्यांची वस्त्रे पुन्हा मिळविण्याच्या तयारीला लागला. शेवटी इंग्रजांच्या जाळ्यात रघुनाथराव अडकला. त्यांनी रघुनाथरावांना मराठा सरदारांच्या ताब्यात दिले. पेशवाईची वस्त्रे परिधान करण्यासाठी रक्ताची नाती विलग झाली व सोयीचे, स्वार्थाचे राजकारण सुरू झाले. याचा फायदा इतरांनी घेतला. त्यामुळे मराठी सत्तेचा ऱ्हास अधिकच जवळ आला. जानोजी भोसलेंनी स्वतःकडून पेशव्यांशी संघर्ष सुरू केला. इतर सरदारांचा कडवा विरोध, अंतर्गत मतभेद यामुळे पेशवाईचे वातावरण गढूळ बनले गेले. सवाई माधवराव तथा दुसरा माधवराव हा अल्पवयीन असल्याने त्याचे पालक म्हणून नाना फडणवीस यांनी राज्यकारभार चालवला. मराठी सरदारातील अंतर्गत कलहाला वैतागून सवाई माधवरावाने आत्महत्या केली. सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर पेशवा कोणाला करायचे हा प्रश्न पडला व मुत्सद्यांना पुन्हा राजकारण खेळावयास संधी सापडली. अखेरीस दुसरा बाजीरावास पेशवेपदाची वस्त्रे मिळाली. नाना फडणीसांच्या मृत्यूनंतर मराठी सरदारांना पेशव्यांच्या राज्यकारभारात हस्तक्षेप करण्यास रान मोकळे झाले. नाना फडणीसानंतर मराठी सत्तेचे

लगाम आपल्या हाती घेण्यासाठी यशवंतराव होळकरांनी पुण्यावर चाल केली. त्याच्या भीतीने दुसरा बाजीराव वसईला पळून गेला व तेथे त्यांनी इंग्रजांशी तह करून इंग्रजांचे मांडलीकत्व पत्कारले. अंतर्गत मतभेद बाजूला ठेवून नागपूरकर भोसले व ग्वाल्हेरचे शिंदे एकत्र येऊन त्यांनी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. परंतु त्यांना पराभव पत्करावा लागला. मराठयांचा पेशवाच दुबळा होता. मालकच कमजोर असेल तर राज्य कसे चालणार येथेच मराठी सत्तेचा ऱ्हास निश्चित झाला.

## ९.५ इंग्रज - मराठा युद्धे

थोरले माधवराव पेशवे यांच्या अकाली मृत्यूमुळे मराठयांमध्ये पेशवेपदावरून अंतर्गत संघर्ष सुरु झाला. रघुनाथरावाने पेशवे पदाच्या लालसेपोटी इंग्रजांशी संधान बांधले, पेशवेपद मिळण्यासाठी त्यांनी इंग्रजांची मदत घेतली तेव्हापासून मराठयांच्या राजकारणात इंग्रजांचा शिरकाव झाला होता. इंग्रजांना मराठी सत्ता कमकुवत करण्याची संधी थोरल्या माधराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर म्हणजे १७७२ मध्ये मिळाली. त्यातून इंग्रज व मराठे यांच्यामध्ये संघर्ष सुरू झाले. इंग्रज-मराठे यांच्यामध्ये तीन युद्धे झाली होती.

**प्रथम इंग्रज मराठा युद्ध (१७७५ -१७८२)**

थोरल्या माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर नारायणराव पेशव्यांना गादीवर बसवण्यात आल्यामुळे त्यांचे चुलते रघुनाथराव यांना पेशवेपदाने हुलकावणी दिली. त्या रागापायी रघुनाथरावाने नारायणरावांचा खून करविला होता. ज्यावेळी रघुनाथराव हे नारायणरावांचे खुणी आहेत हे स्पष्ट झाले, तेव्हा मराठा सत्तेतील बारभाईनी रघुनाथरावाला पकडण्याचे आदेश दिले. त्यामुळे रघुनाथरावाने थेट सुरतेला जाऊन इंग्रजांची मदत घेतली. रघुनाथराव इंग्रजांना जाऊन मिळाल्यामुळे त्यांच्यामध्ये सुरतेचा तह झाला. या तहान्वये इंग्रज रघुनाथरावास पेशवेपद मिळून देण्यास मदत करतील त्याच्या मोबदल्यात रघुनाथरावाने वसई व सालसेट नजीकची बेटे इंग्रजांना द्यावीत. तसेच सुरत व बडोद्याच्या कर वसुलीपैकी काही उत्पन्न इंग्रजांना मिळावे अशी तरतूद होती. हा तह झाल्यानंतर इंग्रज-मराठा समोरासमोर आले व पहिल्या इंग्रज-मराठे युद्धास सुरुवात झाली. या युद्धात मराठे व इंग्रज यांना कोणालाच निर्णायक विजय मिळाला नाही. कलकत्त्याच्या गव्हर्नरने रघुनाथरावांची घेतलेली बाजू व सुरतेचा तह अमान्य केला. शेवटी इंग्रज व मराठे यांच्यात वाटाघाटी होऊन १ मार्च १७७५ रोजी पुरंदर येथे तह झाला. तहानुसार दोन्ही पक्षांनी परस्पर विरोधी कारवाया थांबाव्यात, इंग्रजांनी रघुनाथरावास पेशवेपद मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू नयेत, रघुनाथरावांसाठी झालेल्या खर्चापोटी १२ लाख रुपये इंग्रजांना बारभाई सरदारांनी द्यावेत, रघुनाथरावास वार्षिक तीन लक्ष रुपये पेन्शन देऊन त्याने राजकारणात भाग न घेता गंगातीरी विश्रांती घ्यावी आणि यापूर्वीचा सुरतेचा तह रद्द समजण्यात यावा, तसेच उत्तर कोकणातील साष्टी, ठाणे व गुजरातमधील मराठयांचा प्रदेश इंग्रजांकडे राहावा असे ठरले. परंतु मुंबईच्या गव्हर्नरला हा तह मान्य नव्हता, त्यामुळे १७७८ मध्ये इंग्रजानी पुण्यावर हल्ला केला. इ.स. १७८९ मध्ये इंग्रजांनी मराठयांविरुद्ध अधिकृत युद्ध पुकारले. ज्यामध्ये इंग्रज फौजेचा पराभव झाला आणि त्यांच्यात वडगावचा तह झाला. वडगावच्या तहानुसार इंग्रजांनी रघुनाथरावाला मराठयांच्या स्वाधीन करावे तसेच गुजरात व मुंबई लगतचा मराठयांचा जिंकलेला प्रदेश मराठयांना परत करावा, रघुनाथरावांशी केलेले तह, करार रद्द

करावेत आणि तहाची अंमलबजावणी व्हावी म्हणून दोन इंग्रज अधिकारी दरबारात कायमस्वरूपी ठेवावेत, हा तह इंग्रजांना अपमानास्पद वाटल्यामुळे इंग्रजांचा गव्हर्नर जनरलने तो स्वीकारण्यास नकार दिला, तेव्हा इंग्रजांचा निर्णायक पराभव करण्यासाठी नाना फडणीसाने मराठे, नागपूरकर भोसले, मैसूरचा हैदर व हैदराबादचा निजाम या चौघांचा इंग्रजांच्याविरुद्ध चतु:संग उभा केला. पण हा चतु:संग इंग्रजांनी फोडला. तरी मराठयांनी गुजरातमध्ये व हैदरने कर्नाटकात इंग्रजांना सळो की पळो करून सोडले, तेव्हा इंग्रज पुन्हा शरण आले आणि त्यांच्यात सालबाईचा तह झाला. १७८२ मध्ये सालबाईच्या तहानुसार इंग्रजांनी रघुनाथरावास कोणत्याही प्रकारची मदत देऊ नये, १७७६ नंतर जिंकलेला मराठयांचा प्रदेश मराठयांना द्यावा, बडोद्याच्या फत्तेसिंग गायकवाडचे स्वातंत्र्य इंग्रजांनी मान्य करावे, सवाई माधवरावाला पेशवा म्हणून इंग्रजांनी मान्यता द्यावी. हा तह दोघांनाही फायदेशीर ठरला आणि काही काळ मराठयांचा प्रभाव इंग्रजांवर पडला, दक्षिणेतील मराठयांची प्रबळ सत्ता म्हणून मान्यता मिळाली. वडगावची लढाई मराठे व इंग्रज यांच्यामध्ये पुण्यापासून साधारणपणे ४० किलोमीटर दूर असलेल्या वडगाव या ठिकाणी झाली. याला पहिले मराठा-इंग्रज युद्ध म्हणून सुद्धा ओळखले जाते. या युद्धामध्ये मराठा सैन्याचे नेतृत्व महादजी शिंदे यांनी केले होते, होळकर हे सुद्धा मराठा सैन्यासोबतच राहिले, त्यामुळे रघुनाथरावांचे बेत फसले. १६ जानेवारी १७८९ ला नाना फडणवीस व महादजी शिंदे यांनी इंग्रजांची संपूर्ण शरणागती मान्य करत इंग्रजांवर जो तह लादला तो सालबाईचा तह म्हणून ओळखला जातो. या तहावर १७ मे १७८२ रोजी स्वाक्षरी झाली होती. पहिल्या इंग्रज-मराठे युद्धात मराठयांच्या ऐक्यामुळे इंग्रजांना त्यांच्यासमोर झुकावे लागले होते.

### दुसरे इंग्रज-मराठे युद्ध (१८०३):

सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर रघुनाथरावांचा मुलगा दुसऱ्या बाजीरावाला पेशवेपद मिळाले. रघुनाथावांच्या ब्रिटीश धार्जिण्या धोरणामुळे इतर मराठे सरदार आणि पेशवे यांच्यात संघर्ष निर्माण झाला. मराठयांच्या अंतर्गत संघर्षाचा फायदा इंग्रजांनी घेतला. सालबाईच्या तहानंतर काही वर्षे मराठे व इंग्रज यांच्यात सख्खे होते. दुसऱ्या बाजीरावाने पेशवे पद मिळविण्यासाठी दौलतराव शिंदे यांचे साह्य घेतले. पेशवे पदासाठी दुसरा बाजीराव व अमृतराव यांच्यात संघर्ष होऊन पुण्यात लुटालूट, मारामाऱ्या सुरू झाल्या होत्या. इ.स. १८०० मध्ये नाना फडणीस मरण पावल्यानंतर इंग्रजांना मराठी राज्यात ढवळाढवळ करण्यास चांगली संधी मिळाली होती. रघुनाथरावाच्या विरुद्ध असणारे शिंदे, होळकर इत्यादी सरदारांचा सूड उगवण्याची सुरुवात दुसऱ्या बाजीरावाने केली. यातूनच शिंदे व होळकर यांच्यात वितुष्ट आले. यशवंतराव होळकर प्रचंड फौजेसह दक्षिणेत येत आहे हे समाजतास दुसरा बाजीराव घाबरला व वसई येथे इंग्रजांच्या आश्रयाला गेला. इंग्रजांनी या संधीचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी दुसऱ्या बाजीरावासोबत ३१ डिसेंबर १८०२ मध्ये वसईचा केला. या तहानुसार इंग्रजांचे शत्रू आणि मित्र तेच पेशव्यांचे शत्रू व मित्र असे दुसऱ्या बाजीरावास मानावे लागले आणि त्याच्या बदल्यात इंग्रजांनी पेशव्यांच्या संरक्षणाची सर्वतोपरी जबाबदारी घ्यावी तसेच इंग्रजांची तैनाती फौज, युद्धसामग्री, तोफा वगैरे ठेवण्याची परवानगी मिळावी, फ्रेंच व कर्नाटकातील हैदर हे इंग्रजांचे शत्रू असून त्यांना पेशव्यांनी आश्रय देऊ नये, पेशवा दुसऱ्या बाजीरावने सुरत हे शहर इंग्रजांना व्यापारासाठी द्यावे त्याचप्रमाणे तैनाती फौजेच्या खर्चासाठी २५ लाखांचा प्रदेश पेशव्यांनी कायमचा

इंग्रजांना द्यावा. या तहानुसार दुसऱ्या बाजीरावाने आपले पेशवेपद सुरक्षित ठेवण्याकरिता तैनाती फौज पदरी ठेवली व इंग्रजांचे मांडलिकत्व स्वीकारले. त्यामुळे तो एकदम चैनी, विलासी जीवन जगू लागला. वसईचा तह मराठयांची सत्ता संपुष्टात येण्याचा महत्त्वाचा घटक होता असे मानले जाते. इंग्रजांनी दुर्बल पेशव्यांना हाताखाली धरून मराठयांची सत्ता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या बाजीरावाने ब्रिटिशांशी केलेला वसईचा तह शिंदे, भोसले या मराठा सरदारांना मान्य नव्हता या तहाच्यावेळी पुण्यावर यशवंतराव होळकरांचा ताबा होता. त्यामुळे बाजीरावाने ब्रिटिशांच्या आश्रयाला जाऊन त्यांच्याशी वसईचा तह केला. यशवंतराव होळकरांजवळ ब्रिटिशांशी एक हाती लढण्याचे सामर्थ्य नव्हते त्यामुळे तो पुण्यातून निघून गेला व दुसऱ्या बाजीरावाचा पुण्यातील पेशवेपदाचा मार्ग मोकळा झाला. दुसऱ्या बाजीरावांना इंग्रजांच्या मदतीने पेशवेपद मिळाले, परंतु त्यासाठी केलेल्या वसईच्या तहामुळे मराठयांच्या अंतर्गत राजकारणात इंग्रजांचा हस्तक्षेप वाढत गेला व मराठी सत्ता कमकुवत होण्यास सुरुवात झाली.

दुसऱ्या बाजीरावाच्या इंग्रजांशी संधान बांधण्याच्या निर्णयामुळे इतर मराठा सरदारांमध्ये संताप निर्माण झाला व त्यांनी ब्रिटीशांविरुद्ध युद्ध पुकारले. या कामी त्यांनी फ्रेंचांची लष्करी मदत घेतली होती. अश्याप्रकारे बाजीराव-इंग्रज सरकार व ईस्ट इंडिया कंपनी विरुद्ध शिंदे व इतर काही मराठा संस्थानिक असे दुसरे इंग्रज मराठा युद्ध सुरू झाले. या युद्धात मराठयांचे नेतृत्व शिंद्याकडे होते तर इंग्रजाचे नेतृत्व आर्थर वेलस्ली व जनरल लेक यांनी केले.

या युद्धात ब्रिटीशांनी प्रामुख्याने दोन आघाडया उघडल्या होत्या. त्यापैकी उत्तरेकडील आघाडीचे नेतृत्व लेक यांनी केले तर दक्षिणेकडील आघाडी वेलेस्लीने सांभाळली. इंग्रजांनी मराठयांना डिवचण्यासाठी सरळसरळ संस्थानिकांच्या शहरांवर हल्ल्याची योजना बनवली. शिंद्यानीही शत्रुला लवकर संपवावे या दृष्टीने आपली सेना दक्षिणेला भोसल्यांच्या मदतीला पाठवली. महाराष्ट्रात जालना जिल्ह्यात आसई, अकोला जिल्ह्यात आडगाव तसेच चिखलदऱ्याजवळील गविलगड येथे वेलेस्लीने मराठयांचा निर्णायक पराभव केला. उत्तरेकडे जनरल लेक यांनी दिल्ली काबीज केली.

यशवंतराव होळकरांनी मराठयांची चाललेली ससेहोलपट पाहून युद्धात उतरण्याचा निर्णय घेतला. लष्करी दरारा व मुत्सद्देगिरी यावर इंग्रजांना खालील तह करण्यास भाग पाडले.

१. १८०३ मध्ये देवगावचा तह इंग्रज व भोसले यांच्यामध्ये झाला.

२. १८०३ मध्ये सुर्जी–अंजनगावचा तह इंग्रज-शिंदे यांच्यामध्ये झाला.

३. १८०५ मध्ये राजघाटचा तह इंग्रज-होळकर यांच्यामध्ये झाला होता.

या तहान्वये मराठा संस्थानिकांचे सार्वभौमत्व कायम राहिले, परंतु मराठयांना गुजरात व ओरिसाचा भूभाग गमवावा लागला होता.

### तिसरे इंग्रज-मराठे युद्ध (१८१७-१८)

इंग्रज व मराठे यांच्यामध्ये एकूण तीन युद्धे झाली होती. त्यापैकी तिसऱ्या इंग्रज-मराठे युद्धात मराठयांचा निर्णायक पराभव झाला होता व मराठा साम्राज्याचा ऱ्हास होऊन जवळपास संपूर्ण भारतात इंग्रजांची सत्ता स्थापन झाली होती. इंग्रजांनी नेपाळ युद्धाच्यानंतर दक्षिणेकडे पेंढारीशी संघर्ष सुरु केला होता. पेंढारी हे मराठा राज्यामधील असल्यामुळे अप्रत्यक्षरीत्या हे मराठा सत्तेला आव्हान होते. इंग्रजांनी प्रबळ मराठा संस्थानिक भोसले, शिंदे व दुसऱ्या बाजीराव पेशव्यांवर अपमानकारक तह लादले होते. त्यामुळे बाजीरावाने अखेर इंग्रजांशी अंतिम युद्ध करण्याचा निर्णय घेतला. बाजीरावांच्या या निर्णयाला इतर मराठा संस्थानिकांनीसुद्धा साथ दिली होती. त्यामध्ये अप्पासाहेब भोसले व यशवंतराव होळकर यांचा समावेश होता. परंतु इंग्रजांनी या तीनही शक्तींना एकत्रित येऊ न देता त्यांना इंग्रजांनी वेगवेगळे पराभूत केले.

त्यापैकी सिताबर्डीच्या लढाईत भोसल्यांचा पराभव केला. महित्पुरच्या लढाईत होळकरांचा तर पुण्यातील खडकी, कोरेगाव–भीमा व आष्टा येथील लढाईत पेशव्यांचा पराभव केला. इंग्रजांच्या आधुनिक शस्त्रासमोर व कवायती फौजेसमोर मराठयांचा टिकाव लागला नाही. पेशव्यांनी व इतर मराठा सरदारांनी शरणागती पत्करली. शेवटी कोरेगावच्या निर्णायक लढाईत दुसऱ्या बाजीरावाचा पराभव होऊन त्यांना पेशवेपद सोडावे लागले व पुण्याच्या शनिवार वाडयावर इंग्रजांनी त्यांचा युनियन जॅक फडकवला. अश्या प्रकारे १८१८ मध्ये मराठा सत्तेचा अस्त होऊन ब्रिटीश अंमल सुरु झाला.

## ९.६ मराठा सत्तेच्या ऱ्हासाची कारणे

छत्रपती शिवाजी महाराजांनी शून्यातून स्वराज्याची निर्मिती केली होती, परंतु मराठयांच्या अंतर्गत संघर्ष आणि स्वार्थी धोरणापायी मराठा सत्तेचा ऱ्हास झाला.

दुसऱ्या बाजीरावाच्या सत्तेच्या लालसेपोटी घेतलेल्या चुकीच्या निर्णयामुळे मराठयांमध्ये अंतर्गत संघर्ष सुरु झाला. याचा फायदा इंग्रजांनी घेतला व इ.स. १८१८ मध्ये दुसरा बाजीराव पेशव्यांचा पराभव करून इंग्रजी सत्ता स्थापन केली. असे असले तरी मराठा सत्तेच्या ऱ्हासास केवळ एक नव्हे तर अनेक कारणे जबाबदार आहेत. त्यातील प्रमुख कारणे पुढील प्रमाणे आहेत.

**१. नामधारी मध्यवर्ती सत्ता:** छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या काळात मध्यवर्ती सत्ता प्रबळ होती. छत्रपतीचे कल्याणकारी राज्य आणि संपूर्ण प्रशासनावर अंकुश असल्यामुळे व सर्वांना त्यांच्या गुणवत्तेप्रमाणे कामाचे वाटप झाल्यामुळे छत्रपतीचा मावळा स्वराज्यासाठी प्राणपणाने लढत होता. परंतु छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत छत्रपती पद हे नामधारी झाले आणि वास्तविक सत्ता पेशव्यांच्या हाती गेली. काही पराक्रमी पेशवे सोडले तर इतरांना अंतर्गत गटबाजी आणि संघर्षाचा सामना करावा लागला. परिणामी शत्रू पक्षाने त्याचा फायदा घेऊन मराठयांच्या अंतर्गत राजकारणात ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली व हतबल झालेल्या मध्यवर्ती सत्तेला बाह्यशक्तीची मदत घ्यावी लागली पर्यायाने मध्यवर्ती सत्ता कमजोर झाली.

**२. चौथाई व सरदेशमुखीच्या सनदांनी स्वार्थाची भावना वाढीस लागली:** पेशवा बाळाजी विश्वनाथाने सैय्यद बंधूच्या मदतीने मुघलांकडून चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा प्राप्त केल्या, परंतु त्यामुळे मराठा सरदारांमध्ये स्वार्थाची भावना वाढीस लागली. स्थानिक मराठा सरदार वरचढ झाले व त्यांनी मध्यवर्ती सत्तेला न जुमानता आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले.

**३. कर्तबगार राज्यकर्त्यांची कमतरता:** छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजा, महाराणी ताराबाई, पेशवा पहिला बाजीराव, पेशवा माधवराव यांच्यासारखे मोजकेच नेतृत्व पराक्रमी निघाले, परंतु इतर नेतृत्वानी परावलंबित्व स्वीकाल्यामुळे शत्रूंनी त्याचा फायदा घेतला.

**४. स्वराज्याविषयी अभिमान राहिला नाही:** मराठयांच्या राज्यात पराक्रमी छत्रपती, पराक्रमी पेशवा पहिला बाजीराव, पेशवा माधवराव यांच्या सारखा स्वराज्याभिमान व दूरदृष्टी काही अपवादात्मक मराठा सरदार सोडले तर इतरांकडे नव्हती त्यांना स्वराज्याच्या हितापेक्षा स्वहित, धनदौलत, पद प्रतिष्ठा जास्त महत्वाच्या वाटल्यामुळे मराठा राज्याचे अतोनात नुकसान झाले व त्याचा परिणाम मराठा सत्तेच्या ऱ्हासात झाला.

**५. मराठयांच्या राजकारणातील चुका:** माधवरावांच्या अकाली मृत्यूनंतर प्रत्येकजण स्वार्थासाठी विघटनात्मक चुका करत गेले. मराठयांनी मुघल बादशाच्या सुरक्षेची फुकटची जबाबदारी घेऊन आत्मघात केला. इतर समविचारी हिंदू शक्तींशी मैत्रीपूर्ण संबंध व जवळीकता निर्माण करण्याऐवजी त्यांचा विरोध ओढून घेतल्यामुळे मराठयांना उत्तरेत जबरदस्त किंमत मोजावी लागली. तसेच मराठयांनी दिल्लीचे राजकारण केले, परंतु ते दिल्लीच्या सिंहासनावर बसू शकले नाही हे त्यांचे दुर्दैव होते.

**६. अंतर्गत संघर्षातून मराठी सत्तेला उतरती कळा लागली:** स्वराज्याच्या हितापेक्षा स्वहितास महत्व देणाऱ्या मराठा सरदारांच्या धोरणांमुळे व सत्तेसाठी स्पर्धा केल्यामुळे परकीय शत्रूला स्वराज्यात स्व:ताहून आमंत्रण दिल्यामुळे त्यांचा हस्तक्षेप वाढत गेला परिणामी मराठी सत्ता अंतर्गत गटबाजीने पोखरली गेली.

**७. इंग्रजांची मुत्सद्देगिरी, श्रेष्ठ युद्धनीती व शिस्तबद्ध सैन्य रचना:** इंग्रजांच्या भारतातील सत्तास्थापनेच्या कार्यात त्यांच्या युद्ध व पराक्रमापेक्षा त्यांची मुत्सद्देगिरी जास्त महत्वाची होती. त्यांच्या 'फोडा आणि राज्य करा' या नीतीमुळे त्यांनी मराठयांच्या अंतर्गत राजकारणात शिरकाव करून त्यांच्या मध्यवर्ती सत्तेला कमकुवत केले परिणामी मराठा सत्तेचा ऱ्हास झाला.

## ९.७ सारांश

छत्रपती शिवाजी महाराजांनी एत्तदेशीय व परकीय शत्रूंशी सामना करून महाराष्ट्रातील रयतेच्या संरक्षणासाठी व त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार, जुलूम, जबरदस्ती, महिलांवरील अन्याय, त्यांचा होणारा छळ हे सर्व थांबविण्यासाठी व रयतेच्या कल्याणासाठी स्वतंत्र राज्याची गरज ओळखून कठीण परिस्थितीत स्वराज्याची उभारणी केली होती. १७ व्या शतकात महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक परिस्थितीवर

परकीय आक्रमण, अंतर्गत शत्रूंच्या उपद्रवांमुळे येथील जनता हैराण झाली होती. या परिस्थितीतून सामान्य रयतेची सुटका करून त्यांना मान, सन्मानाने आणि स्वतंत्र जीवन जगण्यासाठी व गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या आई-वडिलांच्या प्रेरणेने स्वराज्याची स्थापना केली होती.

चोहोबाजूंनी शत्रूंचा विळखा होता, बलाढय मुघली सत्ता हिंदुस्थानात असूनसुद्धा एका स्वतंत्र राज्याची स्थापना करणे हे सर्वसामान्यांच्या कल्पनेच्या पलीकडचे होते. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वपराक्रमाने व विश्वासू सरदार आणि मावळ्यांच्या सहकार्याने त्याचे वास्तवात रुपांतर केले होते.

या स्वराज्याला नवी उभारी देऊन त्याचे संरक्षण व विस्तार करण्याची किमया छत्रपती संभाजी राजे व पेशवा पहिला बाजीराव यांनी आपल्या असामान्य कर्तृत्वाने केले होते. परंतु उत्तर पेशवाईमध्ये स्वार्थीवृत्तीच्या राजकारणामुळे व अंतर्गत संघर्षामुळे इंग्रजांनी मराठयांच्या राजकारणात हस्तक्षेप करून ते गिळंकृत केले व इ.स. १८१८ मध्ये मराठी सत्तेचा ऱ्हास घडून आणला. त्याला जबाबदार असलेल्या घटकांची सविस्तर माहिती या घटकामध्ये अभ्यासली आहे.

## ९.८ प्रश्न

१. पानिपतच्या तिसऱ्या युद्धानंतर मराठी सत्तेला उतरती कळा लागली होती या विधानाचे विश्लेषण करा.

२. पेशवेकाळातील इंग्रज-मराठा संबंधावर सविस्तर माहिती लिहा.

३. पेशवा माधवरावांच्या अकाली निधनाने मराठा सत्तेचे मोठे नुकसान झाले होते या विधानाशी आपण कितपत सहमत आहात? स्पष्ट करा.

४. मराठा सत्तेच्या ऱ्हासाची कारणमीमांसा करा.

## ९.९. संदर्भ

१. कोंडेकर ए.वाय., (२००४), मराठयांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

२. कुलकर्णी अ.रा., खरे, ग.ह., (संपा.) (१९८४), मराठयांचा इतिहास, खंड तिसरा, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

३. भामरे जितेंद्र, मराठयांचा इतिहास – शेठ पब्लिकेशन, मुंबई

❖❖❖❖

# १०

# पेशवेकालीन प्रशासन व्यवस्था

**घटक रचना :**

१०.० उद्दिष्टये

१०.१ प्रस्तावना

१०.२ मुलकी प्रशासन

१०.३ महसूली व्यवस्था

१०.४ न्यायदान पद्धती

१०.५ लष्करी व्यवस्था

१०.६ सारांश

१०.७ प्रश्न

१०.८ संदर्भ

## १०.० उद्दिष्टये

१. पेशवेकालीन मुलकी प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करणे.

२. पेशवेकालीन महसूल प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करणे.

३. पेशवेकालीन लष्करी व्यवस्था अभ्यासणे.

## १०.१ प्रस्तावना

छत्रपती शिवाजी राजांनी कालानुरूप जी राज्यव्यवस्था निर्माण केली होती. त्यात अनेक बदल पेशव्यांनी केले. पेशवेकाळात साताऱ्याच्या छत्रपतीचे महत्त्व हळूहळू कमी होत गेले व पेशव्यांच्या हातात सर्व सत्ता गेली. वास्तविक छ. शिवाजी राजांच्या काळात पेशवे हे पद अष्टप्रधानांपैकी एक होते. परंतु बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीपासून पेशवेपद हळूहळू सत्तेचे केंद्रच बनले. मराठयांच्या स्वराज्याचे पेशवाईत साम्राज्यात रूपांतर झाले. राज्याचे सर्व सुत्रे पेशव्यांच्या हाती गेली. तरीही छत्रपतींना सार्वजनिक समारंभ व दरबारांमध्ये अतिशय मान होता. पेशवेकालीन राज्यव्यवस्था ही प्राचीन भारतातील राजकीय तत्वे, शिवकालीन प्रशासन व्यवस्थेतील तत्वे व वेळच्या वेळी पेशव्यांनी बदललेल्या तत्वांवर अवलंबून होती.

## १०.२ मुलकी प्रशासन व्यवस्था

पेशवेकालीन प्रशासनव्यवस्थेत मराठी राज्याचा प्रमुख छत्रपती होता. केंद्रशासन, प्रांतीय शासन व ग्रामप्रशासन हे मुलकी प्रशासनाचे आधारस्तंभ होते.

**१०.२.१ छत्रपती -** पेशवे काळातही छत्रपती पदाला अगदी आदराचे व मानाचे स्थान होते. घटनात्मक प्रमुख हा छत्रपतीच होता. छत्रपती शाहूराजांनीच बाळाजी विश्वनाथाला पेशवेपद बहाल केले. छ. शाहूराजांच्याच कारकीर्दीत मराठा राज्याचा विस्तार होत गेला. छ. शाहूराजांच्या निधनानंतर मात्र त्या पदावर योग्य व्यक्ती न आल्याने पूर्वीच्या छत्रपतीचा धाक व प्रतिष्ठा कायम राहिली नाही. पेशव्यांनी मात्र छत्रपतीचा सन्मान राखण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला.

**१०.२.२ पेशवा -** मराठयांच्या राज्यकारभारात पेशवापद हे अत्यंत महत्त्वाचे व प्रतिष्ठेचे समजले जाई. किंबहुना मराठा राज्याचा कारभार खऱ्या अर्थाने पेशवाच पहात असे. अंगी कर्तबगारी असल्याशिवाय या पदावर टिकून राहणे अत्यंत कठीण होते. शिवकाळात पेशवे पद वंशपरंपरागत नव्हते. कर्तबगार व्यक्तीचीच या पदावर नेमणूक होत असे. बाळाजी विश्वनाथ हा भट घराण्यातील पहिला पेशवा. परंतु पेशवे पदावरील सातवा पेशवा होता. भट घराण्यातील पेशवे इतके कर्तबगार निपजले की शेवटी त्यांनी छत्रपतीलाही निष्प्रभ केले. सर्व पेशव्यांमध्ये पहिल्या माधवरावाला राज्यकारभारासंबंधी विशेष दृष्टी होती व त्याच्याच काळात मराठयांना योग्य न्याय देणारा राज्यकारभार प्रस्थापित करता आला. भट घराण्यापासून पेशवेपद वंशपरंपरागत बनले.

**१०.२.३ हुजुर दफ्तर -** मराठा राज्यकारभाराच्या प्रमुख केंद्राला हुजूर दफ्तर किंवा सचिवालय असे म्हणत. दफ्तराचा कारभार पुण्याला चालत असे. दफ्तरात २०० कारकून काम करीत असत. हे कारकून ज्या ठिकाणी काम करत असत त्याला 'फड' असे म्हणत. राज्यकारभाराची सर्व कागदपत्रे या 'फड' मध्ये जपून ठेवत असत. यामध्ये महसूलविषयीची कागदपत्रे, अबकारी कागदपत्रे तसेच सर्व प्रांतांचा संभाव्य जमाखर्चाचा 'तर्जमा' याच ठिकाणी असे. हुजूर दफ्तराच्या कार्यपद्धतीत नाना फडणीसाने अनेक सुधारणा केल्या. सोयीसाठी या दफ्तराचे अनेक भाग करण्यात आले त्यापैकी चालते दफ्तर व बेरजी दफ्तर ही दोन महत्त्वाची दफ्तरे होती.

**अ) चालते दफ्तर -** हे फडणीसाकडे असे. या दफ्तरात बेहडा, फड, सरंजाम असे विभाग असत. फडामध्ये सर्वप्रकारच्या रोजकीर्दि ठेवल्या जात असत. बेहडा विभागात प्रत्येक खेडे व सुभा यांचे जमाखार्चाचे अंदाज तयार केले जात असत. सरंजामी विभागामध्ये सरंजामदाराचे सर्व हिशोब ठेवले जात.

**ब) बेरजी दफ्तर -** हुजूर दफ्ततरातील हाही महत्त्वाचा उपविभाग होता. ते कायमस्वरूपी पुण्यालाच होते. यामध्ये सर्व जमाखर्च व शिल्लक दाखविली जात असे. हिशोबाच्या खतावण्या या दफ्तरातच तयार करत असत. त्यामुळे अधिकाऱ्याना प्रांतीय व ग्रामप्रशासनात अडचणी येत नसत.

**१०.२.४ प्रांतीय प्रशासन -** राज्याची अनेक प्रांतामध्ये विभागणी करण्यात आली होती. प्रांतालाच सरकार, सुभा वा प्रांत असे म्हणत. मामलेदार किंवा सुभेदार हा प्रांताचा जबाबदार अधिकारी असे तर कमाविसदार हा परगण्याचा प्रमुख असे. परगण्याच्या उपविभागास महाल किंवा तर्फ असे म्हणत. त्यावर हवालदार, तर्फदार किंवा महलकरी नावाचे अधिकारी असत.

**अ) सरसुभेदार -** पेशवेकाळात प्रांताचा सर्वोच्च अधिकारी सरसुभेदार हा होता. राजधानीपासून लांब असलेल्या प्रांताचा राज्यकारभार पहाण्यासाठी पेशव्याकडून सरसुभेदाराची नेमणूक होत असे. सरसुभेदाराच्या कामाचे स्वरूप निरनिराळ्या प्रांतात भिन्न - भिन्न होते. कर्नाटकातील सुभेदारास महसूल व्यवस्थेकडे लक्ष द्यावे लागत असे. तसेच मामलेदारांच्याही नेमणूका करण्याचा अधिकार त्याला असे. परंतु खानदेशातील सरसुभेदाराला मामलेदाराच्या कामावर देखरेख ठेवून त्या प्रांताचा सर्व हिशोब केंद्राला सादर करावा लगात असे.

**ब) सुभेदार -** कार्यक्षम व लायक व्यक्तीचीच सुभेदारपदी नेमणूक होत असे. नेमणूकाच्या वेळी पेशवे सुभेदारांना जबाबदारी व कर्तव्यविषयीच्या सुचना देत असत. प्रांतात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे, सार्वजनिक पैशाचा अपव्यय टाळणे, प्रांताचा आर्थिक व न्यायालयीन व्यवहार बघणे इ. कामे सुभेदाराला करावी लागत.

**क) मामलतदार -** हा परगण्याचा अधिकारी असे. एलफिन्स्टच्या मते, "मामलतदार हे प्रांतातील मोठया विभागाचे तर कमावीसदार हे लहान विभागाचे मुख्य अधिकारी असत. ते पेशव्यांचे परगण्यातील प्रतिनिधी होते." मामलतदाराची नेमणूक ही कायमची नसे. तो जोपर्यंत प्रामाणिकपणे व जबाबदारीने काम करी तोपर्यंत तो आपल्या पदावर राहू शकत असे. अप्रामाणिक व बेजबाबदार व्यक्तींना काढून त्याजागी दुसऱ्या योग्य व्यक्तीची नेमणूक होत असे. प्रांतातील शेती व्यवसायाला प्रोत्साहन देणे, शेतकऱ्यांना कर्जाची व्यवस्था करणे, जमिन महसूल जमा करणे, दिवाणी दावे निकालात काढणे, किल्ल्यांच्या व्यवस्थेवर देखरेख ठेवणे, परगण्यातील आरमारावर देखरेख ठेवणे, प्रांतात शांतता व सुव्यवस्था राखणे इत्यादी कामे मामलतदाराला करावी लागत असत.

**ड) कमाविसदार -** हा देखील परगण्याचा अधिकारी असे. कमाविसदाराला त्याच्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशाच्या उत्पन्नाच्या ४% मेहनताना मिळत असे. जमिन महसूल गोळा करणे, महसूली उत्पन्न वाढविणे, रयतेचे कल्याण साधणे, परगण्याच्या प्रशासनावर देखरेख ठेवणे इ. कामे तो करत असे.

**इ) दरखदार -** मामलतदार व कमाविसदारांच्या कामावर अप्रत्यक्ष देखरेख दरखदार ठेवत असत. हे अधिकारी पेशव्यांनी नेमलेले असत. प्रांतीय प्रशासनाच्या सर्व विभागावर यांची देखरेख असे. दरखदारांमध्ये दिवाण, मुजूमदार, फडणीस, दफ्तरदार, पोतनिस, पोतदार, जमेनीस व अमीन या आठ अधिकाऱ्यांचा समावेश होता हे अधिकारी प्रत्यक्षरीत्या मध्यवर्ती शासनाला जबाबदार असत.

**ई) हवालदार -** परगण्याच्या उपविभागास महाल किंवा तर्फ असे म्हणत. हवालदार हा महालाचा प्रमुख असे. मुजूमदार व फडणीस हे दोन अधिकारी त्याच्या मदतीला असत.

**१०.२.५ ग्रामीण प्रशासन -** ग्रामीण प्रशासनात पाटील, कुलकर्णी, चौगुला, महाल, पोतदार नावाचे अधिकारी काम करीत असत. पेशव्यांच्या राज्यकारभाराचा प्रमुख कणा खेडेगाव होते. खेडयात स्वयंपूर्ण समाज होता. खेडयाला कसबा, मौजे, मजरे असेही म्हणत. पाटलाच्या मदतीला कुलकर्णी असत. कुलकर्णी पदही पाटलाइतकेच महत्त्वाचे असे. गावच्या गरजा भागविण्यासाठी बारा जणांचे एक मंडळ असे त्याला 'बारा बलूत' असे म्हणत. गावातील सर्व जातींचे प्रतिनीधी या मंडळात असत. सुतार, लोहार, चांभार, महार, कुंभार, न्हावी, परीट, मांग, भट, गुरव व मुलाणी यांना बलुते म्हणत.

महार, रामोशी, तराळ हे पाटील व कुलकर्णी यांना सरकारी कामात मदत करीत व रयतेच्याही उपयोगी पडत असत. थोडक्यात पाटील हा गावचा राजाच असे. जमिन महसूल वसूल करणे, सारा ठरविणे, तंटे मिटविणे इ. कामे त्याला करावी लागत. कुलकर्णी गावचे दप्तर सांभाळीत असत. त्यात जमिनीचे मोजमाप व वर्णन यांचा समावेश असे.

महाराकडे शेताच्या हद्दीवर व पिकांवर लक्ष ठेवण्याचे काम असे. चौगुला, पाटील व कुलकर्णीला मदत करीत असे. पोतदार नाण्यांचा दर्जा, वजन तपासत असे. अशा प्रकारे ग्रामप्रशासनाला सरकार शक्यतोवर कोणताही धक्का लावीत नसे. खेडयाला अंतर्गत स्वायत्तता देण्यात आली होती.

## १०.३ महसूल व्यवस्था

सुप्रसिद्ध इतिहासकार डॉ. सेन यांनी मराठयांच्या महसूल व्यवस्थेची स्तुती केलेली दिसते. मराठी राज्यकर्ते रयतेकडून कर वसूल करीत, पण प्रजेचे कल्याणही साधले पाहिजे, ही पण त्यांची तळमळ होती. कर देण्याच्या मोबदल्यात प्रजेचा तितकाच फायदा झाला पाहिजे, असा पेशव्यांचा दृष्टिकोन होता.

**१०.३.१ जमीन महसूल -** वा. कृ. भावे म्हणतात, 'पेशवाईत सरकारी वसूलाच्या पुष्कळ बाबी असल्या तरी त्यात सर्वात महत्त्वाची जमीन महसूल बाब होती.' पेशवेकाळात जमीन महसूल ही उत्पन्नाची प्रमुख बाब असल्याने पेशव्यांनी शेती व्यवसायाला प्रोत्साहन देऊन जमीन महसूल वाढविण्याचा प्रयत्न केला. महसूल निश्चिती करतांना प्रत्यक्ष पीक पहाणी करूनच सारा आकारणी करत. जमिनीची वर्गवारी करून सरस, मध्यम व कनिष्ठ असे तीन मुख्य भाग पाडले जात असत. शिवाय काळी जमीन, डोंगराळ जमीन, बागाईत, जिराईत, पाटस्थळ, मोटस्थळ, आमराई इ. प्रकारही जमिनीचे पाडलेले होते व त्यानुसार धान्याच्या व रोख रकमेच्या स्वरूपात महसूल वसूल केला जात असे. काळ्या कसदार जमिनीवर जास्त तर डोंगराळ जमिनीवर कमी सारा आकारला जात असे. शेतकऱ्यांवर महसूल वसूलीसाठी अन्याय होऊ नये यासाठी पेशवे नेहमी जागृक असत.

**अ) पाटस्थळ बागायती जमिनीचे दर -** प्रत्येक बिघ्याला पहिल्या वर्षी ५ रू., दुसऱ्या वर्षी ६, तिसऱ्या वर्षी ७ रु., चौथ्या वर्षी ८ रू. तर पाचव्या वर्षी १० रू. महसूल वसूल केला जाई. पिकांच्या जातीप्रमाणेच महसूल आकारणी होत असे.

**ब) मोटस्थळ बागाईत जमिनीचे दर -** प्रत्येक बिघ्याला पहिल्या वर्षी १रू. दुसऱ्या वर्षी २ रू., तिसऱ्या वर्षी ३ रू., चौथ्या वर्षी ४ रू. तर पाचव्या वर्षी ५ रू. महसूल जमा केला जाई. महसूल आकारणीच्या पद्धतीला कौल असे म्हणत.

पेशवे काळात प्रत्येक तालुक्यातून दरवर्षी ३ ते ४ लाख रूपये जमीन महसूल सरकारला मिळत असावा असे 'पेशवा रोजनिशीतील' पत्रावरून दिसते. मक्ता पद्धतीनुसार मामलेदार किंवा कमाविसदार काही रक्कम सरकारात भरीत व कुळाशी परभारे करार करून सारा वसुली करत. जो जास्त बोली बोलत असे. त्याला सारा वसूलीचे काम दिले जाई. कोकणात विशेषतः रत्नागिरी जिल्ह्यातील गावांची वसूली पेशवाईत मक्त्याने केली जाई.

**१०.३.२ चौथाई व सरदेशमुखी -** शिवकाळापेक्षा पेशवेकाळात चौथाई व सरदेशमुखीच्या एकूण स्वरूपामध्ये बदल झालेला दिसतो. शिवकाळात हा हक्क परंपरेने वसूल केला जात असे. परंतु पेशवे काळात १७१९ मध्ये मुघलबादशहा व मराठे यांच्यातील तहानुसार या हक्काला कायदेशीर स्वरूप प्रप्त झाले. या तहानुसार दक्षिणेकडील सहा प्रांतांची चौथाई व सरदेशमुखी छ. शाहू महाराज यांना मिळाली. मराठयांच्या संयुक्त राज्यव्यवस्थेत विविध सरदारांकडे विविध प्रदेश सोपविण्यात आले होते. या सर्व सरदारांनी चौथाई व सरदेशमुखी गोळा करून आपापल्या प्रदेशाचे संरक्षण करण्यासाठी लागणारी रक्कम ठेवून बाकीची रक्कम केंद्र सरकारात भरावी. अशी व्यवस्था पेशवेकाळात लावण्यात आली होती. पहिल्या बाजीरावाने आपल्या कारकीर्दित (१७२०-१७४०) दिल्लीचा मुघल बादशहा व हैद्राबादचा निजाम यांच्याकडून कर्नाटक व माळवा प्रांतात चौथाईच्या सनदा मिळविल्या होत्या. १७३९ मध्ये मराठयांनी वसई, चौल, कोरलाई या पोर्तुगिजांच्या प्रदेशातून एकूण महसूलीपैकी ४० टक्के उत्पन्न पोर्तुगिजांकडून वसूल केले. न्यायमुर्ती रानडेंच्या मते, 'मोगलांच्या ६ सूभ्यातून मराठयांना १८ कोटी रू. चौथाई व सरदेशमुखीपासून उत्पन्न मिळत होते; यापैकी छत्रपती शाहु महाराजांच्या सरदेशमुखीचा हक्क म्हणून १ कोटी ८० लाख त्यांना मिळत होते. याशिवाय पेशव्यांनी मराठी सत्तेचा विस्तार करून गूजरात, माळवा, राजपुताना, बुंदेलखंड, काठेवाड, दुआब, गोंडवन, ओरिसा, आग्रा, दिल्ली, अयोध्या व बंगाल प्रांतातून चौथाई व सरदेशमुखी गोळा करण्यास सुरूवात केली होती. पहिल्या बाजीरावाला एकटया माळवा प्रांतातून ५० लाख चौथाई मिळत होती.'

**१०.३.३ टांकसाळी -** पेशवेकाळात राज्यात ३८ प्रकारची सोन्याची व १२७ प्रकारची चांदीची नाणी चलनात होती. ही नाणे सरकारमार्फत तसेच खाजगी लोकांकडून पाडून घेतली जात. त्यांना तसा परवाना दिला जाई. परवाना देतांना फी वसूल केली जात असे. इतिहासकार ग.ह.खरेंच्या मते, 'नाणी पाडण्याचा परवाना ३ वर्षांसाठी दिला जाई, पहिल्या वर्षी ५०, दुसऱ्या वर्षी ७५, तर तिसऱ्या वर्षी १०० रू. टांकसाळ मालकाला शासनास द्यावे लागत असे.'

**१०.३.४ खाणी -** पेशवेकाळात तांबे, लोखंड, चांदी, सोने, यांचा खाण उद्योग चालविला जात असे. खाण मालकाकडून कराच्या रूपाने काही रक्कम सरकारला मिळत असे. कमाविसदार खाण उद्योगावर कर बसवून तो वसूल करत असत.

**१०.३.५ जंगलकर -** जंगलातील झाडे, सरपण, कोळसा, मध, गवत इ. पासून सरकारला बरेच उत्पन्न मिळत असे. झाडे तोडण्यासाठी परवानगी कर सरकारला मिळत असे.

**१०.३.६ खंडणी व नजराणा -** सरंजामदार व संस्थानिकांकडून काही खंडणी सरकारला मिळत असे. दसऱ्याला पेशव्यांना त्यांचे अधिकारी व इतरांकडून अनेक वस्तु नजराणा म्हणून मिळत असत. प्रजा व मांडलिक राजांकडूनही खास प्रसंगी पेशव्यांना नजराने मिळत.

**१०.३.७ विविध कर -** जकात व अबकारी करापासून पेशवे सरकाराला मोठे उत्पन्न मिळत असे. हा कर विविध मालावर मालानुसार, ठिकाणानुसार आकारला जाई. शिंगिशंगोटी हा कर जनावरांच्या खरेदीविक्रीवर आकारला जाई तर दारू व तंबाखूवर अबकारी कर आकारला जाई.

**१०.३.८ व्यवसायकर -** विविध व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांकडून कर वसूल केला जाई. उद्योगधंद्यावरही कर आकारला जाई. अशा तऱ्हेने विविध करांपासून सरकारला सहा कोटी रू. उत्पन्न वर्षाकाठी मिळत होते, असे प्रसिद्ध इतिहासकार ग्रँट डफचे म्हणणे आहे तर एलफिन्स्टनच्या मते, 'पेशवेकालीन राज्याचे उत्पन्न ९६,७१,७३५ रू. इतके होते.'

**१०.३.९ पेशवेकालीन महसूल विभाग -** जमिन महसूलाची आकारणी व वसुलीच्या सोयीसाठी राज्याचे खालीलप्रमाणे महसूल विभाग पाडण्यात आले होते.

**अ) मौजे -** हा सर्वात लहान महसूली विभाग असून त्यावर पाटील व कुलकर्णी हे मुलकी अधिकारी महसूल वसूलीसाठी होते. काही मौजामध्ये अनेक वाडया असत त्यांना मजरे म्हणत. तेथूनही पाटील व कुलकर्णी महसूल वसूल करीत.

**ब) परगणा -** अनेक मौजांचा एक परगणा होई. परगण्यावरील मुलकी अधिकारी, कमाविसदार, मामलेदार हे असत. ते परगण्यातील महसूल जमा करत.

**क) प्रांत -** ५ ते ६ किंवा त्याहून अधिक परगण्यांचा एक प्रांत बनत असे. प्रांतावर सरसुभेदार हा अधिकारी असे. तो मामलेदार कमाविसदार यांच्या मदतीने प्रांतातील महसूल वसूल करत असे.

अशा प्रकारे पेशवे काळात महसूल वसूलीसाठी उपरोक्त विविध विभाग पाडण्यात आले होते. त्या-त्या विभागावर नेमलेल्या अधिकाऱ्यांकडून महसूल तसेच इतर करांची वसूली करण्यात येत असे व नंतर सर्व महसूल व विविध करांपासूनचे उत्पन्न सरकार जमा केले जात असे.

## १०.४ पेशवेकालीन न्यायव्यवस्था

१८व्या शतकातील न्यायव्यवस्थेचा अभ्यास करताना न्यायव्यवस्थेत जे बदल घडून आले त्या बदलावरून मराठयांची न्यायव्यवस्था छ.शाहु महाराजकालीन व पेशवेकालीन अशा दोन कालखंडात विभागलेली आढळते.

**१०.४.१ छ. शाहू महाराजकालीन केंद्रीय न्यायव्यवस्था -** (१७०७-१७५०) छ. शाहू महाराजांच्या काळात केंद्रीय प्रशासनात राजा हा सर्व श्रेष्ठ न्यायालयीन अधिकारी होता. सरदारांच्या तंट्याबद्दल राजाने दिलेला निर्णय अंतिम असे. कधी कधी राजा मंत्र्यांचा किंवा सरदारांचा सल्ला घेत असे. मात्र हा सल्ला राजावर बंधनकारक नसे. जर एखादे प्रकरण

अगदीच हाताबाहेर गेले तर राजा धर्म सभेला पाचारण करत असे. न्यायाधिश व पंडितराव हे पूर्वी प्रमाणेच आपली कामे बजावत असत.

**१०.४.२ छ. शाहू महाराजकालीन स्थानिक न्यायव्यवस्था –** छ. शाहूकाळात स्थानिक न्यायव्यवस्थेत बरेचसे सरंजामशाहीकरण झालेले दिसून येते. विविध सरदारांना या काळात सरंजाम देण्यात आले होते. हे सरंजामदार आपापल्या क्षेत्रात न्यायदानाचे काम दिवाण मजलिस, गोतसभा व पंचायत यांच्यामार्फत करीत असत. काही वेळा ते एखादे प्रकरण केंद्रीय न्यायव्यवस्थेकडे पाठवित असत. छ. शाहू महाराजांच्या कारकीर्दीच्या शेवटी पंचायत पध्दतीचे स्थानिक न्यायव्यवस्थेत महत्त्व वाढत गेले.

**१०.४.३ पेशवेकालीन केंद्रीय न्यायव्यवस्था -** (१७५० ते १८१८) छ. शाहू महाराजांच्या काळात छत्रपतीकडून पेशव्यांकडे सत्तेचे हस्तांतरण केले. छ.शाहू महाराजांनंतर आलेले दोन छत्रपती हे अकार्यक्षम असल्याने पेशव्यांच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण झाले. पेशवा हा सर्व सत्ताधीश झाला तोच राजमंडळाचा प्रमुख झाला, तर छत्रपती नामधारी बनले.

**अ) केंद्रीय न्यायव्यवस्था :**

**१) सातार्‍याचा राजा -** १७०८ ते १७५० पर्यंत मराठा राज्याचा सार्वभौम सत्ताधीश सातार्‍याचा राजाच होता. शिवकाळाप्रमाणे राजाला न्यायदानाचे सर्व अधिकार होते. न्यायाधीश व पंडीतराव यांचे न्याय प्रक्रीयेतील दोघांचे अधिकार कमी होऊन ते सातार्‍याच्या राजाकडे गेले. १७५० नंतर मात्र ते अधिकार पेशव्यांकडेच आले.

**२) धर्मसभा -** धर्मसभा किंवा हुजूर-हाजीर मजलीस ही शिवकाळापासून राज्यातील प्रमुख न्यायसंस्था असूनही १७५० नंतर ती दुर्बल झाली. धर्मसभेत पेशवा, राजमंडळ व इतर जूने सरदार, यांचा समावेश होता. पुढे पेशव्यांचे महत्त्व वाढल्याने राजमंडळातील सभासद व जून्या सरदारांचे महत्त्व कमी झाले. त्यामुळे पेशव्याने धर्मसभेचे लष्करी व दिवाणी अधिकार स्वतःकडे घेतले परिणामी धर्मसभा केवळ नावालाच उरली.

**३) मुख्य प्रधान किंवा पेशवा -** शिवकाळात न्यायालयीन क्षेत्रात राजाचे जे स्थान होते ते १७५० नंतर पेशव्यांना प्राप्त झाले. पेशवेकाळात पहिल्या तीन पेशव्यांनी मजलीस व गोतसभा यांची न्यायदानात मदत घेतली. छ. शाहु महाराजांच्या मृत्युनंतरच्या पेशव्यांनी मजलीस ऐवजी गोतसभा किंवा पंचायत पद्धती बळकट केली. पेशव्याला मदत करण्यासाठी त्याचा दिवाण किंवा फडणीस नावाचा अधिकारी असे. तोच पंचायतीमार्फत बहुतेक सर्व प्रकरणांचा निकाल लावीत असे. तसेच पेशव्याने एक स्वतंत्र न्यायाधीश नेमून त्याच्याकडे धार्मिक व ऐहिक स्वरूपाचे सर्व खटले सोपविले होते. काही सरदारांकडेही पेशव्याने न्यायदानाचे काम सोपविले होते. हे सरदार आपापल्या जहागिरीत न्यायदानाचे काम करीत असत.

**१०.४.४ पेशवेकालीन स्थानिक न्यायव्यवस्था -** स्थानिक पातळीवर सरसुभेदार, सुभेदार, मामलतदार, कमाविसदार व अमीन हे अधिकारी पेशव्यांच्या वतीने न्यायदानाचे काम करत.

munotes.in

**१) सरसुभेदार व सुभेदार -** प्रांतिक न्यायदान प्रक्रीयेत हे दोन अधिकारी महत्त्वाची भूमिका बजावत असत. त्यांना न्यायदानाच्या बाबतीत सर्वोच्च अधिकार प्रांतिक पातळीवर असत. प्रांतातील सर्व न्यायनिवाडयावर त्यांचा शिक्का व सही असे. परगणा गोतसभेचेही हे महत्त्वाचे सदस्य असत.

**२) मामलतदार व कमाविसदार -** प्रांतातील विविध दिवाणी फौजदारी खटल्यांची माहिति करून घेऊन त्यांचा निवाडा करणे, प्रसंगी पंचायत स्थापन करून तिच्यामार्फत खटल्याचा निकाल लावणे, ही कामे मामलतदाराला न्यायदान क्षेत्रातील करावी लागत.

कमाविसदाराला मामलतदारापेक्षा न्यायालयीन क्षेत्रात व्यापक अधिकार होते. कौटुंबिक मालमत्ते संबंधीचे तंटे निकालात काढणे, कर्जासंबंधीची भांडणे सोडविणे इ. कामे त्याला गावपंचायतीच्या मदतीने करावी लागत असत. घर, जागासंबंधीचे कब्जे, किरकोळ तक्रारी पंचायतीच्या मदतीशिवाय कमाविसदार सोडवत असे. फौजदारी गुन्ह्यांचीही तो पेशव्याच्या आदेशावरून चौकशी करत असे.

**३. अमीन -** जेव्हा पेशवे सरकारकडे तालुक्यातील अधिकाऱ्यांविरूद्ध तक्रारी जात असत. त्यावेळी पेशवे सरकार या तक्रारीची चौकशी करण्यासाठी आपला विश्वस्त म्हणून अमीन या अधिकाऱ्याला तालुक्यातील अधिकाऱ्यांच्या चौकशीसाठी पाठवत असत.

**१०.४.५ पंचायत न्यायव्यवस्था -** ही सर्वांत महत्त्वाची न्यायदान व्यवस्था होती. त्यामध्ये न्यायव्यवस्थेचे लोकशाहीकरण झाले होते. थोरल्या माधवरावाच्या काळात पंचायतीचे महत्त्व अधिक वाढले होते. पंचायतीमध्ये त्या त्या गावातील प्रतिष्ठीत लोकांचा समावेश असे. या पंचायतीत कमीत कमी पाच व जास्तीत जास्त पन्नास सभासद असत. दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे खटले पंचायत चालवत असे.

**१०.४.६ गोतसभा -** मराठेकालीन न्यायव्यवस्थेत गोतसभा हे एक महत्त्वाचे अंग समजले जात असे. गोतसभेला शाहूच्या काळात महत्त्वाचे स्थान होते. मात्र पेशव्यांच्या काळात गोतसभेचे महत्त्व कमी होऊन तीची जागा पंचायतीने घेतली. तरीही मराठेकालीन न्यायव्यवस्थेचे खास वैशिष्टे म्हणून गोतसभेकडे पाहिले जात असे.

डॉ. व्ही. टी. गुणे यांनी गोतसभेचे तीन विभाग पाडलेले आहेत. ते म्हणजे परगणा गोतसभा, कसबा किंवा पेठ गोतसभा व खेडेगावची गोत सभा. परगणा गोतसभेत देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, पाटील, नायकवाडी, निरासदार यांचा समावेश असे. मुख्य अधिकारी देशमुख तर देशपांडे त्याला मदत करीत असत. परगण्यात निर्माण होणारी आर्थिक, न्यायालयीन व सार्वजनिक शांततेची प्रकरणे हाताळणे हे परगणा गोतसभेचे मुख्य काम असे.

कसबा किंवा पेठगोतसभेत देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, पाटील, कुलकर्णी व चौगुला यांचा समावेश असे.

खेडेगावची गोतसभा ही न्यायदान प्रक्रियेतील सर्वांत पहिली पायरी होती. यात सर्व वतनदार, आलुतेदार व उपरे यांचा समावेश होत असे. सर्व एकत्र बसून विचार विनिमय करून निर्णय देत असत. ग्रामगोतसभेने दिलेला निर्णय राजासुद्धा बदलू शकत नसे.

दोन गावातील तंटे सोडविणे, कर्जव्यवहाराचे तंटे सोडविणे, वतनसंबंधी खटले चालविणे, घटस्फोट संबंधीचे दावे चालविणे इ. कामे गोतसभा करत असे.

**१०.४.७ ब्रह्मसभा -** ही विद्वानांची सभा होय. त्यात धर्माधिकारी हा प्रमुख असे. त्याला मदतनीस म्हणून मिमांसक, जोशी पुराणिक, वैदिक, ज्ञानसंपन्न पंडित यांचा समावेश होत असे. ही सभा नाशिक, पैठण, पुणतांबे, कऱ्हाड, कोल्हापूर महाबळेश्वर, वाई, पंढरपूर अशा तीर्थक्षेत्री भरत असे. या सभेत धार्मिक तंटे सोडविले जात असे. धार्मिक गुन्हा केलेल्या व्यक्तीस सामान्यपणे प्रायश्चित्त द्यावे लागत असे. प्रसंगी त्यास दिवाण दंडही द्यावा लागत असे.

**१०.४.८ जातिसभा -** प्रत्येक जातीची स्वतंत्र सभा असून त्या त्या जातीची माणसे एकत्र येत असत. डॉ. गुणे या संदर्भात म्हणतात. 'जातीचे नियम भंग करणाऱ्याचा खटला जातिसभे समोर येत असे' यावरून या सभेमध्ये फक्त स्वतःच्या जातीची बंधने योग्य पद्धतीने पाळली जातात किंवा नाही हे पाहिले जात असे. एखाद्या व्यक्तीने जातिबाह्य कृत्य केले असेल तर त्यास ही सभा योग्य ती शिक्षा करत असे.

**१०.४.९ पंचायत न्यायव्यवस्थेचे कामकाज -** गावातील दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे खटले चालविण्याचे काम पंचायत करीत असे. यामध्ये पाटील, कुलकर्णी, शेटे, महाजन, चौगुला, मिरासदार, वतनदार, बलुतेदार यांचा समावेश होता. खटल्याच्या स्वरूपावर व्याप्तीवर सभासदांची संख्या अवलंबून असे.

**१. निवाडापत्र -** वादी - प्रतिवादींनी दिलेली लेखी निवेदने, साक्षीदारांनी दिलेल्या साक्षी पुरावे या सर्वांचा विचार करून पंचायत निर्णयाप्रत येऊन पोहचत असे. त्या निर्णयाला सारांश म्हणत. हा सारांश संबंधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविला जाई व त्याला अनुसरून तो अधिकारी त्यावर निर्णय देऊन प्रतिवादी यांची तक्रार ऐकून त्यांची उत्तरे देत असत. त्यानंतर घेतलेल्या साक्षी व पुराव्यांची माहिती असे. त्याच्याखाली पंचाने घेतलेला निर्णय व शेवटी फडणीसाची सही असे. शेवटी राजाची सही झाली म्हणजे निवाडापत्र अंतिम मानले जाई.

**२. निवाडापत्राची अंमलबजावणी -** निवाडापत्र तयार झाल्यावर त्या संबंधीचा हुकूम संबंधीत अधिकाऱ्यास कळविला जाई व नंतर हा अधिकारी स्थानिक अधिकार्यामार्फत त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करीत असे.

**३. अपिलाची सवलत -** वादी किंवा प्रतिवादीला निर्णय मान्य नसेल तर तो खुद पेशव्यांकडे अपील करत असे. पेशवा प्रत्यक्ष लक्ष घालून पंचायतीमार्फत न्यायदान करण्याचा हुकूम देत असे.

**१०. न्यायालयीन शुल्क -** विजयी पक्षाकडून 'हरकी' किंवा 'शेरणी' न्यायालयीन कामकाजापोटी शुल्क म्हणून घेतली जात असे. तर पराभूत पक्षाकडून दंड घेतला जात असे.

**१०.४.१० पुरावा व साक्षी -** कागदोपत्री पुरावा व साक्षींना न्यायालयीन कामकाजात महत्त्वाचे स्थान होते. ही कागदपत्रे एका विशिष्ट पद्धतीने लिहिलेली असत व त्यावर सही,

शिक्केही असत. न्यायालयीन अधिकारी कागदपत्र पाहताक्षणीच ते अस्सल की बनावट आहे हे ओळखत असत.

ज्या प्रकरणात कागदोपत्री पुरावा उपलब्ध नसे त्यावेळी गावातील प्रतिष्ठित लोकांची साक्ष घेत असत. साक्षीदार देवाळासमोर किंवा बेलपत्र किंवा पाणी हातात घेऊन साक्ष देत असत.

**१०.४.११ दिव्य -** पेशवेकाळात साक्षी पुराव्याच्या जोडीलाच दिव्य हा प्रकारही तितकाच महत्त्वाचा मानला जाई. उकळत्या तेलातून लोखंडाचा तुकडा हाताने बाहेर काढणे, लोखंडाचा तप्त गोळा हातात घेऊन सात प्रदक्षिणा देवळाभोवती घालणे, नदीच्या पात्रात उतरून शपथ घेणे, भाकरी, फुले, अंगारा, बेल, हातात घेऊन शपथ घेणे इ. दिव्याचे प्रकार पेशवेकाळात प्रचलित होते.

**१०.४.१२ शिक्षेचे प्रकार -** पेशवेकाळात दिवाणदंड (राजदंड), देवदंड (ब्रह्मदंड), जातीदंड (गोतदंड) हे शिक्षेचे प्रकार प्रचलित होते. राजदंड स्वतः पेशवे व सरन्यायाधीश करत असे. धर्मशास्त्रानुसार विद्वान ब्राह्मण देवदंड म्हणजे आरोपीला प्रायश्चित देत असत. जातिबाह्य कृत्य केल्यास जातिदंड आरोपीला केला जात असत. म्हणजे त्यास समाज बहिष्कृत करत असत. त्याला पुन्हा जातीत घेण्यासाठी त्याची गोताई (पंक्तीपावन) केली जात असे.

सारांशाने असे म्हणता येईल की, पेशवेकालीन न्यायपद्धती सोपी व सुटसुटीत होती. पंचायत न्याय पद्धतीमध्ये लोकशाहीकरण झालेले होते. विशेष म्हणजे प्रत्येकाला राजापर्यंत अपिल करण्याची सवलत होती.

## १०.५ लष्करी प्रशासन

पेशवेकालीन लष्कराचे घोडदळ, पायदळ, तोफखाना व हुजूरात (पेशव्यांची फौज) असे चार प्रमुख विभाग होते. गनिमी पद्धती बरोबरच समोरासमोर युद्ध करण्याचीही पद्धती अंमलात आणली गेली होती. आरमाराच्या विकासाकडे पेशव्यांनी बरेच लक्ष पुरविले होते.

**१०.५.१ घोडदळ -** घोडदळात करोल, भालेकरी व आडहत्यारी असे प्रकार होते. करोल म्हणजे बंदुकवाले, भालेकरी म्हणजे भाला धारण करणारे व आडहत्यारी म्हणजे मिळेल ते हत्यार चालविणारे.

घोडदळात दोन मुख्य विभाग होते ते म्हणजे बारगीर व शिलेदार.

**अ) बारगीर -** बारगीर हा सरकारी नोकर असे. त्याला सरकारकडून घोडे, हत्यारे व पगार मिळत असे. बारगीरांना महिना ४ ते १० रूपयांपर्यंत पगार मिळत असे. हे बारगीर पेशव्यांच्या व त्यांच्या सरदारांच्याही घोडदळात ठेवले जात असत. बरेच बारगीर व घोडे मिळून पागा तयार होत असे. पागेवरील अंमलदारास 'पाग्या' म्हणत. एका पागेत १० घोड्यांपासून ७०० पर्यंत घोडी असत. या पाग्यांची गणना पुढे सरदारांत होत असे. नौबत, निशान, पालख्या, फडणीस, पोतनीस इ. दरखदार असत. मशालजी, जासूद, डेरे, राहुट्या व ओझ्यासाठी बैल, उंट, हत्ती इ. जनावरेही पागेमध्ये असत. त्यांचा सर्व खर्च सरकारकडून होत असे.

**ब) शिलेदार -** शिलेदारकडे घोडा व हत्यार स्वतःचे असे. शिलेदाराच्या समुदायास 'पथक' म्हणत. अशा शिलेदारांच्या समुदायावर सरदार असत. सरदारांना पथक म्हणत असत. पथकाच्या खर्चास सरकारकडून रोख रक्कम मिळत असे. त्यास 'इतलाखी' पथक असे नाव होते व पथकाच्या खर्चास सरकारकडून मुलूख तोडून दिला असेल तर त्यास 'सरंजामी पथक' असे म्हणत. शिलेदाराचा पगार त्याचा घोडा व हत्यारे पाहून ठरविला जात असे. तो दरमहा २० ते ३० रूपये इतका असे.

**१०.५.२ हुजूरात -** हुजूरात म्हणजे पेशव्यांची फौज होय. पेशव्यांच्या मध्यवर्ती सत्तेकरीता ती शक्य तितकी मोठी असे. साधारणत: पेशव्यांच्या घोडदळात एक हजार पर्यंत घोडेस्वार असत. त्यांची १२ पथके तयार करून प्रत्येक पथकावर वेगवेगळे सरदार नेमले जात असत. पागेकडे फडणीस, पोतनिस इ. रखवालदार श्रेणीतील अधिकारी व शिलेदार पथकाकडे बक्षी हे अधिकारी असत. शिलेदाराजवळ २५ स्वार असून आपला पथक घेऊन स्वारीस निघण्याची आज्ञा त्याला होत असे. पेशव्यांच्या सैन्याचा उपयोग केवळ लढाईसाठी केला जात असे. शत्रुचा प्रदेश ताब्यात आल्यावर त्याचा ताबा हुजूरात घेत असे. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी हुजूरातचा उपयोग करीत असत.

**१०.५.३ पायदळ -** पेशवेकाळात सैन्यात मुख्य भरणा पायदळाचा असे. ही फौज २५००० पर्यंत असे. मराठयांबरोबरच परप्रांतातील व परधर्मातील लोकांचाही भरणा पायदळात केला जात असे. त्यात रोहिले, पठाण, गारदी, शीख, सिद्दी यांचाही भरणा असे. पेशवा माधवरावाने १७७० मध्ये हैदरअलीच्या विरूद्ध मोहिमेसाठी फार मोठे पायदळ उभारले होते. १७७०-७१ मध्ये सुमेरसिंग गारद्याला ४०० गारद्यांचे पथक उभे करण्यास सांगण्यात आले होते. शेरसिंग या शिख जमादाराला २०० सैनिक जमवण्यासाठी आज्ञा करण्यात आली होती. पायदळातील मराठी फौजावर मराठा सरदाराचा जितका वचक असे तितका वचक परप्रांतीय, परकीय शिपायांवर राहत नसे.

**१०.५.४ तोफखाना -** पेशवाईत मराठयांनी गनिमी काव्याचे युद्धतंत्र सोडून समोरासमोर मैदानात लढण्यास सुरवात केल्याने त्यांना तोफांची जास्त गरज भासू लागली. त्यामुळे पेशव्यांनी स्वतंत्र तोफखान विभाग सुरू करून मुझफरखान व नंतर इब्रहिमखान या तज्ञ व्यक्तींच्या तोफखान्याकडे नेमणुका करून तोफखाना सुसज्ज बनविण्याचा प्रयत्न केला. राज्यात अनेक ठिकाणी तोफा व तोफगोळे तयार करण्याचे कारखाने सुरू केले. इंग्रज व पोर्तुगीजांकडून लांब पल्ल्याच्या तोफा मागविल्या जात असत.

शूतरनाला व गरनाला असे तोफांचे दोन प्रकार होते. त्यापैकी शुतरनाला उंटावर ठेवण्यात येई तर गरनाला किल्ल्यावर ठेवण्यात येत असे. लहान व हलक्या दमाच्या तोफा राज्यातच बनविल्या जात. तोफा व दारूगोळा यांच्या पुरवठयावर पेशव्यांचे कोणतेही नियंत्रण नव्हते. तोफखान्याची व्यवस्था दिवाण, मुजूमदार, फडणीस व सबनीस या मुलकी अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात येई. प्रत्यक्ष तोफा चालविण्यासाठी तोफंदाज, पैगंदाज, गोलंदाज, बांधानी व खासे अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाई.

**१०.५.५ पेंढारी व गारदी -** पेंढारी हे पेशवेकाळात लष्कराचे एक अंग होते. त्यात मुख्य भरणा मुस्लिम पठाणांचा असे. पेंढाऱ्यावरील प्रमुख मुस्लिम पठाणच होता. पेंढाऱ्याला लष्करात येऊन राहण्याची परवानगी पेशव्यांकडून घ्यावी लागे. सरदारांचेही पेंढारी असत

ते त्यांच्या फौजांबरोबर असत. पेंढाऱ्यांना दर पालामागे ५ रू. सरकारात भरावे लागत. लष्कराबरोबर राहून पेंढारी शत्रुच्या प्रदेशातील लुटमार करून आपले पोट भरत. शत्रु हारला की त्याच्या छावणीची लुट करण्यात पेंढारी सैन्याला मदत करीत असत. पेंढाऱ्यांप्रमाणे पेशव्यांच्या फौजेत गारद्यांचाही समावेश असे. गारदी लोक शूर, आडदांड व बेगुमान असत. त्यामुळे गारद्यांवर मराठी सरदारांचा वचक राहिला नाही. पेंढारी व गारद्यांमुळे मराठा लष्करात बेशिस्त निर्माण झालीच, परंतु मराठे हे लुटारू आहेत असा हिंदूस्तानभर समजही निर्माण झाला.

**१०.५.६ आरमार -** १६९८ मध्ये मराठयांचा आरमार प्रमुख कान्होजी आंग्रेची नेमणूक झाली. १७०७ मध्ये त्याने मुंबईवर इंग्रजांच्या आरमारी बोटीवर हल्ला करून आपल्या पराक्रमाची चुणूक दाखवली. १७१० मध्ये खांदेरी बेट जिंकून तेथे तटबंदी केली. छ.शाहू महाराजांकडे मराठा राज्याची सूत्रे आली तेव्हा कान्होजीच आरमाराचा प्रमुख होता. १७२९ मध्ये कान्होजीच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा संभाजी आरमाराचा प्रमुख झाला. पुढे १७४३ मध्ये तुळाजी आंग्रेंची प्रमुख पदी नियुक्ती झाली. पुढे तुळाजी नानासाहेब पेशव्याला जुमानत नसल्याने इंग्रजांची मदत घेऊन तुळाजीचा पाडाव केला. १७५६ मध्ये तुळाजीला अटक केली. विजयदूर्ग येथे नवीन तटबंदी करून तेथे मराठी आरमाराचे ठाणे स्थापन केले. तत्पूर्वी १७३७ मध्ये पहिल्या बाजीरावाने अर्नाळा येथे एका आरमारी ठाण्याची स्थापना केली होती. या दोन्हीही आरमारी ठाण्याचे अधिपत्य आनंदराव धुळप याच्याकडे दिले होते. हा आरमाराचा सूभेदार होता.

सुभेदाराच्या हाताखाली एक कारभारी होता. जगन्नाथ नारायण हा सुभेदार धुळपाचा कारभारी होता. मोहिमेवर जाणाऱ्या आरमारी जहाजांची जबाबदारी त्याच्यावर असे. कोकणातील विजयदुर्ग, रत्नागिरी, अंजनवेल, देवगड येथे मराठयांची आरमारी ठाणे होती. त्या प्रदेशातील दालदी, गाबीत व भंडारी लोक नौकायानात निपून होते. त्यांचीच भरती आरमारात होत असे. तांडेला व सरतांडेला नावाचे आरमारी अधिकारी असत.

पेशवेकाळात आरमाराचा उपयोग चाचेगिरीचा बंदोबस्त करणे, व्यापारी जहाजांपासून जकात वसूल करणे, समुद्रात फुटलेली जहाजे ताब्यात घेणे व समुद्रकिनाऱ्याचे शत्रुपासून संरक्षण करणे यासाठी केला जात असे. तुळाजीच्या पाडावानंतर मराठी आरमारच्या ऱ्हासाला सुरूवात झाली होती. माधवरावाच्या काळात हैदर विरोधात मराठा आरमार पश्चिम किनाऱ्याने म्हैसुरच्या समुद्रकाठापर्यंत गेले होते. सागरी लढाईत मराठा आरमाराने चांगली कामगिरी बजावली होती. सारांशाने असे म्हणता येईल की, पेशव्यांची सर्व भिस्त भूदलावर असल्याने त्यांनी आरमाराकडे विशेष लक्ष दिलेले नव्हते.

## १०.६ सारांश

छत्रपती शिवाजी राजांनी राज्यकारभारासाठी जी तत्वे पुरस्करलेली होती, त्या तत्वांचा पेशव्यांनी त्याग केल्याने पेशवाईचा ऱ्हास झाला. असे जरी असले तरी स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर पेशव्यांनीच केले होते. हेही नाकारता येणार नाही. म्हणूनच पेशव्यांची कर्तबगारी खरोखरच महान होती हे नमुद करावे लागेल.

munotes.in

## १०.७ प्रश्न

१) पेशवेकालीन महसूल व्यवस्थेचा आढावा घ्या.

२) पेशवेकालीन लष्करी प्रशासनाची चर्चा करा.

३) टीपा लिहा.

अ) पेशवेकालीन मुलकी व्यवस्था

ब) पेशवेकालीन न्यायदान पद्धती.

## १०.८ संदर्भ

१) सावंत व जाधव व्ही. के. मराठयांचा प्रशासकीय व सामाजिक व आर्थिक इतिहास, विद्याप्रकाशन, (१९९७) नागपूर.

२) कोलारकर श. गो., मराठयांचा इतिहास – मंगेश प्रकाशन, (२००३) नागपूर.

३) कुलकर्णी अ. रा., व खरे ग. ह., मराठयांचा इतिहास – कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पूणे (१९९७)

४) महल्ले व पाठक – मराठा सत्तेचा इतिहास – विद्या प्रकाशन, नागपूर (१९९७)

५) काळे म. वा., मराठयांचा इतिहास – प्राची प्रकाशन, (१९९८) मुंबई

६) तांबोळी पवार, राजदेव, रुपनवर – मराठयांचा इतिहास - निराली प्रकाशन, (२००४) पूणे

७) भामरे जितेंद्र, मराठयांचा इतिहास – शेठ पब्लिकेशन, मुंबई

❖❖❖❖

# ११

# पेशव्यांच्या अधिपत्याखालील - समाज - जात आणि स्त्रियांची स्थिती

**घटक रचना :**

११.० उद्दिष्टये

११.१ प्रस्तावना

११.२ पेशवेकाल सामाजिक जीवन -

११.२.१ ग्रामीण जीवन

११.२.२ संयुक्त कुटुंब व्यवस्था

११.२.३ आहार - वेशभूषा

११.२.४ गुलामगिरी

११.२.५ वेठबिगारी

११.२.६ वतनदार वर्ग - अर्थ - कर्तव्य, हक्क

११.३ पेशवेकालीन जातीय संस्था

११.३.१ अस्पृश्यांचे जीवन - कर्तव्य व हक्क

११.३.२ अस्पृश्यांवरील जाचक निर्बंध

११.४ पेशवेकालीन स्त्रियांची स्थिती

११.५ सारांश

११.६ प्रश्न

११.७ संदर्भ

## ११.० उद्दिष्टये

१. पेशवेकालीन सामाजिक रचना जाणून घेणे.

२. पेशवेकालीन जातीय रचनेचा अभ्यास करणे.

३. पेशवेकालीन स्त्रियांची स्थिती जाणून घेणे.

munotes.in

## ११.१ प्रस्तावना

प्राचीन कालखंडापासून समाजजीवनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कारण समाज रचनेतून जीवनाचा पाया भक्कम केला जातो. असे असले तरी प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक या तीनही कालखंडामध्ये सामाजिक जीवनात बदल होत गेला. प्राचीन काळातील सामाजिक जीवन हे अत्यंत सुखी व संपन्न होते. ते आर्यांच्या आगमनापर्यंत, परंतु नंतर वैदिक काळात समाज चार वर्णव्यवस्थेत विभागला गेला होता. तरी ही विभागणी अत्यंत काटेकोर नव्हती. पण उत्तर वैदिक काळात या वर्णव्यवस्थेचे रूपांतरण जातिव्यवस्थेत झाले. ही जात कोणालाही बदलता येत नव्हती. तसेच अस्पृश्यता, धार्मिक कर्मकांडे, ब्राह्मणांचे वर्चस्व यातून समाज अनेक परंपरा, रुढींमध्ये अडकला होता.

खरे पाहता महाराष्ट्रातील समाज जीवनाचा पहिला टप्पा हा सातवाहन ते यादवकाळात मानला जातो. या काळात समाज जीवन अत्यंत सुखी, समृद्ध, संपन्न होते. त्याचप्रमाणे शिव कालखंडात ही समाज जीवन सुखी व समाधानी होते. कारण छत्रपती शिवरायांनी जात, वर्ण व उच्च, कनिष्ठ हा कधीच भेट केला नाही. त्यांच्या काळात सामाजजीवन सुरळीत चालले होते. परंतु नंतर छत्रपती कालखंडानंतर पेशवाई कालखंड सुरु झाला. आणि समाजजीवन पूर्ण बदलून गेले. कारण पेशवाईत कर्मठपणा, सनातनीपणा यांचा विचार प्रबळ झाला. त्यामुळे समाज मुख्य जाती व अनेक पोट जातींमध्ये विभागाला गेला. सुरुवातीला जाती व्यवस्थेला विकृत स्वरूप नव्हते. कारण मराठयांना छत्रपती होते. पण पुढे पेशवाईत ब्राह्मण पेशवा हाच खरा शक्तिशाली झाला, आणि छत्रपती नाममात्र ठरले. यातूनच ब्राह्मणांचे वर्चस्व अधिक वाढले. कारण राज्यकर्ते ब्राह्मण असल्यामुळे अपरिहार्यपणे ब्राह्मणांचे वर्चस्व वाढले होते. परंतु ब्राह्मण वर्ग त्यांच्या पारंपारिक कर्तव्यापासून आणि ब्राह्मण व्यापारापासून दूर गेला होता आणि स्वत:ला श्रेष्ठ समजून इतर जातीला निम्न समजत होता.

## ११.२ पेशवेकालीन सामाजिक रचना

### १) पेशवेकालीन सामाजिक जीवन -

यादवकालीन अवनत सामाजिक जीवन आणि त्यांचे झालेले परिणाम पुन्हा एकदा मध्ययुगीन इतिहासाच्या कालखंडात पेशवाईमध्ये दिसतात. या कालखंडात वर्णव्यवस्था खोलवर रुजली होती. उपजाती जातीमधील अंतर्गत संघर्ष, अस्पृश्यता आदी समस्यांनी समाज जीवन दुभंगले होते. आपली जात दुसऱ्या जातीपेक्षा श्रेष्ठ आहे अशी सार्वत्रिक समजूत झाली होती. राजकर्ते ब्राह्मण असल्यामुळे अपरिहार्यपणे ब्राह्मणांचे वर्चस्व वाढले होते. परंतु ब्राह्मण वर्ग त्यांच्या पारंपारिक कर्तव्यापासून दूर गेला होता. ब्राह्मणांचे वर्चस्व असले तरी ब्राह्मणांमध्ये अनेक कारणांमुळे एकीचा अभाव आणि संघर्ष होता. ब्राह्मण-मराठावाद तर होताच, परंतु ब्राह्मण ब्राह्मणवादाची तीव्रता ही अधिक होती. या काळाचे आणखी एक नमूद करण्यासारखे वैशिष्ट्य म्हणजे छत्रपती क्षत्रिय होते मराठा होते. परंतु क्रमाने सत्ता क्षेत्रियाकडून ब्राह्मणांकडे संक्रमित झाली होती. क्षत्रिय आणि वैश्य या दोन्ही वर्णनांना वेदाधिकार असला तरी, त्यांनी मागील काही शतकांपासून यास फाटा दिला होता. वैदिक संस्कार याबाबतीत ही दोन्ही वर्ग मागे पडले होते. मुळातच ज्ञानाचा मक्ता

ब्राह्मणाकडे होता. त्यामुळे बाकीचे अडाणीच राहिले. तशातच ब्राह्मण पेशवे हे राज्यकर्ता बनल्याने ब्राह्मणांना प्रशासनात महत्त्वाची पदे दिली गेली. थोडक्यात तर मराठा पाटील राजा असला तरी, कुलकर्णीचे वर्चस्व अनन्यसाधारण होते. त्यांच्यात धर्माची नावे देऊन ब्राह्मणांना उच्च लेखले गेले. कनिष्ठ जातींना नीच लेखले गेले. त्यांच्यावर अनेक बंधने घातली गेली. त्यांना अनेक हक्कापासून वंचित ठेवले गेले. यामुळे ब्राह्मणांचे सर्व समाज रचनेवर वर्चस्व स्थापन झाले. या ब्राह्मण वर्गाने समाजाचे वर्णानुसार विभाग केले, व त्यानुसार कामकाज चालू ठवले. हेच पेशवेकालीन सामाजिक घटक आपण पुढील प्रमाणे पाहू.

### ११.२.१ ग्रामीण जीवन -

प्राचीन काळापासून भरभक्कम असणारे ग्रामव्यवस्था पेशवे काळात थोडेफार फरकाने कायम होती. गावांमध्ये पाटील - कुलकर्णी होते. पाटील गावाचा प्रमुख तर कुलकर्णी हा प्रधान होता. त्यांच्या मदतीसाठी अलुतेदार व बलुतेदार होते. तसेच सामाजिक व आर्थिक व्यवहारांचा केंद्रबिंदू खेडे होते. ग्राम, देहे, मौजा इत्यादी नावाने खेडयांचा उल्लेख केला जात असे. तसेच खेडयांच्या अंतर्गत काही उपविभाग होते. त्यांना मजरा, वाडी, बाडी इत्यादी नावे होते. शेतीसाठी आवश्यक उद्योग व्यवसाय करणारा तो बलुतेदार व अलुतेदारांशिवाय शेतकऱ्यांचे फारसे अडत नव्हते. शिवाय अलुतेदारांची संख्या १८ होती. सामाजिक संस्था या दृष्टीने नमूद करण्यासारखे या काळाची वैशिष्टय म्हणजे जाती अंतर्गत संघर्ष होय. हे संघर्ष सोडविण्यासाठी ज्ञानी, अनुभवी, वयोवृद्ध व्यक्तींचा समावेश होतो. पेशवे काळात सणसमारंभ यांना मोठया प्रमाणात महत्त्व होते. त्यानुसार सण-उत्सव ही साजरे केले होते. ग्रामीण जीवनात मोठया प्रमाणात पेशवेकाळात जातीनिहाय भेद होते. ब्राह्मण हे स्वतः च उच्च कुळातले समजत व त्यानंतरचे सगळे आपल्यापेक्षा कमी महत्त्वाचे आहेत असे समजले जात व त्याप्रमाणेच त्यांचे कामकाज चालत असे.

### ११.२.२ कुटुंबव्यवस्था -

प्राचीन काळापासून संपूर्ण भारतात एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. तसेच शेतीप्रधान समाज व्यवस्थेमुळे संयुक्त कुटुंब व्यवस्था आकारलेली होती. महाराष्ट्रातील कुटुंब व्यवस्थेचा आधार जातीसंस्था होती. समाजातील विविध घटकांची देवाणघेवाण जातिबंधांमध्येच होत असे. जाती संस्थेच्या चौकटीत सर्व व्यवहार होत असल्याने विवाह संबंधामध्ये प्रामुख्याने जाती-उपजाती यांचा विचार होत असे, तसेच या काळात वतनाला महत्त्व असल्याने कुटुंब व्यवस्थेमध्ये वतन, वतनदारी यांना विशेष महत्त्व असे. त्यामुळे जेवढे वतन मोठे किंवा मानाचे तेवढे कुटुंब ही मानाचे समजले जाई. एकत्र कुटुंब व्यवस्था व वतनदारीचे संबंध कनिष्ठ होते.

पेशवे काळात एकत्र कुटुंब पद्धती बरोबरच पितृसताक पद्धती हेही कुटुंब व्यवस्थेची वैशिष्टये मानले जात असे. सामान्यतः हे कुटुंब तीन पिढया एकत्र राहत असत. कुटुंब प्रमुखाला महत्त्वाचे स्थान होते. कुटुंबप्रमुखांनी दिलेला निर्णय हा अंतिम समजला जात असे. शिवाय कोणतेही काम करण्यासाठी कुटुंबप्रमुखाची परवानगी घ्यावी लागत असे. तसेच कुटुंबामध्ये कुटुंब प्रमुखाला अनेक कामे करावी लागत असे. कुलधर्म, कुलाचार पाळावेत अशी अपेक्षा असे, प्रत्येक घराण्याला कुलदैवत होते. म्हणून त्या कुलदेवतेची पूजा करण्याचे काम



munotes.in

कुटुंबप्रमुखाला करावे लागत असे. वर्षात येणारे सर्व सणवार साजरे करणे हेही महत्त्वाचे काम प्रमुखाला करावे लागे. मालमत्तेची वाटणी करताना वडील भावाला इतर भावांपेक्षा जास्त मालमत्ता मिळत असे. कुटुंब व्यवस्थेत विवाहाला विशेष महत्त्व होते. कुटुंबीय व्यवस्था टिकवण्यासाठी प्रज्योत्पादन व परंपरा टिकवण्यासाठी धार्मिक कृती महत्त्वाची असे. धार्मिक विधीत पुत्राला महत्त्व असल्याने कुटुंब व्यवस्थेचे स्त्रीचे महत्त्व कमी झाले.

### ११.२.३ पेशवेकालीन आहार - वेशभूषा -

पेशवेकालीन आहार हा सात्विक होता. आहारामध्ये दही, दूध, भात यासारखे पदार्थ असत तसेच नाना पुरंदरेच्या घरगुती पत्रात काही नोंदी आढळतात. त्यानुसार एका पत्रात ब्राह्मणांना भोजनात दही व दूध देण्याची सूचना केल्याचे दिसून येते. तसेच त्यांच्या जेवणात दही, दूध भातासोबत सर्व प्रकारच्या पालेभाज्या, फळभाज्या, लोणचे, कोशिंबीर, खारीक, खजूर, बदाम, पिस्ते, मिठाई, नारळ, साजूक तूप, असे अनेक पदार्थ आढळतात. तसेच पेशवेकाळात मांसाहार वर्ज्य होता. या काळात मास, मटन खाल्ले जात नसे.

पेशवेकालीन वेशभूषा ही साधी व सोपी होती. पुरुष पोषक बारीक कठाचे धोतर, अंगात बाराबंदी डोक्यावर पगडी, पागोटे किंवा फेटा असे व अंगावर उपरणे असे. विशेषतः या काळात बाजीरावी धोतर जोड प्रसिद्ध होता. तसेच गळ्यात मोत्यांचा माळा व कानात डूल ही घालत होते. तसेच स्त्रियांना पोषाखामध्ये या नऊवारी लुगडे नेसत असत व त्यावर कोपऱ्यापर्यंत बाही तसेच इंग्रजी व्ही अक्षराच्या आकाराच्या गळ्याची आणि मध्यावर गाठ असलेली खणाची चोळी घालीत. तसेच डोक्यावर पदर घेण्याची प्रथा होती. पूजा विधीप्रसंगी स्त्रिया रेशमी रंगीत वस्त्रे नेसत, तर लग्न, मुंज वगैरे विशेष प्रसंगी शालू, पैठणी, चंद्रकला अशी ठेवणीतील खणाची चोळी व वरती भरजरी शेला पांगरीत. शेला पांघरणे हे प्रतिष्ठेचे समजले जाई. तसेच गळ्यात नाना प्रकारचे अलंकार वापरत कानात डूल, गळ्यात ठुशी हे महत्त्वाचे दागिने व नथ हे सौभाग्याचे लेणे म्हणून घातले जाई. अशा प्रकारे पेशवेकालीन आहार वेशभूषा पद्धती होती.

### ११.२.४ गुलामगिरी प्रथा -

भारतीय गुलामगिरीचे स्वरूप पाश्चिमात्य जगातील गुलामगिरी सारखे नव्हते. मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्रात गुलामगिरीची प्रथा अस्तित्वात होती. राज्यकर्ते शुद्र जातीच्या लोकांचा उपयोग सामाजिक आणि आर्थिक दृष्टीने करून घेत असत. त्याचप्रमाणे पेशवेकाळात गुलामगिरी प्रथा मोठया प्रमाणात प्रचलित होती. पेशवेकाळात युद्धात पराभूत झालेल्यांना कर्जफेड करू न शकलेल्यांना गुलाम बनवले जात. दुष्काळात उपासमारीमुळे घरातील माणसांचीच विक्री केली जाई. त्यांना गुलाम बनवले जाई. व्यभिचारी स्त्रियांना किंवा फसवण पळून आणलेल्या स्त्रियांनाही गुलाम बनवले जाईल.

गुलामांना मिळणारी वागणूक व त्यांचे जीवन हे त्यांच्या मालकावर अवलंबून असे. शुभप्रसंगी लग्नकार्यात किंवा सणासुदीला गुलामांना मालक चांगले वागवीत. याप्रसंगी त्यांना बक्षिस किंवा भेटवस्तू दिल्या जात. काही वेळा निपुत्रिक मालक गुलामांना दत्तक घेऊन आपला वारस नेमत असत. गुलामांना तारण ठेवण्याची प्रथा त्या काळी होती. खानदेश व गुजरात मधून मोठया प्रमाणात गुलामांची खरेदी करण्यात येत असे. बऱ्याच वेळा कराड,

munotes.in

सिन्नर, सातारा, आंध्र प्रदेश व बुंदेलखंडातून गुलाम पेशव्यांकडे पाठवले जात असे. सिद्दी व मुसलमान गुलामसुद्धा असे. गुलामांमध्ये स्त्री गुलामाची संख्या जास्त असे. घरकाम व शेतकाम ही गुलामांची प्रमुख कामे होती. बऱ्याच वेळा गुलाम स्त्रियांना सुखभोगासाठी ठेवून घेतले जाई. गुलामांची किंमत २० रुपयापासून २०० रुपये पर्यंत असे. गुलामाच्या विक्रीवर जकात आकाराला जात असे. गुलामांनी जर गुन्हा केला, तर त्यांना नाक, जीभ कापण्याची तसेच कडेलोट करण्याची ही शिक्षा दिल्या जात होत्या.

### ११.२.५ वेठबिगारी -

काही मोबदला न देता काम करून घेण्याची पध्दत म्हणजे वेठबिगारी होय. पेशवेकाळात ही पद्धत अस्तित्वात होती. वेठबिगारीचे काही प्रकार होते. सरकारी वेठबिगारी, सरकारी-खाजगी कार्यालयीन वेठबिगारी, चौकी पहारे लष्करी कामाच्या निमित्ताने प्रचलित असणारी वेठबिगारी अशा स्वरुपाची कामे विनावेतन करून घेतली जात असत. शुद्र जातीतील लोक वेठबिगारी पद्धतीला बळी पडले जात होते. तसेच निराधार दुर्बल परावलंबी व असंघटीत व्यक्तींचा, अज्ञानाचा व दुबळेपणाचा गैरफायदा उठवून त्यांना अंकित करून, त्यांच्या इच्छेविरुद्ध शक्तीने व योग्य मोबदला न देता पडेल त्या कामाकरिता राबवून घेणे यालाच वेठबिगारी म्हणत असे आणि अशी वेठबिगाऱ्यांची संख्या पेशवेकाळात जास्त होती. कारण जाती व बंधने असल्यामुळे अस्पृश्य जातींना जास्त प्रमाणात वेठबिगारी म्हणून राबवून घेतले जात होते व त्यांच्यावर मोठया प्रमाणात अन्याय होत होता.

### ११.२.६ वतनदार वर्ग अर्थ कर्तव्य हक्क -

१. अर्थ - "गावाकरिता किंवा देशासाठी करीत असलेल्या कर्तव्याबद्दल त्या व्यक्तीच्या उपजीविकेकरता, मानमरातब राखण्यासाठी आणि जनतेने दिलेले व वंशपरंपरेने चालवणारे उत्पन्न म्हणजे वतन होय. यात चाकरी, वृत्ती, अधिकार, हक्क, नेमणूक यांचा अंतर्भाव होतो. व हे हक्क आणि तदाणूशंगी कर्तव्य उपभोगाची सामान्य राजमान्य आणि लोकमान्य पध्दत म्हणजे वतन संस्था होय. वतन या साधनेच्या उत्पत्ती संबंधित भिन्न मत - मतांतरे आहेत. काही विद्वानांच्या मते, हा शब्द वर्तन या संस्कृत शब्दापासून बनला असून, त्याचा अर्थ उपजीविकेचे शाश्वत साधन किंवा उदरनिर्वाह व वेतन असा आहे.

ग्रामसंस्थांचा कारभार नीटपणे चालवा म्हणून प्राचीन काळी राज्यकर्त्यांनी या वतन संस्थेला मान्यता दिली आणि मग राजे आपल्या मर्जीतील व्यक्तींना विशेष नात्यागोत्यातील व्यक्तिंना गावे इनाम देऊ लागले. जे आपल्या पराक्रमाने राज्य मिळवण्यासाठी व रक्षणासाठी राजांना मदत करील त्यांना कायमस्वरूपी गावेही इनाम देऊ लागली. त्याचप्रमाणे शहाजीराजे भोसले यांनाही त्यांच्या कामावर खुश होऊन पुणे, सुपे, इंदापूर ही वतने दिली गेली होती. परंतु शिवकालखंडात मात्र छत्रपती शिवाजी महाराजांनी ही वतने बंद केली. कारण हे वतनदार वर्ग स्वतः राजा समजू लागले होते व प्रजेचे अतोनात हाल करीत होते. त्यांच्याकडून जास्तीत जास्त सारा वसूल करून, त्यांचे जीवन हलाकीचे करत होते. पण त्यांच्यानंतर छत्रपती राजाराम यांनी पुन्हा ही पद्धत चालू केली. व नंतर पेशवेकाळात तर त्याचे रुपांतर अत्यंत मोठे झाले. वतनदार वर्गाला अत्यंत महत्त्वाचे व मोठे स्थान मिळाले. वतनदार वर्ग पुढील प्रमाणे आहेत.

१. पाटील

२. कुलकर्णी

३. चौगुला

४. देशमुख - देशपांडे

५. शेटे - महाजन

**वतनदार वर्ग - कर्तव्य हक्क**

## १. पाटील -

प्राचीन ग्राम व्यवस्थेतील गावाचा मुख्य वतनदार अधिकारी पाटील असे. पाटील घराणे हे गावातील प्रमुख मानाचे घराणे समजले जाई. 'पटकिल' या संस्कृत शब्दावरून पाटील हा शब्द बनला आहे. पाटील हा गावाचा मुख्य सरकारी अधिकारी असे. गावापासून सरकारला काही जोड उत्पन्न मिळत असे. त्यातील काही पाटलाला मिळत असे, प्रत्येक जमीनदारांकडून हिस्सा पाटलाला मिळत असे. प्रत्येक जमीनदाराकडून पाटलाला काही धान्य किंवा इतर वस्तू मिळत. तसेच कारागिरांकडूनही काही वस्तू भेट म्हणून मिळत असे. पाटील हे गावातील वाद - विवाद व तंटे सोडवण्याचे काम करीत असे. गावाचे सर्व अधिकार पाटलांकडे असल्याने न्यायदानाचे काम हे पाटील करीत असे. पुढे पेशवे काळात कायदा सुव्यवसाय  राखण्यासाठी कोतवालीस महत्त्व प्राप्त झाले. पाटलाचे कर गोळा करणे, जमिनीच्या नोंदी ठेवणे, गावात शांतता राखणे, गुन्हेगारी आळा बसवणे ही कामे प्रामुख्याने करावी लागत असे. संकटकाळी गावात सैन्य निर्माण करून, स्वराज्याचे सेवेत हजर राहावे लागत असे. त्यामुळे स्वराज्याचा गावगाडा चालवत न्यायपूर्ण वर्तणुकीमुळे अनेक पाटील इतिहासात नावारुपाला आले होते. अशा प्रकारे पेशवेकाळात पाटील या वतनदार वर्गाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले होते.

## २. कुलकर्णी -

प्राचीन काळापासून हिशोब ठेवण्याचे काम हे कुलकर्णी वर्गाकडे असे व हे कुलकर्णी ब्राह्मण असत. तसेच प्राचीन ब्राह्मण संस्थेतील एक अधिकारी वतनदार असे. त्याला मिळालेल्या वतनाला लेखनवृत्ती म्हणत असत. हे वतन सुमारे एकहजार वर्षाचे जुने आहे. गावातील ऐकूण जमिनीचा पंचविसावा हिस्सा पाटील, कुलकर्णी, चौगुले यांना इनाम देण्याची प्रथा होती. त्यांच्या कामावर खुश होऊन त्यांना वतने ही दिली जात होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात त्यांनी वतने देणे बंद केले. परंतु नंतर छत्रपती राजारामांच्या काळात पुन्हा ही पद्धत त्यांनी चालू केली व त्यांच्याच प्रमाणे पेशव्यांनी ही वतने देण्याची प्रथा चालू ठेवली.

## ३. चौगुला -

प्राचीन ग्राम संस्थेतील गावाची व्यवस्था ठेवण्याचे काम तसेच पाटलास मदत करणारा एक वतनदार अधिकारी म्हणजे चौगुला होय. हा साधारणत: कुणबी असे, परंतु कोणत्याही वतन दारास पूर्वी आपल्या वतनाचा भाग दुसऱ्यांना देण्याचा किंवा विकण्याचा हक्क असल्यामुळे

वाणी, मराठा, लिंगायत वगैरे जातीतही चौगुला वतनाची परंपरा आढळते. गावाच्या एकंदर जमिनीचा पंचविसावा हिस्सा पाटील कुलकर्णी व चौगुला यांना मिळत असे. सारा वाचून देण्याची वहिवाट होती. याशिवाय त्यांची कामे म्हणजे गावाची कोठारे, गोदामे यांची व्यवस्था त्यांच्याकडे असे.

**४. देशमुख व देशपांडे -**

हे उच्च श्रेणीतील परंपरागत वतनदार असून वंशपरंपरेने आपली कामे सांभाळत असे. देशमुख म्हणजेच लष्करी व फौजी अधिकारी होय. गावाचे रक्षण जसे पाटील करीत तसेच परगण्याचे संरक्षण देशमुख करीत असे. लढाईच्या प्रसंगी पाटील व देशमुख, देशपांडे यांनी अमुक एवढे सैन्य सरकारास पुरवावे असा करार असत. गावात वसाहत करणे, शेती, उद्योगधंदे सुरु करणे आणि मध्यवर्ती सत्तेतील विशिष्ट सारा गोळा करून देणे ही देशमुखांची कामे असे. परागण्यातील सर्व जमाबंदीचा ते हिशोब ठेवीत आणि वसुलीची देखरेख ठेवी. त्यांच्याजवळ थोडयाफार प्रमाणात सैन्य असे आणि त्यांना लष्करी बळावर गढया, कोट बांधून त्यात ते वास्तव्य करीत. भेट, तोरण, घट, जोडा, पासडी, तूप, तेल वगैरे वस्तू त्यानांही अधिक प्रमाणात मिळत असे. देशपांडे यांकडे परगणातील सर्व गावाचा हिशोब पाहण्याचे काम असे. पेशव्यांनी देशमुख व देशपांडे यांना परगण्याच्या कामकाजाचे पूर्ण नियमन करण्याचे काम दिले होते व त्यांनी चांगले काम केले की, त्यांना पेशव्यांकडून इनाम व बक्षिसे दिले जात होते.

**५. शेट्टे - महाजन -**

या वतनाचा संबंध व्यापाराशी असे. प्रामुख्याने वाणी व्यवसायाशी निगडित संबंध असून गुजरात महाराष्ट्रातील प्रमुख शहरात व्यापार चालत असे तसेच ग्रामव्यवस्थेत ही त्यांचे स्थान महत्त्वाचे होते. इतर वतनाबरोबर हे वतन वृद्धिंगत झाले. अर्थव्यवस्थेचे नियमन करणारी संस्था म्हणून तिचे महत्त्व होते. गावातील सावकारीचे व्यवसाय शेट्टी महाजन करीत असत. तराजू ही त्यांची व्यवसायिक निशाणी होती. पाटील व कुलकर्णी याप्रमाणे त्यांना हक्क मिळत असे.

## ११.३ पेशवेकालीन जातीय संस्था

यादवकालीन सामाजिक स्थितीमध्ये अस्पृश्यांचे जे स्थान होते, त्यामध्ये शिवकाळात व पेशवेकाळात फारसा बदल झालेला दिसत नाही. पूर्वीसारखेच चार म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शुद्र हे वर्ण होते. जातीनुसार व्यवसायाची परंपरा चालू होती. तसेच या काळात बलुतेदारी पद्धतदेखील होती. बारा बलुतेदार या काळात अस्तित्वात होते. त्यापैकी चांभार, महार, मांग, न्हावी यांचा समावेश शुद्रांमध्ये होत असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात वर्णव्यवस्था व जाती व्यवस्थेतील भेद होते. परंतु महाराजांनी स्वतः कधीच जातीवरून माणसाची योग्यता ठरवली नाही, तर त्यांच्या गुणांवरून त्यांची योग्यता ठरवली. तसेच त्यांनी कधी जातीमध्ये भेद केला नाही. परंतु पेशवाई काळातील समाज अत्यंत कर्मठ, धर्मभोळा, शिवाशिव पाळणारा व जाती - जातीमध्ये विभागलेला समाज होता. महार, मांग, चांभार या पेशवेकाळातील प्रमुख अस्पृश्य जाती होत्या व या अतिशय दुः खी व कष्टी असे जीवन जगत होत्या.

### ११.३.१ अस्पृश्यांचे जीवन, कर्तव्य व हक्क -

वैदिक कालखंडात व उत्तर वैदिक कालखंडामध्ये समाज हा चार वर्णांमध्ये विभागाला गेला होता. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र होय. वैदिक कालखंडामध्ये समाजावर जाचक बंधने नव्हती. परंतु नंतर उत्तर वैदिक कालखंडामध्ये समाजावर अनेक जाचक बंधने निर्माण झाली. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे तीन वर्गावर जास्त बंधने नव्हती, पण शुद्र या वर्णावर अनेक जाचक बंधने निर्माण झाली. पेशवेकाळात तर ब्राह्मण वर्ग हा स्वतः ला श्रेष्ठ समजू लागला होता. तसेच बारा बलुतेदार होते, पण चांभार, महार, मांग व न्हावी हे शुद्र जाती म्हणून ओळखल्या जात होत्या. त्याच्यावर अनेक जाचक बंधने तर होतीच तसेच त्यांना अनेक निर्बंध लादण्यात आले होते.

अस्पृश्यांच्या परिस्थितीमध्ये महत्त्वाचा फरक पडला ते पेशवेकाळात पेशवे स्वतः ब्राम्हण असल्यामुळे ब्राह्मण जातीचा समाजावर अधिक प्रभाव होता. आपल्या हातातील सत्ता दुसऱ्या वर्गाकडे जाऊ नये अशी वरिष्ठ वर्गाची इच्छा असल्यामुळे, सहाजिकच पेशवेकालीन वतन, वतनदारांमध्ये वेळोवेळी संघर्ष निर्माण झाले. त्यामुळे जाती-जातीत वारंवार कटू संघर्ष निर्माण झाले. पेशव्याने हा संघर्ष मिटवण्याऐवजी त्याला खत-पाणी घालून राज्य चालविले. पेशव्यांच्या या भेदनीतीमुळे समाज जातीय तणावाने पोखरला गेला व जातीबंधने अधिक कडक होत केली. ही बंधने न पाळणाऱ्यांना कडक शिक्षा होत असे.

**कर्तव्य :** अस्पृश्य समाजातील लोकांना वरिष्ठ जातीतील समाजाची सेवा करावी लागत होती. विशिष्ट जातीसाठी विशिष्ट काम ठरलेले होते. तो त्या - त्या जातीचा कायमचा व्यवसाय होता. जातीनिष्ठ व्यवसायामुळे कायमचा हीन दर्जा प्राप्त झालेल्यांना त्यामधून सुटका नव्हती. त्यामुळे अस्पृश्यांच्या वाट्याला निम्नस्तरीय कामे व कामामुळे हीन दर्जा आला होता. महार, मांग, रामोशी या जातींचा समावेश सेवक वर्गामध्ये केला जाई व त्यांना गावातील हलकी कामे करावी लागत असे. महार हा गावाचा वतनदार असे व त्याचे तरळाकडे दवंडी पिटवण्याचे काम असे, तर गुन्ह्याच्या तपासाचे काम मांग व रामोशी करत.

पेशव्यांच्या सैन्यात हूलस्वार म्हणून एक वर्ग असे, त्यात महार, मांग, चांभार, मेहतर इत्यादी जातीचे लोक असत. ही बिनीची तुकडी असून, लढाईत व प्रवासात नेहमी आघाडीवर असे. प्रवासात रस्ता मोकळा करण्याचे, तर लढाईत शत्रूवर पहिला हल्ला चढवण्याची त्यांच्यावर जबाबदारी असे. प्रसिध्द इतिहासावर आबा चांदोरकरांनी दिलेल्या माहितीनुसार, हूलस्वरांना उच्च दर्जाच्या स्वरांप्रमाणे १२ ते २५ रुपये पर्यंत दरमहा पगार असे. सेनायक मांग या शिलेदाराचा वार्षिक तनखा ४०० रुपये असून, त्याच्या हाताखाली दोन स्वरांना १०० रुपये मिळत. तर सिदनाक महार यास सालीना ४०० रुपये रोख व शंभर रुपयाचे कापड मिळत असे.

**हक्क :** अस्पृश्य जातींना समाजातील उच्चवर्ग त्यांच्या सेवेत ठेवीत असत. परंतु त्यांना कोणत्याच प्रकारचे हक्क दिले गेले नव्हते. या समाजाला शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. तसेच ब्राह्मणांप्रमाणे होम, हवन, देवपूजा करण्याचा अधिकार नव्हता.

### ११.३.२ अस्पृश्यांवरील जाचक निर्बंध -

वैदिक वाङ्मयात व बौद्ध ग्रंथांमध्ये चांडाळ या अस्पृश्य जातीचा उल्लेख आढळतो. परंतु वैदिक काळात चांडाळ हे अस्पृश्य असल्याचा उल्लेख सापडत नाही. स्मृती ग्रंथात ब्राह्मण स्त्री व शुद्र पुरुष यांच्या संबंधातून चांडाळांची उत्पत्ती झाली असा उल्लेख आहे. तसेच प्राचीन कालखंडापासून या चार वर्णानुसार समाज विभागाला गेला आहे. त्यानुसार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र हे होय. त्यामध्ये शुद्रांवर समाजाने अनेक प्रकारचे जाचक बंधने निर्माण केली होती . अस्पृश्यांची घरे गावाबाहेर होती. या लोकांनी मेलेल्या व्यक्तीचे कपडे वापरावे, फाटक्या तुटक्या भांडयातून जेवावे व लोखंडाचे दागिने वापरावे, अशा प्रकारचे अनेक दंडक मनूस्मृतीत  सांगितले आहेत.

अस्पृश्य जातीस बऱ्याच सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय निर्बंधांना तोंड देऊन जगावे लागले आहे. कारण यांची घरे गावापासून दूर असे, शिवाय यांची घरेही भक्कम मजबूत नव्हती, तसेच पेशवेकाळात पुणे शहराच्या हद्दीत सकाळी व सायंकाळी ज्यावेळी सावल्या लांब पडतात. त्यावेळी महार, मांगांना येण्यास मज्जाव होता. असा उल्लेख सापडतो. कारण उच्चवर्णीयांना या सावलीमुळे विटाळ होत असे. अस्पृश्यांना रस्त्यावर थुंक टाकण्याची मनाई होती. म्हणून ते गळ्यात एक भांडे अडकवत व त्यामध्ये थुंकत. शिवाय कमरेला मागच्या बाजूस झाडू बांधला जायचा. जेणेकरून त्यांच्या पाऊल खुणा रस्त्यावर राहू नये, म्हणून पादत्राणे वापरणे, सोन्या - चांदीचे दागिने घालणे, छत्री वापरणे, डोक्यावर साफा बांधणे, कोट अंगरखा घालणे, झोपण्यास खाट वापरणे इत्यादी अनेक बाबतीत निर्बंध होते. पाणवठयावर पाणी भरण्याचा अधिकार नसे. कोणत्याही मंदिरात प्रवेश मिळत नसे, शिवाय पूजा - अर्चा करण्यावर यांच्यावर निर्बंध आखले होते. तसेच कोणतेही धार्मिक कार्य ते करू शकत नव्हते.

अशाप्रकारे पेशवेकाळामध्ये मोठया प्रमाणात अस्पृश्य समाजावर अनेक निर्बंध लादले होते. म्हणून त्यांचे जीवन अत्यंत दुः खी व कष्टमय झाले होते. त्यांच्यावर झालेल्या अनेक निर्बंधामुळे त्यांना कोणत्याच प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते.

## ११.४ पेशवेकालीन स्त्रियांची स्थिती

पुराणकाळात स्त्रीचे स्थान गौण होते. सामाजिक-सांस्कृतिक जीवनातल्या तिच्या मर्यादा ही निश्चित होत्या. शिवकाळ व पेशवेकाळात आहे त्या स्थानाची आणि समाजाने बाळगलेल्या स्त्रीविषयी दृष्टिकोनाचे भलेपुरे परिणाम प्रकाशाने प्रकट करणारा हा काळ होता. मुलींच्या लग्नाचे वय त्या काळात आणखी कमी होत गेले आणि बालविवाहाची प्रथा सर्वत्र रूढ झाली. जिजाबाईंचे लग्न त्यांच्या वयाच्या नवव्या ते दहाव्या वर्षी झाले असावे, आणि शिवाजी महाराजांचे सईबाईशी लग्न झाले तेही सईबाईंच्या वयाच्या सातव्या ते आठव्या वर्षीच. अर्थात लग्न लवकर झाले तरी, वयात येईपर्यंत मुलगी बहुदा माहेरीच असे. ऋतूप्राप्तीनंतर ती सासरी येई. गृहकृत्याचे, कुटुंबाने चालविलेल्या रूढी-परंपरांचे, सांस्कृतिक आणि धार्मिक प्रथांचे रितीरिवाजांचे, सणसमारंभाचे शिक्षण तिला दोन्ही घरांमधून मिळत असे. लेखन वाचनाची आणि औपचारिक शिक्षणाशी तिचा संबंध नव्हता आणि एकूणच धर्मप्रधान समाज व्यवस्थेचे परिणाम पुरुष वर्गापेक्षा स्त्री वर्गावर जास्त

असल्यामुळे तिच्या ज्ञानसंपदाचा रोख धर्माकडेच वळलेला असणे स्वाभाविक होते. त्यातही कर्मकांड, व्रत वैकल्य यांचा भाग अधिक होता.

लेखन - वाचन करणाऱ्या स्त्रिया संख्येने अगदी कमी होत्या, पेशवे काळात बाळाजी विश्वनाथांची पत्नी राधाबाई आणि कन्या उमाबाई, पहिल्या बाजीरावांची पत्नी काशीबाई, नारायणरावांची पत्नी गंगाबाई याशिवाय आनंदीबाई अशा काही साक्षर बहुश्रुत ज्ञानप्रेमी वाचनवेडया स्त्रिया ही या काळात आढळतात. सगुणाबाईंचा स्वतःचा एक ग्रंथ संग्रह होता राधाबाई वाचनाच्या विविध अंगी होत्या. आनंदीबाई ह्या तर अनेक अर्थाने कर्तबगार आणि बुद्धिमान स्त्री होती. त्यांना राज्यकारभाराचे ज्ञान होते. त्या मोठया महत्त्वकांक्षी होत्या. मराठा काळातील जिजाबाई, येसूबाई, ताराबाई, शाहू छत्रपतींच्या राण्यात असे अनेक स्त्रिया, अतिशय हुशार व कर्तबगार होत्या. त्याचप्रमाणे पेशवेकाळातील बाळाजी विश्वनाथांची पत्नी राधाबाई, काशीबाई, सगुणाबाई. उमाबाई, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई अशा अनेक स्त्रिया या अतिशय हुशार व कर्तबगार होत्या. परंतु त्यांच्यासाठी शिक्षण व्यवस्था ही मर्यादित स्वरुपाची होती. या काळात स्त्रियांना कोणत्याही प्रकारचे औपचारिक शिक्षण देण्याची पद्धत नसल्याने त्यांना घरगुती स्वरूपाचे शिक्षण देण्यात येई. या शिक्षणाचा त्यांना आपल्या संसारात विशेष उपयोग होत असे.

**अ) पेशवाई स्त्रिया -**

पेशवे कुटुंबातील सख्खे सावत्र चुलत व दत्तपुत्र असलेल्या तमाम पुरुषांच्या विवाहामुळे ५५ ते ६० सु - स्वरूप ब्राह्मण स्त्रिया पेशवे घराण्यात सासुरवासिनी म्हणून आल्या होत्या. या सगळ्या स्त्रिया अतिशय सुरेख आणि हुशार होत्या. बाळाजी विश्वनाथ यांची पत्नी राधाबाई यांना बघून इतक्या सुरेख वधु मिळतात तरी कुठे, असा प्रश्न छत्रपती शाहू महाराजांच्या राणी वंशाला पडत असे. म्हणून पेशव्यांकडील विवाह, समारंभाला देखणीवधू बघण्यासाठी त्या स्त्रिया आवर्जून येत असत.

पेशवेकालीन महत्त्वाच्या स्त्रिया -

१. आनंदीबाई - मोरो भिकाजी थत्ते यांची कन्या चिमाजी आप्पांची पत्नी.

२. आनंदीबाई - रघुनाथ उर्फ राघव राघोबा दादांची दुसरी पत्नी.

३. उमाबाई - सदाशिवराव भाऊंची पत्नी.

४. जानकीबाई - रघुनाथराव उर्फ राघोबादादांची पहिली पत्नी.

५. काशीबाई - थोरल्या बाजीरावांची पत्नी.

६. गंगाबाई - नारायण रावांची पत्नी.

७. गोपिकाबाई - बाळाजी बाजीराव यांची पत्नी.

८. दुर्गाबाई - विश्वास रावांची पत्नी.

९. पार्वतीबाई - सदाशिवराव भाऊंची पत्नी.

munotes.in

**१०. मस्तानी थोरल्या बाजीरावाची दुसरी पत्नी.**

अशा अनेक सुंदर, कर्तबगार, हुशार स्त्रिया या पेशवे काळात होत्या. संस्काराने संपन्न अशा त्या स्त्रिया होत्या. प्रत्येक यशाच्या मागे या स्त्रियांचा मोठा वाटा होता. पेशवे काळातील या अनेक स्त्रियांच्या पत्राचा उल्लेख इतिहासात आढळतो. पेशवे काळातील स्त्रिया या जरी शिक्षण घेतलेल्या किंवा मानाचे स्थान मिळविलेल्या असल्या तरी, या काळात त्यांच्यावर अनेक बंधने होती व अनेक कर्मठ, रूढी-परंपरांना त्यांना तोंड द्यावे लागत होते. बालविवाह, सतीची चाल, केशवपण, विधवांची दयनीय अवस्था व त्यांच्यावरील जाचक बंधने अशा अनेक कर्मठ, रूढी-परंपरांमुळे त्यांच्यावर अन्याय होत होते. उच्च कुळातील स्त्रियांची जर ही अवस्था होती तर खालच्या स्तरावरील स्त्रियांची यांच्याहीपेक्षा दयनीय अवस्था होती.

**ब) स्त्रियांचा दर्जा -**

प्राचीन कालखंडापासून स्त्रियांच्या दर्जाचा विचार केला तर प्रत्येक कालखंडापासून त्यात बदल झालेला दिसतो. जसे सिंधू काळात असलेले मानाचे स्थान. नंतर वैदिक व उत्तर वैदिक कालखंडामध्ये त्यांच्यावर लादलेले जाचक बंधने. यापासून सतत त्यांच्या स्थितीत बदल होत गेला. वैदिक काळात स्त्रियांना जे पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते, ते हळूहळू कमी होत गेले. स्मृतीकाळात तर 'मनु' एके ठिकाणी स्त्रिला देवी म्हणतात. पण दुसरीकडे त्यांना कोणतेही स्वातंत्र्य देण्याचे कारण नाही असे म्हणतात. यानंतर पुढे स्त्रियांवर अनेक जाचक बंधने लादली गेली. स्त्रियांच्या शिक्षणाचा अधिकार हिरावून घेतला, प्रौढ विवाहाचा अधिकार काढून घेतला. सतीची चाल, केशवपण, बालविवाह, अशा कर्मठ रूढी - परंपरा रूढ झाल्या. त्यामुळे स्त्रियांचे स्थान व दर्जा मोठया प्रमाणात घसरत गेला. पेशवाईच्या उत्तरकाळात तर स्त्री ब्राह्मण असो किंवा शुद्र असो. तिने सर्व अधिकार गमावलेले असे. रांधणे, शिजवणे, घरातील काम पाहणे, धार्मिक अनुष्ठाने पाहणे, हेच त्यांचे कार्य उरले होते.

स्त्री म्हणजे एक प्रकारची दासी आहे आणि तिला सांभाळणे, खावू-पिऊ घालणे हे तिच्यावर आपण उपकार करतो अशी पुरुषांची भावना होती. वैवाहिक पत्नी खेरीज दासी, कुणबिनी वैश्या यांचा उपभोग घेणे, हा सरदार, श्रीमंत, सुख वस्तू लोकांचा शोकच मानला जात असे. दारिद्र्याने गांजलेला गरीब वर्ग आपल्या मुली बाळींना या व्यवसायातील दलालांना विकत. त्या मोठया झाल्या की, कुणबीण म्हणून विक्री होई आणि त्या मालकाची सेवा करीत. स्त्री म्हणजे फक्त उपभोगाची वस्तू आहे असा त्या काळाचा समाज होता. नायकिणी या नृत्य गायनात कुशल असत. सरदार यांचे आपल्या दरबारात कार्यक्रम ठेवत. पेशवाईची राजधानी पुणे हे त्या काळात भारतातील इतर भागातून येणाऱ्या नायकिणींचे आश्रयस्थान बनले होते. तसेच देवाला मुली वाहण्याची देखील प्रथा होती. या प्रथेतूनच देवदासी प्रथा चालू झाली. अशा अनेक जाचक व कर्मठ, रूढी-परंपरामुळे समाजातील स्त्रियांचा दर्जा अत्यंत खालावलेला होता.

**क) स्त्रियांवरील जाचक बंधने व प्रथा -**

**१. सतीची चाल -**

प्राचीन संस्कृतीचा अभ्यास केला तर त्यामध्ये कोठेही सतीची चाल हा प्रकार दिसत नाही. जसे सिंधू संस्कृती, सिंधू संस्कृतीमध्ये कुठेही सतीची चाल ही पद्धत रूढ नव्हती. परंतु



munotes.in

आर्यांच्या आगमनानंतर उत्तर वैदिक काळामध्ये ही पद्धत रूढ झाली. मुस्लिमांच्या स्वाऱ्या, स्त्रीच्या अलंकारावर घरातल्यांचा डोळा, विधवा जर तरुण असेल तर तिच्या पाय घसरण्याच्या कुटूंबाला बट्टा लावू नये याची दक्षता, सतीचा विधी करणाऱ्या ब्राह्मणास भर भक्कम दक्षिणा, इत्यादी कारणांनी सतीची चाल बोकाळली. छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे यांच्या मृत्यूनंतर जिजाबाईनी सती जाण्याचा आग्रह धरला परंतु खूप विनंती करून त्यांनी त्यांचा निर्णय बदलला. मुसलमानांच्या आक्रमणाच्या काळात पराभवाची चिन्हे दिसू लागताच आपली अब्रू शाबित ठेवण्यासाठी राजपूत स्त्रिया सामुहिक रित्या अग्नीत उडया टाकून जोहार करत. पण पुढे मात्र पेशवाईत सतीची चाल अतिशय प्रतिष्ठित पावली. तरुण स्त्रीची, विधवेची सती जाण्याची इच्छा नसेल तर तिला मादक पदार्थ पाजत व तिच्या किंकाळ्या कुणाला ऐकू जाऊ नये, म्हणून ढोल नगारे मोठयाने वाजवत. तिचे सगे - संबंधी व नातेवाईकसुद्धा हे दृश्य स्वतःच्या डोळ्याने पाहत असे. पण कोणालाही त्यांची दया येत नसे. हा एक धार्मिक भाग आहे म्हणून त्याला महत्त्व जास्त दिले गेले होते. त्यामुळे स्त्रियांना या कर्मठ चालीमुळे अतिशय हीन अशी वागणूक मिळत होती, व अतिशय मोठया प्रमाणात त्यांच्यावर अत्याचार होत होते. माधवराव पेशव्यांची पत्नी सती गेली होती. म्हणजेच पेशव्यांच्यात देखील सतीची चाल होती. यावरून सर्वसामान्य स्त्रियांची काय अवस्था असेल याची आपण कल्पना करू शकतो.

### २. विधवेचे जीवन -

ज्या स्त्रिया सती जात नसे, त्यांना दुसऱ्या विवाहाचा अधिकार नसे. पेशवेकाळानंतर त्यांची स्थिती अत्यंत दयनीय झाली. केशवपण करून अत्यंत जडे भराडे लाल रंगाचे पातळ, नेसून, घरातील एका कोपऱ्यात जीवन जगावे लागत होते. त्यांना शक्यतो घराबाहेर पडू नये, अशी बंधने घातली होती. विधवा स्त्री सासरी राहिली किंवा माहेरी गेली, तरी तिला खूप कष्ट करावे लागत होते. तिचे जेवणसुद्धा साधेच होते. तिचे तोंड सण - समारंभाच्या दिवशी पाहणे अशुभ मानले जायचे. म्हणून तिला या उत्सवाच्या दिवशी तिच्या खोलीच्या बाहेर येण्यास मनाई असे, बालविवाहाची प्रथा तर होती. पण नंतर पाळण्यातच लग्न लागली जायची आणि एखाद्या वेळी या पाळण्यात झालेल्या मुलीच्या विवाह नंतर तिच्या पतीचा मृत्यू झाला तर तिला जन्मभर विधवेचे जीवन जगावे लागत होते. पेशवेकाळात तर हे नियम अतिशय कटाक्षाने पाळले जात होते. त्यामुळे त्या काळातील स्त्रीयांचे जीवन अतिशय दयनीय झाले होते. कारण फक्त घरामध्ये ती स्त्री डामून ठेवली जात होती व तिच्यावर अन्याय व अत्याचार केले जात होते.

### ३. स्त्रियांचा आर्थिक अधिकार -

पेशवेकाळात स्त्रियांना कपडे पुरवणे, एखादा दूसरा अलंकार घालणे, एवढीच त्यांची आर्थिक चैन होती. श्रीमंत ब्राह्मण स्त्रियां जास्तीचे दागिने घालत असत. पित्याच्या घरून तिला मिळालेले स्त्रीधन हे विवाहानंतर सासरच्या मालकीचे होई. संपत्तीचा कोणताच अधिकार त्यांना नव्हता. सरदार घरातील स्त्रियांना शस्त्र चालवणे, घोडयावर बसणे, भाला फेक करणे, राजकीय मसलतीत भाग घेणे याचा जरी लाभ मिळाला असला, तरी तो अपवादात्मकच उदाहरणे होती. पेशवाईचा नाश झाला तरी, दीर्घकाळ त्या गुलामगिरीत जगत होत्या.

### ४. गुलामगिरी पद्धत -

प्राचीन कालखंडापासून गुलामगिरी पद्धत चालू होती. तसेच पेशवाईमध्येसुद्धा मोठया प्रमाणात गुलामगिरी पद्धत अस्तित्वात होती. तसेच पेशवेकाळात दास - दासी बाळगण्याची पद्धत समाजमान्य असल्याचे दिसते. पेशाव्यातील राजवाडे, सरदार, श्रीमंत व सुखवस्तू लोक आपल्या पदरी कुणबीने - बटकीन बाळगत. त्यांची खरेदी विक्री करत. ६०रु. बटकीनीची किंमत ठरवली जात व मुलासह बटकीणीची किंमत रुपये १५० असे. तावजी भंडारी या शिलेदाराने एक बटकीन साठ रुपयाला, तर तुकोजी शिंदे यांनी पोरासह १५० रुपयात विकत घेतल्याचे वा. कृ. भावे यांच्या पेशवेकालीन महाराष्ट्र या ग्रंथात म्हटले आहे.

### ५. स्त्री-शिक्षणाचा अभाव -

स्त्री शिक्षणापासून अनेक शतकापासून वंचित राहिली होती. तिला शिक्षणाचा अधिकार नव्हता, तिने फक्त चूल व मूल पहावे, असा त्या काळाचा समाज होता. आठव्या व नवव्या वर्षी विवाह होणाऱ्या बालवधूकडून शिक्षणाची अपेक्षा तरी काय करावी, स्त्रियांनी शिक्षण घेऊ नये, असा त्या काळातील समाजाचा विरोध होता. असे असले तरी पेशवे, शिंदे, होळकर, पटवर्धन, दाभाडे, गायकवाड यांच्या घराण्यातील स्त्रियांना परंपरागत शिक्षण मिळाले होते. काही स्त्रियांजवळ स्वतः चा ग्रंथ संग्रह होता. तसेच राजपूत व मराठा घरातील स्त्रियांना भालाफेक, तलवार चालवणे, घोडयावर बसणे, हत्यारे चालवणे, या सर्वांचे शिक्षण दिले जात होते. ताराबाई, अहिल्याबाई होळकर, उमाबाई यांसारख्या स्त्रियांनी युद्धकलेत व प्रशासनात लौकीक प्राप्त केला होता. हे तर राजघरातील स्त्रियांबाबतीत होते. परंतु सर्वसामान्य स्त्रियांना कोणत्याच प्रकारचे शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे त्यांचे जीवन अतिशय कष्टमय झाले होते.

### ६. अनिष्ट रूढी-परंपरांचा स्त्री जीवनावर परिणाम -

स्त्री जीवनावर मोठया प्रमाणात प्राचीन व मध्ययुगीनकाळी अनिष्ट, रूढी परंपराचा परिणाम त्यांच्या जीवनावर झाल्याची दिसून येते. त्यावेळी अनेक कर्मठ प्रथा-परंपरा होत्या, जसे अनिष्ट जातीत मूल झाल्यास ते यल्लमा आणि खंडोबा या देवांना वाहण्याची रूढी होती. अशा देवास वाहिलेल्या मुलीस मुरळी व देवदासी म्हणत. देवदासी मुरळ्यांचे काम, देवीची सेवा करण्याचे होते. पण बऱ्याचदा अशा स्त्रिया वासनेच्या शिकार बनत. त्यांना विवाह करण्याची मुभा नव्हती. काही स्त्रिया जीवनाला वैतागून जोग घेत. त्यांना जोगतीने असे संबोधत. एकूणच अशा स्त्रियांचे जीवन अतिशय कष्टप्रद व दु : खाने भरलेले होते.

## ११.५ सारांश

पेशवेकाळातील समाजव्यवस्था जात आणि स्त्रियांची स्थिती वरील सर्व घटकांच्या माध्यमातून स्पष्ट होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळाची जी समाजव्यवस्था होती, त्यामध्ये प्रजा अतिशय सूखी जीवन जगत होती. परंतु पेशव्यांच्या काळात त्यांच्या कर्मठ रूढी, परंपरा यांची जाचक बंधने, जातीयतेविरुद्ध कडक नियम, समाजाची जातीयतेविरुद्ध केलेली विभागणी व स्त्रियांची दयनीय अवस्था यांच्यावर घालून दिलेले अनेक जाचक बंधने, व कर्म, रूढी-परंपरा यांना बळी या सर्व कारणांमुळे समाज हा अत्यंत दुः खी व कष्टी होता. या सर्व कारणांमुळेच तर पेशवाईचा पुढे अंत घडून आला.

## ११.६ प्रश्न

१. पेशवेकालीन सामाजिक जीवन सविस्तर स्पष्ट करा ?

२. पेशवेकालीन अस्पृश्यांचे जीवन, कर्तव्य व त्यांचे हक्क सविस्तर स्पष्ट करा ?

३. पेशवेकालीन वतनदार वर्ग यावर टीप लिहा.

४. पेशवेकालीन स्त्रियांच्या स्थितीचे सविस्तर वर्णन करा.

## ११.७ संदर्भ

१. मोरवंचीकर रा. श्री., आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण - शिल्पकार चित्रकोष खंड - १, प्रकाशक - साप्ताहिक विवेक (हिंदुस्तान प्रकाशन संस्था).

२. कोंडेकर, ए. वाय. - मराठयांचा इतिहास, फडके प्रकाशन.

३. कोलारकर श. गो - मराठयांचा इतिहास - मंगेश प्रकाशन, (२००३).

४. काळे म. वा., मराठयांचा इतिहास, प्राची प्रकाशन, मुंबई १९९८.

५. भामरे जितेंद्र, मराठयांचा इतिहास – शेठ पब्लिकेशन, मुंबई

❖❖❖❖

munotes.in

# १२

# पेशवेकालीन सांस्कृतिक विकास – साहित्य, कला आणि वास्तुकला

**घटक रचना :**

१२.० उद्दिष्टये
१२.१ प्रस्तावना
१२.२ पेशवेकालीन सांस्कृतिक विकास
अ) पेशवेकालीन साहित्य –
१२.१.१ गद्य वाङमय
१२.१.२ बखर
१२.१.३ शाहिरीकाव्य-पोवाडा
१२.१.४ लावणी
१२.३ पेशवेकालीन कला
१२.३.१ संगीत
१२.३.२ नृत्य
१२.३.३ नाटक
१२.३.४ चित्रकला
१२.३.५ शिल्पकला
१२.४ पेशवेकालीन स्थापत्य
१२.४.१ नगर रचना
१२.४.२ वाडे
१२.४.३ इमारती
१२.४.४ मंदिरे
१२.४.५ किल्ले
१२.४.६ गडी
१२.४.७ नद्यांवरील घाट
१२.४.८ पाण्याची व्यवस्था
१२.५ पेशवेकालीन वास्तुकला
१२.६ सारांश
१२.७ प्रश्न
१२.८ संदर्भ

munotes.in

## १२.० उद्दिष्टये

१. पेशवेकालीन साहित्याची माहिती घेणे.

२. पेशवेकालीन कला व स्थापत्य जाणून घेणे.

३. पेशवेकालीन वास्तुकलेविषयीची माहिती घेणे.

## १२.१ प्रस्तावना

प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक या तीनही कालखंडामध्ये जसा सामाजिक, आर्थिक, राजकीय घटकांचा अभ्यास केला जातो. त्याचप्रमाणे सांस्कृतिक घटकांचाही अभ्यास केला जातो. कारण सांस्कृतिक घटकांच्या माध्यमातून प्रत्येक काळातील सामाजिक जीवनाची माहिती मिळते. तसेच सांस्कृतिक विकासाच्या माध्यमातून कला, वाङमय, साहित्य, वास्तुकला, शिल्पकला या सर्व घटकांची माहिती मिळते व सांस्कृतिक विकासाचा ही आढावा घेता येतो.

मराठयांच्या इतिहासाचा अभ्यास करताना आपण शिवकालीन व पेशवेकालीन घडामोडींचा, लढायांचा अभ्यास केला. त्याचबरोबर या काळातील प्रशासन, अर्थव्यवस्था याचाही मागोवा घेतो, कारण हिंदुस्तानच्या इतिहासात या सर्व गोष्टींना फार महत्वाचे स्थान आहे. यामुळे मराठयांच्या काळातील अभ्यासकांना आपोआपच संस्कृतीचा ही शोध घेणे आवश्यक वाटते. खरे पाहता शिवकाळात प्रामुख्याने सततच्या संघर्षमय व युद्ध जन्य परिस्थितीमुळे सांस्कृतिक विकास प्रमाणात होऊ शकला नसला तरी पेशवेकाळात वाढ झालेली दिसून येते. या काळातील वाङमयीन, शैक्षणिक, कला, स्थापत्य यांचा विकास घडवून आला. तसेच पेशवे काळात संगीत, नृत्य, लावणी, तमाशा, फड, पोवाडा, शाहीर या सर्व घटकांमुळे सांस्कृतिक विकास मोठया प्रमाणात झाला.

## १२.२ पेशवेकालीन सांस्कृतिक विकास

प्राचीन, मध्ययुगीन तसेच आधुनिक अशा तीनही कालखंडामध्ये कला, स्थापत्य आणि वास्तुकला यांना खूप महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. प्राचीन राजे राजवाडयांपासून ते आजतागायत सांस्कृतिक विकासाकडे सर्व स्तरावर विकास होत आहे. तसेच प्राचीन कालखंडापासून कला व वाङमय, तसेच वास्तुकलेचा मोठया प्रमाणात विकास झाला आहे. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे आपण आजही त्या काळातील वाङमय ग्रंथ, पुराणे, नृत्यकला, पोवाडा, शाहिरी पोवाडे, चित्रकला वेगवेगळ्या सुंदर वास्तू, शिल्प, लेणी, मंदिरे हे त्या काळातील सांस्कृतिक विकास दर्शवतात, हे सर्व खरे असले तरी पेशवे काळात प्रामुख्याने राजकारणाकडे त्यांचे लक्ष केन्द्रित असल्याने पेशव्यांना कला, स्थापत्य व वास्तुकलेचा जास्त प्रमाणात विकास करता आला नाही. परंतु त्यांनी कला, स्थापत्य व सांस्कृतिक विकासाकडे दुर्लक्ष ही केले नाही. त्यांनी त्यांच्या काळात कला, स्थापत्य, चित्रकला, वास्तुकला, इ. गोष्टींकडे लक्ष केंद्रीत करून त्यांचा विकास घडवून आणला. तो पुढीलप्रमाणे –

## अ) पेशवेकालीन साहित्य

### १२.१.१ गद्य वाङमय :

गद्य वाङमय पेशवेकाळात केवळ एकच विषयावर भर देणारे पद्य वाङमय प्रकार निर्माण झाला असे नाही, तर चरित्र, कथा, बखरी, ऐतिहासिक स्वरुपाची कागदपत्रे, ग्रंथ यांचेही मोठया प्रमाणात निर्मिती झाली. मराठी भाषेतील पहिला चरित्र ग्रंथ मानला जातो. तो 'लिळाचरित्र' जो तेराव्या शतकात लिहिला गेला. बहिणाबाईंनी अभंगातून आपले चरित्र लिहिले आहे. पेशवेकाळात महिपती बुवांनी 'सतचरित्र' व 'भक्तीचरित्र' लिहिली. 'संतविजय' 'भक्तिविजय' संतलीळामृत हे त्यांचे भक्तीपर ग्रंथ जनसामान्यांपर्यंत लोकप्रिय झाले. याच काळात अनेक कवींनी पदे, अभंग, स्तोत्रे, अष्टके, आरत्या, भुपाळ्या ही स्फुटकाव्य लिहिली. तसेच ही स्फुटकाव्य महाराष्ट्रातील अत्यंत भक्तीभावाने घरोघरी म्हटल्या जात. त्यामुळे या काळातला वाङमय विकास घडवून आला.

### १२.१.२ पेशवेकालीन बखरी

इतिहासाच्या दृष्टीने बखर हे साधन अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. कारण बखरीच्या माध्यमातून तत्कालीन राजाची सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व प्रशासकीय माहिती समजण्यास मदत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडामध्ये लिहिलेल्या काही बखरी तसेच त्यांच्या सेवेत असलेले काही बखरकार यांनी महाराजांच्या मोहिमा, त्यांची प्रशासकीय व्यवस्था या सर्व गोष्टींची माहिती बखरीमध्ये नमूद केली आहे. म्हणूनच आज आपल्याला छत्रपती कालखंडाचा इतिहास समजण्यास मदत होते. त्याचप्रमाणे पेशवे काळात लिहिले गेलेल्या पेशव्यांच्या बखरी त्याही मोठया प्रमाणामध्ये पेशवेकाळाची माहिती मिळविण्यास मदत करतात. त्यामध्ये मराठा साम्राज्याची छोटी बखर, मराठे शाहीची बखर व इतर अशा अनेक बखरी आहेत. भाऊसाहेबांची बखर, पेशव्यांची बखर, नाना फडणीसांचे आत्मचरित्र, अमात्यांची राजनीती, रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र हे ग्रंथ देखील पेशव्याच्या काळात लिहिले गेले. पेशवे दफ्तरावरील लक्षावरील कागद विशेषत: पेशव्यांच्या इतिहासासाठी अत्यंत उपयुक्त आहे. "रियासतकार सरदेसाई, इतिहासकार माने, इतिहासाचार्य राजवाडे, पारसनीस यांनी या अनेक ऐतिहासिक कागदपत्रांचे संपादन करून मराठयांचे इतिहासाची साधने संपादित केली आहेत." अशा स्वरुपाची आणखी माहिती पेशवेकालीन बखरीतून मिळते. ती पुढीलप्रमाणे –

#### १) छ. शाहू महाराज यांची बखर -

ही बखर १७४९ ला तयार करण्यात आली. छ. शाहू महाराजांच्या मृत्युनंतर गोविंद खंडेराव चिटणीस यांनी तोंडी सांगून ही बखर प्रसिद्ध केली. छ. शाहू महाराज, पेशवे बाजीराव, चिमाजी यांचे गुरु ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकर यांच्या 'चरित्राची बखर' या सुमारास त्यांच्या शिष्यांपैकी कोणीतरी सांप्रदायिक आदराने लिहिली. यात चमत्कार कथा आहे. तसेच या बखरीत छ. शाहू महाराजांच्या पूर्ण जीवनाचे व संघर्षाचे वर्णन करण्यात आलेले आहे.

### २) समर्थांची बखर -

हनुमंत स्वामी कृत ही महत्त्वाची बखर आहे. शिवराय-समर्थ भेटीबाबत या बखरीत चर्चा केलेली आढळते.

### 3) आत्मचरित्रपर बखर -

ही आत्मचरित्रपर बखर असून या बखरीमध्ये नाना फडणीसाचे आत्मचरित्र विशेष लिहिले गेले आहे. परंतु हे काही प्रमाणात अपूर्ण आढळते. माधवरावांना पेशवे पद मिळाल्याचा वृत्तांत यात आहे. नाना फडणीस यांच्या आयुष्यातला पूर्वार्ध आणि त्यांच्या कुलाची माहिती यात येते.

### ४) गंगाधर शास्त्री पटवर्धन यांचे आत्मचरित्रपर बखर -

या बखरीमध्ये गंगाधर शास्त्री यांचे आत्मचरित्र नमूद केले आहे. त्यात त्यांनी पटवर्धांनी वयाच्या आठव्या वर्षी कारकुनीला आरंभ केला. त्यानंतर ब्रिटिश रेसिडेंट वॉकर यांनी त्यांना गायकवाड सरकारशी बोलणे करण्यासाठी नेमण्यापर्यंतचा वृत्तांत त्यांच्या आत्मचरित्रात आहे. तसेच सवाई माधवरावांच्या नंतरची पेशवाईची यात विस्तृत आणि सत्य रुपात माहिती लिहिलेली आहे. म्हणूनच ही बखर पेशवेकाळाची व पेशव्याची माहिती जाणून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे साधन मानले जाते.

### ५) साष्टी उर्फ राहण्याची बखर -

'वसईचा धर्मसंग्राम' या बखरीत चिमाजी अप्पांनी वसईसाठी फिरंग्यासोबत जो यशस्वी धर्म संग्राम केला त्याचे वर्णन नमूद केलेला आहे. साष्टीच्या बखरीत वसई प्रांत मराठयांनी काबीज केल्यानंतरची हकीकत त्यात नमूद केली आहे. यात गंगाजी नाईक हे वीर नायक आहे. यात त्यांचे उत्कृष्ट वर्णन आहे. यातील फिरंग्यांच्या जुलुमाचे वर्णन डोळ्यापुढे उभे राहते.

### ६) पानिपत बखर -

गोपिकाबाईंच्या आज्ञेवरून रघुनाथराव यादव चित्रगुप्तानी 'पानिपतची बखर' ही पानिपतच्या युद्धानंतर दोन वर्षाच्या आत लिहिली त्यातील कही तिथ्या-तारखा इतिहासाशी जुळत नाही. तरी ही माहितीगाराने लगेच लेखन केल्याने त्यातील माहितीला काहीसे प्रामाण्य आलेले असावे. सदाशिवराव भाऊसाहेबांच्या शास्त्र धर्माचे दर्शन, मुक्ति आणि कृती यातून तेजस्वीपणे व्यक्त झाले आहे. पानिपत बखर दु:ख आणि अभिमान यांची धीरोदत्त सांगड घालते. दिल्लीच्या रोखाने चाललेला सेनासागर दिवसेंदिवस अधिक उचंबळत चालला. भाऊसाहेबांनी जाराच्या व इराणच्या वकिलाला ठणकावून सांगितले "आम्ही फर्जंद लहान माणूस नाही.. इराणीचा हिशोब कोण धरतो? कोण धरतो? आमचे खातरेत नाही." भाऊसाहेबांचा हळवेपणा, विश्वासरावंवरील प्रेम, अपयशाची खंत याचे प्रत्येकारी चित्रण बखरीत आहे. युद्धाच्या वेळी भाऊ कल्पनाशक्तीचा आदित्य भासले. "रामचंद्रासाठी भारताने अयोध्या सोडून नंदीग्राम राहून वैराग्यवत उदास जाघाले. तद्वत रावणरावांनी

आरंभिले” हे वाचता वाचता बखरकाराचे सामर्थ्य कळते. वीर आणि करूण रसपूर्ण अशी ही बखर वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**७) काशीराजाची बखर -**

पानिपतावर लिहिलेली काशीराजांची बखर सुजाउद्दौला व मराठे मित्रत्त्व राखून पाहणाऱ्या काशीराज पंडित या वकिलाने लिहिलेली आहे. मराठा दुराणी युद्धाच्या दृष्टीने ही बखर विश्वसनीय मानली जाते.

**८) भाऊसाहेबांची बखर -**

कृष्णाजी शामरावांची ‘भाऊसाहेबांची बखर’ ही सरस आहे. यातील शैली ओजस्वी आहे. उतरलेल्या राजकारणाची इथ्यंभूत माहिती यात आहे. “बचेंगे तो और भी लडेंगे” हे दत्ताजी शिंदे यांचे उद्गार प्रसिद्ध आहेत. यात कुंभेरीच्या किल्ल्याचे यथोचित वर्णन केलेले आहे. ‘होळकरांची थैली’ ही होळकरांच्या बाजूने सादर केलेली पानिपतची हकीकत आहे. पानिपतच्या पराभवाचे दु:ख यात विवेचिले आहे.

## १२.२.३ शाहिरीकाव्य-पोवाडा :

शिवकाळात जन्माला आलेली आणि पेशवेकाळात भरलेली कविता म्हणून शाहिरी काव्याचा उल्लेख मध्ययुगीन वाङमयात प्रामुख्याने केला जातो. यादवकालीन वाङमयात शाहीर, गोंधळी, भट यांचे थोडेफार उल्लेख आढळतात. त्यामुळे तेव्हापासून ही कविता अस्तित्त्वात होती, असे म्हटले तर ते फारसे वावगे ठरणार नाही. शिवकालीन ४ पोवाडे छ. शाहू महाराजकालीन ३ पोवाडे, पेशवेकालीन सुमारे १५० पोवाडे व अन्य इंग्रजी काळातले आहेत. सुमारे ३०० पोवाडे आज उपलब्ध होऊ शकतात. शाहिरांच्या या रचना कोणाच्यातरी आज्ञेवरून झाल्याने त्या स्वयंरचित आहेत असे म्हणता येत नाही. अग्निदास, तुळशीदास आणि यमाजी हे शिवाजी-बाजी यांचे आश्रित तर आनंदफांदी हे पेशवे दरबारातील भट होय. या शाहिरांना त्यांच्याकडून इनामे मिळालेली दिसून येतात. मराठयांच्या लौकिक जीवनातील सुखदु:खाचे क्षण, गतवैभवाच्या स्मृती या विषयीच्या प्रांजळ प्रतिक्रिया त्यांच्या पोवाडयातून व्यक्त होताना दिसतात.

**१) अनंतफंदी -**

नगर जिल्ह्यातील संगमनेर येथील अनंतफंदी या जेष्ठ कवीने ‘चंद्रावलीची’ लावणी लिहिली. पूर्वजांचा धंदा गोंधळ घालण्याचा होता. तरुणपण उनाडक्या करण्यात गेले. पण तेव्हापासून काव्यरचनेचा छंद त्यांना होता. तमाशाचे फडही त्यांनी चालविले. कटाव, फटके लावण्याची रचना त्यांनी केली. प्रसिद्ध पोवाडा लिहिला आहे. बाजीराववरील त्यांच्या पोवाडयात “घडीत व्हावी सौम्य मुद्रा घडीत यावा कोप रुद्रा | घडीत घ्यावी क्षनैक निद्र | स्वच्छ – चारी प्रभु हा |” असे बाजीरावाचे दोषही त्यांनी स्पष्टपणे नोंदवले. त्यांच्या काही लावण्या भडक उत्तान आहेत पण त्यांची “बिकट वाट वहिवाट नसावी | धोपट मार्ग सोडून नको..| कष्टाची बरी भाजी भाकरी तूप-साखरेची चोरी नको.| यासारखी फडक्यांची रचना मात्र चांगली आहे. वाङमयीन कलात्मकता त्यात कमी प्रमाणात आढळते.

**२) प्रभाकर :**

रत्नागिरी जिल्ह्यातील मुरुड गावात जन्मलेल्या प्रभाकर दातार, पुण्यात कारकुनीचे काम करीत होते. पुण्याच्या चैनी व विलासी वातावरणातच त्यांनी पोवाडे व लावण्या लिहिल्या. गंगू हैबती, महादबा सुतार यांनी त्यांची कवणे गायली.

तमासगिरांचे जे फड त्या काळी होते, त्यांचा कवी म्हणून त्यांना मान्यता होती. अन्य शाहीरांपेक्षा त्यांची लावणी अधिक उत्तम आणि भडक आहे. शृंगारीत शरीरचेष्टा पती-पत्नीच्या नात्यातील विलासवर्णने आणि ढंगदार, शब्दरचना ही प्रभाकार यांच्या रचनेची वैशिष्टये. सवाई माधवरावांच्या कारकीर्दीवरील त्यांचा 'रंगाचा पोवाडा' प्रसिद्ध पावला. नाना शंकरशेठ, स्प्रिंगल साहेब, पेसानजी शेठ यांच्यावरही त्यांनी पोवाडे लिहिले. रसिकांसाठी कवने रचणारा हा कवी आहे.

**३) परशराम -**

सिन्नर तालुक्यातील (जि.नाशिक) वावी गावाच्या शिंपी समाजातील हे कवी. पेशवे सरकारने वतन नाकारणाऱ्या या गंगाथडीच्या शाहिराने "सुई दोऱ्याला हयात असू द्या | तेची इनाम मोकासा | चैनीखातर आम्ही राया | पडलो नाही फंदात" | असे सांगितलेले आढळते. या विठ्ठल भक्त शाहिराने संत कवितेचा अभ्यास केला होता. विठोबाखाली यांच्या आदेशावरून त्यांनी लावण्या लिहिल्या बाबा सात भाई, मुलराज बाकेराव या तमाशाच्या धंद्यातील लोकांनी त्यांच्या लावण्या लोकप्रिय बनविल्या. तसेच पौराणिक व आध्यात्मिक स्वरूपाच्या देखील त्यांनी पेशवाईच्या दुरावस्थेचे प्रभावी वर्णन आपल्या लावण्यांमधून केले आहे.

**४) सगनभाऊ -**

जेजुरीला राहणाऱ्या हत्याराला धार लावण्याचा म्हणजेच शिकलकरीचा धंदा करणारे हे कवी सगन भाऊंच्या लावण्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेले. होनाजी गवळ्याच्या प्रतिस्पर्धी गटाचा हा शाहीर रावळांच्या फडासाठी रचना करीत असे. पेशव्याईतील मराठी वीर, संत, हिंदू दैवते, तीर्थक्षेत्रे – धर्मक्षेत्रे यांच्या विषयी मुसलमान संत कवीने आदरपूर्वक रचना केलेल्या दिसतात. यांच्या लावणीतील शृंगार संयमशील आहे. खडकीच्या लढाईनंतर ते सातारा छत्रपतींचे आश्रयास गेले. दूसरा बाजीरावांच्या पलायनानंतर पुण्याची केविलवाणी अवस्था ही त्यांनी आपल्या लावण्यामधून वर्णिलेली आहे.

**५) होनाजी बाळा -**

पुणे प्रांतातील हे कवी सगनभाऊ कलगीतुऱ्याचे सामने करण्यासाठी जसे प्रसिद्ध होते. तसेच ते "घनश्याम सुंदरा श्रीधरा | अरुणोदय झाला |" या भूपाळीने आजही सर्वपरिचित आहेत. सात्विक आणि श्रद्धायुक्त रचना हे त्यांचे वैशिष्टये.

हे शाहिरी घराण्याचा वारसा सांगणारे कवि आहेत. त्यांचे आजोबा साताप्पा शिलारखाने हे पेशव्यांचे आश्रित व तमाशातील चुलता बाळ आहे बाळ आहे ही प्रसिद्ध लावणीकार होते. होनाजींना ही पेशव्यांच्या आश्रय होता. सरकारवाडयासमोर तमाशा करण्यासाठी त्यांना

वर्षाकाठी ३०० रुपये वर्षासन मिळत असे. पेशवाई बुडाल्यावर बडोदेकरांनाही त्यांना वर्षासनं चालू ठेवली होती. त्यांनी पाच पोवाडे रचले. त्यातील तीन बाजीरावांवरील आहेत. बाजीरावांवरील त्यांच्या लावण्यात ढंगदार आहेत. "लटपट लटपट तुझं चालणं मोठ्या नखऱ्याचं | बोलणं ग मंजुळ मैनेच |" हे मराठी माणसाच्या मनातलं गीत होनाजींची लावणी आहे. त्यांच्या सुंदर लावण्यामुळे पेशवेकाळात ते अतिशय लोकप्रिय झाले होते.

### १२.२.४ लावणी :

लावण्य म्हणजे वयात आलेल्या तरुणीच्या सौंदर्याचा लावनिशी संबंध जोडावा, असा मोह व्हावा असेच पेशवाईत बहारीस आलेल्या लावणीच्या स्वरूप आहे. शाहिरी साहित्यात कवींनी लावण्या देखील लिहून जनसामान्यात व दरबारी मानमरातबटून उत्तेजित करून रिझवले आहे. सुरुवातीस शृंगारिक काव्य लिहिण्यासाठी या कवींनी राधा-कृष्ण, शिव-पर्वती यांना मध्यम केले आहे.

छत्रसाल बुंदेला यांनी पहिल्या बाजीरावास सौंदर्याची खाण व अनेक कला गुणसंपन्न मस्तानी ही मुस्लीम तरुणी भेट म्हणून दिली आणि बाजीरावांनी तिला जवळजवळ पटराणीचा दर्जा दिला. तिच्यामुळे ते मांस भक्षण करू लागले. त्यामुळे कर्मठ, सनातनवादी ब्राम्हणांनी बाजीरावांचा पराक्रम न पाहता त्यांच्यावर टीकेची जोड उठवली. त्यांचा भाऊ चिमाजी अप्पा यांनी मस्तानीला अटक केली. पण पुढे तेच कर्मठ, सनातनी ब्राम्हण मुस्लिमांच्या शानशोकीच्या शृंगारिक कलांच्या साहित्याशी नादी लागले. याचा एक पुरावा म्हणजे त्यांनी लावणीतील स्वीकारलेला शृंगार होय. लावणी व तमाशा यांची हातातहात घालून वाढ होत गेली. गरिबाला एखादा पैसा देताना काचकूच करणारे हौशी, गुलछबू लोक, दौलत जादा करून आपला आंबट शोक व्यक्त करू लागले. बघता बघता लावणी बहरीस येऊन तिने जनसामान्यांना प्रभावित केले. तिच्या ठसकेबाजींनी साऱ्यांना ताल धरायला लावला. राम जोशी या शाहिरी कवीच्या प्रसिद्ध लावणीतील ओळीतून हा लावणीचा बेधुंद करणारा प्रभाव मांडता येईल. राम जोशी म्हणतात...

"सुंदरा मनामध्ये भरली, जरा नाही ठरली |
हवेलीत शिरली मोत्याची भांग |"

परशूराम हे शिंपी पण त्यांनी लावणी वाङ्मयात भर घातली, राम जोशींच्या लावण्यांनी राम जोशींच्या मस्तकी शाहिरीचा मुकुटच चढविला. अनंतफंदी, प्रभाकर यांनी ही शृंगारिक लावण्या रचल्या. यापैकी कितीतरी लांवण्यानी आजही मराठी मनाला भुरळ घातली आहे.

## १२.३ पेशवेकालीन कला

### १२.३.१ संगीत

अठराव्या शतकापर्यंतचा महाराष्ट्रातील सांकेतिक इतिहासाचा आढावा घेताना महाराष्ट्रात आदिम संगीत, लोकसंगीत, धर्मसंगीत, भक्तीसंगीत, जनप्रिय संगीत, कलासंगीत, सुगम संगीत या प्रमुख संगीताच्या कोटींमधून विविध संगीत रुपधारा वाहत होत्या असे दिसते. त्यामुळे महाराष्ट्रात सांगतात समृद्धी विपुल प्रमाणात होती, असे निश्चितपणे म्हणता येईल. तसेच संगीताच्या दृष्टीने वारकरी पंथातून काही विशेष संगीत रूपे आकारात आली. देवाच्या

नावाचा गजर, नामस्मरण, नामस कीर्तन, पद, विरणी, अभंग, ओवी, भारुड, कीर्तन, आरती, पाळणा, भूपाळी इत्यादीच्या माध्यमातून संगीत कला बहरू लागली.

शिवकाळात शून्यातून ब्रम्ह निर्माण करणे म्हणजे मराठा राज्याची स्थापना करणे हे महत्त्वाचे कार्य असल्याने संगीत, नृत्य, नाटय, नृत्यशिल्प इत्यादी फारसा विकास झाला नाही. परंतु पेशव्यांच्या काळात तमाशा, कीर्तने, दरबारी उत्सव यातून संगीताचा विकास झाला. पेशव्याच्या काळात आणखी संगीत प्रकार ध्रुपद, धमार, ख्याल टप्पे हे विकसित झाले. सारंगी, सतार, पखवाज इत्यादी वाद्य महत्त्वाची होती. लावणी, पोवाडा, भजन, कीर्तन, पद, भारुडे यांसारखे लोकसंगीताचे प्रकार होते. तसेच नारदीय कीर्तन व बैठकीची लावणी हे प्रकारही रूढ झाले. पेशव्यांच्या दरबारात गणेश उत्सवाच्या काळात गवई होत असे. पहिल्या बाजीराव पेशवे व रघुनाथरावांच्या पदरी गवई होते. हे उपलब्ध पुराव्यावरून लक्षात येते.

## १२.३.२ नृत्य

पेशवे काळात लेझीम, भलरी किंवा मुलींचे घुमा हे खेळ म्हणजेच नृत्याचा प्राथमिक भागच होता, तर लावणी गाताना होणारे हे यापेक्षा आणखी वरच्या दर्जाचे होते. लावणी नृत्य लयबद्ध, नियमबद्ध व काही अंशी तंत्रबद्धही होते. पेशवे हे कला व मनोरंजनाचे भोक्ते असल्याने त्यांनी लावणी, तमाशा व फड या माध्यमातून आपले मनोरंजन केले. त्यामुळे त्यांच्या काळापासूनच लावणी हा नृत्य प्रकार बहरला गेला.

## १२.३.३ नाटय

भारुडे, तमाशा, लोकगीते, दशावतारी खेळ या पलीकडे मराठा काळातील नाटयकला पोहोचलेली दिसत नाही. पेशवेकाळात मात्र गवळण, भारुड व तमाशाच्या माध्यमातून नाटयप्रकार हा महाराष्ट्रात रुजला. कारण महाराष्ट्रातील परंपरागत लोकनाटय प्रकारातील सर्वाधिक लोकप्रिय नाटयप्रकार म्हणजे तमाशा होय. पेशव्यांनी आपल्या मनोरंजनासाठी मोठया प्रमाणात या कलेला प्रोत्साहन देऊन त्याचा काही प्रमाणात विकास घडवून आणला.

## १२.३.४ चित्रकला

शिवकाळापासून ते पेशवेकाळापर्यंत म्हणजे साधारणपणे १७ व्या शतकापासून ते १९ व्या शतकापर्यंत महाराष्ट्रातील चित्रकलेचा विचार दोन टप्प्यात करता येतो. स्वराज्य स्थापनेच्या काळापासूनच पहिला टप्पा ते पेशव्यांची राजवट हा दुसरा टप्पा. स्वराज्य स्थापनेच्या कार्यात गुंतल्यामुळे छ. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत कला निर्मितीला वाव मिळाला नसावा, तरी पण या काळात लघुचित्रे काढले जात होती. अशी माहिती इतिहासकारांच्या काही अभ्यासकाने मांडले आहे.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मतानुसार शहाजीराजे व छत्रपती यांच्या संग्रहित शेकडो चित्रे पूर्वकालीन व स्वकालीन असावी, प्रसिद्ध स्त्री पुरुषांप्रमाणे स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तीच्या तसबिरी काढून घेऊन त्यांचा संग्रह करण्याची हौस होती. पण शिवकाळातील चित्रकामाच्या अभावी त्याविषयी सांगणे कठीण आहे.

छ. शाहू महाराजांच्या कारकिर्दीत चित्र निर्मितीला वाव मिळाला होता आणि त्यांचे प्रत्यांतर त्यांनी बांधलेल्या रंगमहालातील भित्तीचित्रावरून येते. या कालखंडातील चित्रकलेवर एका बाजूने मोगल-रजपूत शैलीचा तर दुसऱ्या बाजूने दक्षिणेकडील शैलीच्या प्रभाव पडलेला दिसून येतो. उदाहरणार्थ श्रीरंगपट्टणम येथील टिपू सुलतानाच्या राजवाडयातील भित्तीचित्रे आणि सातारा व इतर ठकाणी असलेल्या वाडयातील भिंतीचित्रांमध्ये चित्ररचना व तांत्रिक विशेष याबाबतीत साम्य दिसून येते. तसेच बाजीराव पेशवे यांनी उत्तम चित्रकार बोलून शनिवारवाडयात पुराणातील महाभारत, रामायणातील चित्रे काढून घेतली आहेत. पहिल्या माधवरावांनी तर माणकोजी नावाच्या चित्रकारास पेशव्याच्या दरबारात ठेवून घेतले होते. सातारा, पुणे, वाई, नाशिक, निपाणी, चांदवड इत्यादी ठिकाणच्या वाडयात भिंतीचित्रे काढली होती. शिवाय मोरगाव पुण्याजवळचे पाषाण, बेनवडी इत्यादी मंदिरात देखील छतावर भिंतीवर चित्रे काढली जात होती. प्रामुख्याने दशावतारातील विषय हे चित्राचे मुख्य विषय होते. गणपती, रिद्धी-सिद्धी, लक्ष्मी, विष्णू, शिव-पार्वती, विठ्ठल-रखुमाई, शिवलीलामृतातील प्रसंग याची चित्रे काढली जात. या चित्रातून एक प्रकारे मराठयांच्या संस्कृतीचे दर्शन घडविले जाई.

### १२.३.५ शिल्पकला

मराठाशाहीत शिल्पकलेचा फारसा उत्कर्ष झालेला दिसत नाही. कारण छत्रपती व पेशव्यांचे सर्व आयुष्य मोगल, निजाम व ब्रिटिश या बलाढ्य शत्रूशी लढण्यातच गेले. त्यामुळे मराठे व पेशवेकालीन शिल्प हे दुर्मिळ आहेत. छ. शिवाजी महाराजांचे एक अत्यंत दुर्मिळ शिल्प काही वर्षांपूर्वी कर्नाटकातील धारवाड जवळील यादववाड या गावी सापडले आहे. ते एका शिळेवर अत्यंत उठावदार पद्धतीने कोरलेले असून त्यात शिवछत्रपती व बेळवडी मल्लम्मा यांच्याशी बोलणी झाली याचे दृश्य दाखविले आहे. मराठेशाहीतील मंदिरे ही त्यांच्या वास्तुशिल्पाचा विचार करता यादवकालीन मंदिरासारखीच वाटतात. अहिल्याबाई होळकरांनी पेशवेकाळात अनेक मंदिरे बांधली. त्या मंदिरामध्ये छ. शाहूंच्या मूर्ति व कोरीव काम मोठया प्रमाणात केलेले आढळते. या वस्तुशिल्पावर राजपूत व गुजराती कलेचा प्रभाव जाणवतो. मंदिराच्या प्रवेशद्वारावर मराठा सरदारांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. त्या उभ्या किंवा बसलेल्या अथवा हत्तीवर आरूढ झालेल्या दिसतात. तसेच नर्तकी व वाद्यवृंदातील वादकांच्याही मूर्ती आहेत.

मराठा व पेशवेकालीन मंदिराच्या बाहेरील भिंती व मंडपाच्या छतावर तर शिल्पांची मोठी रेलचे आढळते. या कोरीव कामात फुले व भौतिक नक्षी प्रकर्षाने जाणवते. नक्षीत कमळ व हंसही प्रामुख्याने आढळतात. तसेच हत्ती, मोर, माकडे इत्यादी प्राणी कोरलेले आढळतात. मराठी शाळेतील कास्ट शिल्पे ही महाराष्ट्रात महाराष्ट्रभर पहावयास मिळतात. दगडात व लाकडात कोरलेल्या शिल्पात साम्य आढळते.

## १२.४ पेशवेकालीन स्थापत्य

### १२.४.१ नगररचना

महाराष्ट्रात सातवाहन काळापासून वसाहती झाल्याचे दिसते. किंबहुना महाराष्ट्राच्या नागरीकरणाची सुरुवात खऱ्या अर्थाने याच काळात झाली. छ. शिवाजी महाराजांना जशी

स्वराज्याची नवनिर्मिती करावी लागली, तसेच मराठी स्थापत्य विशारदांना स्थापत्य क्षेत्रात करावी लागलेली दिसते. त्यांनी पूर्वकालीन व समकालीन परंपरा व शैली यांचा या कामे उपयोग करून नवीन नगरी उभारली. छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी रायगड या किल्ल्यावर होती. त्यामुळे त्यांनी तेथील नगर रचनांची विशेष काळजी घेतली. अगदी तेथिलच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राची नगरांचा व जिंकलेल्या किल्ल्यांचा सांभाळ केला. त्याचप्रमाणे शाहू महाराजांनी देखील सातारा शहर वसवलेले होते.

पेशव्याच्या काळात मात्र सातारा हे शहर दळणवळणाच्या दृष्टीने सोयीचे नसल्याने पेशव्यांनी पुणे शहर निवडले. १७२१ पर्यंत पेशव्यांचे वास्तव्य सासवड येथे होते. त्यानंतर त्यांनी आपला मुक्काम पुण्यात हलविला. पुणे, कुमारी व कासारी या तीन खेडयांचे मिळून पुणे शहर झाले. पुढे अन्य खेडयांचा त्यात समावेश करून पेशव्यांनी पुणे शहराचा विस्तार केला. १७४८ ते ४९ मध्ये शुक्रवार पेठेची स्थापना केली. बुधवार पेठेची स्थापना रामाजी व बाळाजी या नाईक बंधूंनी केली. १७५० ते ५१ दरम्यान वल्लभदास यांनी गुरुवार पेठेची स्थापना केली. नायगाव खेडयांचे रुपांतर सदाशिव पेठेत करण्यात आले. पेशव्यांप्रमाणेच त्यांचे सरदार ही आपल्या जहागीरीमधून नवीन गावे व शहरे वसवित असते.

### १२.४.२ वाडे

वाडा शब्दाची उत्पत्ती संस्कृत 'वाटक' या शब्दावरून बनली आहे. वाटक हे 'वाटिका' चे रूप आहे. वाडा म्हणजे थोर अथवा मोठे. थोडक्यात वाडा म्हणजे चौकोनी अथवा आयताकृती भूखंडावरील सर्व बाजूने परिवेष्ट व एक किंवा अनेक चौक असलेली भव्य इमारत होय. अशा प्रकारचे भव्य दिव्य वाडे पेशवाईकाळात आपणास पहावयास मिळतात. पेशवाईतील वाडे आजही पुणे, नाशिक, सातारा, सासवड, वाई इत्यादी ठिकाणी पहावयास मिळतात. या वाडयाचे प्रमुख बांधकाम लाकडांमध्ये तर भिंती दगडा-माती, विटा-दगड असे मिश्र साहित्याने केलेले दिसते. मराठेकालीन वाडयांचा स्थापत्य इतिहास सोळाव्या शतकापासून गृहीत धरला, यात त्यांची सुरुवात बाळाजी विश्वनाथ भट (१६६० ते १७२०) या पहिल्या पेशव्यांपासूनच करावी लागेल. बाळाजी विश्वनाथांची हरिहरेश्वर येथे स्वनिर्मित वास्तू असून देखील त्यांच्या जीवनातील बहुतांश काळ सासवड पुरंदरे वाडयात गेल्याचे समजते.

पेशवाईतील वाडयांना सजवणारे दुय्यम घटक म्हणजे कमानी, महिरपी, तक्तपोशीवरील नक्षी इत्यादी घटक म्हणजे राजस्थान आणि मोगल यांच्या वास्तुकलेचा प्रभाव म्हणावा लागेल. शनिवारवाडा पेशव्यातील एक महत्त्वाची वास्तू १७३० साली पहिल्या बाजीराव पेशव्यांनी बांधली. या वाडयातील लाकडी कोरीव छतावर विविध प्रकारच्या सुंदर बेलबुट्ट्या रंगविल्या होत्या. झाडे, वेली, फुले तसेच रामायणातील, महाभारतातील कथा, प्रसंगाचे चित्रण भिंतीवर केले होते. दिवाणखाण्यातील चित्रे काढण्यास भोजराज या निष्णात चित्रकाराला जयपूरहून खास आमंत्रित केले होते. त्याचप्रमाणे नाना फडणीस हे सुद्धा कलेचे रसिक होते. त्यांनी आणि इतर महत्त्वाच्या व्यक्तींनी नाशिक, चांदवडवावी, निपाणी, मेणवली यासारख्या ठिकाणी वाडे बांधले. त्यातील भिंतीचित्रे हा या वाडयांना एकत्र आणणारा एक समान दुवा आहे. अशा प्रकारे पेशवाईतील वाडे हे अतिशय सुंदर व वैशिष्टयपूर्ण आहेत.

### १२.४.३ इमारती

छत्रपती शाहू महाराजांनी सातारा हे शहर वसवले होते. परंतु महाराष्ट्रातील निरनिराळ्या भागांनी दळणवळणाच्या दृष्टीने सातारा सोयीचे नसल्याने पेशव्यांच्या काळामध्ये पेशव्यांनी पुणे शहर निवडले व तेथेच वास्तव्य करून त्यांनी आपले प्रशासकीय कामकाज येथूनच चालविले. त्यासाठी त्यांनी स्वतःसाठी मोठमोठे वाडे स्वरूप इमारती बांधल्या. पुण्यात शनिवारवाडा, शुक्रवारवाडा, विश्रामवाडा तसेच नाशिकचा सरकार वाडा व कोपरगावचा रघुनाथरावांचा वाडा हे सर्व वाडे भव्यदिव्य इमारतीतच होते.

पेशवे काळात या इमारती व वाडयांचे बांधकाम भक्कम व मजबूत असे. ते ज्योत्यासाठी घडीव दगड वापरत असत. उत्तम घोटलेल्या चुन्याच्या भिंतींना प्लास्टर करत असत. भिंतीची जाडी तीन फूट किंवा त्यापेक्षा जाड असून खिडक्या आकाराने लहान व संख्येने कमी ठेवीत. छप्पर नळीच्या कौलाचेच असे. पेशवेकाळात अनेक सरदार व इनामदारांनी हवेली व वाडे बांधण्यास सुरुवात केली. खऱ्या अर्थाने या उपक्रमाची सुरुवात पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या काळात झाली. शिंदे व होळकरांनीसुद्धा मोठमोठया हवेल्या बांधल्या. नानासाहेबांनीसुद्धा १७५३ मध्ये एक वाडा बांधला होता. पेशवाईमध्ये इमारती अतिशय सुंदर व प्रमाणबद्ध होत्या.

### १२.४.४ पेशवेकालीन मंदिरे

महाराष्ट्राचे वाकाटक, कलचुरी, राष्ट्रकुट, कल्याणी, चालुक्य, यादव, शिलाहार या राजकुळांच्या कारकीर्दीच्या काळात येथे मोठया प्रमाणात मंदिर उभारली गेली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात व पेशवे काळात ही अनेक मंदिरे बांधली गेली. कारण प्राचीन काळापासून धार्मिक घटकाला मोठया प्रमाणात महत्त्व दिले जात होते. म्हणूनच मंदिराचे महत्त्व धार्मिकतेच्या बाबतीत मोठे होते.

पेशवाईत जी मंदिरे बांधली गेली, त्यात पेशव्यांप्रमाणेच सरदारांनी ही पुढाकार घेतला होता. नाना फडणीसांनी कोकणातील त्यांच्या मूळ गावी काळभैरवाचे देऊळ उभारले. भीमाशंकरच्या बांधकामात त्यांनी पुढाकार घेतला. तसेच कृष्णेच्या काठी लक्ष्मी-वासुदेव व अमृतेश्वर यांची मंदिरे उभारली. अनंतराव रास्ते सरदाराने वाईत अनेक मंदिरे उभी करून कृष्णाकाठी घाट बांधला. चिपळूण जवळील ख्यातनाम परशुरामांचे मंदिर ब्रम्हेंद्र स्वामींच्या पुढाकाराने बांधले गेले. ब्रम्हेंद्र स्वामी हे अनेक मराठा सरदार व पेशव्यांचे धार्मिक गुरु होते. शिवाय पेशवे हे ब्राम्हण असल्याने देवपूजा, पूजा-अर्ज यांना मोठया प्रमाणात महत्त्व देत होते. म्हणून पेशवे काळात मंदिरांना अत्यंत महत्त्व प्राप्त झाले होते.

जरी पेशवेकाळात अनेक मंदिरे बांधली गेली असली तरी ती अत्यंत साधी आणि कलाकृतीच्या तुलनेत भारतातील इतर मंदिराच्या तुलनेत सौंदर्यहीन होती. याचे कारण म्हणजेच एक तर मराठे सतत युद्धात गुंतलेले होते आणि उत्कृष्ट कारागीर व पैशाचा अभाव होता. विविध मंदिरे, वाडे यांच्या ठिकाणी जी शिल्पे उभारली आहेत, ती देखील अत्यंत साधी आहेत,

### १२.४.५ पेशवेकालीन किल्ले

छत्रपती शिवाजी महराजांच्या काळात किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व होते. महाराजांना किल्ल्यांच्या आश्रयाने मुसलमानी फौजेशी आत्मरक्षण करावे लागत असल्याने त्यांनी स्वतःचे नवीन किल्ले बांधून जुन्या किल्ल्यात बरीच भर घातली. परंतु पेशवाईत मराठी राज्याचा खूप विस्तार झाल्यामुळे सह्याद्रीच्या डोंगरी किल्ल्यांची आवश्यकता मराठयांना तितकी राहिली नाही. म्हणून त्यांनी नवीन किल्ले थोडेच बांधले. उदाहरणार्थ बाळाजी विश्वनाथांनी लोहगड जवळ विसापूर किल्ला बांधला. पहिल्या बाजीरावाने १७३७ मध्ये अर्नाळा किल्ला जिंकून त्यांची नवीन बांधणी केली. १७६५ मध्ये नारोशंकर राजेबहाद्दर या सरदाराने माळगावचा प्रसिद्ध किल्ला भुईकोट किल्ला बांधला. नाना फडणीसाने लोहगड किल्ल्याची थोडीफार दुरुस्ती केली होती. पेशवाईमध्ये त्या किल्ल्यांचा प्रामुख्याने उपयोग हा कैदी ठेवण्यासाठी केला जात असे.

### १२.४.६ पेशवेकालीन गढी

मराठेकालीन व पेशवेकालीन गढी हे तत्कालीन वास्तुकलेचे श्रेष्ठ नमुने होते. किल्ल्यांपेक्षा गढी ही लहान इमारत होती. संरक्षक तटबंदी असलेल्या गढया सरदारांचे निवासस्थान होते. तेथील वास्तव्य सुखावत व्हावे या दृष्टीने सर्व प्रकारचे प्रयत्न केले जात असे. गढीचा आकार व मजबूतपणा हा मालकाच्या संपत्ती स्थितीवर अवलंबून असे. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात अशा अनेक गढया महाराष्ट्रात बांधण्यात आल्या.

### १२.४.७ पेशवेकालीन नदीघाट

हिंदू धर्मामध्ये मोठया प्रमाणात स्नानाला महत्त्व दिले गेले आहे. कारण कोणत्याही धार्मिक विधी करण्याअगोदर व्यक्तीने स्नान करणे हे गरजेचे असायचे, कारण हिंदू धर्मामध्ये धार्मिक कृतीला महत्त्व दिले जात होते. म्हणून नद्यांच्या काठावर अनेक पायऱ्यांचे घाट बांधण्याची पूर्वापार पद्धत होती. कृष्णा, गोदावरी, कोयना, चंद्रभागा इत्यादी नद्यांच्या काठी असलेल्या शहरात मोठमोठे घाट बांधले गेले आहेत. उदाहरणार्थ नाशिक, वाई, कराड, पंढरपूर, पैठण येथे पक्क्या बांधणीचे घाट बांधण्यात आले. पेशवे काळात तर पेशवे हे ब्राम्हण असल्याने प्रत्येक धार्मिक विधीसाठी स्नान करणे, हे महत्त्वाचे मानले जात होते. त्यामुळे पेशवेकाळात जास्तीत जास्त नदी घाट बांधण्यात आले. अहिल्याबाई होळकरांनी महेश्वर व मंडलेश्वर या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी अनेक विशाल व सुंदर घाट बांधले होते, की जे घाट तत्कालीन स्थापत्य कलेचा उत्कृष्ट अविष्कार आहे. १८३१ मध्ये पेशवे सरदार यशवंतराव घोरपडे यांचे वंशज दौलतराव घोरपडे यांनी पूर्वीच्या भांबुर्डा गावात घाट बांधला.

### १२.४.८ पेशवे काळातील पाण्याची व्यवस्था

पुणे ही पेशव्यांची राजधानी होय. अटकेपार झेंडा लावलेल्या पेशव्याने पुण्यामध्ये सुमारे २५० वर्षांपूर्वी पाणी व्यवस्थेचे नियोजन केले. कात्रजपासून शनिवारवाडयापर्यंत एक आश्चर्यकारक १७४९ मध्ये बाळाजी विश्वनाथांनी नागरिकांना पाणी मिळवून देण्यासाठी भुयारी कालवा बांधला. तसेच पाणीपुरवठा करण्यासाठी वेगवेगळ्या योजना आखल्या. शहरानजीकच्या नदीवर बांध बांधून या बंधाऱ्याचे पाणी खापराच्या नळाद्वारे आणून ते शहरातील ठिकाणच्या मोठया हौदात एकत्र केले जात असे. अशा प्रकारच्या चार बांधांचे

पाणी पुण्यात आणण्याची व्यवस्था पेशव्यांनी केली होते. पुण्यात पाणी आणण्यासाठी पेशव्यांनी कात्रजजवळ एकाखाली एक अशी दोन धरणे बांधली होती. यातून भुयारी नळाने पाणी शहरात खेळविण्यात आले होते. पुण्यामध्ये मोठमोठे धरण बांधले गेले व पाणीपुरवठामुळे अनेक बागाही फुलवण्यात आल्या होत्या.

## १२.५ पेशवेकालीन वास्तुकला

मोगलांच्या काळात वास्तुशिल्पाचा व वास्तूकलेचा जो विकास झाला. तशी भव्यता, सौंदर्य, नाजूकता महाराष्ट्रातल्या वास्तुकलेत आढळली नाही. भव्य घुमट, मिनार, भिंतीवरचे हिरे-मोती जडीत नक्षीकाम महाराष्ट्रातल्या वास्तुकलेत दिसत नाही. अजिंठा, वेरूळ हे जगप्रसिद्ध लेणी ही प्राचीन काळात विकसित झाली. पण त्यानंतर शिल्पकलेचा विकास खंडित झाला होता. यादवकाळात हेमाडपंथी स्थापत्य शैली विकसित झाली. मध्य प्रदेशातील शिल्पकला, कर्नाटकातील शिल्पकला याची छाप सोलापूर खानदेशातील शिल्पकलेत दिसून येते. मराठयांनी बांधलेल्या वास्तू हे प्रामुख्याने वाडे आणि मंदिरे यांच्या रुपात होती. मराठा शिल्पकलेचा पहिला कालखंड १६३० ते १७०० हा गणला जातो. या काळातील वास्तुकलेत दख्खनची छाप होती. पण पेशव्यांच्या काळातील विस्तार उत्तरेस होऊ लागल्यावर राजस्थान, आग्रा, दिल्ली येथे शिल्पांचा प्रभाव मराठयांच्या स्थापत्यावर पडला. शिवशाहीच्या काळात वास्तुकला वाडे, किल्ले बांधणे आणि काही मंदिरे उभारणे या भोवतीच केंद्रीत झाले होते. किल्ले मजबूत कसे असतील यावर लक्ष दिले गेले. मंदिराचे बांधकाम दगडांचे आणि अत्यंत साधे असे. छ. शिवाजी महाराजांनी सुरुवातीची राजधानी रायगडाच्या बरोबर अनेक किल्ले बांधून दुरुस्त केले. त्याचबरोबर सागरी किल्ले बांधण्यावर राजांनी लक्ष दिले. पेशव्याच्या परिसरात शुक्रवार वाडा, विश्रामबाग वाडा, शनिवार वाडा, कोपरगावचा राघोबांचा वाडा, साताऱ्यातील छत्रपतींचे नवा आणि जुना असे दोन राजवाडे प्रसिद्धीस आले होते. दोन नद्यांचा संगम जिथे होतो, तेथे दगडांचे घाट बांधले आहेत. काही ठिकाणी देवळे उभारले आहे.

दगडावर खोदकाम करून शिल्पे घडवली जात ही शिल्पकला मराठाशाहीत कोरल्या गेल्या नाहीत. मात्र प्राचीन काळातील वेगवगेळ्या घराण्यांच्या काळात विविध मंदिरांची उभारणी करत असताना अशा सुबक मुर्त्या घडवल्या गेल्या. आक्रमक मुस्लीम सत्तांनी या मूर्त्यांचा मोठया प्रमाणात विध्वंस केला. कर्नाटकातील यादव वाडा येथील एका शिळेवर छ. शिवाजीराजे आणि बेलवाडीची मल्लमा यांचे भेटीचे शिल्प कोरले आहे. विविध मंदिरे घाटवाडे यांच्या ठिकाणी जी शिल्पे उभारली गेली आहेत, तिही अत्यंत साधी आहेत. धातूमुर्ती आणि कष्ट या कला विकसित झाल्या होत्या. परंतु कास्टशिल्प हे आग लावणे वगैरे प्रसंगामुळे अधिक दिवस तग धरू शकले नाही. या काष्टशिल्पावर राजस्थान आणि गुजराती शैलीचा प्रभाव आढळतो.

## १२.६ सारांश

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यकारभारासाठी जी तत्त्वे पुरस्करलेली होती. त्या तत्त्वांचा पेशव्यांनी त्याग केल्याने पेशवाईत ऱ्हास झाला. असे जरी असले तरी स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतरण पेशव्यांनीच केले. हे नाकारता येत नाही. सततच्या मोहिमा यामुळे

पेशव्यांना जास्तीत जास्त सांस्कृतिक विकास जरी करता आला नसला तरी त्यांच्या काळातील साहित्य, कला, स्थापत्यकला, वाङमय, शिल्पकला, पोवाडे या सर्वांमध्ये केलेल्या सुधारणा अत्यंत महत्वाच्या आहेत. पेशवाईमधील बखरकार व शाहीर यांमुळे पेशवेकाळातील सांस्कृतिक घटकांना महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे इतिहासात पेशवेकालीन कला, स्थापत्य, शिल्पकला यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

## १२.७ प्रश्न

१) पेशवेकालीन साहित्याची सविस्तर माहिती द्या ?

२) पेशवेकालीन कला व स्थापत्य यावर टिप लिहा.

३) पेशवेकालीन वास्तुकलेविषयी सविस्तर वर्णन करा.

## १२.८ संदर्भ

१) मोरवंचीकर, रा. श्री., आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण – शिल्पकार चित्रकोष, खंड - १ प्रकाशक – साप्ताहिक विवेक (हिंदुस्थान प्रकाशन संस्था).

२) कोलारकर, श. गो., मराठयांचा इतिहास – मंगेश प्रकाशन, नागपूर (२००२).

३) पवार, जयसिंगराव, मराठा साम्राज्याचा उदय आणि अस्त – कोल्हापूर.

४) काळे म.वा., मराठयांचा इतिहास – प्राची प्रकाशन – मुंबई (१९१८).

५) भामरे जितेंद्र, मराठयांचा इतिहास – शेठ पब्लिकेशन, मुंबई

❖❖❖❖

munotes.in